UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष डॉ.सतीश पाटील)**

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही

**मु.शी.**: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही या विषयावर सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, बाळासाहेब थोरात, भास्कर जाधव, मो. आरिफ नसीम खान, जितेंद्र आव्हाड, गोपालदास अग्रवाल, जयदत्त क्षीरसागर, विजय वडेट्टीवार, हनुमंत डोळस, नितेश राणे, पांडुरंग बरोरा, अब्दुल सत्तार, डॉ. सतीश पाटील, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री नरहरी झिरवाळ, सुनिल केदार, दिपक चव्हाण, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री अस्लम शेख, वसंतराव चव्हाण, डी.पी.सावंत, कालीदास कोळंबकर, मधुकरराव चव्हाण, काशीराम पावरा, अमिन पटेल, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री जयकुमार गोरे, राहुल बोंद्रे, अमित झनक, अमर काळे, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री डी. एस. अहिरे, हर्षवर्धन सपकाळ, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री कुणाल पाटील, शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, ॲड. त्र्यंबक भिसे, सर्वश्री अमित देशमुख, बसवराज पाटील, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव

( प्रस्ताव पुढे सुरु ...

....2

प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) : अध्यक्ष महाराज, सहा दिवसापासून या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. रोज आम्ही रात्रीपर्यंत थांबतो. मला हे पटलावर आणायचे आहे म्हणून मी बोलते. अध्यक्ष महाराज, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानते. नियम 293 च्या प्रस्तावावर बोलत असताना मी असे सांगेन की, आमचा जन्म मुंबईचा आमची कर्मभूमि मुंबईची आहे. आम्ही पूर्वी असे ऐकायचो की माणसाकडे दोन पैसे गाठीला आले की, लोक म्हणायचे जीवाची चैन करायची असेल तर मुंबईला गेले पाहिजे. केव्हा म्हणायचे जीवाची मुंबई करायची आहे म्हणून मुंबईला यायचे. आज या मुंबईची जीवाची मुंबई झालेली आहे की काय असे वाटायला लागले आहे.

अध्यक्ष महाराज, आमचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेसंदर्भात आहे. या मुंबई महानगरपालिकेचा कारभार नियोजनशून्य, अतिशय प्रभावहीन असा सुरु आहे. मुंबई महानगरपालिकेची दूरदृष्टी अजिबातच नाही. ज्या तऱ्हेने मुंबई महानगरपालिकेने कामे करावायस पाहिजे होती ती केली नाही. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. या मुंबई शहरात रोज लाखोच्या संख्येने लोक येतात. मुंबई ही जागतिक पातळीवर मानलेल्या शहरापैकी एक आहे. आपण येथिल परिस्थिती बघितली तर मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील देवनार डम्पिंग ग्राऊंडचा विषय आपण रोज वर्तमानपत्रत वाचत असतो. देवनार डम्पिंग ग्राऊंडला रोज आग लागत होती म्हणून आम्ही यासंदर्भात विधिमंडळात स्थगन प्रस्तावाच्या सूचनेच्या माध्यमातून हा विषय उपस्थित करीत होतो. या मुंबई शहरात ज्या पायाभूत सुविधा, नागरी सुविधा द्यायला पाहिजे होत्या त्यासाठी कसलीही प्रोव्हिजन केलेली नाही.

अध्यक्ष महाराज, मंत्री महोदय श्री.गिरीश बापट साहेब आम्ही पार्किंग संदर्भात एक प्रश्न विचारला. मुंबई शहरात पार्किंगच्या संदर्भात कसलीही पॉलिसी तयार केली नाही. विधानपरिषदेत माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, आम्ही मुंबई शहरात पार्किंगची पॉलिसी करणार आहोत. महानगरपालिका पार्किंगसाठी ठेकेदाराला पैसे देते, ठेकेदार पैसे घेऊन सुध्दा पार्किंग होत नसेल तर यासारखे दुसरे कोणते दुर्दैव नाही. या मुंबई शहरात मल:निस्सारण, घनकचरा, पाणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पुरवठा, शौचालय, आरोग्य, सार्वजनिक, पर्यावरण, रोजगार या बाबतीत महानगरपालिका अपयशी ठरलेली आहे.

..3



प्रा. वर्षा गायकवाड...

अध्यक्ष महाराज, मुंबई शहरात दररोज 26 लाख 35 हजार 435 इतकी वाहने रस्त्यावर धावतात अशी नोंद आहे. शहरात प्रवेश करणाऱ्या चार चाकी वाहनांमध्ये 8.4 टक्क्यांनी तर दोन चाकी वाहनांमध्ये 6.4 टक्क्यांनी वाढ झालेली आहे. दोन चाकी आणि चार चाकी वाहनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. वाहनांच्या प्रमाणात रस्त्यांसाठी बजेटमध्ये तरतूद केली जात नाही. माननीय अर्थ मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी अर्थसंकल्प मेट्रोसाठी 90 कोटी रुपयांची प्रोव्हिजन केली आहे. बाकी मुंबईच्या बाबतीत काहीही बोलले गेले नाही. महिलांसाठी ज्या 300 बसेस देणार आहात, त्यामध्ये आपण मुंबई शहर घेतलेले आहे. त्याशिवाय या अर्थसंकल्पाच्या दोन पुस्तकामध्ये या मुंबई शहराचा कोठेही उल्लेख नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. महाराष्ट्र राज्याला नव्हे तर देशाला आर्थिक पाठबळ देणारे हे मुंबई शहर आहे. एकीकडे देशात मुंबईला आर्थिक राजधानीचा दर्जा मिळत आहे. या मुंबई शहराकडून राज्य सरकार तसेच केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. बजेट सादर झाल्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी एक बैठक घेतली आणि एमएमआरडीए संदर्भात त्यांनी निवेदन केले होते. त्या निवेदनाची प्रत माझ्याकडे आहे. त्या निवेदनाचे आम्ही स्वागत करतो. एमएमआरडीएच्या बजेटमध्ये रस्ते, इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी 125 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे, हे निवेदनाद्वारे सभागृहात सांगण्यात आले आहे.

छेडानगर पासून ते सायनपर्यंत दुहेरी रस्ते करणार आहेत, असे सांगण्यात आले. त्यासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या मुंबई शहरात इतक्या मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढत आहे. आपण चीन, सिंगापूर सारख्या देशांना भेटी देतो. आपल्या देशाची तुलना आपण चिनशी करतो. आपल्या देशापेक्षा चिनची लोकसंख्या जास्त असून त्यानंतर आपल्या देशाचा दुसरा क्रमांक लागतो. चीन देशात वाहतुकीसाठी अतिशय नियोजनबध्द काम केलेले आहे. चिन देशात त्रिस्तरीय रस्ते केलेले आहेत. मुंबई शहराच्या विकासामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी ही महत्वाची असते. मुंबई शहरात एमएमआरडीएच्या माध्यमातून महत्वाची कामे केली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

जातात. सी लिंक, इस्टर्न फ्री वे, एसएलआर, जोगेश्वरी लिंक रोड, मेट्रो, मोनो रेल हे सर्व शासनाच्या माध्यमातून झालेले आहेत. आपण कोस्टल रोड करणार आहेत, परंतु त्याला बराच

...4



प्रा. वर्षा गायकवाड...

कालावधी लागणार आहे. आपल्याला सी लिंकचा अनुभव आलेला आहे. सायंकाळच्या दरम्यान आम्ही वरळीहून निघाल्यावर वांद्रे येथे पोहोचतो. तेथून आम्हाला अंधेरीला जाण्यासाठी चार-चार तास लागतात. एवढी वाहतुक त्या रस्त्यावर असते. अशा ठिकाणी दुहेरी रस्ता करण्याची आवश्यकता आहे. आम्ही ईस्टन फ्रीने येतो, त्यानंतर पुढे बॉटल नेक आहे, त्यावर कसा मार्ग काढता येईल, याकडे लक्ष दिले पाहिजे. जेवढा वेळ आम्हाला चेंबूरवरुन यायला लागत नाही त्यापेक्षा जास्त वेळ बॉटल नेट पासून पुढे यायला लागतो. यासंदर्भात काहीतरी नियोजन करण्याची गरज आहे. पेडररोड संदर्भात एक पॉलिसी करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महाराज, पाणी पुरवठ्याच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर परिस्थिती फार गंभीर आहे. मुंबई शहरात 60 ते 65 टक्के लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. महानगरपालिकेच्या धरणामध्ये फक्त 15 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. ते पाणी जूनपर्यंत पुरणार आहे. 300 स्क्वे. मीटरची इमारत असेल तर विकासकाने रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प निर्माण केला पाहिजे, असा महापालिकेने धोरणात्मक निर्णय घेतला होता. हे कागदी घोडे किती दिवस चालणार आहेत. किती इमारतींवर यासंदर्भात आपण ॲक्शन घेतली ? रेन वॉटर हार्वेस्टिंग बंधनकारक असताना फक्त ते कागदावर राहिले आहे. सोसायट्यांमध्ये वृक्ष लागवड, गार्डन, साफसफाई केली जाते. यासाठी लागणारे पाणी रेन वॉटर हार्वेस्टिंगच्या माध्यमातून वापरता येईल. काल माझ्या प्रतिक्षा नगरमध्ये दिवसभर पाणी नव्हते. आम्ही अशी प्रकरणे घेऊन महानगरपालिकेत जातो. यासंदर्भात मुंबई हाय कोर्टात याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेचा निकाल 15 डिसेंबर, 2014 रोजी लागला. हाय कोर्टाने आपल्या आदेशात सांगितले की, ही जबाबदारी राज्य शासन आणि महानगरपालिकेने घेतली पाहिजे. भारतीय संविधनाच्या अनुच्छेद 21 नुसार प्रत्येकाला पाणी मिळण्याचा अधिकार आहे. मुंबई हाय कोर्टाचा निकाल लागल्यानंतर राज्य सरकारने महानगरपालिकेला फेब्रुवारी 2015 रोजी कळविले. त्यानंतर मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी एक बैठक घेतली. दिनांक 24 फेब्रुवारी 2015 रोजी महानगरपालिकेचे आयुक्त, जल अभियंता यांनी मुंबईसाठी पाणी पुरवठा धोरण तयार केले. हे पाणी पुरवठा धोरण स्थायी समितीसमोर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मांडले गेले. स्थायी समितीने यावर सात महिने चर्चा केली, त्यानंतर दिनांक 14 ऑक्टोबर, 2015 रोजी ते धोरण फेटाळले आणि पुन्हा आयुक्तांना सांगितले की आपण यावर फेरविचार

....5



प्रा. वर्षा गायकवाड...

करावा. आज मुंबईत मध्ये पाण्याची एवढी मोठी समस्या असताना 15 लाख लोकांची पाण्याची तहान आपण कशी भागविणार आहात? आता एप्रिल महिना सुरु असून आणखी आपल्याला अडीच महिने घ्यावयाचे आहेत. साधारणपणे जुलैच्या मध्याला पाऊस पडण्याची शक्यता आहे. मी मागच्या वेळेस औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून हाच मुद्दा मांडला की, गरीब माणसाला पाण्याचे कनेक्शन घ्यायचे असेल, त्यासाठी एक बाय एकचा खड्डा तयार करावा लागतो. पाण्याच्या एका कनेक्शनसाठी 75 हजार ते एक लाख रुपयांपर्यंत खर्च येतो.

यानंतर B-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. वर्षा गायकवाड ....

हा पाईप व्यतिरिक्तचा खर्च आहे. पाईप घेण्यासाठीचा खर्च वेगळा आहे. शिवाय पर्यावरण विभाग, पाणी पुरवठा विभाग, प्रदूषण नियंत्रण विभाग आणि एई, जेई पासून एसईपर्यंत सर्वांच्या परवानग्या घ्याव्या लागतात. याकरिता मी मागच्या वेळेस औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून असे म्हटले होते की, एक खिडकी योजना असली पाहिजे. त्याच बरोबर ते पैसेही कमी झाले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आपण मला एकदा सांगावे की, मुंबईमध्ये किती पाण्याचा सप्लाय होतो आणि पाण्याची डिमांड किती आहे. हा रेशिओ एकदा काढावा. त्यांनी एकदा अधिकाऱ्यांना पर्सनल केबिनमध्ये बोलवावे आणि हा प्रश्न विचारावा की, पाण्याचा किती सप्लाय होतो, किती पाणी पुरवठा आपण घरांना देतो आणि किती कर्मशिअलला देतो ? आपल्याला यामध्ये टँकरचे किती माफिया आहेत याची माहिती होईल. जरा याचीही माहिती घ्यावी. आपण कोणाला पाणी देतो तर आज आपण आपल्या गरीब माणसाला पाणी देत नाही तर, आपण टँकरच्या माध्यमातून पाणी देतो. आज मुंबई शहरामध्ये ही परिस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, मलनिःसारण किंवा सांडपाणी याबाबत पाहिले तर, आज मुंबई शहरामध्ये सुमारे पावणेतीन हजार दशलक्ष सांडपाणी तयार होते. सांडपाण्यासाठी 7 केंद्र बांधलेली आहेत परंतु, त्यामध्ये फक्त 1 हजार 400 दशलक्ष पाण्याचे शुध्दिकरण केले जाते बाकीचे सर्व पाणी समुद्रात सोडले जाते.

अध्यक्ष महोदय, पर्यटनाबाबत मी खूप बोलू शकते. मुंबई शहराला एवढा सुंदर समुद्र किनारा असतानाही वरळी सी फेस किंवा इकडच्या सी फेसवर जाऊन तेथील पाणी किती स्वच्छ असते ते मला सांगा. एवढ्या मोठ्या देशात आपण फिरतो, फॉरेनमध्ये जातो तेव्हा तेथील समुद्राचे पाणी आपल्याला कधी काळे दिसते का, हा प्रश्न मला खरच विचारायचा आहे. त्यांच्या येथे सर्व गोष्टी समुद्राच्या मध्ये टाकल्या जातात. आपल्या येथे त्या समुद्राच्या बाहेरच टाकल्या जातात, त्यामुळे नेहमी समुद्राचे पाणी काळे दिसते व समुद्र किनाऱ्यावर नेहमी कचरा दिसतो. केवळ 7 टक्के पाण्याचे शुध्दीकरण होते. उर्वरित पाण्याचे शुध्दीकरण होत नाही. कुलाबा, घाटकोपर, मालाड, वांद्रे या सर्व ठिकाणी महानगरपालिकेने कन्सल्टंट नेमले आहेत परंतु, अजूनही त्यांचे काम सुरु झालेले नाही.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. वर्षा गायकवाड ....

अध्यक्ष महोदय, महानगरपालिकेचे बजेट किती आहे हे पहावयाचे झाले तर आम्ही कधी ऐकतो की, ते 35 हजार कोटी रुपयांचे आहे. मागच्या वेळेस ऐकले होते की ते साडेतेहतीस हजार कोटी रुपयांचे आहे, ठेवी 51 हजार कोटी रुपयांच्या आहेत. एवढ्या मोठ्या ठेवी असताना आमची ही महानगरपालिका गरीब नाही. पुष्कळशा देशांपेक्षा आमची महानगरपालिका श्रीमंत आहे. परंतु, इच्छाशक्ती व महत्त्वाकांक्षेचा अभाव, नियोजनशून्यता, पुढचा काहीच विचार करायचा नाही, भविष्याचा दृष्टिकोन नसल्याचे दिसते.

अध्यक्ष महोदय, नालेसफाईच्या बाबतीत मधल्या काळात लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाली होती. नालेसफाईच्याबाबतीत तीनतेरा वाजलेले आहेत. आपल्या आयुक्तांनी अहवाल तयार केला, अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या, सस्पेंड झाले परंतु, त्याचा उपयोग नाही. पावसाळा येण्याच्या आधी आपल्याला महानगरपालिकेच्या माध्यमातून 40 टक्के काम सुरु करायचे होते परंतु, अजून ते काम सुरु झाले नाही. मोठमोठे नाले असतात आमच्या मतदारसंघात यामुळे त्रास सहन करावा लागतो.

अध्यक्ष महोदय, रस्त्याच्या बाबतीत प्रत्येक सन्माननीय सदस्य बोलले. रस्त्यांच्या बाबतीतील भ्रष्टाचाराबाबत सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी मुद्दा उपस्थित केला. 5 कोटी रुपयांच्या तुलनेत पाहिले तर 214 रस्त्यांची कामे हातात घेण्यात आलेली आहेत. त्यासाठी जो अहवाल तयार केला गेला, त्याचा उल्लेख यांनी केला. राम किर मार्गाचा उल्लेख केला. तेथे आयुक्त श्री. संजय देशमुख गेले त्यांचा, तसेच उपायुक्तांचाही उल्लेख केला ही सर्व कमिटी तेथे गेली, त्यांनी यामध्ये बोगस चलन झाले वगैरे सर्व सांगितले. तरीही त्याच माणसाला पुन्हा मरिनलाईन्सचे काम देण्यात आले. प्रथम त्यांना 85 कोटी रुपयांचे काम दिले. नंतर अजून वाढवून 125 कोटी रुपयांचे काम दिले असे होत असेल तर ते बरोबर नाही.

**तालिका सभाध्यक्ष (डॉ. सतीश पाटील)** : सन्माननीय सदस्या आपण 15 मिनिटे बोलला आहात, ही चर्चा केवळ 10.45 पर्यंत असल्याने आपण आपल्या भाषणाचा समारोप करावा.

...3/-

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, मला माझ्या मतदारसंघातील काही मुद्दे मांडावयाचे आहेत. धारावी मधील डेव्हलपमेंट हा सर्वात महत्त्वाचा विषय आहे. राजीव गांधी प्रकल्पाच्या माध्यमातून धारावीचे 5 सेक्टरमध्ये विभाजन करण्यात आले. त्यातील 1 सेक्टर म्हाडाला देण्यात आलेला आहे. त्यामध्ये 1 इमारती बांधण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी असलेल्या पात्रतेच्या संदर्भातही आम्ही सातत्याने बोलत आहोत की, तेथील लोकांची पात्रता ठरविण्यासाठी दिनांक 1.1.2000 चा जीआर वापरावा. ट्रान्सफर पॉलिसी सुकर असावी. वडिलांच्या नावाने असलेले घर मुलाच्या नावावर होत असताना खूप त्रास होतो. घरातील भाडेकरूला उभे करून त्याचा फोटो काढला जातो आणि पात्रतेच्या संदर्भात त्रास दिला जातो. मी मुख्यमंत्री महोदय व माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे आभार मानते की, त्यांनी या संदर्भात बैठक घेतली. उर्वरित 4 सेक्टरचे टेंडर निघालेले आहे. परंतु, आज आमचे लोक आझाद मैदानला येऊन बसलेले आहेत. महानगरपालिकेच्या इमारती असतील, शाहू नगर असेल, गीतांजली नगर असेल, बालिकानगर असेल या सर्वांची मागणी आहे की, आम्हाला 750 स्क्वेअरफूटांचे घर मिळावे. पीएमजीपीच्या इमारती असतील त्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना 450 स्क्वेअरफूटांचे घर मिळावे. ज्या रेल्वेच्या अंतर्गत झोपड्या आहेत, त्याबाबत आमची अशी मागणी आहे की, रेल्वे मंत्री महोदयांशी बोलून त्यांना डीआरपीमध्ये घ्यावे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात मागचे सरकार असताना एक स्कायवॉक केला होता. त्या स्कायवॉकचे अर्धे काम होऊन 2 वर्षे झाली आहेत. मी याबाबत सातत्याने मंत्री महोदयांकडे फॉलोअप करीत आहे. म्हाडाच्या माध्यमातून तो स्कायवॉक बांधलेला आहे. तेथे खूप ट्रॅफिक असते. आज स्कायवॉकचे 14 कोटी रुपयांचे काम झालेले आहे. त्याकरिता अजून 20 कोटी रुपये लागणार आहेत परंतु, ते देण्याचे कामही शासनाच्यावतीने झालेले नाही.

अध्यक्ष महोदय, धारावीमध्ये एक आय.टी. आहे त्याचा मी उल्लेख केला, त्याकरिताही पदनिर्मिती करावी, ही नम्र विनंती आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक सामाजिक न्याय भवन त्या ठिकाणी व्हावे, ही सुध्दा माझी मागणी आहे, त्याबाबतही प्रयत्न करावा.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. वर्षा गायकवाड ....

अध्यक्ष महोदय, कोळीवाड्याचा विषयही मी मांडणार आहे. कोळी बांधव हे मुंबईचे आद्यनागरिक आहेत. मुंबईमध्ये जे कोळीवाडे आहेत, त्या संदर्भात मी मुख्यमंत्री महोदय व मंत्री महोदयांना मी विनंती करणार आहे. त्यांचा असेसमेंट टॅक्स खूप वाढविला आहे. आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, पूर्वी ज्याला 400 रुपये द्यावे लागत होते, त्याला आता 46 हजार रुपये द्यावे लागत आहेत. आज त्यांना पार्किंग, गार्डन किंवा काहीच सुविधा मिळत नाहीत. हा मुंबईतील सर्व कोळीवाड्यांचा प्रश्न आहे. हे जे 100 पटीने पैसे वाढविण्यात आलेले आहेत, त्या संदर्भात निर्णय घ्यावा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

............

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित साटम ( अंधेरी पश्चिम ) : अध्यक्ष महोदय, मुंबई आणि कोकणच्या विषयावरील म.वि.स. नियम 293 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलताना मला याची जाणीव आहे की, वेळ फार कमी आहे. परंतु, आधी मुंबईवर बोलायचे की, आधी कोकणवर बोलायचे असा प्रश्न आहे, कारण मुंबई ही आमची जन्मभूमी, कर्मभूमी आहे आणि कोकण ही आमची मूळ भूमी आहे. त्यामुळे मी सुरुवातीची 2 मिनिटे कोकणावर बोलतो, त्यानंतर मुंबईच्या विषयावर बोलतो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी असे सांगितले होते की, कोकणातील हापूस आंब्याला कोकणामध्येच बाजारपेठ मिळाली पाहिजे. तिकडच्या आंबा, काजू शेतकऱ्याला तेथेच मार्केट उपलब्ध करुन दिले पाहिजे. त्यांना मुंबईला येऊन आंबे विकावे लागतात. परंतु, मुंबई ही कन्झ्युमर कॅपिटल असल्यामुळे कोकणामध्ये तेवढ्या मोठ्या प्रमाणावर कन्झ्युमर आपल्या शेतकऱ्याला उपलब्ध होईल की नाही हे प्रश्नचिन्ह असल्याने माझी या विषयांतर्गत मुख्यमंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, मेक इन इंडियामध्ये ऑरेंज उन्नतीचा जसा करार जैन इरिगेशन आणि कोकाकोला कंपनी बरोबर करण्यात आला होता, तशाच प्रकारचा मँगो उन्नतीचा करार हा सिंधुदुर्ग, रत्नागिरीसह संपूर्ण कोकण रिजनसाठी करण्यात यावा, जेणेकरुन कोकणातील शेतकऱ्याच्या आंब्याला तेथल्या तेथेच कन्झ्युमरचे मार्केट उपलब्ध होईल. केवळ मँगो उन्नतीच नाही तर काजू उन्नती, कोकम उन्नती अशाप्रकारचे मोठ्या प्रमाणावर प्रोजेक्ट्स तेथे मेक इन इंडियामार्फत राबविले जाऊ शकतात, याची उद्योग मंत्री महोदयांनी नोंद यावी.

अध्यक्ष महोदय, टूरिझमबाबत असे बोलले गेले की, केरळ या राज्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर टूरिझम आहे. गोव्यातही खूप मोठ्या प्रमाणावर टूरिझम आहे. त्या तुलनेत कोकणातील टूरिझम फारच कमी असल्यामुळे मला असे वाटते की, कोकणाची तुलना केरळ किंवा गोव्याशी करणे म्हणजे कोकणाला कमी लेखणे आहे. कोकणातील पर्यटनाला वाव मिळाला तर कोकण डायरेक्ट साऊथ इस्ट एशिया, सिंगापूर, मलेशिया, हाँगकाँग आणि थायलँड या देशाशी स्पर्धा करेल. तेथे जे मोठे 3 प्रकल्प आहेत, सी वर्ल्ड, तेथील इंटरनल टूरिस्ट डेस्टिनेशनला लिंक करणारी मेट्रो व

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित साटम .....

तेथील चिपीचा एअरपोर्ट हे जर डेव्हलप झाले तर साऊथ इस्ट एशियाचे पर्यटन डिमॉलिश करण्याची ताकद एकट्या कोकणामध्ये आहे असा माझा विश्वास आहे. त्या दृष्टिकोनातून शासनाने मोठ्या प्रमाणावर त्याकडे लक्ष दिले तर तसे घडू शकते.

अध्यक्ष महोदय, मुंबईच्या विषयाकडे वळताना मला मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानावयाचे आहेत. गेल्या 17 महिन्यांमध्ये मुंबईच्या विषयांवर जेवढे गतिमान निर्णय झाले आणि जेवढे विषय त्यांनी मार्गी लावले, तेवढे मला असे वाटते की, गेल्या 12-15 वर्षांत कधीच लागले नव्हते. मुंबई मेट्रोचा प्रकल्प, कोस्टल रोडचा प्रकल्प, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा प्रश्न अशा कित्येक प्रश्नांवर गेल्या 10-15 वर्षांत जेवढी प्रगती झाली नव्हती तेवढी गेल्या केवळ 17 महिन्यांत झाली.

अध्यक्ष महोदय, मेट्रोचे टेंडर निघत आहे. कोस्टल रोडचे एन्व्हायरमेंटल क्लिअरन्स आपल्याला मिळालेले आहे. इंदू मिलचाही निर्णय झालेला आहे. मुंबई शहराचा डि.पी., मुंबई शहरातील ओपन स्पेसेस, मुंबई शहरातील पार्किंग पॉलिसी याबाबत क्रांतिकारक निर्णय मुख्यमंत्री महोदयांनी घेतले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. दोन दिवसांपूर्वीच त्यांनी मुंबई शहरातील हॉकर्स पॉलिसी संदर्भात एक स्टँड घेतला.

C-1/-...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित साटम.....

त्यामुळे मुंबईच्या फेरीवाल्यांचा प्रश्न सुटून मुंबईचे पदपथ आणि रस्ते कसे मोकळे होऊ शकतात आणि फेरीवाल्यांना हॉकिंग झोन्समध्ये कसे बसविले जाऊ शकते, याबाबत एक कालबाह्य कार्यक्रम महानगरपालिकेने आखावा, अशी त्यांनी घोषणा केलेली आहे. यानुषंगाने मी मुख्यमंत्री महोदयांना विनंती करणार आहे. त्यांची छबी पहाता भ्रष्टाचार विरहित प्रशासन देण्याचा त्यांचा एक प्रामाणिक प्रयत्न आणि भ्रष्टाचाराविषयी असहिष्णुता अशा प्रकारचे त्यांचे धोरण आहे. त्यामुळे मुंबईच्या रस्त्यांच्या कामासंदर्भात चौकशी लागली. नाले सफाई संदर्भात चौकशी लागली. आता तथाकथित कचरा घोटाळ्यासंदर्भात देखील फार चर्चा सुरु आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना माझी कळकळीची विनंती आहे की, मुंबई शहराचा रोड स्कॅम, डीसील्टींग स्कॅम आणि Garbage Scam is tip of the iceberg. मी फार जबाबदारीने बोलत आहे. माझी आपल्या मार्फत माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे. मुंबई शहराचा रोड स्कॅम डीसील्टींग स्कॅम आणि गारबेज स्कॅमपेक्षा मोठा मुंबईतील स्क्वेअर फुटाचा स्कॅम आहे. मुंबईच्या बिल्डींगचा स्कॅम आहे. माझे मत आहे की, मुंबईतील बिल्डींग स्कॅम हा 50 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्तीचा घोटाळा आहे. बिल्डींग प्रपोझल डिपार्टमेंट, बिल्डींग डिपार्टमेंट, एसआरए, डीपी डिपार्टमेंट या सर्व विभागाच्या संगणमताने गेले 12, 15 वर्षापासून मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. यामध्ये विशिष्ट प्रकारचे अधिकारी असून त्यांनी एक रॅकेट तयार केलेले आहे. ते रॅकेट असे आहे की, मुंबईतील बिल्डींग प्रपोझल डिपार्टमेंट, बिल्डींग डिपार्टमेंट, डीपी डिपार्टमेंट आणि एसआरए या चार डिपार्टमेंटमध्येच हे विशिष्ट प्रकारचे अधिकारी फिरत असतात, या विभागांच्या बाहेर त्यांची कधीच ट्रान्सफर होत नाही. ते कचरा खात्यामध्ये, नाले सफाईच्या खात्यामध्ये, गार्डनच्या खात्यामध्ये कधीच काम करीत नाही. परंतु गेली आठ, दहा, बारा, पंधरा वर्षापासून सतत या चार खात्यामध्येच फिरत आहेत. यासंदर्भात माझ्याकडे पुरावे आहेत. असे अनेक अधिकारी आहेत. यामध्ये श्री. महाले, श्री. सनके, श्री. अमोल दलाल, श्री. साखळकर इत्यादी अधिकारी आहेत. एसआरएमधील टांक आणि राव नावाचे अधिकारी आहेत. यांच्या पोष्टींगची पूर्ण चौकशी केली तर ते गेल्या बारा ते पंधरा वर्षापासून केवळ बिल्डींग प्रपोझल, बिल्डींग डिपार्टमेंट, डीपी डिपार्टमेंट आणि एसआरए मध्येच काम करीत आहेत. अंधेरी आणि बांद्रा येथील क्षेत्रामध्ये 3,674 फाईल्स गायब आहेत. यामध्ये मागील सरकारने एक समिती देखील

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित साटम.....

नेमली होती. माननीय मुख्यमंत्री विरोधी पक्षामध्ये असताना यासंदर्भात त्यांनी आवाज उठविला होता. परंतु अद्यापपर्यंत त्याचा कोणताही निकाल लागलेला नाही. या प्रत्येक फाईलमध्ये किमान 5 कोटी रुपयांचा घोटाळा आहे. अंधेरी आणि बांद्रा येथील साडेतीन हजार फाईल्सचा एक फाईल पाच कोटी रुपये प्रमाणे हिशोब लावला तर 18 हजार 500 कोटी रुपयांचा घोटाळा होतो. अधिकाऱ्यांच्या या रॅकेटचा सुत्रधार किंवा त्याचा किंगपीन कोण आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्याचा कोणी बॉस असेल तर मला माहीत नाही. परंतु तो कोणत्याही राजकीय पक्षाचा नगरसेवक नाही, आमदार नाही, स्टँन्डींग कमिटीचा चेअरमन नाही. महापालिका आयुक्त नाही, ॲडिशनल कमीशनरही नाही. हा व्यक्ती कोण आहे, गेल्या 12 ते 14 वर्षामध्ये सलग सात ते आठ वर्षे मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या कार्यालयामध्ये ओएसडी म्हणून काम करणारे श्री. सुधीर नाईक हे यामागचे खरे सुत्रधार किंवा किंगपीन आहेत. हे मी फार जबाबदारीने बोलत आहे. सर्व अधिकाऱ्यांची पोष्टींग कोणकोणत्या खात्यामध्ये कशी करायची, आपले अधिकारी प्रत्येक खात्यामध्ये कसे बसवायचे, त्यांच्यावर कशा प्रकारे प्रेशर आणायचे बिल्डरांकडून कशी सुपारी घ्यायची आणि अनधिकृत कामांना अधिकृत करण्याचा मार्ग कसा मोकळा करायचा अशा प्रकारचे काम सदरहू ओएसडी करतात.

अध्यक्ष महोदय, मी एक साधे उदाहरण देतो. माझ्या मतदार संघामध्ये श्रीराम नावाची शाळा आहे. ती महाराष्ट्र शासनाची ग्रेडेड स्कुल आहे. या शाळेत शिक्षण घेणारी 100 टक्के मुले गोरगरीब कुटुंबातील आहेत. तसेच या शाळेत सुमारे 50 टक्के मुले मायनॉरिटी समाजाची आहेत. त्या शाळेमध्ये क्लासरुम कमी पडत असल्यामुळे त्यांनी एक छोटीशी वेगळी बिल्डींग बांधली. त्या बिल्डींगला गेले 6 महिने बिल्डींग प्रपोझल ओसी दिली जात नाही. त्याचे कारण काय तर तुमच्या शाळेच्या बाहेरील रस्त्यावर महानगरपालिकेची दिवाबत्ती लागलेली आहे. तो रस्ता महानगरपालिकेने आपल्या सेंट्रल एजन्सीच्या फंडातून बनविलेला आहे. सदरहू रस्ता महानगरपालिकेच्या ताब्यात आहे की, नाही याचे कागदपत्र सादर करा, हे त्याचे कारण आहे. म्हणजे गरीब मुले शिक्षण घेत असलेल्या शाळेला ओसी मिळत नाही, परंतु अनेक प्रकारचे अनधिकृत ग्रॉस व्हायलेशन असणाऱ्या बिल्डींगस्ला श्री. सुधीर नाईक यांच्या सांगण्यावरुन त्यांचे बसविलेले अधिकारी ओसी देतात.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित साटम.....

अध्यक्ष महोदय, तेथे श्री. राम धस नावाचे डेप्युटी कमीशनर आहेत. The richest officer in the BMC असे धस यांना म्हणतात. त्यामुळे माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे. मुंबई शहरामध्ये 50 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त असलेल्या या स्क्वेअर फुटाच्या घोटाळ्याची चौकशी करण्याकरिता एसआयटी नेमावी. ही चौकशी एसआयटी मार्फत करण्यात यावी आणि मी सांगितलेल्या अधिकाऱ्यांची डीसप्रप्रोशनेट ॲसेटसाठी ॲन्टी करप्शनमार्फत चौकशी करावी. कारण आपले डीजी श्री. प्रविण दिक्षीत साहेब यांनी चार, सहा महिन्यापूर्वी एक स्टेटमेंट केली होती. त्यांनी असे म्हटले होते की, महानगरपालिकेतील भ्रष्टाचार कमी झाला तर किमान मुंबई शहरामधील घरांच्या किमती 500 रुपये प्रत्येक स्क्वेअर फुटाने कमी होतील. माझे तर असे मत आहे की, 500 रुपये नव्हेतर 2 ते 3 हजार रुपये स्क्वेअर फुटामागे कमी होतील. याचे कारण म्हणजे स्क्वेअर फुटामागे या अधिकाऱ्यांचे रेट फिक्स आहेत. सदरहू अधिकारी फाईल्स दाबण्यासाठी, ॲक्शन न घेण्यासाठी किंवा त्याला लिगली क्लिअर करण्यासाठी 1 ते 5 हजार रुपये पर स्क्वेअर फुटामागे लाच घेतात. या ठिकाणी राज्यमंत्री महोदय बसलेले आहेत. त्यामुळे मी आपल्या मार्फत राज्यमंत्री महोदयांना व त्यांच्यामार्फत माननीय मुख्यमंत्र्यांना ही विनंती करतो की, त्यांनी या घोटाळ्याची एसआयटी मार्फत चौकशी करावी. या अधिकाऱ्यांच्या विरुद्ध ॲन्टी करप्शनची डीसप्रप्रोशनेट ॲसेटची चौकशी लावावी. जेणे करुन मुंबई महानगरपलिकेतील बिल्डींग डिपार्टमेंटमधील भ्रष्टाचार कायमचा हद्दपार करता येईल. यामुळे मुंबई शहरामधील घरांच्या किमती कमी होऊ होतील व सामान्य मानसाला मुंबई शहरामध्ये परवडणारी घरे मिळू शकतील. माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या उत्तरामध्ये यासंदर्भातील घोषणा करावी, मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद.

---*---

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते व विरोधी पक्षाच्या इतर सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या नियम 293 वरील चर्चेवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमित साटम यांच्यानंतर मी काय बोलावे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. दोन दिवसापूर्वी सन्माननीय सदस्य आमचे मित्र ॲड.आशिष शेलार म्हणाले की, मला असे वाटते चुकीचा प्रस्ताव आलेला असून याऐवजी मुख्यमंत्री महोदयांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव आणायला पाहीजे होता. आम्हाला मुख्यमंत्री महोदयांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव आणायचा आहे. याचे कारण म्हणजे मुख्यमंत्री हे भाजपाचे किंवा शिवसेनेचे नसून संपूर्ण महाराष्ट्राचे आहेत. मुख्यमंत्री महोदयांची छबी फार चांगली आहे. त्याकरिता अभिनंदनाचा प्रस्ताव आणायला पाहीजे. परंतु यापूर्वी आमचे जे मुद्दे आहेत, त्याचे उत्तर देखील मिळाले पाहीजे. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव हे नगरविकास राज्यमंत्री असताना त्यांनी मुंबई महानगरपलिकेच्या एका स्कॅमची चौकशी लावली होती. त्याचे आजपर्यंतचे उत्तर काय आले किंवा त्या चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले हे कोणालाही माहीत नाही. तसेच सन्मानीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री असताना त्यांनी देखील एक चौकशी लावली होती. त्यांनी देवनार डंपिंग ग्राऊंडमध्ये युनायटेड फॉस्फरस लिमिटेडमुळे झालेल्या घोटाळ्याची एक समिती नेमली होती.

...D/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमिन पटेल.....

माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी डम्पींग ग्राऊंडमध्ये कोणता गैरव्यवहार झाला हे सांगितले होते. सदरहू समितीने काय अहवाल दिला आहे, या गैरव्यवहारामध्ये सत्ताधारी पक्षाचे लोक, विरोधी पक्षाचे लोक, अधिकारी सामील आहेत काय ? असतील तर त्यांची नावे सदनासमोर सांगण्यात यावी. तसेच, सदरहू समितीचा अहवाल पटलावर ठेवण्यात यावा, अशी आमची मागणी आहे. 31 मार्च रोजी बंद करण्याचे आदेश दिले. देवनार डम्पींग ग्राऊंडला दिनांक 28 जानेवारी, 2016 रोजी आग लागली होती. यामध्ये युनायटेड फॉस्फरस लि.चा हात आहे काय की इतर कोणाचा हात आहे, हे आपल्यासमोर येण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, देवनार येथे वेस्ट टू एनर्जीचा प्लँट उभा करावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमित साटम व सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले की, मुंबई महानगरपालिकेमध्ये मागील 10 वर्षात स्टँडींग मध्ये अन्डरस्टँडींग ने कामे झालेली आहे म्हणजे स्टँडींगमध्ये अन्डरस्टँडींगने कामे होतात.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार साहेबांनी सांगितले होते की, मुख्यमंत्री महोदयांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव आणला पाहिजे. तो आणण्यासाठी मी आज तयार आहे परंतु मुंबई महानरगपालिकेमध्ये 10 वर्षात जो भ्रष्टाचार झाला त्याची एसआयटीमार्फत चौकशी केली पाहिजे व त्याचा अहवाल पुढील अधिवेशन सत्रामध्ये सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा. सदरहू एसआटी चौकशीचा प्रस्ताव सभागृहाच्या पटलावर ठेवला तर मी मुख्यमंत्री महोदयांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडेन.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेचे वार्षिक बजेट 37 हजार कोटी रुपये आहे व 51 हजार कोटी रुपयांच्या ठेवी बँकेमध्ये आहेत. एवढा निधी असताना माझ्या मतदारसंघामधील जनतेला एक ग्लास स्वच्छ पाणी पिण्याकरिता मिळत नाही, यासंदर्भात चौकशी झाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे बजेट 2400 कोटी रुपये असून महानगरपालिका क्षेत्रामध्ये 3 लाख 80 हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महानगरपालिकेकडून

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमिन पटेल.....

प्रत्येक विद्यार्थ्यावर 60 हजार रुपये याप्रमाणे खर्च करण्यात येतो. एवढा खर्च करुनही या विद्यार्थी संख्येपैकी केवळ 22 विद्यार्थी एस.एस.सी.परिक्षेत 90 टक्क्यांपेक्षा अधिक मार्क घेतात. माझ्याकडे इंडियन एक्सप्रेस पेपरमध्ये छापून आलेल्या बातमीचे कटींग असून त्यामध्ये लिहिले आहे की, "20 per cent of the school students forced to quit due to lack of Secondary Schools." अतिशय चांगला मुद्दा सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी मांडला होता. त्यांनी ऑब्लीगेटरी ड्यूटी, स्टॅट्यूटरी ड्यूटी याबाबतही सांगितले होते. एज्यूकेशन ही स्टॅट्यूटरी ड्यूटी आहे. काय मिळते त्या शाळांमध्ये ?

अध्यक्ष महोदय, महानगरपालिकेच्या 1,250 शाळा असून त्यामध्ये 1100 प्राथमिक शाळा आहेत व 145 शाळा माध्यमिक शाळा आहेत. मुंबई महानगरपालिकेने माध्यमिक शाळांवर लक्ष देणे आवश्यक आहे. मुंबई महानगरपालिकेकडून जे 27 आयटम वाटप करण्यात येतात त्यामध्ये घोटाळा आहे. सन्माननीय सदस्य श्रीमती मनिषा चौधरी आपण नगर सेवक आहात मी देखील 10 वर्ष महानगरपालिकेमध्ये नगरसेवक होतो. महानगरपालिकेकडून वाटप करण्यात येणाऱ्या 27 आयटम मध्ये बॅग व बुट यांचाही समावेश आहे. सन्माननीय सदस्य श्री.पराग अळवणी यांना सांगू इच्छितो की, या बॅगचे हॅन्डल धरले तर ते हातात येते व बॅग खाली पडते, वाटप करण्यात येणाऱ्या बुटाचे सोल व वरील भाग दोन्ही वेगळे होतात, हे मी स्वतः पाहिले. याबाबतचा मुद्दा सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी मांडला होता.

अध्यक्ष महोदय, सम्माननीय सदस्य श्री आशिष शेलार जी ने इस मुद्दे को उठाया था. सम्माननीय सदस्य श्री अतुल भातखलकर जी, जो इन्क्वायरी लगायी थी....सम्माननीय सदस्य श्री भास्कर जाधव यहाँ बैठे हैं. मैं श्री पाटील साहब से कहना चाहता हूं....हमने कुछ नहीं..... सम्माननीय सदस्य श्री आशिष शेलार और श्री अमित साटम जी को बोलने के लिए कहिए. दस सालों में जो भ्रष्टाचार हुआ है उसकी इन्क्वायरी लगाईए. आपने मुंबई महानगरपालिका में 20 सालों में क्या किया है ? 33,100 people will die due to lung problems because of Deonar dumping ground. यह मैं नहीं कह रहा हूं. इंडियन एक्सप्रेस में दिनांक

.....3.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अमिन पटेल.....

31.1.2016 को छापा गया है कि सन 2050 में 33,100 लोगों की मुंबई में मौत हो जाएगी, क्योंकि देवनार में एन्वायरनमेंट खराब हो गया है. दिनांक 26 जुलाई की बारीश के बाद केंद्र सरकार ने पैसा दिया. केंद्र सरकार से जो पैसा आया था उसकी इन्क्वायरी होनी चाहिए. आज भी मुंबई में यदि वैसी ही बारीश होगी तो Mumbai unprepared for deluge like Chennai. पूरी मुंबई डूबने के लिए तैयार है. यह तो ऊपर वाले की मेहरबानी है कि बारीश लिमिट में होती है. जिस दिन ज्यादा बारीश हो जाएगी तो मुंबई फिर से डूब जाएगी.

अध्यक्ष महोदय, 3,500 करोड़ रुपये हेल्थ का बजट है. तकरीबन 60 हजार ओपीडी के पेशन्ट्स महानगरपालिका के हॉस्पिटल्स में है. 16,000 बेड्स हैं. मुंबई के महानगरपालिका के हॉस्पिटल में हेल्थ की समस्या को सुधारना है तो मेरा एक सुझाव है, इस पर आपने गौर करना चाहिए. तकरीबन 650 एम.डी. डॉक्टर हर साल मुंबई महानगरपालिका के मेडिकल कॉलेज से तैयार होते हैं और 200 डॉक्टर सरकारी कॉलेज से तैयार होते हैं. इसका मतलब 850 एम.डी. डॉक्टर इन हॉस्पिटल से तैयार होते हैं. एक साल के बॉण्ड के अंदर इन सभी डॉक्टरों को पूरे महाराष्ट्र में भेजा जाता है. महाराष्ट्र में मेडिकल कॉलेज खोलकर वहाँ के डॉक्टरों को बॉण्ड पर वहां रखा जाए. 75 प्रतिशत डॉक्टरों को मुंबई में एक साल बॉण्ड की पोस्टिंग दी तो मुंबई महानगरपालिका के जो हॉस्पिटल हैं जिन पर हम 3500 करोड़ रुपये खर्चा करते हैं, उन हॉस्पिटल में लोगों का सही इलाज होगा और लोगों का फायदा होगा.

अध्यक्ष महोदय, 21 करोड़ रुपये राज्य सरकार ने जे.जे.हॉस्पिटल को देना बाकी है. यह पैसा जे.जे.हॉस्पिटल को दे दिया जाएगा...दवाई का बिल बाकी है. मुंबई में दो हॉस्पिटल हैं. कामा हॉस्पिटल और जी.टी. हॉस्पिटल है. ये राज्य सरकार के हॉस्पिटल हैं. दोनों हॉस्पिटल में 250 बेड्स खाली पड़े हैं. मेरा ऐसा प्रस्ताव है कि कामा हॉस्पिटल में जो 250 बेड्स खाली पड़े हैं वहां पर शासन ने महिला और बच्चों के लिए एक विशेष कॅन्सर का हॉस्पिटल बनाना चाहिए. जी.टी. हॉस्पिटल में भी 250 बेड्स खाली पड़े हैं, वहां पर जेन्ट्स के लिए कॅन्सर का हॉस्पिटल बनाना चाहिए.

....4.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अमिन पटेल.....

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री और श्री पाटील साहब पर मुझे पूरा भरोसा है कि इस बारे में जब भी उत्तर दिया जाएगा तो महानगरपालिका के बारे में जरूर चौकशी की जाएगी, क्योंकि रोड के ऊपर, पानी के ऊपर, हाऊस गली के ऊपर, डिसल्टींग के ऊपर जो करोड़ों रुपये हर साल खर्च किया जाता है..... सम्माननीय सदस्य श्री पराग अलवणी साहब मेरी बातों से सहमत हैं कि वह पैसा पूरा गटर में बह जाता है. कॉन्ट्रेक्टर की मिलीभगत है, उसको खत्म करने का काम तथा इस नेक्सस को तोड़ने का काम मंत्री महोदय करेंगे, क्योंकि जो वक्त के साथ नहीं चलते, वक्त उनके साथ नहीं चलता है. परिवर्तन संसार का नियम है. हम लोग डेढ़ साल से सुन रहे हैं कि आपने पिछले 15 सालों में क्या किया ? आप वक्त का साथ नहीं देंगे तो वक्त आपका साथ नहीं देगा. परिवर्तन होने के लिए देर नहीं लगती.

अध्यक्ष महोदय, बेस्ट के इलेक्ट्रीक बिल का बहुत महत्व का मुद्दा है. दिनांक 4.11.2015 के टाईम्स ऑफ इंडिया अखबार में कहा गया है कि "Power bills in island city are three times higher than average." दस लाख ग्राहकों को लूटने का काम बेस्ट कर रही है. बताया जाता है कि ट्रान्सपोर्ट का लॉस है. इसके दो कारण है, एक तो बेस्ट इन्फ्लेटेड बिल जानबुझकर भेज रही है, यह मैं नहीं कह रहा हूं, हिंदुस्थान का जो सबसे बड़ा अखबार टाईम्स ऑफ इंडिया है, यह उसकी रिपोर्ट है. बिल को इन्फ्लेट किया जा रहा है, बढ़ाया जा रहा है. दूसरा मुद्दा ट्रान्सपोर्ट व्यवस्था में लॉस का है. मुंबई के 10 लाख लोगों को लूटने का काम बेस्ट कर रही है. इस बारे में इन्क्वायरी करने की जरूरत है. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय केळकर (ठाणे) : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी वि.स.नियम 293 अन्वये प्रस्ताव मांडला असून त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी कोकणाचा वेगळा प्रस्ताव व मुंबईचा वेगळा प्रस्ताव मांडावयास पाहिजे होता. कोकणावर पुन्हा या प्रस्तावाच्या माध्यमातून अन्याय झाला आहे, असे मला वाटते. कोकणाचा विषय मोठा असून त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात आले आहे.

अध्यक्ष महोदय, ठाणे जिल्हा हा कोकणामध्ये येत असल्याने मी ठाण्यातील समस्या मांडण्यापासून सुरुवात करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांच्या दृष्टीने रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे जिल्हेच कोकणामध्ये आहेत, असे त्यांना वाटते. परंतु कोकणामध्ये ठाणे व रायगड हे जिल्हे देखील येतात.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील भूखंड ज्याप्रमाणे निरनिराळ्या संस्थांना दिले गेले व त्याचा धंदेवाईक वापर केला गेला.

यानंतर E-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय केळकर......

तशी ठाणे महापालिकेमध्ये देखील संस्थाने उभी राहिली. महापालिकेने मैदाने केली, निरनिराळ्या प्रकारचे भूखंड निर्माण केले आणि निरनिराळ्या सामाजिक संस्थांच्या नावाने तेथील लोकांना दिले आणि त्याचा फार मोठ्या प्रमाणात गैरवापर केला. सामान्य माणसाला त्यापासून कोणत्याही प्रकारचा फायदा झाला नाही. फक्त संस्थाने निर्माण करण्याचे काम झाले असून त्यामध्ये धंदेवाईक रोजगार कमाविण्याचा काही लोकांनी काम केले आहे. त्यांचे मुदत संपली असली तरी ते सुरू आहेत. त्यामुळे माझी आपल्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांना मागणी आहे की, मुंबईला ज्याप्रमाणे चौकशी केली त्यानुसार हे दिलेले भूखंड रद्द करावेत आणि ते पुन्हा एकदा जनतेसाठी खुले करावेत, मग त्यामध्ये स्वीमिंग टँक असतील, मैदाने असतील, बगीचे असतील या सर्वांचा वापर वेगवेगळ्या पध्दतीने स्वतःच्या स्वार्थासाठी केला गेला आहे.

अध्यक्ष महाराज, ठाण्याच्या संदर्भात दुसरा एक महत्वाचा विषय असा आहे की, या ठिकाणी असलेली परिवहन सेवा ही आयसीयूमध्ये गेलेली आहे. महापालिका आयुक्त त्या ठिकाणी खऱ्या अर्थाने काम करीत आहेत. परंतु गेली अनेक वर्षे या परिवहन सेवेमध्ये ज्या लोकांनी काम केले आहे त्यांनी फार मोठा घोटाळा केला आहे. ही परिवहन सेवा अक्षरशः मोडकळीस आलेली आहे. मी त्या ठिकाणी 2 वेळा त्या परिवहन सेवेच्या आगारामध्ये भेटी दिल्या होत्या. त्यावेळी 350 बसेसपैकी 150 बसेस बंद होत्या. त्या कशाकरिता बंद होत्या तर टायर्स नाहीत आणि त्यांना लागणारे साहित्य नाही, या कारणांसाठी त्या बंद होत्या. ठाणे शहराची लोकसंख्या 21 लाख असताना तेथील परिवहन सेवेतील अर्ध्या बसेस बंद ठेवणे हे एक प्रकारचे षडयंत्र आहे असे मला वाटते. गरीबांच्या वापरासाठी असलेली ही परिवहन सेवा असून त्यांच्याकरिता ती अद्ययावत करण्यात यावी अशी माझी माननीय मुख्यमंत्र्यांकडे मागणी आहे की, आपण यामध्ये हस्तक्षेप करावा. या परिवहन सेवेतील कामगारांची देणी असतील, त्यांच्या प्राव्हीडेंट फंडचा प्रश्न असेल, अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार असेल या सर्व बाबींमध्ये हस्तक्षेप करुन ती परिवहन सेवा रुळावर आणण्यासाठी प्रयत्न करावा.

अध्यक्ष महोदय, ठाणे शहरामध्ये ड्रेनेजच्या बाबतीत बोलायचे झाले तर मलनिःस्सारणमध्ये प्रचंड घोटाळा झालेला आहे. गेल्या 10 वर्षामध्ये या वाहिन्यांचे काम पूर्ण झालेले नाही. टक्केवारी

2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय केळकर......

वाढली आहे, किंमती वाढल्या आहेत. परंतु या वाहिन्या दिलेल्या नाही. कोणत्या कंत्राटदाराला आपला आशिर्वाद आहे ते समजत नाही. कारण संगनमताने यामधील साहित्याच्या किंमती वाढविल्या गेलेल्या आहेत. त्यामुळे या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी एसीबीमार्फत झाली पाहिजे, अशा प्रकारची माझी या निमित्ताने मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी कोकणाच्या संदर्भात सांगितले की, कोकणामध्ये अनेक मोठमोठी माणसे होऊन गेली आहेत. ज्ञानपीठ विजेते, भारतरत्न, साहित्यिक, क्रीडा, क्रांतीकारकापासून ते समाजसुधारकांपर्यंत एकही क्षेत्र शिल्लक नाही की, कोकणाने या महाराष्ट्राला आणि जगालाही योगदान दिले आहे. परंतु कोकणाची पूर्वीच्या सरकारने कायम उपेक्षा केली, अन्याय केला आणि कोकणाला दुजाभावाची वागणूक दिली. एमएमआरडीएच्या माध्यमातून ठाण्यावर 6 हजार कोटी रुपयांचा अन्याय तर झालेलाच आहेच, तो आता मुख्यमंत्री भरुन काढीत आहेत. परंतु कोकणावर देखील आपल्या सरकारने अन्याय केलेला आहे. मात्र आताचे सरकार हे कोकणाचे भाग्यविधाते ठरणारे असेल, अशी मला खात्री आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली या सरकारने ज्या पध्दतीने कोकणाच्या संबंधी निर्णय घेतले आहेत. ते निर्णय ऐतिहासिक आणि क्रांतिकारी आहेत असे मला वाटते. आपण गळा काढत आहात, त्याचे कारण की आपल्याला कोकणाबद्दल प्रेम आहे आणि म्हणून मला आपला आदर आहे. परंतु ज्यावेळी आपले सरकार होते त्यावेळी कोकणातील शेतकऱ्यांकरिता, पर्यटकांकरिता, आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी, निरनिराळ्या प्रकारच्या तिर्थक्षेत्राकरिता जे करायला हवे होते ते आपण केले नाही.

अध्यक्ष महोदय, मी सरकारने अभिनंदन करील की, पायाभूत सुविधा उभारण्यासाठी कोकणातील मुंबई गोवा मार्गासाठी 3500 कोटी रुपये दिलेले आहेत. 5 वर्षामध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारने मिळून 2 लाख कोटी राज्यातील रस्ते विकासासाठी आणि कोकणातील रस्त्यांसाठी 20 हजार कोटी रुपये केंद्रीय दळणवळणमंत्री श्री. नितीन गडकरी साहेब यांनी दिले आहेत, जे आधीच्या सरकारने यापूर्वी कधीही दिले नव्हते. त्यामुळे मी सरकारचे विशेष अभिनंदन करतो.

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय केळकर......

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने पर्यटन धोरण जाहीर झाली आहे. पर्यटन धोरण जाहीर व्हावे म्हणून आपण विधान परिषद सभागृहामध्ये मागणी करीत होतात, आपण पण मागणी करीत होतात आणि मी देखील करीत होतो. परंतु त्यावेळी पर्यटन धोरण जाहीर झाले नाही. आता या सरकारने पर्यटन धोरण जाहीर केले असून मेक इन महाराष्ट्राच्या माध्यमातून मेक इन कोकण देखील होण्यास सुरूवात झालेली आहे. यामधून 1 कोटींचा रोजगार निर्माण होणार आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : सभागृहाची वेळ आता संपली असली तरी अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्यामुळे सभागृहाची वेळ 10 मिनिटांकरिता वाढविण्यात येत आहे.

श्री संजय केळकर : अध्यक्ष महोदय, 30 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक या 5 वर्षामध्ये सरकारकडून होणार आहे. त्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करील की, त्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासासाठी विशेष निधी दिलेला आहे. समुद्र विश्वाच्या निर्मितीसाठी निरनिराळ्या प्रकारच्या योजना आखलेल्या आहेत. खाड्यांमध्ये हाऊसबोट प्रकल्प असेल, स्कूबा ड्रायव्हींग इन्स्टिट्यूट असेल आणि किनारपट्टीवर धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या बाबतीत असेल, या सर्व कामांमध्ये या शासनाने अतिशय चांगले काम केले आहे.

अध्यक्ष महोदय, आंबा हा जगामध्ये गेला पाहिजे आणि जगातील पर्यटक हा कोकणात आला पाहिजे अशा प्रकारची आपली भूमिका आहे. परंतु या आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी गेल्या वेळी काहीही झाले नाही. देवगड येथील आंबा उत्पादक संशोधन केंद्राकरिता निधी देण्याची आवश्यकता असून त्यासाठी माझी मागणी आहे की, हे आंबा संशोधन केंद्र अद्ययावत करण्यात यावे. आता थ्री डी आणि तुडतूड्या किटकांनी आंब्याचे सतत नुकसान केले आहे. गेली अनेक वर्षे आंबा पिकाचे नुकसान होत असताना आंबा उत्पादक शेतकरी त्यास धैर्याने तोंड देत आहे. या निमित्ताने आपण या संशोधन केंद्राला न्याय द्यावा. कोकणचे कॅलिफोर्निया करण्यापेक्षा कॅलिफोर्नियाचे कोकण करु अशा प्रकारची भूमिका घ्यावी.

**तालिका सभाध्यक्ष :** आणखी 2-3 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे.

श्री. संजय केळकर : अध्यक्ष महोदय मला फक्त दोन तीन मुद्दे मांडावयाचे आहेत. या निमित्ताने आपण आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी काम करावे. मेरीटाईम विद्यापीठ त्या ठिकाणी निर्माण झाले पाहिजे.

**तालिका सभाध्यक्ष :** आपल्याला दुसऱ्या माध्यमातून मांडता येईल. 4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित देशमुख (लातूर शहर) : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील साहेब यांनी कोकणाच्या समस्या या विषयावर जो नियम 293 अन्वये प्रस्ताव मांडला आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी कोकणाची चर्चा सुरू आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे आपण अर्ध्या मिनिटात आपले मुद्दे मांडावेत.

श्री. संजय केळकर : अध्यक्ष महोदय, पेंडसे समितीचा अहवाल आला. परंतु तो धूळ खात पडला आहे. 20 खोऱ्यांमध्ये 7 मोठे, 99 मध्यम आणि 417 लघु पाटबंधारे प्रकल्प सुरू करण्यामध्ये पूर्वीच्या सरकारला अपयश आले. परंतु ते करण्याचे काम पुढील काळामध्ये हे शासन निश्चितपणे करणार आहे. कोकणातील माणसाला याबद्दल विश्वास आणि आशा आहे. कोकणातील माणूस धीराने आणि धैर्याने काम करणार आहे. त्याला या शासनाबद्दल निश्चितपणे विश्वास आहे. मत्स्य व्यवसाय विज्ञान विद्यापीठ निर्माण करण्याची भूमिका आहे. कोकणतील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याचे एक स्वतंत्र कोकण विद्यापीठ करावे अशा प्रकारची मागणी शैक्षणिक क्षेत्रातून होत आहे. त्यामुळे कोकणाचा खऱ्या अर्थाने कायापालट होईल.

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे आणि मुंबई शहराची अवस्था आपल्या डोळ्यापुढे आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपले विचार व्यक्त केले आहेत. मुंबईला आपण आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर म्हणून उल्लेख करतो. त्याच दिशेने मुंबईची वाटचाल होत आहे आणि व्हावी अशी सर्वांची इच्छा आहे. जगामध्ये मुंबई शहराला आंतरराष्ट्रीय दर्जा असला तरी हे शहर आज कोठे आहे, त्याची अवस्था काय आहे याचा अभ्यास आणि त्यावर चिंतन करण्याची आवश्यकता आहे. या शहरातील रस्ते, वाहतूक आणि वाहतुकीची होत असलेली कोंडी, मुंबईतील लोकल ट्रेन्स, मेट्रो, मोनोरेल, या सर्वच बाबतीत जी गती या विकास कामांना द्यायला हवी ती गती या सरकारकडून मिळत नसल्याचे दिसते आहे. हे सरकार अतिशय मोठ्या पाठबळावर या महाराष्ट्रात सत्तेवर आले आणि आपल्याकडून महाराष्ट्राच्या खूप अपेक्षा आहेत आणि त्या अपेक्षा कोठे तरी पूर्ण होत नसताना दिसतात, हे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मला आठवते की, आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या कारकिर्दीमध्ये मेट्रो फेज-1 चे भूमिपूजन मुंबईमध्ये झाले होते. मुंबई मेट्रो फेज-1 सुरू होऊन आता कार्यान्वीत आहे.

F-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख...........
मला आठवते की, आदरणीय माजी मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या कार्यकाळामध्ये फेज-2 चे भूमीपूजन झाले. त्यानंतर या सर्वच कामांना गती यायला हवी होती, ती गती आम्हाला पाहायला मिळत नाही. मेट्रोचे जाळे मुंबई शहरामध्ये आहे. किंबहूना एमएमआर व्हीजनमध्ये लवकरात लवकर विकसीत व्हावे ही मागणी मला याठिकाणी नोंदवावीशी वाटते. शहरातील रस्त्यांमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. मला महिती आहे की, हे शासन भ्रष्टाचारासंदर्भात गंभीर आहे. या बाबतीत सरकारडे ज्या काही तक्रारी आलेल्या आहेत, त्या तक्रारी आता न्यायालयामध्ये सुध्दा जाऊन पोहचलेल्या आहेत. सन्माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई आपण मुंबईचे पालक मंत्री आहात तसेच शिवसेनेचे नेते आहात. मला खात्री आहे की यांसदर्भात सुध्दा आपण हस्तक्षेप करुन रस्त्यांच्या बाबतीत ज्या काही तक्रारी आहेत त्या दूर कराल अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करावीशी वाटते.

अध्यक्ष महोदय, मोनोरेलचे काम झाले, त्यानंतर त्याचा जो विस्तार व्हायला पाहिजे होता तो झाला नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी कोस्टल रोडच्या बाबतीत आपल्या हातात सुत्रे घेतली आणि सांगितले की, 24 महिन्यामध्ये कोस्टल रोड बांधणार आहोत. 15 महिने झाले अजून या कोस्टल रोडचे भूमीपूजन झालेले आम्ही पाहिले नाही. माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई याठिकाणी आहेत. मुंबईमध्ये पब्लीक गार्डन्स नाहीत, प्ले ग्राऊंडस् नाहीत. येणाऱ्या काळामध्ये हे सर्व मोठ्या प्रमाणामध्ये विकसीत करावे लागेल. मुंबईकरांना जगण्यासाठी ज्या सोयी-सुविधा पाहिजेत, त्या आपण करीत आहात त्याबद्दल दुमत नाही. पण ज्या गतीने आणि व्याप्तीने त्या करायला हव्यात त्या होताना दिसत नाहीत. आपण एक चांगला मुद्दा मांडला होता की, रेस कोर्सचे पब्लीक पार्क करायचे. माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई यांना माझी आग्रहाची विनंती आहे की, हा जो विचार आहे तो पुढे आणला पाहिजे. हा प्रस्ताव सरकारकडून मान्य करुन घेतला पाहिजे. जर मुंबईच्या ठिकाणी पब्लीक पार्क विकसीत झाले तर सर्व मुंबईकरांना मोकळा श्वास घेता येणार आहे. या गोष्टीला मी यानिमित्ताने समर्थन करतो आणि त्यांनी यामध्ये पुढे पावले टाकावीत अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, फक्त महाराष्ट्रामध्ये मुंबई आणि पुणे येथे दोन रेसकोर्स आहेत. इतर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख........

कुठल्याही राज्यामध्ये दोन रेसकोर्स आपल्याला पाहायला मिळत नाहीत. हे रेसकोर्स पनवेलला होऊ शकते. याठिकाणी सन 2019 ला आंतरराष्ट्रीय विमानतळ होऊन उड्डाणे होणार आहेत असे माननीय मुख्यमंत्र्यांच्या तोंडून ऐकले आहे. मुंबई महानगरपालिकेने आणि नगरविकास खात्याने विशेषतः एफएसआयवर प्रिमियम, टीडीआरवर प्रिमियम यासंदर्भात आकारणी केलेली आहे. त्यामुळे मुंबई ही महागडी होत चालली आहे. मंत्रालयाच्या नुतनीकरणाचे काम सुध्दा सरकारने हाती घेतले. पण अजूनही ते लोकांसाठी खुले झालेले नाही.

----------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : अध्यक्ष महोदय, नियम 293 अन्वये चर्चेमध्ये भाग घेताना खेड तालुक्यातील लोटे एमआयडीसीमधील प्रदूषित पाणी हे दाभोड खाडीमध्ये सोडले जाते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर मासे मरत आहेत. मासेमारी करणाऱ्या लोकांवर फार मोठी उपासमारीची वेळ आलेली आहे. तसेच आंबा, काजू या पीकांवरही मोठ्या प्रमाणावर परिणाम होत आहे. कोकणातील स्थानिक पर्यावरण मंत्री असल्यामुळे आम्हाला त्यांच्याकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत. जे पाणी वाशिष्टी नदीमध्ये करभवणी येथे सोडले जाते. ते पाणी खोलवर समुद्रात सोडून हा प्रदूषणाचा प्रश्न कायमचा निकाली काढावा अशी मी याठिकाणी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, दिनांक 1 मार्च, 2015 रोजी अवकाळी पावसामुळे नुकसान झाल्याने आंबा व काजू या फळबागांसाठी नुकसान भरपाई जाहीर झालेली आहे आणि काही प्रमाणात वाटपही झालेले आहे. परंतु त्यावेळच्या अत्यंत कमी कालावधीच्या पंचनाम्यातील तफावतीमुळे काही लाभार्थी नुकसान भरपाईपासून वंचित राहिलेले आहेत. विदर्भ, मराठवाड्यामध्ये जी नुकसान भरपाई देतो त्याप्रमाणे याठिकाणी सुध्दा नुकसान भरपाई देण्यात यावी.

**तालिका सभाध्यक्ष** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमीत बैठक 11.00 वाजता होईल.

(सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10 वाजून 55 मिनिटांनी स्थगित झाली.)

-----------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर )**

**पृ.शी./मु.शी.:-** लेखी उत्तरे

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात 2.25 लाख टन कोळसा पडून असल्याबाबत

**(1) * 49583 श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) परळी औष्णिक विद्युत केंद्र पाण्याअभावी बंद असल्याने वीज केंद्रात वापरा अभावी 2.25 लाख टन कोळसा पडून असल्याची बाब माहे फेब्रुवारी, 2016 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, वापराअभावी पडून असलेल्या कोळशाची वातावरणातील घटकांशी संपर्क होऊन राख होत असल्याने शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, परळी औष्णिक विद्युत केंद्रात कोळसा उचलण्याची यंत्रणाच नसल्याने लाखो रुपयांचा कोळसा पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, संच बंद असल्यामुळे पडून असलेला कोळसा उचलण्याची यंत्रणा बसविणे, इतर केंद्रासाठी वापर होणे अथवा स्थानिक उद्योजकांना विक्री करणे इत्यादी मागण्या होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(5) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(6) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पडून असलेल्या कोळशाच्या व्यवस्थापनासाठी दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(7) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (1) होय, हे खरे आहे.

(2) हे खरे नाही.

....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 49583 ..........

सदर कोळशाचा साठा नियोजितरित्या व्यवस्थितपणे डोझरद्वारे एकत्रित करुन कॉम्पॅक्टरद्वारे दाबून (compress), रचून ठेवलेला आहे. त्यामुळे अंतर्गत ज्वलनाला प्रतिबंध झालेला आहे. तसेच अग्निशमन विभागामार्फत नियमितपणे पाण्याचा मारा करण्यात येत असल्यामुळे राख निर्माण होण्यास प्रतिबंध झाला आहे.

(3) हे खरे आहे.

परळी औष्णिक विद्युत केंद्रातील कोळसा हाताळणी विभागाची रचना ही फक्त कोळसा उतरवून घेण्यासाठीच आहे.

(4) हे खरे नाही.

(5) परळी औष्णिक विद्युत केंद्रात कोळसा उचलण्यासाठी यंत्रणा बसविण्याचे प्रस्तावित नाही. तसेच इतर केंद्रात कोळशाचा वापर करण्यासाठी वा कोळशाच्या खरेदीबाबत स्थानिक उद्योजकांकडून कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही.

(6) व (7) केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या (CEA) मार्गदर्शक तत्वानुसार कोळशाचा साठा हा 20 दिवस पुरेल एवढा ठवणे आवश्यक आहे. सध्या परळी येथे 19 दिवस पुरेल एवढा साठा आहे. सदर कोळशाच्या साठ्याचे पुढील 2 ते 3 महिने व्यवस्थितरीत्या जतन करुन आगामी पावसाळयामध्ये परळी औष्णिक विद्युत केंद्रातच वीज निर्मितीसाठी वापरण्याचे नियोजन आहे.

श्री. राणाजगजीतसिंह पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. त्यामध्ये अतिशय स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे की, खरोखर कोळसा तेथे उपलब्ध आहे. जवळजवळ 4 लाख टन कोळसा एकट्या परळीला शिल्लक आहे हे वास्तव आहे. त्याची किंमत साधारण 130 कोटी रुपया पर्यंत आहे. कोळशाला आग लागू नये म्हणून रोज तेथे चार ते

....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 49583 ..........

श्री. राणाजगजीतसिंह पाटील..........

पाच लाख लिटर पाणी मारावे लागते. माझे दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, क्लॅरिफिक व्हॅल्यू कमी होत आहे. जवळवळ सात ते आठ महिन्यापासून 130 कोटी रुपयांचा कोळसा पडून आहे. सी.ई.ए. च्या गाईड लाईन्सचा उल्लेख करण्यात आला की, 20 दिवसांचा कोळसा ठेवायला हवा. आता तेथे 19 दिवसांचा कोळसा शिल्लक आहे. परंतु हे युनिटस् बंद करत असताना नियोजन व्हायला पाहिजे होते. आपल्याकडे एवढा कोळसा आहे, इतके पाणी उपलब्ध आहे. यासर्वांचा विचार व्यवस्थित करुन कोळसा वापरला पाहिजे होता. नियोजनाचा निश्चितपणे अभाव आहे असे माझे म्हणणे आहे. मंत्री महोदयांनी याबाबत त्यांचे मत सांगावे.

अध्यक्ष महोदय, त्याच बरोबर दुसरा महत्वाचा मुद्दा आहे की, आपल्याकडे 8000 मेगावॅट चे जनरेशन कोळशावर आधारीत आहे. जगामध्ये परिस्थिती अशी आहे की, मोठया प्रमाणात पाण्याचा कमी करायला लागले आहेत. वॉटर कुल कंडेंनसरच्या ऐवजी एअर कूल वापरायला लागले आहेत. परिस्थिती अशी आहे की, साऊथ अफ्रिकेतील देशामध्ये 4 हजार मेगावॅटचा प्लान्ट आहे. जो पूर्णतः एअर कूल आहे. ड्राय कुल फॉसिल फ्युल बेस्ड पावर प्लॉंट आहे. अशा ठिकाणी पाण्याचा वापर 19 पटीने कमी राहतो. याच पावर प्लॉंटचा विचार केला. तर साधारण त्यांना 50 एमएम.सीयू. वर्षाला पाणी लागते. जर वॉटर कूल असता तर आणि त्याच कॅप्यासिटीला डायरेक्ट ड्राय कूल केला तर केवळ 3.5 एमएम.सीयू. पाणी लागते. तसेच चायना सारख्या देशामध्ये 2013 मध्ये 44 टक्के कूल बेस्ड पावर प्लॉंट आहेत. त्यांचे हवेवर आधारीत कूलींग आहे. अमेरिकेमध्ये सुध्दा जवळजवळ 30 गिगावॅटचे प्लॉंट एअर कूल आहेत. त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, नियोजनाचा अभाव आहे. त्याबाबत मंत्री महोदयांचे मत आणि पुढच्या काळात नियोजन योग्य व्हावे, ही विनंती. आणि दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे पाण्याची पहिल्या दिवसापासून चर्चा करतो आहोत. पाण्याचे दुर्भिक्ष आहे. अशा परिस्थितीमध्ये तातडीने याचा अभ्यास करुन एअर कूल कंडेन्सर वापरण्याच्या बाबतीत शासन निर्णय घेईल का ?

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 49583 ..........

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, 20 दिवसांचा कोळसा ठेवावाच लागतो. त्याप्रमाणे कोळसा ठेवला आहे. पाऊस कधी येईल आणि पाऊस आल्याबरोबर परळी केंद्र सुरु करण्याचा विचार वीज निर्मिती कंपनीचा होता. परंतु पाऊस आला नाही. कुठल्याही पावर प्रोजेक्टला लोडिंग करता येते. त्याठिकाणी अनलोडिंग केल्यानंतर तो कोळसा पुन्हा उचलणे, तो ट्रान्सपोर्ट करुन दुस-या पावर प्रोजेक्टला नेणे, 600 ते 700 रुपये त्याची प्रतीटन किंमत वाढते. ते ट्रान्सपोर्टला परवडत नाही. त्यामुळे पाण्याच्या नैसर्गिक आधारावर हा निर्णय घेतला आहे व राहिलेला कोळसा कॉम्पॅक्टकरुन डोसिंग करुन ठेवला आहे. त्याला खूप पाणी मारावे लागत नाही. साईट- साईटला केव्हा जळतो तेव्हा स्प्रिंकलर करुन पाणी मारण्याची व्यवस्था केली आहे. 20 दिवसाचा कोळसा नियमाप्रमाणे ठेवला आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, पाणी कमी वापरण्याची काय उपाययोजना आहे ? केंद्र सरकार आणि राज्य शासनाने पुढकार घेतला आहे. यानंतर कुठलेही सिंचनाचे आणि पिण्याचे पाणी पावर प्रोजेक्टला द्यायचे नाही. त्यानुसार परळी हे नांदेडहून जोडण्यासाठी डी.पी.आर तयार केला आहे. परळी आणि राज्यातील सर्वच पावर प्रोजेक्ट हे आता सिव्हेजवरचे पाणी उचणार. सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार हे मंत्री असताना त्यांनी कोराडीचा ज्यापध्दतीने प्रोजेक्ट तयार केला. त्याच आधारावर राज्यात हे सर्व प्रकल्प सिव्हेज पाणी उचलून चालविण्याचा प्रयत्न आहे.

अध्यक्ष महोदय, जुने प्रकल्प हे जुन्या टेक्नॉलॉजीवर आधारीत असल्यामुळे त्यांना त्याच पध्दतीने चालवावे लागेल. भविष्यात जर कधी नवीन प्रस्ताव करु तेव्हा कमी वापरता येईल अशी टेक्नॉलॉजी वापरणार आहोत.

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, प्रकल्पाकडे वापराविना कोळसा राहिलेला आहे, त्याची किंमत काय आहे ? अडीच लाख टन कोळसा भारतीय आहे कि आंतरराष्ट्रीय आहे ?

......5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 49583 ..........

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, हा कोळसा सिंगराणीचा असून भारतीय आहे. त्याची किंमत 120 कोटी रुपये आहे. चार लाख टन कोळसा आहे. तो कोळसा अत्यंत व्यवस्थितपणे डोझिंग करुन कॉम्पॅक्ट करुन ठेवला आहे. त्याला कुठलेही डॅमेजेस नाही. या कोळशाची व्यवस्थित दखल घेतलेली आहे.

श्री. राणाजगजीतसिंह पाटील : अध्यक्ष महोदय, नांदेडहून किती सांडपाणी आणावयाचे नियोजन आहे ? त्याला किती पैसे लागतील ? त्याच्यामधून अंदाजे 1100 मेगावॅट आहे, त्यापैकी जनरेशन किती करता येईल ? याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे, अशी विनंती आहे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, नांदेडवरुन 60 एमएलडी पाणी घेतो आहेत. 550 कोटींचा डीपीआर झाला आहे. त्याला रि-वर्क करने सुरु आहे. तो पीपीपी मॉडेल करायचा कि एनव्हीटी करायचा, महाजनकोकडून ईपीसी करायचा हा परवाच माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत बैठक घेतली त्यामध्ये त्यांनी सांगितले की, देशामध्ये आणि जगामध्ये सिव्हरेज पाणी वापरुन त्यामध्ये ज्या नवीन नवीन टेक्नॉलॉजी आल्या आहेत. त्या टेक्नॉलॉजीचा वापर करा, कमीत कमी खर्चामध्ये डीपीआर तयार होईल याची काळजी घ्यावी. आंतरराष्ट्रीय लेव्हलचे बीडींग करा, यामधून पुढे जाणार आहोत. सध्या 60 एमएलडीचा प्रस्ताव आहे. नवीन दोन प्रकल्प प्रस्तावित आहेत. बाकी दोन जुन्या प्रकल्पाकरिता लिंकेज पाणी वापरणार आहोत, जे दोन नवीन आहेत त्याला नांदेडचे पाणी घेणार आहोत.

श्री. राणाजगजीतसिंह पाटील : अध्यक्ष महोदय, पाणी नांदेडवरुन आणल्यानंतर निम्मे सेटस् फक्त चालू शकतील. माझी मंत्री महोदयांना आपल्या माध्यमातून विनंती आहे की, एअर कूल टेक्नॉलॉजीचा व्यवस्थित अभ्यास करुन निर्णय घ्यावा, एवढीच माझी विनंती आहे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, सझेशन फॉर ॲक्शन.

...........

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## वरुड ( जि.अमरावती ) तालुक्यामध्ये गौण खनिजाचे उम्खनन होत असल्याबाबत

**( 2 )* 47014 प्रा. विरेंद्र जगताप ( धामणगांव रेल्वे ) :** सन्माननीय **महसुल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

1. वरुड ( जि.अमरावती ) तालुक्यामध्यचे गौण खनिजाच्या उत्खननावर बंदी असताना महसूल विभागाच्या अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे तस्कर सर्रासपणे मोठया प्रमाणात गौण खनीज्याचे उत्खनन करुन त्याची रात्रीच्या वेळी वाहतूक करीत असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्याचे माहे ऑक्टोबर, 2015 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

( 2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

( 3) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गौण खनिजाच्या उत्खननाला आळा घालण्याबाबत तसेच संबंधित दोषी अधिका-याविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

( 4 ) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथराव खडसे : (1), (2) व (3) वरुड तालुक्यात गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी भरारी पथके नेमण्यात आली असून सदर पथकांमार्फत माहे ऑक्टोंबर, 2015 मध्ये 10 वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन रु.1,36,000/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

तसेच सन 2015-16 मध्ये वरुड तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतुकीच्या एकूण 76 प्रकरणांत रु.14,52,427/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे व 3 गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा.विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, अमरावती जिल्हयातील वरुड तालुक्यातील अवैध गौण खनिजाच्या उत्खननावर बंदीबाबतचा आहे. गौण खनिज वरुड तालुक्यामध्ये ट्रायझोन आहे.

...7/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 47014...............

प्रा.विरेंद्र जगताप..........

उत्खननावर बंदी असताना रात्रीच्या वेळी वाहतूक करुन अधिका-यांच्या डोळयात धुळफेक करुन हे महसूलाची चोरीकरित आहेत. आपण उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, सन 2015 10 वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन रु.1,36,000/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. सन 2015-16 मध्ये पुन्हा रु.14,52,427/- इतका दंड वसूल केला, हे नेमके वाहनांवर कारवाई करुन दंडात्मक वसूली केलेले उत्तर बरोबर आहे की, सन 2015-16 मध्ये पुन्हा रु.14,52,427/- इतका दंड वसूल हे उत्तर बरोबर आहे. याचे स्पष्टीकरण व्हावे. या अवैध गौण खनिजाच्या अतिभार वाहतूकीमुळे मोठया प्रमाणावर रस्त्यांची सुध्दा दुर्दशा होत आहे. अकरा ते साडेअकरा ही लोड बेअरींग क्षमता आहे. त्याच्यापेक्षा दुप्पट, तिप्पट वजनाचे ट्रक जातात. रेतीचे ट्रक तर तिप्पट वजनाचे जातात. अशा परिस्थितीमध्ये त्या रस्त्यांची अक्षरशः चाळणी होते, खड्डे पडतात, म्हणून अशा अवैध गौण खनिजाच्या अतिभार वाहतूकींवर सुध्दा शासन महसूल, परिवहन आणि पोलीस विभागाचे संयुक्त पथक करुन यांच्यावर कडक कारवाई करणार का ?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, वरुड तालुक्यामध्ये गौण खनिजाच्या उपसावर बंदी नाही. तेथे मोठे प्रमाणावर गौण खनिजाची चोरी होते अशा तक्रारी स्थानिक तहसिलदार आणि कलेक्टर यांच्याकडे प्राप्त झालेल्या आहेत. सातत्याने अशा स्वरुपाच्या अवैध चोरीला प्रतिबंध घालण्यासाठी पथके नेमण्यात आलेली आहे.

H-1 .........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.47014.....

श्री.एकनाथराव खडसे .....

ही पथके वारंवार तपासणी करीत असतात. वरुड तालुक्यात 76 प्रकरणात 14 लाख 72 हजाराचा दंड वसूल करण्यात आलेला आहे. परंतु अमरावती जिल्हयामध्ये 782 प्रकरणामध्ये 1 कोटी 28 लाख रूपये दंड वसूल करण्यात आलेला आहे. 1 कोटी 36 लाखाचा दंड आक्टोबर 2015 मधील आहे. याबाबत वारंवार अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून राज्य सरकारने वाळूच्या धोरणामध्ये काही बदल केलेले आहेत. वाळूमाफीयांवर कारवाईमध्ये वाहन जप्त करणे, वाहनाचा परस्पर लिलाव करणे, डब्ल्यूटीएस पध्दतीने मोजणी करणे, वाहनांना जीपीएस सिस्टीम लावणे, वारंवार असे गुन्हे करणाऱ्या व्यक्ती असतील तर अशा व्यक्ती व ठेकेदारांवर एमपीडीए सारखे गुन्हे दाखल करण्याची कारवाई करणे अशा स्वरूपाच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये नियमामध्ये दुरूस्ती करण्यात आलेली आहे. वारंवार असे प्रकार घडत असताना कठोर कारवाई आपण करीत आहोत, पण तुम्ही सांगितल्याप्रमाणे जेथे वाळूचे घाट असतात तेथील रस्ते खराब होतात. या रस्त्यावर मोठया टनेजने वाहतुक होत असते म्हणून ते खराब होतात ही वस्तुस्थिती आहे. म्हणून गौणखनिजाची रॉयल्टी सरकार वसूल करीत असते. प्रामुख्याने रॉयल्टीचा उपयोग त्या त्या क्षेत्रासाठी प्राधान्याने करण्याच्या सूचना सरकारकडून देण्यात आलेल्या आहेत. साधारणपणे हे जिल्हा परिषदेचे रस्ते आहेत. वाळू घाटाजवळील जिल्हा परिषदेचे रस्ते प्राधान्याने वाहतुकीस योग्य ठेवण्याकरिता सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याला अतिरिक्त निधी राज्य सरकारकडून देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

श्री.भिमराव धोंडे : अध्यक्ष महोदय, गौणखनिजाचे अमरावती जिल्हयामध्ये 1 कोटी जमा झालेले आहेत. गौणखनिजाची रक्कम प्रत्येक जिल्हयामध्ये असते पण यामध्ये फार कामे घेण्यात येत नाही. यामुळे गौणखनिजाची जी रक्कम जिल्हाधिकारी पातळीवर प्रलंबित आहे असे आपण सांगितले आहे त्यातून आम्ही सुचविलेली कामे झालेली नाहीत. आपण याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सांगून ताबडतोब रस्त्याच्या कामासाठी ही रक्कम वापरण्याकरिता आदेश देण्यात येतील का ?

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, राज्यभरातील गौणखनिजाची रक्कम पूर्वीच्या पध्दतीप्रमाणे जिल्हाधिकारी पातळीवर समान पध्दतीने वाटप करण्याचे धोरण होते. मधल्या कालखंडात उद्योग विभागाच्या माध्यमातून वाटप केले जात होते, आता हे अधिकार माननीय मुख्यमंत्री यांना मागील अडीच तीन वर्षांपूर्वी देण्यात आलेले आहेत. मुख्यमंत्री महोदयांकडे अधिकार दिल्यानंतर तेव्हापासून आजपर्यंत काही प्रमाणात वाटप झाले आहे पण परंतु पूर्णत: याचे वाटप झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. महसूल विभागाकडे ज्या विभागाकडून जी रॉयल्टी जमा होत असेल यातील रॉयल्टीचे वाटप समान तत्वावर करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांच्याकडे अशा प्रकारचे आदेश पुन्हा निर्गमीत करण्यात यावेत अशी विनंती माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे केलेली आहे. मेजर खनिजाबाबत उद्योग विभागाने निर्णय घ्यावा अशा स्वरुपाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्या संदर्भात जिल्हाधिकारी किंवा तत्सम खनिकर्म अधिकारी यांना हे अधिकार देण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, गौणखनिजाचा अवैध उपसा होत आहे. यामध्ये घडणाऱ्या प्रकाराबाबत मंत्री महोदयांनी सांगितले की, शासनाने काही उपाययोजना केलेल्या आहेत. आपण काही नवीन कायदे आणले आहेत, दंडात्मक कारवाईबाबत पुढाकार घेतला आहे. याबाबतचे सर्व अधिकार आपण जिल्हाधिकारी यांना दिलेले आहेत. या सर्व उपाययोजना करुनही या व्यवसायात व व्यवहारात मोठा पैसा गुंतलेला आहे यातून गुन्हेगारीकरण वाढलेले आहे हा महत्वाचा मुद्दा आहे. आपण कायदे कितीही कडक करण्याचा प्रयत्न केला तर स्थानिक पातळीवर संगनमताने हा कारभार होत आहे. यामध्ये पोलीस यंत्रणा, महसूल यंत्रणेचे अधिकारी असतील. प्रयत्न करुनही गैरप्रकार थांबत नाहीत. रात्रीसुध्दा सर्रासपणे वाळू उपसा सुरु आहे. भरारी पथकाने वाळूचे ठेके तपासले आहेत. पण आपण आंतरजिल्हा भरारी पथके पाठवून जास्तीचा झालेल्या वाळू उपसा तपासण्यासंबंधी कारवाई करुन उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, अवैध वाळू उपसा व वाहतुक रोखण्यासाठी मंत्री महोदयांनी कितीही प्रयत्न केले तरी त्यांचे अनिर्बंध काम चालू आहे. याबाबत निर्बंध काढून टाकण्याबाबत काही राज्यांनी प्रयोग केलेले आहेत अशी आमच्याकडे माहिती आहे. अशा प्रकारे आपले शासन काही विचार

......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील ....

करील का ? यामुळे काळाबाजार थांबविता येईल किंवा तो आपोआपच कमी होईल. कठोर उपाययोजना करताना आंतरजिल्हा पथकांकडून कारवाईची उपाययोजना करता येईल. अशी उपाययोजना करावी की, ज्यामुळे त्या जिल्हयातील गैरप्रकार रोखण्याकरिता त्यावर निर्बंध घालता येतील. काऊंटरचेक सारख्या काही उपाययोजना आपण करणार का ?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, या विषयावर मी सभागृहात विस्तृत उत्तर यापूर्वीही दिलेले आहे. हा निर्बंध काढण्याचा विषय आहे. वाळू उपसा मोठया प्रमाणावर होत असल्याने पर्यावरणाचा मोठया प्रमाणावर ऱ्हास होत आहे. पाणी जिरण्याचे प्रमाण वाळू उपशामुळे कमी होते असा अहवाल आलेला आहे. न्यायालयाचे असे निर्देश आहे की, यासंदर्भात बंधन घातले पाहिजे. सरकारने न्यायालयाच्या सूचनेप्रमाणे याबाबत चौकट निश्चित करुन यावर प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न केला आहे. वाळू उपशाबाबत वारंवार आपण उपाययोजना करीत असताना असे लक्षात आले की, वाळू आपणास फार कमी कालावधीसाठी उपलब्ध होते. मी सांगितले होते की वाळूचा लिलाव करीत असताना अगदी फेब्रुवारी, मार्च किंवा एप्रिलही उजाडतो. एप्रिलपर्यंत वाळूघाटाचे लिलाव सुरुच असतात. एप्रिलला वाळूघाटाचा लिलाव झाल्यानंतर एप्रिल ते 15 जून किंवा पाऊस पडेपर्यंत वाळू उपसू शकतो. पावसाळयाच्या कालखंडातील मधील चार महिने व त्याला नव्याने वाळूचा ठेका मिळत नाही ते चार महिने अशा प्रकारे आठ महिने बाजारामध्ये वाळूचा तुटवडा जाणवत असतो. वाळूची मागणी सुरु असते, बांधकामे थांबलेली नाहीत किंवा थांबविता येत नाहीत. अशा ठिकाणी मधल्या कालखंडामध्ये वाळूचा मोठया प्रमाणावर अवैध मार्गाने उपसा करण्याचा प्रयत्न यातील माफीयांकडून झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. राज्य सरकारने वाळूबाबत आता ग्रीन ट्रिब्युनलशी चर्चा केली आहेत, हरित न्यायालयाचेही याबाबत काही निर्देश आहेत. या न्यायालयाच्या सूचनेनुसार व त्यांच्या निर्देशानुसार अशा प्रकारे वाळूचे धोरण ठरविण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. वाळू उपसा करण्याबाबतचे टाईमटेबल ठरवावे. कोणत्या ठिकाणी वाळूचा लिलाव करावयाचा आहे याचे जून, जुलै महिन्यात वाळूघाट निश्चित करणे, ऑगस्ट महिन्यात जाहिरात देऊन टेंडर प्रक्रिया करणे, सप्टेबरमध्ये टेंडरनुसार ऑर्डर काढून उपशाची परवानगी दिली गेली पाहिजे. राज्यात 1 आक्टोबरपासून वाळू उपशाला सुरुवात झाली पाहिजे. 1 आक्टोबर ते 30

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

सप्टेबर अशी 12 महिन्याची त्याला मुदत दिल्यामुळे त्याला आवश्यकतेनुसार वाळू काढण्यास परवानगी मिळेल. तुटवडा जाणवणार नाही अशा प्रकारचा निर्णय राज्य सरकार घेत आहे. त्याबाबतचे टाईमटेबल आम्ही ठरविलेले आहे. हे टाईमटेबल याच वर्षीपासून लागू होणार आहे. आपणास आंतरजिल्हा अशी बंद आणता येत नाही. आंतरजिल्हा तपासणीसाठी आजही आपण भरारी पथक केलेले आहेत. ज्या ठिकाणी मोठया प्रमाणावर तक्रारी आहेत त्याकरिता मंत्रालयीन पातळीवरसुध्दा डयेप्युटी सेक्रेटरी यांच्याकडून राज्यात अनेक ठिकाणी तपासणी करण्यात आलेली आहे.

यानंतर आय-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.47014......

श्री.एकनाथराव खडसे.....

काही पथके त्या ठिकाणी मुंबईहून पाठविली जातात. वारंवार भरारी पथके जाऊनही चोरी सुरु असेल तर मंत्रालयीन पातळीवरुन कारवाई करण्यात येते. ठेकेदाराला किती वाळूचा ठेका दिला आणि त्याने प्रत्यक्षात किती वाळूचा उपसा केला या संदर्भात जी डब्ल्यूटीएस आणि इटीएस सिस्टम आहे, ती अचूक पध्दत असून सर्वोच्च व उच्च न्यायालयानेही त्याला मान्यता दिलेली आहे. या सिस्टमच्या आधारे कोणत्या ठेकेदाराने दिलेल्या ठेक्यापेक्षा अतिरिक्त वाळूचा उपसा केला असेल तर लक्षात येते. यामुळे या संदर्भात या सिस्टमचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. वाळूच्या ट्रकच्या मागे जीपीएस सिस्टमचा वापर करण्यात येतो. ट्रक जप्त केले जात होते नंतर ते लावले जात होते. आता ट्रक जप्त केल्यानंतर ताबडतोब लिलाव करण्याची परवानगी अधिका-यांना देण्यात आलेली आहे. याकरिता जेसीबी,नावा मशिन्सचा वापर करुन जहाज ज्याचा अवैध वाळू उपशाकरिता वापर केला जातो, त्यांचा त्या ठिकाणी स्फोट करुन उडवून देण्याची परवानगी अधिका-यांना देण्यात आलेली आहे. नदी नाल्यांमध्ये अवैध वाळूचा उपसा करण्याच्या उपयोगात आणलेली यंत्र सामग्री दारुगोळयाच्या माध्यमातून उडवून देण्याच्या सूचना अधिका-यांना देण्यात आलेल्या आहेत. अनेक ठिकाणी यासंदर्भात कारवाई करण्यास सुरुवात केलेली आहे. ज्या ज्या ठिकाणी प्रतिबंध घालता येईल त्या त्या ठिकाणी प्रतिबंध घालण्याची प्रक्रिया राज्य सरकारमार्फत करण्यात येत आहे.

......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**गुहागर (जि.रत्नागिरी) शहरातील विद्युत केबल**

**भूमिगत करण्याच्या प्रस्तावाबाबत**

***(३)*** * **४८९६७** ***श्री.भास्कर*** **जाधव (गुहागर)**सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** गुहागर (जि.रत्नागिरी) शहरातील हद्दीमध्ये माहे सन २००९ मध्ये झालेल्या फयान वादळात व समुद्राच्या खारट हवेमुळे असंख्य वीज खांब कोसळून नुकसान झाले असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी जमिनीखालून केबल टाकण्याची मा.उर्जा मंत्री यांचेकडे माहे जानेवारी २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

***(२)*** असल्यास, जमिनी खालून केबल टाकणे हा एकमेव पर्याय असल्याने महावितरण कंपनीकडे मंजुरीसाठी पाठविलेला परिपूर्ण प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

***(३)*** असल्यास, या प्रस्तावाला मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

***(४)*** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक ८.२.२०१६ रोजीी निवेदन पत्र दिलेले आहे.

***(२)*** राष्ट्रीय वादळ भय उपशमन (NCRMP) या योजनेंतर्गत उपरी तारमार्ग भूमिगत करणे, रोहित्रे उंच प्लिन्थवर बसविणे तसेच विद्युत ग्राहकांच्या सर्व्हिस वायर भूमिगत करणे इत्यादी कामाचा समावेश असून या योजनेमध्ये महाराष्ट्राच्या समुद्र किनारपट्टीलगतच्या चार जिल्हयातील एकूण १२ ठिकाणचे प्रस्ताव मदत व पुर्नवसन विभागाकडे सादर करण्यात आले होते. यामध्ये गुहागर या ठिकाणचा समावेश आहे.

***(३)*** राष्ट्रीय वादळ भय उपशमन (NCRMP) या योजनेसाठी केंद्र शासनाने रु. २०० कोटीचा निधी महावितरणसाठी मंजूर केला असून जागतिक बँकेने १२ प्रस्तावित ठिकाणांपैकी रत्नागिरी (जि.रत्नागिरी), अलिबाग (जि.रायगड) व सातपाटी (जि.पालघर) या तीन ठिकाणांची निवड केली आहे. त्यामध्ये गुहागरच्या प्रस्तावाचा समावेश नाही.

***(४)*** प्रश्न उद्‌भावत नाही.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या मी एक गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो. एनसीआरएमपी ही योजना का आणली होती, याचे कारण पुढीलप्रमाणे आहे. सन 2009 मध्ये फयान वादळ आले होते. या फयान वादळाचा सर्वाधिक फटका कोकणाला बसला होता.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***ता.प्र.क्र.* ४८९६७**

***श्री.भास्कर जाधव....***

रत्नागिरी, रागापूर, गुहागर आणि दापोली येथील फळबागा, घरादारांचे, इलेक्ट्रीसिटीचे या फयान वादळामुळे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. तत्कालीन ऊर्जामंत्री सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार यांच्या पुढाकाराने ही एनसीआरएमपी अंतर्गत ही योजना लागू करण्यात आली होती. ही योजना रत्नागिरी आणि गुहागरकरिता लागू करण्यात आली होती. यादृष्टीने याकरिता 126 कोटी रुपये मंजूर झाल्याची अधिकृत माहिती आमच्याकडे आहे. तशा प्रकारची सरकारकडे नोंद आहे. नंतरच्या सर्व्हेमध्ये या चार जिल्हयातून बारा शहरे याकरिता निवडली गेली होती. त्यामध्ये गुहागर हे शहर आहे, असे या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये दिलेले आहे. परंतु त्यानंतर शेवटच्या टप्प्यातील उत्तरामध्ये निवडल्या गेलेल्या 3 शहरांमध्ये गुहागर हे शहर नाही शासन याबाबत पुढाकार घेऊन जागतिक बँकेकडे शासनाच्या वतीने प्रस्ताव पाठविणार आहे का ? फयान वादळामुळे सर्वात जास्त नुकसान गुहागर शहरामध्ये झाले होते, ही बाब जागतिक बँकेच्या लक्षात आणून दिले पाहिजे. या तीन शहरांमध्ये गुहागर या शहराचा समावेश न करणे ही पूर्णपणे अधिका-यांची चूक आहे. जागतिक बँकेने सांगितले होते की, सर्वात जास्त नुकसान झालेली शहरे निवडण्यात यावी. गुहागर शहरामध्ये 1800 इलेक्ट्रीक पोल्स उन्मळून पडले होते. असे असतानाही हे शहर यातून डावलले गेलेले आहे. शासन या गुहागर शहराकरिता अंडरग्राऊंड केबल व्यवस्था करुन देणार आहे का ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, हा डीपीआर एकूण सहा शहरांचा झाला होता. फयान वादळामुळे कोकणातील 12 शहरांना फटका बसला होता. वर्ल्ड बँकेकडे 385 कोटी रुपयांचा डीपीआर सादर करण्यात आला होता. रत्नागिरी, सातपाटी, अलिबाग या तीन शहरांकरिता मंजूरी दिली गेली. याकरिता 200 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. त्यापैकी 100 कोटी रुपयांचा निधी मिळालेला आहे. गुहागर, गणपतीपुळे आणि वसई डीपीआरमध्ये नाहीत. उर्वरित सहा शहरे देखील डीपीआरमध्ये नाहीत. एकूण 12 शहरांना फयान वादळाचा फटका बसलेला आहे. याकरिता शासन पुन्हा वर्ल्ड बँकेकडे प्रस्ताव घेऊन जाईल.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***ता.प्र.क्र.*** ४८९६७

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

गुहागर शहराचा डीपीआर 75 कोटी रूपयांचा होता. शासन गुहागरकरिता व उर्वरित 9 शहरांकरिता ही योजना कार्यान्वित करण्यासाठी वर्ल्ड बँकेकडे प्रस्ताव पाठवेल. शासन याकरिता तातडीने आवश्यक ते प्रयत्न करेल.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री यांनी प्रश्नाला पॉईंटेड उत्तर देता देता उत्तर संदिग्ध केलेले आहे. मंत्री महोदय गुहागर शहराकरिता असे म्हणता म्हणता कोकणातील उर्वरित 09 शहरांचाही प्रस्ताव वर्ल्ड बँकेकडे पाठविण्यात यावा, त्याबाबत माझे दुमत नाही. शासनाने उर्वरित 09 शहरांनाही या माध्यमातून न्याय द्यावा. परंतु शासन खास बाब म्हणून गुहागर शहराचा डीपीआर मंजूर करून वर्ल्ड बँकेकडे त्या संदर्भातील प्रस्ताव मान्य करणार का ? याचे माननीय मंत्री यांनी स्पेसिफिक उत्तर द्यावे म्हणजे मी आपल्याला धन्यवाद द्यायला मोकळा होईल.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, याकरिता गुहागर शहर प्रथम प्राधान्याने घेण्यात येईल.

श्री.विनायक पाटील : अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न वेगळा आहे. गेल्या आठ दिवसांच्या कालावधीत माझ्या मतदारसंघातील अहमदपूर तहसील कार्यालय व एसडीओ कार्यालयातील लाईट कट केलेली आहे. लातूर जिल्हयामध्ये अनेक तहसील कार्यालये थकबाकीत असताना अहमदपूरचीच लाईट कट करण्यात आलेली आहे. ज्याप्रमाणे मराठवाडयाची वाईट अवस्था आहे, त्याचप्रमाणे अपक्ष आमदाराच्या मतदारसंघातही लाईटबाबत वाईट अवस्था होत आहे का ?मुलांच्या परीक्षा चालू आहेत. पोलीस भरती चालू आहे. कागदपत्रे काढण्याकरिता लाईटची आवश्यकता असते. माननीय मंत्री महोदय या संदर्भात संबंधितांना योग्य ते आदेश देतील का ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, या प्रश्नाचा तारांकित प्रश्नाशी संबंध नाही. तरीही सार्वजनिक बाब असल्यामुळे याबाबत तपासणी करण्यात येईल. परवाच सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील यांनी सांगितले की, वीज महामंडळ तोटयात चालू आहे. वीज महामंडळ ही एक कंपनी आहे.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***ता.प्र.क्र.*** ४८९६७

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

याकरिता संबंधितांना योग्य ते पैसे भरावेच लागतील कारण महामंडळाकडे देये पैसे येणार नाही तर कंपनी चालणार कशी ? काही ठिकाणी पैसे भरले नाही तर लाईट डिस्कनेक्ट करावीच लागते. तरी हा प्रश्न तपासून सार्वजनिक नुकसान होत असेल तर योग्य आदेश देण्यात येतील.

------

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**लातूर जिल्ह्यातील दुष्काळ आणि पाणीटंचाईमुळे**
**गावकरी स्थलांतरीत होत असल्याबाबत**

*(४)* * **५२७६३** ***श्री.अमित* विलासराव देशमुख (लातूर शहर)र:र** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

*(१)* लातूर जिल्ह्यातील सुमारे ५०,००० गावकरी दुष्काळसदृश्य परिस्थिती आणि त्यामुळे निर्माण झालेल्या भीषण पाणीटंचाईच्या समस्येमुळे स्थलांतरीत होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

*(२)* असल्यास, सुमारे १,६४० टँकर मराठवाड्यातील जिल्ह्यात पाणीपुरवठा करत असून त्यापैकी सर्वात कमी म्हणजे फक्त १६६ टँकर लातूरला पाणीपुरवठा करत आहेत, हे ही खरे आहे काय,

*(३)* असल्यास, पुणे आणि औरंगाबाद येथे मोठ्याप्रमाणावर स्थलांतर झाले असूननदुष्काळ, चाराटंचाई तसेच पाणीटंचाई या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

*(४)* नसल्यास, विलंबाची ीकारणे काय आहेत ***?***

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

*(२)* हे खरे नाही.

टंचाई परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची निकड विचारात घेऊन टँकर पुरविण्याचे अधिकार शासन निर्णय दिनांक २३.२.२०१६ नुसार संबंधित तहसीलदार यांना देण्यात आलेले आहेत.

*(३)* सद्य:स्थितीत लातूर जिल्ह्यात एकूण ३ चारा छावण्या सुरु असून त्यामध्ये एकूण १३४९ जनावरे दाखल करण्यात आली आहेत. तसेच आवश्यकतेनुसार व मागणीनुसार चारा छावण्या मंजूर करण्याचे प्रस्ताव प्राप्त झ ाल्यास कार्यवाही करण्यात येत आहे.

*(४)* प्रश्न उद्‌भ ावत नाही.

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, शासनाने दिलेल्या एका लेखी उत्तराला माझी हरकत आहे. लातूर जिल्हयातील गावकरी दुष्काळसदृश्य परिस्थिती आणि त्यामुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या समस्येमुळे स्थलांतरित होत असल्याच्या माहितीबाबत शासनाने हे खरे नाही असे उत्तर दिले आहे. याच्याशी मी सहमत नाही. स्थलांतर मोठया प्रमाणात लातूर येथून होत आहे. लातूरमध्ये उद्योग व्यापार, व्यवसाय, दुकाने बंद पडत चालली आहेत. या अनुषंगाने माझे काही थेट प्रश्न आहेत. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी लातूरला रेल्वेने पाणी देण्यासंदर्भात उपाययोजना केलेली आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, पाण्याअभावी जे उद्योग बंद पडत आहेत, त्या उद्योगांच्या कर्जावरील व्याज शासन माफ करण्याचा विचार करेल का ? त्यांच्या कर्जाचे पुर्नगठन करण्याचा विचार सरकार करेल का ? शासन यापुढे उद्योगांना पाणी कसे देणार आहे ? जे लोक 6000 लिटर पाण्याचे खाजगी टँकर्स विकत घेतात त्याचे दर पाणीटंचाईमुळे 200-300 रुपयाहून 1200-1500 रुपयांपर्यंत वाढलेले आहेत. टँकर्सचे दर गगनाला भिडलेले आहेत.

......7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.52763......

श्री.अमित देशमुख......

या टँकर्सचे दर नियंत्रित करण्यासाठी शासन आदेश जारी करणार आहे का ? लातूरच्या ग्रामीण भागामध्ये इजीएस योजना सुरु आहे. परंतु जे मजूर आणि कामगार लातूर बाहेर कामाच्या शोधात चालले आहेत, त्यांना रोखण्यासाठी ड वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये शासन इजीएस ही योजना लागू करणार आहे का ?

जे-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 52763........

श्री. अमित देशमुख.........

रोजगार हमी योजनेमध्ये मजुरांना 160 ते 180 रुपये मजुरी मिळत आहेत. यामध्ये 250 ते 300 रुपयांची वाढ करणार काय ?

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी 10 ते 11 प्रश्न विचारले आहेत. लातूर शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असल्यामुळे मला सविस्तर उत्तर देण्यासाठी अधिकचा वेळ देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांना बारावा प्रश्न विचारावयाचा आहे काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, लातूरमध्ये भीषण पाणी टंचाईच्या समस्येमुळे स्थलांतरित होत असल्याचे माहे फेब्रुवारी, 2016 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय, असा प्रश्न विचारला असता मंत्री महोदयांनी हे खरे नाही असे उत्तर दिलेले आहे. मंत्री महोदयांनी उत्तरात दुरूस्ती करण्याची गरज आहे. लातूरमध्ये भीषण पाणी टंचाईच्या समस्येमुळे अनेक लोक स्थलांतरित होत आहेत आणि ती वस्तुस्थिती आहे. मी लातूर शहरात दोन वेळा जाऊन आलेलो आहे. त्या भागातील कन्स्ट्रक्शनमध्ये काम करणारे मजुर आणि व्यावसायीक स्थलांतरित झालेले आहेत. यासंदर्भात माझ्याकडे आकडेवारी आहे. हवी असल्यास मी ती मंत्री महोदयांना देऊ शकतो. तेथील अशा प्रकारचे विदारक चित्र मी स्वत: माझ्या डोळ्यांनी पाहिलेले आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे, ते पहिल्या प्रथम दुरूस्त करण्याची गरज आहे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी माहिती दिलेली आहे, ती माझ्याकडे दिल्यास मी ती तपासून घेणार आहे. माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार लातूर शहरात कोणत्याही प्रकारे एवढ्या मोठ्या प्रमाणावर लोकांनी स्थलांतर केलेले नाही अशी माहिती आहे. मला जिल्हाधिकारी यांच्याकडून त्यासंदर्भातील आकडेवारी प्राप्त झालेली आहे आणि त्यानुसारच मी सभागृहात उत्तर देत आहे. निव्वळ पाणी नाही म्हणून लोक स्थलांतरित

......2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 52763........

श्री. एकनाथराव खडसे.......

झालेले आहेत असा विषय तरी जिल्हाधिकारी यांनी माझ्या निदर्शनास आणून दिलेला नाही. मी लातूरला एक ते दोन वेळा गेलेलो आहे. सदरहू प्रश्न चर्चेला येणार असल्यामुळे मी पुन्हा लातूर शहरात जाऊन तेथील वस्तुस्थिती काय आहे, ते जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. जिल्ह्यातून किती लोकांनी स्थलांतर केलेले आहे, त्याची नोंद आहे काय, वगैरे माहिती मी जिल्हाधिकारी यांच्याकडून जाणून घेतली होती. लातूर शहरातून ऊस तोड करणारे मजूर बाहेर गेले होते, ते आता परत यायला लागले आहेत अशी वस्तुस्थिती आहे. लातूर शहर हे शैक्षणिक संकुलाचे शहर आहे. त्या ठिकाणी एक मोठे एज्युकेशन हब आहे. त्या ठिकाणी बाहेरचे विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असून, त्यांची संख्या एक लाखाच्या आसपास आहे. लातूर शहरात परीक्षा सुरु असल्यामुळे विद्यार्थ्यांसमवेत पालक देखील आलेले आहेत. त्यामुळे त्या ठिकाणच्या परीक्षा लवकर घेऊन बाहेरील आलेल्या लोकांची संख्या कमी करावी या दृष्टीकोनातून जिल्हाधिकारी यांनी परीक्षा लवकर घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. अशा प्रकारे लातूर शहरातील लोकसंख्येचा थोडासा ताण कमी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी प्रयत्न केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, पिण्याच्या पाण्याची जबाबदारी ही लातूर महानगरपलिकेची आहे. लातूर शहरात 6 हजार किंवा 10 हजार पाण्याचे टँकर द्यायचे किंवा कसे ही संपूर्ण जबाबदारी लातूर महानगरपालिकेची आहे. परंतु, त्यांची जबाबदारी असल्यामुळे सरकारला आपली जबाबदारी टाळता येणार नाही. मला तेथील परिस्थिती सांगताना खूप वेदना होत आहेत. लातूर शहरामध्ये 8 वर्षे तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख होते. लातूर शहराची एवढी गंभीर अवस्था असावी याचे मला खूप दु:ख होत आहे. याची सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी नोंद घ्यावी. परंतु, जे झाले, ते झालेले आहे. पाणी तर द्यायलाच लागणार आहे....(गोंधळ)....जे सत्य आहे, ते मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. उद्योगाच्या संदर्भात स्थलांतर झाल्याची माहिती नाही. मांजरा सहकारी साखर कारखान्याचे पूर्ण क्रशींग झालेले आहे. मांजरा सहकारी साखर कारखान्याने पाण्याचा पुरेपूर उपयोग केलेला आहे. मांजरा सहकारी साखर कारखान्यानी पाणी वापरले नसते तर त्यातील काही पाणी लातूर शहराला पिण्यासाठी उपलब्ध करून देता येणे शक्य झाले असते.

.....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 52763........

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्री महोदय उत्तर देताना हेत्वारोप करीत आहेत. पाणी देण्यामध्ये सरकारची किती निष्क्रीयता आहे हे उत्तरातून दिसून येत आहे. सरकार पाणी द्यायला तयार नाही. रेल्वेने पाणी दिले जाईल, अशा प्रकारच्या घोषणा ऐकून आम्ही आता थकलेलो आहोत. आज लातूर शहरातील लोकांचे स्थलांतर होत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. सरकारचे अपयश लपविण्याकरिता मंत्री महोदय हेत्वारोप करीत आहेत. लातूर शहरावर निसर्ग संकट कोसळलेले आहे. लातूर शहरात गेल्या 4 वर्षापासून पाऊस नाही.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. योगेश सागर )** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी हरकतीचा मुद्दा काय आहे, तेवढा सांगावा.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, लातूर शहरावर नैसर्गिक संकट कोसळलेले आहे. लातूर शहरात गेल्या 4 वर्षापासून पाऊस नसल्यामुळे पाणी नाही. अशी परिस्थिती लातूर शहराची नसून संपूर्ण मराठवाड्याची आहे. लातूरच्या संदर्भातील प्रश्न आला म्हणून स्व. विलासराव देशमुख यांच्यावर महसूल मंत्र्यांनी हेत्वारोप केलेला असून तो त्यांनी मागे घ्यावा किंबहूना त्यांनी सभागृहाची माफी मागावी अशी आमची हरकत आहे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, जे सत्य आहे, ते आपण सर्वांनी ऐकून घेण्याची तयारी ठेवली पाहिजे. मी काहीही चुकीचे बोलत नाही. लातूर शहरात 8 वर्षे मुख्यमंत्री होते आणि ती वस्तुस्थिती आहे. 25 वर्षे त्या ठिकाणी मंत्री होते. पण पाणी येऊ शकले नाही, हे सर्वांना मान्य करावेच लागणार आहे....(अडथळा)..30 कोटी रुपयांची योजना आहे. ही वस्तुस्थिती आहे. हे सत्य आहे. हे पेपरला आलेले आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**तालिका सभाध्यक्ष** : मंत्री महोदय लातुर शहरातील वस्तुस्थिती सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत. मंत्री महोदयांनी कोणताही आरोप केलेला नाही.

.......4....

ता.प्र.क्र. 52763........

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी 115 कि.मी. लांब पाईललाईनच्या माध्यमातून उस्मानाबाद जिल्ह्याला पाणी दिलेले आहे. त्यामुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील पाणी टंचाईचा प्रश्न कमी झालेला होता. याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करीत आहे. त्यांनी उस्मानाबादला जसे पाणी दिले तशाच प्रकारे लातूर शहराला देखील पाणी देण्याची आवश्यकता होती.

अध्यक्ष महोदय, 30 कोटी रुपयांच्या पाणी पुरवठा योजनेला मान्यता दिलेली आहे. मागील सरकारने मान्यता दिलेली होती. पैसा दीड वर्षापूर्वी दिलेला आहे. 6 वेळा टेंडर काढून देखील लातूर नगरपालिकेने टेंडर घेतलेले नाही. त्याचे कारण काय आहे ? लातूर शहराला रेल्वेने पाणी देण्यासाठी रेल्वे मंत्रालयाकडे परवानगी मागितलेली आहे. त्यानुसार रेल्वे मंत्रालयाने परवानगी दिलेली आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : मंत्री महोदयांचे उत्तर झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली जाणार आहे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, जे तुम्ही केले नाही, ते आम्ही करुन दाखविणार आहोत. मांजरा सहकारी साखर कारखान्याचे पूर्ण क्रशींग झालेले आहे. मांजरा सहकारी साखर कारखान्याने पाण्याच्या पुरेपूर उपयोग केलेला आहे. मांजरा सहकारी साखर कारखान्यानी पाणी वापरले नसते तर त्यातील काही पाणी लातूर शहराला पिण्यासाठी उपलब्ध करुन देता येणे शक्य झाले असते. याबाबत सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी माहिती द्यावी. खालचे बॅरेज भरुन घेतले असून, त्याचे रेकॉर्ड आहे. त्यामुळे ऊसाला पाणी दिलेले आहे. तेथील जनतेला काय झालेले आहे हे समजले पाहिजे. मी अधिक खोलात जाणार नाही. मला लातुर शहराला पाणी द्यावयाचे आहे. 15 दिवसाच्या आत लातुर शहराला रेल्वेने पाणी देण्यासाठी प्रयत्न करणार आहोत...(अडथळा).....लातुर शहराला रल्वेन पाणी आणण्यासाठी मंजुरी मिळालेली आहे. रेल्वे प्रशासनाने मान्यता दिलेली आहे. माननीय रेलमंत्री श्री. सुरेश प्रभू यांनी आवश्यक त्या परवानग्या दिलेल्या आहेत. त्यामुळे आम्ही माननीय रेलमंत्री श्री. सुरेश प्रभू यांचे मनापासून अभिनंदन करीत आहोत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 52763........

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय लांबलचक भाषण करीत आहेत. भाषण करावयाचे असेल तर या विषयी सभागृहात वेगळ्या आयुधाचा वापर करुन चर्चा घडवून आणण्याची आवश्यकता आहे. लातूर शहरात भीषण पाणी टंचाई आहे. त्यामुळे आज दुसरा कोणताही प्रश्न महत्वाचा नाही. सभागृहाचे कामकाज बंद करुन या विषयी चर्चा करण्यासाठी माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी परवानगी देण्याची गरज आहे. मंत्री महोदय, प्रश्न सोडविण्याऐवजी ते राजकारण करीत आहेत. मंत्री महोदयांची इच्छा शक्ती असेल तर एका वर्षात आम्ही 2013 मध्ये 115 कि.मी. पाण्याची पाईपलाईन टाकून उस्मानाबाद जिल्ह्याला पाणी दिलेले आहे. अशा प्रकारे आपल्याला लातूर शहराला पाणी देता आले नसते काय ? इच्छाशक्ती असेल तर ते शक्य आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : मंत्री महोदय लातूर शहरातील परिस्थिती काय आहे, ते सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, इच्छाशक्ती आहे म्हणूनच लातुर शहराला रेल्वेने पाणी देण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यांची इच्छाशक्ती नसल्यामुळे 70 वर्षे त्यांना लातूर शहराला पाणी देता आले नव्हते. मी आतील विषयाला स्पर्श करणार नाही. 15 दिवसाच्या आत लातूर शहराला रेल्वेने पाणी आणण्यासंदर्भातील योजनेला मूर्त स्वरुप देण्यात येईल. 25 लाख लिटर पाणी रेल्वेने आणण्याचा प्रस्ताव आहे.

K-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे... ता.प्र.क्र. 52763....

केंद्र सरकारने दोन रेल्वेचे रॅक देण्याचे मान्य केलेले आहे. मी खासकरुन केंद्र सरकारचे अभिनंदन करीन की, त्यांनी येणाऱ्या खर्चात काही कन्सीशन देण्याचे मान्य केले आहे. लातूर शहरातील पाण्याचा प्रश्न पंधरा दिवसाच्या आत सोडविण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करीन. आमची इच्छाशक्ती आहे म्हणूनच आम्ही रेल्वेने पाणी आणत आहोत. तेलंगणाचे माननीय मंत्री श्रीमती निर्मला सिथारामन यांनी मला फोन करुन सांगितले की, आवश्यकता असेल तर तेलंगणाला पाणी उपलब्ध आहे. बाहेरचे राज्य पाणी द्यायला तयार आहे. आपण इच्छा शक्ती म्हणत आहात, इच्छाशक्ती असती तर कशाला आज पाणी टंचाई भासली असती. ..(अडथळा)... 17 लाख टन क्रसिंग झाले....(अडथळा).. मी राजकीय भूमिकेतून बघत नाही. मला पाणी द्यावयाचे आहे. कोणत्याही स्थितीत, कितीही खर्च आला तरी लातूरलाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासठी युध्द पातळीवर आमचे प्रयत्न सुरु आहेत. जेथे आवश्यक असेल, ते नियमात बसत नसेल तरी सुध्दा नियम बदलविण्याचा निर्णय घेऊन आम्ही पाणी देणार आहोत. पंधरा दिवसाच्या आत आम्ही लातूरला रेल्वेने पाणी पोहोचविणार आहोत

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य आपल्या जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलत असतात)

श्री.संभाजी पाटील निलंगेकर : अध्यक्ष महाराज, आज सभागृहात विरोधी पक्ष ज्या भुमिकेतून आक्रमक झालेला आहे. मागील पंधरा वर्षामध्ये एवढा ... (अडथळा).....

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महाराज, मूळ प्रश्न हा स्थलांतराबद्दलचा आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, लातूर जिल्ह्यातून अजिबात स्थलांतर झालेले नाही. आपण लातूरच्या अधिकाऱ्यांना विचारले तर ते नाहीच म्हणतील कारण त्यांना आपले अपयश लपवायचे आहे. लातूर जिल्ह्यातील लोक पुणे, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, ठाणे येथे स्थलांतरित झालेले आहेत. वर्तमानपत्रात अशा बातम्या आलेल्या आहेत की, कोणत्या गावातील लोक कोठे गेलेले आहेत. आपण त्यांना विचारा की, मराठवाड्यातील लोक त्या ठिकाणी आलेली आहेत का, मग आपल्याला खरी माहिती मिळेल. मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे की, लातूर जिल्ह्यामध्ये एकूण 3 जनावरांच्या छावण्या चालू आहेत. त्यामध्ये 1350 जनावरे आहेत. आजरोजी मराठवाड्यात

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण ..... ता.प्र.क्र. 52763....

दुष्काळ आहे की नाही? जनावरांना प्यायला पाणी मिळत नाही. तेथे माणसाना प्यायला पाणी नाही. जनावरांना बिस्लरी बॉटलने पाणी मिळते काय प्यायला? सन 2013 ला आम्ही 10 लाख जनावरे छावण्यामध्ये सांभाळली होती, हे आपल्याला माहिती आहे. लातूर जिल्ह्यात इतका गंभीर दुष्काळ होता. मला या निमित्ताने प्रश्न विचारावयाचा आहे की, छावण्या सुरु करण्याची परवानगी कोणत्या स्तरावरुन दिली जाते ?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महाराज, चाऱ्याच्या छावण्यांची ज्या ठिकाणी आवश्यकता असेल तेथे परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत. आवश्यकतेनुसार तीनच काय तीस छावण्यांची आवश्यकता असेल तर त्यासाठी जिल्हाधिकारी सक्षम आहेत. यासाठी राज्य सरकारकडे येण्याची आवश्यकता नाही. आपल्याकडे माहिती असेल, परंतु माझ्याकडेही माहिती आहे, मी तपासून घेतो. या राज्यातील एकही जनावर चाऱ्याविना मरणार नाही, अशी हमी सरकार म्हणून मी देतो. मला आता आश्चर्य वाटते...(गोंधळ).. ... बाकीचा शब्द गाळून सांगतो इतके वर्षे मराठवाड्यातील चार-चार मुख्यमंत्री झाले आहेत. आपल्या सारखे कार्यक्षम मुख्यमंत्री असताना हा प्रश्न मला सोडवावा लागतो. आपल्या कालखंडात 40-40 दिवस पाणी नव्हते. आपण रेकॉर्ड तपासून पहावे. जर चुकीचे असेल तर मला सांगा. मी काल स्वतः पूर्ण माहिती घेतली. मी परवा दिवशी लातूरला स्वतः गेलो होतो. मी अधिकाऱ्यांशी स्वतः समक्ष चर्चा केली. माझ्याकडे दररोज संध्याकाळी सर्व जिल्ह्यांचे लेखी रिपोर्ट जिल्हा प्रशासनाकडून येतात. काही चुकत असेल तर आपण निदर्शनास आणावे, आम्ही त्यामध्ये दुरुस्ती करु आपण म्हणत आहात तशी परिस्थिती माझ्या निदर्शनास कोणी आणून दिलेली नाही. जर स्थलांरित झाले अशी तुमच्याकडे माहिती असेल, प्रशासनाकडून चुकीची माहिती पाठविली असेल तर प्रशासनाविरुध्द कारवाई करु.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, माननीय महसूल मंत्र्यांनी मघाशी ज्या उत्तराचा उल्लेख केला की, स्व. विलासराव देशमुख हे राज्याचे मुख्यमंत्री अनेक वर्षे होते. मांजरा नदीवर बॅरेजेस बांधण्याचे काम त्यांच्या काळात झाले. दुष्काळ हा 70 वर्षापासून नाही. आपण ज्याचा उल्लेख केला की, तुम्ही 70 वर्षे काहीच केले नाही. मांजरा नदीवर केलेले काम तसेच लातूर

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील... ता.प्र.क्र. 52763....

शहरात विकासाचे केलेले काम याप्रमाणे माननीय महसूल मंत्री श्री.खडसे साहेब आपल्या जळगावमध्ये काम करुन दाखवा. स्व.विलासराव देशमुख यांचे नाव काढून राजकरण निर्माण करु नका. "नाचता येईना आंगण वाकडे" अशी परिस्थिती या सरकारची झालेली आहे. आपण रेल्वेने पाणी आणतो म्हणतात. आपण जानेवारी पासून रेल्वेने पाणी आण्ायला सुरुवात करायला पाहिजे होती. अजून रेल्वेच्या डब्यांना आतून रंग देण्याचे काम चालू आहे. एका रेल्वेतून किती पाणी मिळणार आहे? जर सरकारला खरोखरच मराठवाड्याला पाणी द्यावयाचे असेल तर 10 रेल्वे आणणे गरजेचे आहे. केवळ एक रेल्वे आणून सांगणार की, आम्ही रेल्वेने पाणी देतो. हा उद्योग सरकारने कधी बंद करणार आहे? राजकारणापेक्षा दुष्काळी भागातील जनतेला मदत करण्याची दानत सरकार कधी दाखविल?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महाराज, यांचे पाप लपविण्यासाठी हा केविलवाणा प्रकार आहे. या राज्यामध्ये पहिल्यांदा रेल्वेने पाणी आणण्याचे काम आम्ही पंधरा दिवसात करतो आहोत. जे आपल्याला पंधरा वर्षात जमले नाही.....(अडथळा) इतक्या वर्षात आपण केलेली पाप आम्ही फेडत आहोत. एक रॅक नव्हे तर दुसरी रॅक तयार झालेली आहे. आपण पाईपलाईन टाकू शकला नाही. आम्हाला रेल्वेने पाणी नेणार आहोत. या राज्यामध्ये कोणीही पाण्याविना, चाऱ्याविना मरणार नाही. तुमच्यासारखे हाल आम्ही होऊ देणार नाही. काहीही झाले तरी आम्ही निर्णय घेऊ. इतक्या वर्षानंतर काहीही बोलले तरी जनता तुमच्यावर आता विश्वास ठेवणार नाही.

( विरोधी पक्षाचे तसेच सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाचवेळी बोलत असतात.)

**तालिका सभाध्यक्ष** : मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. आता आपण पुढील प्रश्न चर्चेला घेऊया. मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की हा महत्वाचा प्रश्न आहे.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राजूरा (जि.चंद्रपूर) शहरालगतच्या सर्व्हे क्र.१४९ मधील भूखंडाची महसूल विभागाकडून करण्यात आलेली मोजणी**

**(5) * ५१७४४ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजा राजूरा (जि.चंद्रपूर) शहरालगतच्या सर्व्हे क्र. १४९ मधील जमिनीची मोजणी भूमि अभिलेख व महसूल विभागाने दिनांक १५ व १६ जानेवारी, २०१६ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मोजणीसाठी तयार केलेल्या दस्तऐवजानुसार सर्व्हे नं.१४९/४/२ मधील १.६२ हे.आर., सर्व्हे नं. १४९/१० मधील ३.०६ हे.आर., सर्व्हे नं.१४९/११/२ मधील २.०२ हे.आर, १४९/३ मधील ०.७८ हे.आर, सर्व्हे नं.१४९/१४ मधील १.८२ हे.आर. सर्व्हे नं.१४९/१५ अ मधील २.११ हे.आर. सर्व्हे नं. १४९/१५ ब मधील २.०२ हे.आर. सर्व्हे नं.१४९/१६ मधील ०.६२ हे.आर. जमिन शहरातील धनाढ्यांच्या नावाने असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त जमिन आदिवासींना वाटप केल्यानंतर सरकार जमा झाली असतांना ही जमिन गैरआदिवासींच्या नावाने देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(5)5असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (2), (3), (4), (5) व (६) मौजा राजूरा येथील शासकीय भुखंड सर्व्हे क्र.१४९ चे वेगवेगळे पोट हिस्से असून सदर भूखंडाची मोजणी दिनांक १५.०१.२०१६ ते दि.२२.०२.२०१६ या कालावधीत झालेली आहे. सर्व्हे क्र. १४९ चे प्रश्नाधिन ८ पोट हिस्से वेगवेगळया ८ व्यक्तींना वाटप करण्यात आले आहे. उक्त ८ व्यक्तींपैकी २ व्यक्ती आदिवासी असून अन्य ६ व्यक्ती गैरआदिवासी आहेत. सदर वाटप करण्यात आलेली जमीन कधीही शासन जमा करण्यात आलेली नाही.

स.क्र.१४९/११/२ (क्षेत्र २.०२ हेक्टर) ही जमीन वाटपाद्वारे श्री मलका सोयाम या आदिवासीस मिळाली होती. त्यांनी सदर जमीन श्री. सुरेश शंकर सिडाम या आदिवासीस विक्री केली. श्री. सिडाम यांनी सदर जमिनीची अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडून अकृषिक मंजूरी घेऊन व लेआऊट टाकून प्लॉटस्ची विक्री केली आहे.

स.क्र. १४९/१४ क्षेत्र १.८२ हेक्टर ही जमीन वाटपाचे आधारे श्रीमती पिसी ज. किसना गोंड या आदिवासीस मिळाली होती त्यांनी सदर जमीन श्री. माधव पंधारे या आदिवासीस विक्री केली. श्री पंधारे यांनी सदर जमिनीची अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडून अकृषिक मंजूरी घेऊन व लेआऊट टाकून प्लॉटस्ची विक्री केली आहे.

वरील दोन्ही प्रकरणी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी अपर जिल्हाधिकारी यांचे अकृषिक परवानगी संबधी आदेश दि.२४.०६.२०१३ रोजी रद्द केले होते. सदर दोन्ही जमिनीबाबतच्या अपील प्रकरणी अपर आयुक्त, नागपूर यांनी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे सदर आदेश रद्द करुन अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे आदेश कायम केले आहेत.

डॉ.सुनिल देशमुख : अध्यक्ष महाराज, हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. मौजा राजूरा (जि.चंद्रपूर) शहरालगतच्या सर्व्हे क्रमांक 149 चे आठ पोट हिस्से केले. त्यातील दोन आदिवासींना दिले आणि सहा अन्य लोकांना दिले. या पोट हिस्स्याच्या सर्व्हे क्र. 149/11/2 व 149/14 हे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुनिल देशमुख... ता.प्र.क्र.51744...

दोन पोट हिस्से कोणतीही परवानगी न घेता याचे हस्तांतरण केले. मुख्य म्हणजे ते एन.ए. केले. अप्पर जिल्हाधिकारी आणि अप्पर आयुक्त यांनी यामध्ये भ्रष्टाचार केलेला आहे. ही अनियमितता केलेली आहे, त्याच्यावर शासन काय कारवाई करणार आहे? या दोन्ही अधिकाऱ्यांना तत्काळ बडतर्फ केले पाहिजे. सदरची नस्ती मंत्रालयात बोलावून प्रधान सचिव आणि मंत्री महोदय याची फेरतपासणी करणार आहात काय?

( विरोधी पक्षाचे तसेच सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाचवेळी बोलत असतात.)

श्री.संभाजी पाटील : अध्यक्ष महाराज,...

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.संभाजीराव पाटील आपण कृपया आपल्या जागेवर बसावे.

श्री.संजय राठोड : अध्यक्ष महाराज, राजूरा येथील शासकीय भूखंड सर्व्हे क्र.149 चे आठ भाग करून दोन आदिवासींना आणि सहा बिगर आदिवासींना दिले होते. या ठिकाणी निश्चितपणे अनियमितता झाल्याचे दिसून येत आहे.

यानंतर L-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )**

( सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन अध्यक्ष महोदयांशी बोलतात)

ता.प्र.क्र. 51744 ....

श्री. संजय राठोड ....

श्री. मलका सोयाम या आदिवासीला ही जमीन वाटप करण्यात आली होती. त्याने श्री. सुरेश शंकर सिडाम या आदिवासीला ही जमीन विकलेली आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन उचित कारवाई करण्यात येईल. ... ( अडथळा ) ...

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी कृपया जागेवर बसावे. मला माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे ऐकू द्या.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आज संपूर्ण मराठवाडा पाण्यासाठी तहानलेला आहे. हजारो शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. हजारो जनावरे चाऱ्याअभावी खुंट्यावर गेली. सरकारला कोणत्याही प्रकारच्या संवेदना नाहीत. सरकार घोषणे पलीकडे जात नाही. आज लातूर जिल्ह्याचा प्रश्न होता. त्या प्रश्नावर चर्चा होत असताना आम्ही त्या ठिकाणी रेल्वेने पाणी देऊ असे मंत्री महोदय म्हणाले. आम्ही हे गेले 4 महिने ऐकत आहोत. यांची रेल्वे काही येत नाही. लोक तहानेल्या अवस्थेत मरत आहेत.

अध्यक्ष महोदय, इच्छाशक्ती असेल तर उजनी धरणातील पाणी सरकार 1 वर्षात लातूरला आणू शकले असते. मागच्या काळात काय घडले ते सोडून द्या. मंत्री महोदयांनी स्वर्गीय विलासराव देशमुखांचा संदर्भ दिला. ज्या आविभार्वाने स्वर्गीय विलासराव देशमुख यांचे नाव घेताना अवमानास्पद पध्दतीने त्यांचा अवमान होईल अशा पध्दतीचे वक्तव्य मंत्री महोदयांनी केले आहे. आमची मागणी आहे की, ते एक तर कामकाजातून काढून टाकले पाहिजे किंवा त्यांनी सभागृहाची माफी मागावी. स्वर्गीय विलासराव देशमुखांचा संदर्भ देण्याचे काही कारण नव्हते. ..( अडथळा ) ...

**अध्यक्ष** : स्वर्गीय विलासराव देशमुखांच्या संदर्भातील वक्तव्याबाबत मंत्री महोदय खुलासा करीत आहेत. ... ( अडथळा ) ...

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन अध्यक्ष महोदयांशी बोलतात)

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, माननीय विलासरावांचे नाव मी मागे घेतो आणि माजी मुख्यमंत्री असे म्हणतो, त्याला तर हरकत नाही ? माननीय विरोधी पक्ष नेते मी तुम्हाला एक सांगतो की, तुम्ही कितीही म्हटले तरी त्या ठिकाणी आता पाणी येत आहे, त्यामुळे तुमचा बोलण्याचा प्रश्नच संपून जाईल. तो प्रश्न सुटला की मांडायचे काय ही चिंता तुम्हाला पडली आहे. रेल्वेने पाणी येणार नाही असे जे बोलले जाते त्याबाबत मी हे सांगू इच्छितो की, हे पाणी येणारच. त्यामुळे चिंता करु नका. जे तुम्ही केले नाही, ते हे सरकार करणारच. आम्ही सक्षम आहोत. ( अडथळा) ....

मला तर एक आश्चर्य वाटते, माननीय विरोधी पक्ष नेते मी राजकारणाच्या पलीकडे बोलतो. बॅरेजेस बांधल्यावर, त्या कोल्हापूर बंधाऱ्यापासून बॅरेजेस संदर्भात दादांनी प्रयत्न केला मी स्वत: त्यावेळेस त्याचे कौतुक केले होते, कारण बॅरेज माझ्याकडे होते. आमच्या शहराला पाण्याची कमतरता जाणवते आहे अशावेळेस कारखाने चालवायचे, 17-17 लाख मेट्रिक टन ऊसाचे क्रशिंग करायचे. मांजरा धरणातील पाणी त्या बॅरेजेसमध्ये घ्यायचे, त्याला पाणी द्यायचे आणि लोकांना पाणी द्यायचे हे तुम्हाला पटते काय ? हे तुम्हाला पटत असेल तर मी तुम्हाला धन्यवाद देतो. तुम्ही ते पाणी अडवून ठेवले असते तर ही परिस्थिती निर्माण झाली नसती. परंतु, मी त्या विषयात जात नाही. कोणत्याही परिस्थितीत 15 दिवसांच्यात आत लातूर शहरामध्ये पाणी येईल. त्याबाबत माननीय पंतप्रधान स्वत: लक्ष घालत आहेत. माननीय श्री. पियुष गोयल, माननीय श्री. सुरेश प्रभू लक्ष घालत आहेत. मी स्वत: दररोज त्याबाबत बोलत आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख मी आपल्याला आश्वस्त करतो की, निश्चितच 15 दिवसांच्याही आधी तेथे पाणी आणण्याचा माझा प्रयत्न आहे. मी स्वत: तेथे जाऊन बसणार आहे. जे झाले आहे ते विसरा, पाणी कसे मिळेल ते पहा. आम्ही यासाठी काटेकोरपणे प्रयत्न करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, मला आठवते आहे की, आपण पहिल्या दिवसापासून आजपर्यंत दुष्काळावर चर्चा करीत आहोत. त्यामुळे या अधिवेशनात तेच प्रश्न आहेत व तीच उत्तरे आहेत. आम्ही प्रयत्न करणार, त्यामध्ये कमी पडणार नाही, हे मी या सभागृहाला वारंवार आश्वस्त करतो. यासाठी वेगळे नियम केले, वेगळ्या तरतुदी केल्या कधी नव्हे एवढा पैसा आम्ही आता उपलब्ध करुन घेतलेला आहे. त्यामुळे आम्ही पाण्याची व्यवस्था निश्चितपणे करु, एवढेच सांगतो. ...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलेमध्ये येऊन अध्यक्ष महोदयांशी बोलतात)

श्री. एकनाथराव खडसे ....

माननीय विलासरावांचे नाव मी घेतले ते मी मागे घेतलेले आहे. परंतु, मला खरेच दुःख वाटते. मी महाराष्ट्राला सांगेन की, ज्या मराठवाड्यात 4-4 मुख्यमंत्री होतात तेथे ही परिस्थिती उद्‌भवत असेल तर हा हसण्यावारी नेण्यासारखा किंवा लपविण्यासारखा प्रश्न नाही, त्याचे दुःख वाटते. तरीही सरकार जबाबदारी टाळू शकत नाही. मी तर अजिबात टाळू शकत नाही. त्यामुळे आम्ही निश्चितपणे चारा व पाणी उपलब्ध करुन देऊ.

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी मूळ प्रश्नाला बगल देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मंत्री महोदयांच्या उत्तराशी मी सहमत नाही. आपण असे म्हणत आहात की, कारखान्यांना मांजरा धरणातील पाणी दिले गेले. ही चुकीची माहिती आहे. ... ( अडथळा ) ...

**अध्यक्ष :** ते पाणी कारखान्यांना नाही तर शेतकऱ्यांना दिले गेले. आपण फक्त प्रश्न विचारावेत.

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, दुष्काळ निवारण करण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारवर, केंद्र सरकारवर ताशेरे ओढलेले आहेत. त्यांनी राजकीय भाषा... ... ( अडथळा ) ...

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य आपण राजकीय भाषण न करता प्रश्न विचारावेत.

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, त्यांनी असे सांगितले की, कारखान्यांना पाणी दिले नसते तर हा प्रश्न निर्माण झाला नसता. शासनाने कारखाने सुरु करण्यास परवानगी का दिली ?

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य आपण तो मुद्दा सोडून द्या, पाणी कधी मिळेल ते पहा.

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, क्रशिंग लायसन्स राज्य सरकार देते.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, ही वस्तुस्थिती आहे. मी सांगत आहे ते चुकीचे असेल तर त्या संदर्भातील माहिती तुम्ही आणावी मी तुमची जाहीर माफी मागेन. माझ्याकडे शासनाचे लेखी रिपोर्ट आहेत. ही वस्तुस्थिती आहे, की मांजरा धरणातील पाणी बॅरेजेसमध्ये गेले. बॅरेजेस मधून ते वापरले गेले. माननीय पाटबंधारे मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांनी सर्व

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलेमध्ये येऊन अध्यक्ष महोदयांशी बोलतात)

श्री. एकनाथराव खडसे .....

फिगर्स माझ्याकडे दिल्या आहेत. ही वस्तुस्थिती आहे की, पाणी वापरले गेले. ते वापरले गेले नसते तर, शहरामध्ये आज ही अडचण जाणवली नसती.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, माझी हरकत आहे की, चौथ्या तारांकित प्रश्नावरील चर्चा पूर्ण झाल्यानंतर आपण पाचवा तारांकित प्रश्न चर्चेकरिता घेतला. परंतु, पाचव्या तारांकित प्रश्नावरील चर्चा पूर्ण झाल्यानंतर आपण पुन्हा चौथ्या तारांकित प्रश्नावर चर्चा करीत आहोत.

**अध्यक्ष** : सभागृहातील परिस्थिती लक्षात घेता असे करता येते.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, महसूल मंत्री महोदयांनी आजच्या सामना या वृत्तपत्रातील अग्रलेख वाचला असेल असे मी समजतो. त्या अग्रलेखामध्ये तुमच्या भूमिकेवर काय ताशेरे ओढले आहेत, ते आपण पहावेत. ... ( अडथळा ) ...

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य आपण ते कशाकरिता कोट करीत आहात, आपल्याला काय म्हणायचे आहे ते डायरेक्ट सांगावे. लातूरच्या प्रश्नाबाबत आपल्याला काही विचारावयाचे असल्यास तेवढे बोलावे.

श्री. संभाजी निलंगेकर-पाटील : अध्यक्ष महोदय, सध्याची परिस्थिती खूप गंभीर आहे. आज सर्व टि.व्ही. चॅनेल्सवर लातूरचा प्रश्न दाखविला जात आहे. तेथील महिला पाण्याच्या शोधात 24-24 तास झोपत नाहीत. ही परिस्थिती ज्यांच्यामुळे निर्माण झाली, त्यांचा हा उत्साह पहावा. मागच्या 15 वर्षांमध्ये त्या ठिकाणी ज्या उपाययोजना करायला पाहिजे होत्या, त्या केल्या गेल्या नाहीत. आज यांची तेथे सत्ता आहे, आज महानगरपालिका कॉंग्रेसच्या ताब्यात असल्यानंतर महानगरपालिका पाणी विकत आहे. ... ( अडथळा ) ...

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य आपण राजकीय प्रश्न न विचारता पाण्यासंबंधी बोलावे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, एक रेल्वे आणून लातूर शहराला पुरणार नाही. महसूल मंत्री महोदयांना मला हे सांगावयाचे आहे की, आणायच्याच असतील तर 10 ते 12 रेल्वे आणाव्यात. आपण माननीय श्री. सुरेश प्रभू यांच्या जीवावर उड्या मारत असाल तर, 10 ते 12 रेल्वे आणा, एका रेल्वेने भागणार नाही. ... ( अडथळा ) ...

M-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना ते आयुष्यात जमले नाही. माझी एकट्याच्या बळावर सत्ता आहे. माननीय केंद्रीय मंत्री श्री. सुरेश प्रभू एकट्याच्या बळावर आहेत. तुमच्या सारखा विरोधी पक्षनेते देखील होऊ दिले नाही, एवढी वाईट परिस्थिती आमची केलेली नाही. त्यामुळे आवश्यकता असतील तर रेल्वे आणू.

**अध्यक्ष :** आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---*---

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ. रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचा सन 2014-2015 या वर्षाचा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

श्री. विजय शिवतारे (जसंधारण राज्यमंत्री) : मी आपल्या अनुमतीने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन 2013-2014 या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

श्री. विजय देशमुख (परिवहन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन 2014-2015 या वर्षाचा प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

श्री. सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन 2017-2015 या वर्षाचे अर्थविवरण पत्रक व कामाचा कार्यक्रम आणि सन 2013-2014 या वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन 2014-2015 या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

---*---

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. /मु.शी. :** अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री.सुरेश खाडे (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जाती कल्याण समितीचा दुसरा व तिसरा अहवाल सादर करतो.

**अध्यक्ष :** अनुसूचित जाती कल्याण समितीचा दुसरा व तिसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---*---

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./ मु.शी.** : स्थगन प्रस्तावाच्या सूचना.

**अध्यक्ष** : आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

---*---

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, आजच्या दिवशी जगामध्ये जागतीक दीन साजरा केला जातो. त्यानिमित्ताने आज विधानमंडळ सचिवालयातील चौथ्या मजल्यावर ॲन्टी डायबेटीस डे सुविधा उपलब्ध केलेली आहे. एड्‌सग्रस्तांनी हनुमान चालीसा वाचल्यावर एड्‌स रोग दूर होईल, अशी भूमिका नागपूर महानगरपालिकेने घेतलेली आहे. हे विज्ञान युग आहे. परंतु असे रोग दूर करायचे असेल तर हनुमान चालिसा वाचावी, अशा स्वरुपाचा नागपूर महानगरपालिकेने आदेश दिल्यामुळे त्यांना उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने चपराक लावली आहे. एड्‌सग्रस्त केवळ हिंदु नसतात, तर ख्रिश्चन, मुस्लीम हे देखील एड्‌सग्रस्त असतात.

**अध्यक्ष :** हनुमान चालिसा वाचावी, अशा सूचना कोणी केलेल्या आहेत.

श्री. जयदत्त क्षीरसागर : नागपूर महानगरपालिकेतील भाजपाचे श्री. तिवारी हे नेते आहेत. त्यांनी हा कार्यक्रम ठेवलेला आहे.

**अध्यक्ष :** सदरहू बाब नागपूर महानगरपालिकेशी संबंधित आहे. त्यामुळे ही बाब येथे उपस्थित करता येणार नाही. सदरहू महानगरपालिकेचा सदस्य सभागृहामध्ये आहे काय, ही बाब येथे उपस्थित कशी करता येईल? हनुमान चालिसा वाचून एखादा रोग बरा होतो किंवा कसे ही बाब कोणाला आवडेल किंवा कोणाला आवडणार नाही, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. कृपया आपण खाली बसावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचना दालनात नाकरण्यात आलेल्या आहेत. परंतु आमचा महत्वाचा विषय होता. राज्यात पाण्याचे दुर्भिक्ष आहे. पाणी महत्त्वाचे आहे की, आयपीएलचे सामने महत्त्वाचे आहेत, याबद्दल उच्च न्यायालयाने सरकारची आणि संबंधित संघटनांची खरडपट्टी काढली आहे.

अध्यक्ष महोदय, वाशिम जिल्ह्यातील वसार या गावामध्ये हे गाव विकणे आहे, अशी पाटी लावण्यात आलेली आहे. म्हणजेच एका बाजूला भीषण दुर्भिक्ष आहे आणि दुसऱ्या बाजूला माननीय उच्च न्यायालयाने आयपीएलच्या सामन्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केलेले आहे. ही गंभीर बाब आहे. त्यामुळे यासंदर्भात आम्ही दिलेल्या स्थगन प्रस्तावावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे.

**अध्यक्ष :** त्यासंदर्भात चर्चा घेता येणार नाही. आता औचित्त्याचे मुद्दे घेण्यात येतील. कृपया सन्माननीय विरोधी पक्षनेते आपण खाली बसावे.

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे.

अध्यक्ष महोदय, मागील दोन दिवसामध्ये पनामा पेपर्समध्ये छापून आलेल्या काळा पैसा धारकांची यादीत जगातील विविध देशांचे पंतप्रधान व इतरांची तसेच आपल्या देशातील काही लोकांची नावे छापून आलेली आहेत. त्यामध्ये प्रसिद्ध अभिनेते श्री. अमिताभ बच्चन यांचे देखील नाव आलेले आहे. राज्य सरकारने त्यांना सेव्ह टायगर अभियानासाठी ब्रॅण्ड ॲम्बेसेडर म्हणून नेमलेले आहे. तसेच बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे इंटरनॅशनल फायनान्सीअल सेंटर्स निर्माण केले जाणार आहे. केंद्र सरकारने याच्या सल्लागार समितीवर देखील श्री. अमिताभ बच्चन यांना घेतलेले आहे. यासंपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत माननीय पंतप्रधानांनी स्पेशल टास्क फोर्स नेमण्याची घोषणा केली.  संपूर्ण काळापैसा पनामा पेपर्सच्या माध्यमातून जगासमोर आलेला आहे.

**अध्यक्ष :** सन्माननीय विरोधी पक्षनेते काळ्या पैशासंदर्भात वर्तमान पत्रामध्ये बातमी आलेली आहे. आपल्याकडे यासंदर्भातील पुरावे असल्यास सांगावे. पुरावे असल्यास त्यासंदर्भात निर्णय देता येईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, पनामा पेपर्समध्ये छापलेल्या काळ्या पैशाच्या यादी धारकांमधून श्री. अमिताभ बच्चन यांचे नाव क्लिअर होत नाही, तोपर्यंत त्यांना सेव्ह टायगर अभियानामध्ये ब्रॅण्ड ॲम्बेसेडर म्हणून ठेवू नये, तसेच राज्य सरकारने त्यांना आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रामध्ये नेमलेल्या सल्लागार पदावरुन देखील दूर करण्यात यावे, अशी आमची मागणी आहे. यासंदर्भातील चौकशी होऊ दिली पाहीजे. त्यांचे नाव पनामा पेपर्समध्ये छापून आलेले असून ही बाब गंभीर आहे.

**अध्यक्ष :** माननीय विरोधी पक्षनेते मी आपल्याला त्यामुळेच विनंती केली होती की, सदरहू बातमी वर्तमान पत्रामध्ये छापून आलेली आहे. यासंदर्भात आपल्याकडे काही पुरावे असल्यास त्याची माहिती घेण्याच्या सूचना देण्यात येतील. परंतु वर्तमान पत्रातील बातमीवरुन आपण म्हणता त्याप्रमाणे सरकारला निर्णय घेण्याच्या सूचना देता येणार नाही.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आमचे टिकीट काढल्यास आम्ही त्या देशात जावून पुरावे गोळा करुन आणतो. ही बाब गंभीर आहे. याच बाबीवरुन आईस्लैंड या देशातील पंतप्रधानांनी राजीनामा दिलेला आहे. अजून कोणता पुरावा पाहीजे. जो पर्यंत त्यांचे नाव क्लिअर होत नाही, तोपर्यंत त्यांनी स्वतः बाजूला व्हावे किंवा त्यांना दूर करण्यात यावे.

...7/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** सन्माननीय विरोधी पक्षनेते आपण म्हणता त्याची आवश्यकता नाही, आता सर्व ऑनलाईन असल्यामुळे कुठलीही माहिती तातडीने उपलब्ध होऊ शकते. तसेच मी या सूचनेला दालनात अनुमती नाकारलेली आहे. आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. बाळासाहेब मुरकुटे यांनी औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माझी पॉईंट ऑफ ऑर्डर आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी पनामा पेपर्समध्ये आलेल्या बातमीवरुन या ठिकाणी उल्लेख केला. काळ्या पैशासंदर्भातील विषय असला तरी, तसेच केंद्र सरकारच्या अखत्यारितील विषय असला तरी त्यांना महाराष्ट्रामध्ये व्याघ्रदूत प्रकल्पाचे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर म्हणून घेतलेले आहे. त्यांनी गुन्हा केला असेल, त्यांनी तेथे काळा पैसा ठेवला असेल गैरव्यवहार केले असतील तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहीजे, याला माझे दुमत नाही. परंतु ज्याचे व्यक्तिमत्व मोठे आहे, ज्यांचे ब्लॉग लाईकर्स म्हणजेच फेसबूक लाईकर्स व ट्विटर लाईकर्स जगात नंबर एक वर आहेत, अशा व्यक्तीला शासनाने विनंती करुन व्याघ्रदूत प्रकल्पामध्ये ब्रॅण्ड ॲम्बेसेडर म्हणून सामावून घेतलेले आहे...(अडथळा)...असे होणार नाही. माझे ऐकून घ्यावे. एखादा सेलीब्रेटी किंवा मोठ्या व्यक्तीचे अशा पद्धतीने वस्त्रहरण करण्याचा अधिकार सभागृहाला नाही...(गोंधळ)...

**अध्यक्ष :** मी यासंदर्भातील स्थगन प्रस्तावाची सूचना दालनात नाकारलेली आहे. परंतु सन्माननीय विरोधी पक्षनेते यांचा मान ठेवून त्यांना बोलायला दिले व आपल्याकडे काही पुरावे असल्यास ते द्यावे, असेही त्यांना सांगितले. हा विषय रेकॉर्डवर नाही. ठीक आहे. आपण आता पुढील कामकाज घेऊया.

...N/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फोर्मेशन है. यहाँ पर सम्माननीय श्री रणजित पाटील जी उपस्थित है. हँकॉक ब्रिज को डिमॉलिश किया गया है. कल एक आदमी की मृत्यू हुई है. पिछले एक महीने में पांच लोगों मृत्यू रेल्वे लाईन क्रॉस करने के कारण हुई. विदाऊट किसी प्रोविजन के उस ब्रिज को डिमॉलिश किया गया है. वहां पर पुलिस का पहरा नहीं रहने के कारण हर चार दिन में एक आदमी मर रहा है. मंत्री महोदय से मेरी विनती है कि वहाँ पर पुलिस से कह कर प्रोटेशन लगवाईए. 14 साल का एक बच्चा परीक्षा देकर, वापस आते समय रेलवे लाइन क्रॉस करते हुए मर गया है. कल भी एक आदमी मर गया है. एक महीने में पांच लोग मर गए है. हँकॉक ब्रिज को बीएमसी और रेलवे ने मिलकर डिमॉलिश कर दिया है. पुलिस की जिम्मेदारी बनती है कि वहां पर प्रोटेक्शन लगवाए ताकि और लोगों की मौत न हों.

**अध्यक्ष :** शासनाने प्रोटेक्शन लावण्यासंबंधीची व्यवस्था करावी.

डॉ.रणजित पाटील (गृह (शहरे), राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, यथायोग्य कार्यवाही करण्यात येईल.

श्री.अब्दुल सत्तार : अध्यक्ष महोदय, मी नियम 97 अन्वये प्रस्ताव दिला होता तो आपण नाकरला आहे. त्यावर बोलण्याची मला संधी देण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, राज्यात अभुतपूर्व पाण्याची टंचाई निर्माण झालेली असताना औरंगाबाद शहरातील बिअरबार व दारुच्या कारखान्यांना 56 एम.एल.टी. पैकी 32 एम.एल.टी.पाणी पुरवठा करण्यात येत आहे. पाण्यासंदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालय व माननीय उच्च न्यायालयाने अनेक निर्णय दिले असून आयपीएल सामन्यांना पुरवण्यात येणाऱ्या पाण्यासंदर्भातही निर्णय दिलेला आहे. माननीय न्यायालयाने दिलेल्या सदरहू निर्णयाप्रमाणे औरंगाबाद शहरातील बिअरबार व दारुच्या कारखान्यांना पुढील तीन महिन्यांसाठी करण्यात येणारा पाणी पुरवठा बंद करण्याबाबत मंत्री महोदय निर्णय घेतील काय ?

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.अब्दुल सत्तार यांनी अतिशय चांगला मुद्दा उपस्थित केला असून त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याची शासनाने दखल घ्यावी.

-------------

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** पालमंत्र्यांनी शहीद जवानाच्या अंत्यविधीस दोन तास उशिराने उपस्थित राहणे

**मु.शी.:** पालमंत्र्यांनी शहीद जवानाच्या अंत्यविधीस दोन तास उशिराने उपस्थित राहणे या विषयावर श्री.जयकुमार गोरे यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून माननीय जलसंपदा राज्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.विजय शिवतारे (जलसंपदा राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयकुमार गोरे यांनी पालमंत्र्यांनी शहीद जवानाच्या अंत्यविधीस दोन तास उशिराने उपस्थित राहणे या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्द्यास अनुलक्षून मी पुढील निवेदन करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सियाचीन (जम्मू काश्मीर) येथे दिनांक 3 फेब्रुवारी, 2016 रोजी हिमकडा कोसळून जवान सुनिल सुर्यवंशी हे शहीद झाले होते. मात्र हवामान खराब असल्यामुळे त्यांचे पार्थिव 13 दिवसानंतर दिनांक 15 फुब्रुवारी, 2016 रोजी आणण्यात आले होते. शहीद जवान सुनिल विठ्ठल सुर्यवंशी यांचा अंत्यविधी कार्यक्रम कुकडवार (मस्करवाडी) ता.माण, जिल्हा सातारा येथे दिनांक 16 फेब्रुवारी, 2016 रोजी झाला होता.

अध्यक्ष महोदय, सदरच्या दिवशी शहीद जवान सुनिल विठ्ठल सुर्यवंशी यांच्या पत्नी श्रीमती सुनिता सुर्यवंशी व कुटुंबियांची अंत्यविधीपूर्वी समक्ष भेट घेऊन सांत्वन केले होते व आपल्या दु:खामध्ये सामील असल्याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदय यांचाही संदेश सांगितला होता.

अध्यक्ष महोदय, शहीद जवान सुनिल विठ्ठल सुर्यवंशी यांच्या अंत्यविधी कार्यक्रमास नियोजित वेळेपूर्वीच शासनाच्यावतीने, शासनाचा प्रतिनिधी म्हणून व पालकमंत्री या नात्याने अंत्यविधीच्या कार्यक्रम ठिकाणी उपस्थित राहून मी पुष्पचक्र अर्पण केले होते.

अध्यक्ष महोदय, श्री.जयकुमार गोरे विधानसभा सदस्य यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे असत्य माहिती सभागृहाला देऊन शहीद जवानाचा अपमान केला आहे व खोट्या माहितीद्वारे शासनाची बदनामी करण्याचा प्रयत्न केला आहे.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय शिवतारे......

अध्यक्ष महोदय, सातारा जिल्ह्यातील स्थानिक वर्तमानपत्रामध्ये "पालकमंत्र्यांनी कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केल्याचे व अंत्यविधी कार्यक्रमास उपस्थितीच्या" बातम्याही तत्कालीन वेळेस प्रसिध्द झालेल्या आहेत. पालकमंत्र्यामुळे अंत्यविधीस 2 तास उशीर झाला असता तर वर्तमानपत्रातून याबाबत मोठ्या टिका झाल्या असत्या. अशा कोणत्याही वर्तमानपत्रामध्ये टिका झालेल्या नाहीत.

अध्यक्ष महोदय, वास्तविक पाहता पालकमंत्र्यांमुळे कार्यक्रमास 2 तास उशीर झाला हे म्हणणे पूर्णतः खोटे असून शासनाच्या कोणत्याही मंत्र्यांनी कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली नाही हे म्हणणे पूर्णतः खोटे आहे.

अध्यक्ष महोदय, शहीद जवान सुनिल सुर्यवंशी यांच्यापूर्वीही सातारा जिल्ह्यामध्ये सुरज मोहिते, दिनांक 20 मार्च, 2015 व कर्नल संतोष महाडीक, दिनांक 19 नोव्हेंबर, 2015 या शहीद झालेल्या जवानांच्या / अधिकाऱ्यांच्या अंत्यविधी कार्यक्रमास शासनाच्यावतीने उपस्थित राहून मी सांत्वन व पुष्पचक्र अर्पण केले होते.

अध्यक्ष महोदय, कर्नल संतोष महाडीक यांचे पार्थिव पुणे येथील विमानतळावर आगमण, पुणे ते सातारा पार्थिवासोबत प्रवास करुन अंत्यविधी कार्यक्रम पारपडेपर्यंत दीड दिवस मी उपस्थित होतो. याबाबत सैन्य दलातील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी शासनाचा प्रतिनिधी म्हणून एखादा मंत्री दीड दिवस उपस्थित राहतो याबाबत "भारतीय जवाना विषयी महाराष्ट्र शासनाच्या मनामध्ये किती आदर आहे हे दिसून येते", अशा भावना व्यक्त केल्या होत्या. याबाबत मला एक अधिकृत पत्र प्राप्त झालेले आहे. हे पत्र कर्नल सहास जतकर, सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य यांनी पाठविलेले आहे ते मी सभागृहास वाचून दाखवित आहे.

" मा.मंत्री महोदय,

काश्मीरमधील कुपवाडा येथील हाजी जंगलात दहशतवाद्यांशी लढताना वीर मरण आलेले भारत मातेचे सुपुत्र कर्नल संतोष महाडीक यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यासाठी आपण दिनांक 18 नोव्हेंबर, 2015 रोजी पुणे येथील लोहगाव विमानतळावर हजर राहिलात. तसेच, राष्ट्रीय युध्द

....4

श्री.विजय शिवतारे.....

स्मारक येथे सुध्दा आवर्जून उपस्थित राहून शहीद कर्नल महाडीक यांना पुष्पचक्र अर्पण करुन श्रध्दांजली वाहिली व अखेरची मानवंदना दिली.

दिनांक 19 नोव्हेंबर, 2015 रोजी कर्नल महाडीक यांचे पार्थिवावर मौजे पोगरवाडी जिल्हा सातारा येथे लष्करी इतमामात व शोकाकुल वातावरणात करण्यात आलेल्या अंत्यसंस्कारासाठी आपण सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री या नात्याने माननीय नामदार श्री.मनोहर पर्रीकर, संरक्षण मंत्री, भारत सरकार यांचे समवेत उपस्थित राहिलात. तसेच, त्याचक्षणी शहीद कर्नल महाडीक यांची वीर पत्नी, त्यांचा मुलगा व मुलगी यांचे दु:खात सहभागी होऊन आपण त्यांचे सांत्वन करुन मनोबल वाढविले.

आपल्या उपस्थितीमुळे व आस्थेवाईकपणामुळे सर्व सैनिक / माजी सैनिक / लष्करी अधिकारी यांनी आपले खरोखरच कौतुक केले.

देशाचे संरक्षण करताना वेळ प्रसंगी अनेक अधिकारी / जवानांना आपले प्राण गमवावे लागतात तर काहींना कायमचे अपंगत्व पत्करावे लागते. अशा परिस्थितीमध्ये सरकार व शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असते. परंतु आपल्या सारखे मंत्री महोदय जेव्हा जवानांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी होतात व त्यांचे पाठीशी खंबीरपणे उभे राहतात तेव्हा शहिदांच्या कुटुंबियांना जगण्याची एक नवी उमेद, नवे बळ मिळते. तसेच आपण एकटे नसून आपल्या पाठीशी भक्कम असा आधार असल्याची निश्चितच खात्री पटते.

साहेब, आपण शहीद जवानांच्या कुटुंबियांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलात, त्यांच्यावर ओढावलेला दु:खद प्रसंगात त्यांच्या सोबत थांबलात, त्यांना आपुलकीचा व माणुसकीचा आधार दिलात. त्याबद्दल मी महाराष्ट्रातील सर्व सैनिक / माजी सैनिक / वीर पत्नी / वीर माता / वीर पिता व त्यांचे कुटुंबीय यांचेवतीने आपला शतशः आभारी आहे. आदरपूर्वक !

--------------

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, मला बोलण्याची संधी देण्यात यावी.

**अध्यक्ष :** माननीय मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्यांवर आक्षेप घेतला नाही.

श्री.जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी काल मी मांडलेल्या औचित्याच्या मुद्यासंदर्भात सभागृहामध्ये स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी जे वाचून दाखविले ते कोणत्या जवानाबाबत वाचून दाखविले हे सर्व सभागृहाने ऐकले आहे, हे मी अत्यंत जबाबदारीने बोलत आहे. मी त्या मतदार संघातील लोकतिप्रनिधी आहे. शहीद जवानाच्या अंत्यविधिला मी स्वतः उपस्थित होतो व त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण व इतर लोकांनी त्या ठिकाणी भेट दिली आहे. मी जबाबदारीने सांगतो की, अंत्यविधी पार पाडण्यास उशीर झाला. शहीद जवानाच्या कुटुंबियांना पालक मंत्री महोदय भेटलेले नाही. तसेच, जबाबदारीने सांगतो की, शहीद जवानाच्या कुटुंबियांना ज्याप्रमाणे कर्नाटक व तामिळनाडू सरकारने मदत केली त्याप्रमाणे राज्य शासनाने कोणतीही मदत केली नाही.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मदतीचा मुद्दा वेगळा आहे.

(सत्ताधारी पक्षातील एक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, तुम्ही काय सांगता... तुम्ही ठेका घेतला आहे काय ?

(सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी हा वाद संपवावा. आता पुढील औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री.बाळासाहेब मुरकुटे, सन्माननीय सदस्य श्री.भारत भालके यांचा औचित्याचा मुद्दा आहे त्यांनी तो मांडावा. सन्माननीय सदस्य श्री.जयकुमार गोरे यांना सांगू इच्छितो की, आरोप प्रत्यारोप झाला नाही. आपण आपल्या आसनावर बसावे. सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर व इतर सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.भारत भालके यांचा औचित्याचा मुद्दा आहे त्यांनी तो मांडावा.

यानंतर O-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे

(पुढे सुरू....

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. भारत भालके यांचा औचित्याचा मुद्दा असून त्यांनी तो मांडावा.

श्री. भारत भालके : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. अध्यक्ष महोदय, सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील मैला सफाई कामगार (मेहतर समाज) गेल्या 135 वर्षापासून तिर्थक्षेत्र पंढरपूर येथे राज्यातून लाखो भाविकांची व शहरातील लाखो नागरिकांची मानवी विष्ठा हाताने उचलण्याचे काम करीत होता. यामुळे पंढरपूर शहराचेच आरोग्य नव्हे तर भिमा तिरी नदीकाठच्या असलेल्या सर्व गावांचे आरोग्य म्हणजेच महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र या प्रांताच्या आरोग्याच्या पर्यायाने पाणी प्रदूषणामुळे होणारे साथीचे रोग उद्‌भवू नयेत म्हणून व शहरातील स्वच्छता करणे क्रमप्राप्त असल्याने सदरची कामे आणिबाणीचा प्रसंग म्हणूनच या सफाई कामगारांकडून करुन घेतले जात आहेत असे स्पष्टीकरण राज्य मानवी हक्क आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे प्रशासनाने दिनांक 6.2.2009 साली केलेले आहे. सन 189 मध्ये जेव्हा प्लेग रोगाची साथ पसरली तेव्हा साफसफाई करताना अनेक कर्मचारी मृत्यूमुखी पडले व अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. एवढे मोठे योगदान करुनही मैला साफसफाई कामगारांकडून घरभाडे पोटी पंढरपूर नगरपरिषद जागेच्या किंमतीपेक्षाही शेकडो पटीने घरभाडे कपात केले जात आहे व अजूनही मैला सफाई कामगारांकडून घरभाडे वसूल केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्यांच्यात व जनमानसात पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, पीआयएल8/2012 च्या जनहित याचिकेच्या निर्णयात उच्च न्यायालयाने दिनांक 3.7.2015 व दिनांक 24.2.2015 रोजी मैला साफसफाई करणाऱ्या 213 कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याचे आदेश दिले असणे, परंतु अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, सबब, राज्य शासनाने पंढरपूर येथील मैला सफाई कामगारांची राहती निवासस्थाने, जागा मालकी हक्काची करुन देण्याची आवश्यकता. अशा या गंभीर व अतिशय महत्वाच्या विषयावर मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. कृपया स्वीकृत करण्यात यावा, ही विनंती.

------------

2......



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : विनियोजन विधेयक.

**L. A. BILL NO. XVII OF 2016**

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2017.)

श्री. सुधीर मुनगंटीवार (वित्त मंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 17 महाराष्ट्र विनियोजन विधेयक, 2016 सभागृहासमोर मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली आहे.

**अध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार (वित्त मंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 17 महाराष्ट्र विनियोजन विधेयक, 2016 विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी जे विनियोजन विधेयक आहे त्यावर आपल्याला बोलता येत नाही. जे मुद्दे आहेत ते मान्य असल्यास त्यावर फक्त आपल्याला बोलता येते. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी मांडलेले सर्व मुद्दे अमान्य आहेत. त्यांना जर काही मुद्दे मांडावयाचे असतील तर त्यांनी माझ्या दालनात प्रत्यक्ष भेऊन मुद्दे मांडावेत, मी त्यांची वाट पाहील. पण सभागृहाच्या नियमानुसार आपण मांडलेले सर्व मुद्दे अमान्य आहेत. कारण सभागृहामध्ये त्या त्या खात्यावर चर्चा झाली असून विनियोजन विधेयकामध्ये ज्या खात्यावर चर्चा होत नाही त्या खात्यावर आपल्याला चर्चा करता येते. फक्त नियमाच्या बाहेर जाऊन विधिमंडळाचे कामकाज होऊ नये म्हणून मी हे आपल्यासमोर मांडत आहे. पण सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचे मुद्दे मी अतिशय बारकाईने वाचले. एकदा नव्हे, दोनदा नव्हे

3......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION



PPD/ ST/ AKN/ 12:20

श्री. सुधीर मुनगंटीवार.....

तर तीनदा वाचले. जर आपण त्यांना बोलण्यास अनुमती दिली तर एक चुकीचा पायंडा पडेल, एवढेच आपल्या लक्षात आणून देतो.

**अध्यक्ष :** मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेब आपण त्यांना पुन्हा भेटून मुद्दे क्लिअर करुन घेण्यास हरकत नाही.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, हे मुद्दे अमान्य आहेत असे जर आपण ठरविले असेल तर माझी काही हरकत नाही.

**अध्यक्ष :** अमान्य नाही, पण हे सन्माननीय वित्तमंत्र्यांनी ठरविले आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मी अमान्य करीत नाही. पण सभागृहाच्या महाराष्ट्र विधानसभा नियम पुस्तकात विनियोजन विधेयकामध्ये ज्या खात्यांवर चर्चा होते, कारण ज्या खात्यांवर आपण चर्चा करतो ते विरोधी पक्षनेते ठरवितात. त्यामुळे विरोधी पक्षनेत्यांनी कोणत्या खात्यावर चर्चा व्हावी हे ठरविण्याचा अधिकार त्यांचा आहे. त्यांनी त्यांचा अधिकार वापरुन त्या त्या खात्यांवर चर्चा केलेली आहे. आता त्या खात्यांवर चर्चा झाल्यानंतर विनियोजन विधेयकावर चर्चा उपस्थित करता येत नाही. कारण यामध्ये नगरविकास विभागाच्या 2515 या मुद्यावर चर्चा करता येत नाही. शेवटी हा रेकॉर्ड तयार होतो. उद्या कोण तरी 10 किंवा 20 वर्षांनी या रेकॉर्डचा वापर केला तर... म्हणून माझी विनंती आहे की, मी त्यांचे मुद्दे एकदा नव्हे, दोनदा आणि तीनदा वाचले आहेत. त्यामध्ये 2515 किंवा त्यांच्या विकासाच्या कामांचे मुद्दे आहेत. त्यांनी हे मुद्दे मला प्रत्यक्ष भेटून जरी सांगितले तरी नेहमीच मी त्यांच्या मुद्यांवर सकारात्मक राहतो. पण एक चुकीचा पायंडा केला तर भविष्यात 288 सदस्यांना विनियोजन विधेयकावर बोलू द्यावे लागेल आणि 8 दिवस विनियोजन विधेयकावर चर्चा सुरू राहील. त्यामुळे ज्यांचे मुद्दे मान्य आहेत त्यांचाच आपल्याला विचार करावा लागेल. फक्त सन्माननीय सदस्यांची एक बाब खरी आहे की, त्यांचे हे मुद्दे अमान्य झाले आहेत, हे कळविण्याची आवश्यकता विधिमंडळ कार्यालयाची होती, ती का झाली नाही हे मात्र आपण तपासून घेतले पाहिजे.

4......



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अजित पवार : सन्माननीय वित्तमंत्री महोदयांनी जो मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला आहे त्यामध्ये तथ्य आहे. नेहमीच पुरवणी मागण्यांमध्ये ज्या विभागावर चर्चा होत नाही. आम्ही सत्ताधारी पक्षामध्ये होतो त्यावेळी सन्माननीय श्री. सुधीर मुनगंटीवारसाहेब आपण आणि आपल्या पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य यांची मीच त्यासंबंधी बैठक घेत होतो. सर्व अधिकारी आणि सेक्रेटरी यांना बोलावून प्रत्येक मुद्याचा त्यामध्ये आपण निर्णय घेत होतो. माझी एवढीच विनंती आहे की, आता यासंबंधी जास्त विषय न वाढविता वित्तमंत्री महोदयांनी एक बैठक बोलवावी आणि त्यामध्ये सन्माननीय सदस्यांचे जेवढे विषय आहेत तसे विषय घेण्यात यावेत. अशा पध्दतीने तो विषय संपवून पुढे जावे असे मला वाटते.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांसोबत बैठक घेऊन या संदर्भातील जे प्रश्न आहेत त्यावर निर्णय घेण्यात येईल. मी अगोदरच सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांच्या प्रश्नासंबंधी सरकार अतिशय सकारात्मक आहे. सरकार एवढे सकारात्मक आहे आणि इतके वेगाने काम करते की, आपल्यालाही वाटावे की, हे सरकार आणखी 25 वर्षे कायम रहावे. इतके उत्तम काम आम्ही करु, आपण चिंता करु नका.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आमचे विधिमंडळ पक्षनेते सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार यांनी सांगितले त्याप्रमाणे हे जे मुद्दे आहेत, मी त्या बाजूला होतो त्यावेळी श्री. सुधीर मुनगंटीवार साहेब, श्री. देवेंद्र फडणवीस साहेब, श्री. गिरीश बापट साहेब, श्रीमती शोभाताई फडणवीस ताई यांनी कोणताही मुद्दा काढला तरी त्याचे डिपार्टमेंटवाईज डिस्कशन झाले किंवा नाही याचा विचार न करता मी ऑन द स्पॉट सर्व मुद्यांचे तपशीलात जाऊन उत्तरे देत होतो. त्यामुळे आपला जो मुद्दा आहे की, नियमाच्या बाहेर जाऊन कामकाज व्हावे असे मलाही वाटत नाही. त्यामुळे आता हे मुद्दे आपल्यापर्यंत पोहोचलेले आहेत. आपण त्यावर कार्यवाही करावी आणि म्हणून सभागृहाचा जास्त वेळ घेत नाही. यासंबंधी बैठक आपण बोलवावी.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पिय प्रक्रियेच्या शेवटच्या टप्प्यात आता आपण आलेलो आहे. मी माझ्या भाषणामध्ये माननीय वित्तमंत्री महोदयांनी विनंती केली होती की, बजेटची कागदपत्रे आपण संकेतस्थळावर ठेवावेत. महाराष्ट्र हे सर्वात श्रीमंत राज्य आहे. सर्वात समृध्द राज्य आहे आणि आपली अर्थव्यवस्था ही सर्वात मोठी आहे. आपली कागदपत्रे वेबसाईटवर

5....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण.....

नसतात. इतर अनेक राज्ये त्यामध्ये काही भारतीय जनता पक्षाची राज्ये आहे तर काही नाहीत. वित्तमंत्र्यांचे भाषण संपल्याक्षणी सर्वच्या सर्व कागदपत्रे वेबसाईटवर असतात. इतकेच काय तर नागालॅन्डसारख्या छोट्या राज्याने सुध्दा मागील 5 वर्षापासून सर्व कागदपत्रे दिली आहेत. सर्व रिसर्चेस आणि संशोधन करणारी माणसे आमच्याकडे येतात आणि ते म्हणतात की आम्हाला यातील काही समजत नाही. त्यामुळे आपण पारदर्शक कारभार करण्याकरिता हे केले पाहिजे आणि यासंबंधी आपण आश्वासन दिले तर बरे होईल.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय माजी मुख्यमंत्री महोदयांनी जे म्हटले आहे ते खरे आहे की, 21 व्या शतकामध्ये वेबसाईट्स, इन्फॉरमेशन आणि पारदर्शकता जेव्हा आपण स्वीकारली आहे, त्या सर्व बाबी करण्याची आवश्यकता आहे आणि त्या दृष्टीकोनातूनच मी माजी वित्तमंत्री सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेब यांची समिती नेमण्याचे प्रस्तावित केले होते. यामध्ये पुढच्या वर्षीचा अर्थसंकल्प बॅगमधून द्यायचा की, आय-पॅडमध्ये द्यायचा. नवीन सॉफ्टवेअरमध्ये माहिती द्यायची का, चर्चेचा स्तर अतिशय उत्तम करावयाचा असेल तर त्याचा आधार आकडेवारी असतो. त्यामुळे आपल्याला माहिती आहे की, पॉलिसीचे इव्हॅल्यूएशन आणि त्याच्या स्टॅन्डर्ड ऑपरेटिंग प्रोसेस काय असेल या संदर्भातील तटस्थ अशी समिती तयार करीत आहोत. सन्माननीय सदस्यांची भावना जशीच्या तशी मान्य आहे आणि आपण या संदर्भात मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्याचे सांगितले आहे. आपली जर अनुमती असेल तर आपण एक सर्वपक्षीय समिती नेमावी आणि या संदर्भात इतर राज्यांचाच नव्हे तर आपले राज्य जगाच्या लोकसंख्येमध्ये 13 व्या क्रमांकावर आहे. इकॉनॉमीच्या दृष्टीकोनातून 36 व्या क्रमांकावर आहे. पण चुकीचा खर्च करण्याच्या दृष्टीकोनातून सर्वांच्या पुढे आहे.

P-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार......

हे थांबवायचे असेल तर आपल्याला चांगला प्रयत्न करायला पाहिजे. यामध्ये काही पक्षीय भिंती आडव्या येत नाहीत. शेवटी हे राज्य सर्वांचे आहे. सत्ता येते आणि जाते आणि म्हणून तुमच्या भावनेशी आम्ही सहमत आहोत. या दृष्टीकोनातून ज्या-ज्या चांगल्या सूचना कराल. हे सरकार संवेदनशीलतेने त्या सर्व सूचनांचे स्वागत करेल आणि नुसते स्वागत नाहीत तर अंमलबजावणी करेल.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, यावर्षीचे बजेट ताबडतोब वेबसाईडवर टाकले तर त्याला काही अडचण नाही. वेबसाईडवर टाकण्यासाठी काही अडचणी असतील तर पेनड्राईव्हवर द्या, डीस्कवर द्या.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, यामध्ये ताबडतोब जेवढ्या दुरूस्त्या आणि सुधारणा करता येतील त्या करण्यात येतील. पण भविष्यासाठी आपण सर्वांनी एक पाऊल पुढे गेले पाहिजे.

**अध्यक्ष :** याबाबत लवकरच समिती स्थापन करण्यात येऊन काम सुरु करण्यात यावे.

श्री.गोपालदास अग्रवाल : अध्यक्ष महोदय, माझी कपात सूचना आहे. ज्यांची सूचना मान्य केली नाही त्यांना बोलण्याची संधी देण्यात येते आणि माझी सूचना मान्य करुनही बोलण्याची संधी दिली जात नाही. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय याच्या मागणीची चर्चा अर्थसंकल्पामध्ये झालेली नाही. त्या अनुषंगाने मी या कपात सूचनेच्या माध्यमातून प्रत्येक आमदाराला 10 लाख रुपयां........

**अध्यक्ष** : तुमची सूचना कोणी मान्य केली. मान्य केलेली नाही.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपलदास अग्रवाल यांनी दोन सूचना दिल्या होत्या. त्यातील एक सूचना अमान्य करण्यात आली आणि दुसरी वाहन खरेदीची सूचना मान्य करण्यात आलेली आहे.

**अध्यक्ष** : वाहन खरेदीची सूचना होती काय?

श्री.गोपालदास अग्रवाल : अध्यक्ष महोदय, प्रत्येक आमदाराला 10 लाख रुपये वाहन खरेदीसाठी कर्ज देण्याची पध्दत आहे आणि त्यामध्ये ज्यांनी 10 लाखापर्यंत कर्ज घेंतले तर त्यांच्यावर व्याज देण्याचे सरकारचा निर्धार आहे. आता वाहनांची किंमत वाढलेली आहे. एक्ससाईड

.........2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल ........

ड्युटी, टॅक्सेस वाढलेले आहेत. त्यादृष्टीने कमीत कमी 20 लाखापर्यंत देण्यात यावे. तसेच व्याजाचा जो दर 10 टक्के आहे त्याला पीएलआरच्या दराने देण्यासाठी 20 लाख रुपयांपर्यंतची मर्यादा करावी ही माझी मागणी होती. दुसरी मागणी होती की, सचिवांचे पगार खूप कमी आहेत. हे पगार वाढविण्याबाबत सुध्दा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात यावा. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड तुमच्यासारखे धनाढ्य लोक नाहीत. याठिकाणी 150 नवीन आमदार आलेले आहेत. त्यांच्याबद्दल मी बोलत आहे. तसेच आमदारांच्या स्वीय सहायकांचे पगार वाढविण्यात यावेत आणि म्हणून या दोन्ही मागण्या मान्य करण्यात याव्यात.

**अध्यक्ष** : आमदारांच्या मागण्यांसाठी एवढे आग्रही राहू नका.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी ऑक्टोबर, 2015 मध्ये एक पत्र दिले होते. त्या अनुषंगाने दिनांक 23 नोव्हेंबर, 2015 रोजी एक बैठक आयोजित करण्यात आली होती. दिनांक 23 नोव्हेंबर, 2015 रोजीच्या बैठकीमध्ये साधारणतः आता असणारा जो दुष्काळ आहे. या दुष्काळजन्य परिस्थितीचा विचार करुन गाडीच्या संदर्भातील निर्णय भविष्यात योग्य क्षणी घेण्याचा निर्णय झाला. पण सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल यांनी जो मुद्दा मांडला तो योग्य आहे. आमदारांचे जे स्वीय सहायक आहेत. जर 5 वर्षांनी आमदार बदलला किंवा त्या आमदाराच्या जागी दुसरा आमदार निवडून आला तर स्वीय सहायकांच्या आयुष्यामध्ये खूप चढउतार येतात. आता त्यांना मानधन स्वरुपात जे पैसे देतो. सर्व क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचा दर सहा महिन्यांनी डीए वाढवितो, वेतन आयोग देतो. परंतु आमदरांचे जे स्वीय सहायक आहेत त्यांच्या पगाराबाबत आम्ही गंभीरतेने विचार करीत आहोत. आज त्यांना वर्ग-4 च्या बरोबरीचा पगार आहे. स्वीय सहायक वर्ग-4 च्या बरोबरीचा पगार घेतात. आमदारांच्या चर्चेसाठी जेव्हा मुद्दे काढतात आणि ते दर्जेदार असावेत यादृष्टीने त्यांचा पगार वाढविण्याबाबत दुष्काळी परिस्थिती असल्याने आज निर्णय घेऊ शकत नाही. परंतु चांगली परिस्थिती आल्याबरोबर यावर निर्णय घेण्यात येईल.

प्रश्न मतास टा□न संमत झाला.

........3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3, अनुसूची विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.सुधीर मुनगंटीवार :अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 17 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**अध्यक्ष**: सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 17 संमत झाले आहे.

----------

........4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** औचित्याचे मुद्दे

( पुढे सुरु.......

श्री.राजेश क्षीरसागर : अध्यक्ष महोदय माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे राजर्षी शाहू महाराजांचे स्मारक उभारण्याबाबत राज्य शासनाने सुमारे 3 वर्षापूर्वी घोषणा केलेली आहे. दिनांक 15.12.2013 रोजी महापौरांच्या हस्ते शाहू स्मारकांचे भूमीपूजन करण्यात आले. परंतु सदरहू स्मारकासाठी वस्त्रोद्योग महामंडळाकडून राज्य शासनाला अद्यापी जागेचा ताबा देण्यात आलेला नाही. या संदर्भात राज्य शासनाकडे पाठपुरावा केलेला आहे व करीत आहे. परंतु अद्यापी राजश्री शाहू स्मारक उभारण्याबाबत कोणतीच कार्यवाही याठिकाणी होत नसल्याचे दिसत आहे. राजश्री शाहू स्मारक उभारण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याकरिता मी या औचित्याच्या मुद्दयाद्वारे विनंती करीत आहे.

-----------

.........5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष श्री.राहुल बोंद्रे )**

श्रीमती माधुरी मिसाळ : अध्यक्ष महोदय माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, पुणे शहरातील मुळा-मुठा नदीच्या पात्रात महापालिकेच्या दहा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातून पुरेशी प्रक्रिया होत नसल्यामुळे मल्लापाण्यावर प्रक्रिया न करता ते थेट नदीत सोडले जाणे, त्याविषयी राष्ट्रीय हरित न्यायाधकिरणाकडे तक्रार केली जाणे, न्यायाधिकरणाने महापालिकेला त्यांची बाजी मांडण्यास सांगितले असता अजूनही महापालिकेने याबाबत कारवाई न करणे, गटारे, नाले, ओढ्यांमधून थेट नदीत पाणी सोडले जाते. सांडपाण्याबरोबर नदीत कचरा टाकण्याची मानसिकता वाढणे, त्यामुळे प्लॅस्टिक, कचरा, थर्माकोल आदी विघटन न होणाऱ्या कचऱ्याचेही नदीत प्रमाण वाढू लागणे, तो कचरा काढण्याची कोणतीही यंत्रणा महापालिकेकडे नसणे, जो कचरा राडारोडा नदीत टाकला जातो. जे एसटी प्लांट पुण्यामध्ये लावले गेलेले आहेत. ते सर्व प्लांट पूर्ण कार्यक्षमतेने चालत नाहीत किंवा ते प्लांट बंद तरी आहेत. नदीमध्ये जे पाणी सोडले जाते ते अतिशय घाणेरडे तसेच मैलापाणी नदीत सोडले जाते. त्यामुळे नदीच्या आजूबाजूला राहणाऱ्या लोकांचे जीवन धोक्यात आलेले आहे. नदीवर काळा तवंग आलेला आहे. याबाबत महापालिकेकडे वारंवार तक्रार करुन सुध्दा एसटीपी प्लांटमध्ये खूप सारा भ्रष्टाचार झाला असल्यामुळे महापालिका त्यामध्ये लक्ष घालीत नाही. आपल्या माध्यमातून मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

----------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.संतोष टारफे : अध्यक्ष महोदय, एका सामजिक विषयावर औचित्याच्या मुद्याद्वारे आपण मला सभागृहामध्ये माझे विचार मांडण्याची संमती दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो. पूर्ण मराठवाडयाप्रमाणे हिंगोली जिल्हयामध्ये सुध्दा पाणी टंचाई आहे. परंतु आमच्या हिंगोली जिल्हयामध्ये पाणी टंचाई जेवढी आहे. तेवढी देशी दारुची टंचाई नाही. अक्षरश: प्रत्येक जिल्हयामध्ये देशी दारुची विक्री होते. बिअर शॉपीचे परमिशन असून सुध्दा तेथे देशी दारुची विक्री होते. ग्रामीण भागातील महिलांनी वेळोवेळी आंदोलन केले, पोलीस अधिक्षक यांना भेटले, तिथल्या उत्पादन शुल्क अधिका-यांना भेटले, पोलीस अधिका-यांना भेटल्यानंतर पोलीस अधिक्षक म्हणतात की, हे आमचे काम नाही, त्या उत्पादन शुल्क अधिका-यांची जबाबदारी आहे. त्यानंतर उत्पादन शुल्क अधिका-यांकडे गेल्यानंतर ते म्हणतात जर देशी दारुचे जास्त विक्री होत असेल तर सरकारला रेव्हेन्यू जास्त मिळतो.

अध्यक्ष महोदय, माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, एकीकडे शासन दुष्काळावर एवढया मोठया उपाययोजना करीत आहे. परंतु या देशी दारुच्या माध्यमातून तिथले कुटुंब अक्षरश: उध्दवस्त होत आहे. एकीकडे त्या कुटुंबाकडे पैसा नसतो. परंतु तिथले पुरुष व्यसनाधीन आहेत. ते महिलांना मारझोड करुन त्यांच्याकडून पैसे घेऊन या देशी दारुच्या दुकानात जातात. अशा अवैध देशीदारु विकणा-यांवर कारवाई होणे आवश्यक आहे. जरी कारवाई झाली तरी धातुरमातूर कारवाई करुन त्यांना लगेच सोडतात. त्यामुळे शासनाच्या वतीने योग्य ती कारवाई व्हावी अशी मी आपल्यामार्फत शासनास विनंती करतो.

............

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मंगेश कुडाळकर : अध्यक्ष महोदय, मला औचित्याच्या मुद्यावर बोलण्यास अनुमती दिल्याबद्दल आभार व्यक्त करतो. मागासवर्गीयांसाठी पदे सरळसेवेने भरणे व प्रस्तावित सेवाप्रवेश नियमांच्या आधारे नामनिर्देशनाने किंवा पदोन्नतीने पदे भरणे या नियमबाह्य केलेल्या कार्यवाही संदर्भात श्री.भा.दा.धाटावकर, संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांच्यावर दिनांक 30.6.2011 रोजी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन ) नियम, 1981 च्या नियम 27 मधील तरतूदीनुसार दरमहा सेवानिवृत्ती वेतनाच्या 6% इतकी रक्कम तीन वर्षाच्या कालावधीकरिता कपात करण्यात यावी, अशी शिक्षा करण्यात आली. नियमबाह्य नियुक्त्या केलेल्या कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्याकडून झालेली नाही. नियमबाह्य नियुक्त्या झालेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्याचे माहे फेब्रुवारी 2016 मध्ये उघडकीस आलेले आहे. नियमबाह्य नियुक्त्या झालेल्या कर्मचाऱ्यांवर व त्यांची पदोन्नती रोखण्याकरिता कारवाई करावी, अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणीकरित आहे.

.........

....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष ऊर्फ पंडितशेट पाटील : अध्यक्ष महोदय, मी खालील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयांतील शासन मान्य अनुदानित वसतिगृहांना सुमारे 4 कोटी 40 लाख रुपयांचा निधी सन 2015-16 करीता मंजूर केला होता. परंतु मुंबई विभागीय प्रादेशिक उपायुक्तांच्या नाकर्तेपणामुळे हा निधी परत गेलेला आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या 125 वसतिगृहांतील मुलांवर उपासमारीची पाळी आलेली आहे. यानिमित्ताने माझी मागणी आहे की, या अखर्चित निधी राहिल्याबाबत संबंधित अधिका-यांवर कारवाई आणि मंत्री महोदयांनी हा निधी तात्काळ आम्हाला परत करावा, सामाजिक न्याय विभागामार्फत जी वसतिगृहे चालविली जातात त्यांची भोजन आणि राहण्याची सोय जे संस्थाचालक करतात त्यांना हा निधी अखर्चित राहील्यामुळे मिळणार नाहीत. म्हणून तातडीने 4 कोटी 40 लाख रुपयांचा निधी द्यावा, या विद्यार्थ्यांवर उपासमारीची पाळी येऊ नये म्हणून हा औचित्याचा मुद्दा मांडीत आहे.

.............

....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री गोपालदास अग्रवाल : अध्यक्ष महोदय, गोंदिया जिले के आमगांव और सालेकसा तथा भंडारा जिले के साकोली नगरपंचायतों के चुनाव उच्च न्यायालय के आदेशानुसार रद्द हुए. कल इस विषय की लक्षवेधी सूचना के माध्यम से तीनों नगरपंचायतों के चुनाव....जो दि.13 फरवरी, 2015 में अस्तित्व में आयी है, उसके बारे में उल्लेख किया गया है. इस विषय की चर्चा के समय मैं उपस्थित नहीं रह सका. जहां तक साकोली का प्रश्न है, साकोली की प्रक्रिया अंतिम टप्पे में है. निश्चित ही वहाँ की नगरपरिषद का चुनाव शीघ्र ही होगा. लेकिन आमगांव और सालेकसा के बारे में बड़ा आश्चर्यजनक परिणाम है कि हाई कोर्ट के आदेश के कारण जिस नगरपंचायत की स्थापना दि.13 फरवरी, 2015 को हुई थी वह नगरपंचायत दि.18 मार्च, 2016 को वापस ग्रामपंचायत में परिवर्तित हो गई. नगरपरिषद बनाने का अहवाल कलेक्टर के द्वारा मंत्रालय को पहुंचा दिया गया है. आमगांव खुर्द और सालेकसा इन दोनों ग्रामपंचायतों को मिलाकर एक नगरपंचायत बनाने का निर्णय...और सालेकसा ग्रामपंचायत के......नगरपंचायत के अंदर उन दोनों का समावेश करने का निर्णय.......हाई कोर्ट में स्वयं सरकार ने समर्थन देकर इस बारे में निर्णय अक्टूबर 2015 में ले लिया, लेकिन 6 महीने हो गए, जिलाधिकारी का अहवाल अभी तक सरकार को प्राप्त नहीं हुआ. मेरी विनती है कि गोंदिया जिले के आमगांव खुर्द और सालेकसा को मिलाकर एक नगरपंचायत और आमगाव की नगरपरिषद, इन दोनों के चुनाव दि.13 फरवरी, 2015 से करने की पूरी व्यवस्था रद्द है. वहां पर लोकतांत्रिक प्रक्रिया खत्म हो चुकी है. इन दोनों जगहों नगरपंचायत सालेकसा और नगरपरिषद आमगांव के चुनाव शीघ्र करने का निर्णय सरकार तुरंत ले, ऐसा मेरा औचित्य का मुद्दा है.

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजाभाऊ वाजे : अध्यक्ष महोदय, मी औचित्याच्या मुद्याद्वारे खालील महत्वाचा विषय मांडू इच्छितो, माझ्या सिन्नर मतदार संघातील नाशिक-पुणे महामार्गावर सद्या रुंदीकरणाचे काम सुरु असून या कामांतर्गत नांदूर शिंगोटे येथे बाहय वळण मार्ग बांधण्यात आलेला आहे. सदरहू बाहय वळण मार्गाला जोडून मौजे मानोरी, कणकोरी, मऱ्हळ, सुरेगाव, पांगरी, वावी ते नांदूर शिंगोटेकडे जाणा-या रस्त्याला भुयारी मार्ग झालेला नसल्याने सदर जोडरस्ता अत्यंत धोकादायक आहे.

बाह्य वळण मार्गावरुन गेल्या दोन महिन्यापासून वाहतूक सुरु झाली असून प्रचंड वेगाने वाहने येत जात असतात. सदर ठिकाणी लोकसंख्येची घनता जास्त असल्याने परिसरातील ग्रामस्थांना रस्ता ओलांडण्याची वारंवार गरज आहे व दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध नसल्याने त्याच ठिकाणाहून रस्ता ओलांडावा लागतो आहे. या ठिकाणी गेल्या दोन महिन्यांत पाच अपघात होऊन त्यामध्ये तीन व्यक्तींना आपले प्राण गमवावे लागले असून दिनांक 2 एप्रिल 2016 रोजी सखुबाई खुरसने ही 6 वर्षाची बालिका वाहनाच्या धडकेने मृत्युखुखी पडली आहे.

त्यामुळे बाह्य वळण रस्त्यावर नागरिकांना रस्ता ओलांडण्यासाठी भुयारी मार्ग किंवा पूल करण्याची मागणी गावाच्या ग्रामस्थांनी, ग्रामपंचायतीनी ठराव करुन संबंधित अधिकाऱ्यांकडे मागणी केली असून कोणत्याही प्रकारची हालचाल होत नाही. या भागातील विद्यार्थी, ग्रामस्थांच्या दैनंदिन वाहतुकीसाठी नांदूर शिंगोटे येथील बाह्य वळण मार्गावर भुयारी मार्ग किंवा पूल करण्यात यावा, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो.

..........

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, मुंबई के अंदर विशेषकर मेरे मतदार क्षेत्र में पिछले कई दिनों से दूषित पानी आ रहा है. लोगों को एक ग्लास भी साफ पानी पीने के लिए नहीं मिल रहा है. मेरा निवेदन है कि मुंबई महानगरपालिका को आदेश दिया जाए. विशेषकर ए, बी और ई वार्ड में दूषित पानी आ रहा है. मुंबई महानगरपालिका के हेडक्वॉर्टर में दूषित पानी आ रहा है. मुंबई में पानी के जो पाइप हैं उनको फौरन बदला जाना चाहिए. बी और ई वार्ड में दूषित पानी आ रहा है. उस बारे में सरकार को आदेश दिया जाए. महानगरपालिका के जो वॉर्ड ऑफिसर हैं उनको आदेश दिया जाए. जो दूषित पानी आ रहा है उसको ध्यान में रखते हुए पाइप की मरम्मत करनी चाहिए और साफ पानी देने की व्यवस्था की जाए, ऐसा मेरा औचित्य का मुद्दा है.

....7/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.शशिकांत खेडेकर : अध्यक्ष महोदय, मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याबद्दल संधी दिल्याबद्दल आपले हार्दिक आभार मानतो.

सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघातील खडकपूर्णा प्रकल्प संत चोखा सागर धरणामधून जे लाभक्षेत्र आहे. त्या लाभक्षेत्रातून जी गावे वंचित राहिलीत त्या गावांना खडकपूर्णा प्रकल्पाचा लाभ मिळावा म्हणून अनेक वर्षापासून शेतकरी आंदोलन करीत आहेत. याबाबत मी वारंवार सभागृहात तशी मागणी सुध्दा केलेली आहे.

यासंदर्भात माननीय श्री.गिरीष महाजन साहेब जलसंपदा मंत्री यांनी दिनांक 3 फेब्रुवारी, 2016 रोजी मंत्रालय, मुंबई येथे बैठक घेतली असता खडकपूर्णा प्रकल्प जलाशयातील पाण्याचे फेरनियोजन करुन संबंधित वंचित लाभक्षेत्राला लाभ देण्यासाठी एका महिन्यात दुसरी बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते.

R-1 ...........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मनिषा चौधरी.......

मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती करते की, त्या ठिकाणी तातडीने आपण झोपडपट्टी जाहीर करावी व महापालिकेला गल्ली नं1 ते 14 पर्यंत पिण्याच्या टँकरची सुविधा करुन देण्याबाबत आदेश द्यावेत. अशी औचित्याच्या मुद्दयानुसार मी विनंती करते. शासनाने महापालिकेला गणपत पाटील नगरला टँकरने पाणीपुरवठा करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती करते.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्य शासनाचे कर्मचारी 30-35 दीर्घ सेवा केल्यानंतर शासकीय नियतवयोमानानुसार निवृत्त होतात. अन्य देयकांकरिता त्यांच्याकडून फॉर्म भरुन घेतला जातो. तसेच, त्यांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणी व शासकीय गट विमा योजनेचा हप्ता घेणे बंद करतात. नियत वयोमानानुसार ते निवृत्त होतात, त्यांना कार्यालयामार्फत समारोप दिला जातो. समारोपाच्या दिवशीच भविष्य निर्वाह निधी, गट विमा योजनेचा धनादेश दिला जात नाही. तो त्यावेळी दिल्यानंतर त्यांना आनंद होईल. याबाबत केंद्र शासनाने आपल्या कर्मचा-यांच्या बाबतीत शासन निर्णय काढलेला आहे. या ठिकाणी तशा प्रकारचा शासकीय निर्णय राज्य शासनाने आपल्या कर्मचा-यांच्या निवृत्तीच्या दिवशी त्यांना सर्व लाभाचे धनादेश देण्यासंदर्भात काढावा. जेणेकरुन त्यांच्या भविष्य निर्वाह निधी रकमा, शासकीय गट विमा योजनेचा धनादेश कर्मचा-यांना देण्यात यावा. सभागृहात सामान्य प्रशासन विभाग मंत्रीमहोदय, अर्थमंत्री महोदय उपस्थित आहेत. त्यांना मी विनंती करतो की, राज्य शासनाच्या कर्मचा-यासंदर्भात केंद्र शासनाच्या कर्मचा-यांप्रमाणे आदेश काढण्यात यावा. अशी मी विनंती करतो.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.जितेंद्र आव्हाड: अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. मला पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून एक गोष्ट शासनाच्या व संपूर्ण महाराष्ट्रात लक्षात आणून द्यावयाची आहे. आताच एक महत्त्वाची माहिती प्रसार माध्यमांच्या माध्यमातून मिळालेली आहे. मालेगावच्या बॉम्बब्लास्टची सर्व कागदपत्रे गहाळ झालेली आहेत. ही कागदपत्रे कोर्टातून गहाळ झालेली आहे. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. श्रीमती रोहिणी सॅलियन या वकिलाने काही दिवसांपूर्वी असे निवेदन दिले होते की, हे प्रकरण पुढे न नेण्याबाबत माझ्यावर दबाव आहे. या संदर्भातील कागदपत्रे मी एनआयए ऑफिशियल्समोर श्री.रसाळ नावाच्या वकिलाच्या हातामध्ये सुपूर्द केली होती, असेही श्रीमती रोहिणी सालियन नावाच्या वकिलाने सांगितले होते. मालेगाव स्फोटसंदर्भातील कागदपत्रे कोर्टातून गहाळ होतात, ही महाराष्ट्राच्या दृष्टीने लांछनास्पद बाब आहे. कालच बॉम्बब्लास्टसंदर्भातील एका आरोपीला जन्मठेपेची सजा सुनाविण्यात आली. महाराष्ट्राला बरे वाटले, कायदा व्यवस्थित चालू आहे, कोणालाही येथे सोडले जात नाही. असे वाटले. आज अशी बातमी येते की, मालेगा बॉम्बस्फोट प्रकरणातील विटनेसेसशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे कोर्टातून गहाळ झालेली आहेत. ही संशयास्पद बाब आहे. अधिवेशन चालू आहे. सरकार अस्तित्वात आहे. याकडे शासनाने त्वरित लक्ष देऊन सोमवारच्या आत या संदर्भात माहिती घेऊन निवेदन करावे. सरकारची यासंदर्भात एनआयए, मालेगाव बॉम्बब्लास्ट व संबंधित कागदपत्रांच्या गहाळ होण्याविषयी नेमकी कोणती भूमिका आहे, हे समजले पाहिजे. कोर्टातून कागदपत्रे गहाळ होतात, यापेक्षा मोठे दुर्दैव कोणतेच नाही.

( काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केलेला मुद्दा हा अतिशय गंभीर आहे. मालेगाव ब्लास्टसंदर्भातील कागदपत्रे कोर्टातून गहाळ होत असतील तर या ठिकाणी प्रज्ञा सिंग आणि तिच्यावर असलेले आरोपासंदर्भात 164 अंतर्गत मॅजिस्ट्रेट समोर केलेले स्टेटमेंट, इतर साक्षीदाराशी संबंधित कागदपत्रे गहाळ करण्याचा कट कोणी रचलेला आहे ? याची शंका तयार होत आहे. योग्य ती शिक्षा योग्य त्या माणसांना करण्यासाठी ही कागदपत्रे महत्त्वाची होती,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

तीच दुर्दैवाने कागदपत्रे गहाळ कशी झाली ? राज्य शासनाने याबाबत निश्चित कोणता रोल प्ले केलेला आहे ? या संदर्भातील कागदपत्रे परत मिळविण्यासाठी शासन काय करणार आहे ?

श्री.एकनाथराव खडसे: अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ही बाब न्यायालयाच्या संदर्भातील आहे. मालेगाव स्फोटाशी संबंधित कागदपत्रे न्यायालयातून गहाळ झालेली आहेत. ही न्यायप्रविष्ट बाब होती. याच्याशी राज्य शासनाचा दुरान्वयाने संबंध नाही. न्यायालयातून कागदपत्रे गहाळ होतात, याबाबत जे वक्तव्य केलेले आहे, ते म्हणजे या न्यायालयाचा अवमान आहे. ही बाब न्यायालयीन असून न्यायप्रविष्ट आहे. याबाबतचा उल्लेख प्रोसिडींगमधून काढून टाकण्यात यावा. ती कागदपत्रे सरकारच्या कस्टडीत नव्हती. ती कागदपत्रे न्यायालयाच्या कस्टडीत होती. याचा सरकारशी काही संबंध नाही. कागदपत्रे गहाळ झालेले आहेत, असा मुद्दा मांडणे म्हणजे न्यायालयावर आक्षेप नोंदवून न्यायालयावर आरोप करण्यासारखे होय. या ठिकाणी सभागृहाच्या माध्यमातून यावर जो काही निर्णय द्यावयाचा आहे, तो निर्णय देण्यात यावा.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री.राहुल बोंद्रे ):** सन्माननीय सदस्य हा न्यायालयाशी संबंधित मुद्दा आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, या सभागृहात कोणाचीही न्यायालयाचा अवमान करण्याची इच्छा नाही. न्यायालयासमोर जे 164 अंतर्गत दिलेल्या स्टेटमेंटचे ॲफिडेव्हिट सादर केले होते, ते आणि संबंधित कागदपत्रे गहाळ झाली, असे प्रसार माध्यमांनी सांगितलेले आहे. न्यायालयाच्या आसपासच्या संरक्षणाची जबाबदारी कोणाची आहे ? न्यायालयाच्या आसपास चोरी होऊ न देण्याची जबाबदारी पोलिसांची आहे. पोलीस शासनाच्या हातात आहे. शासन पोलिसांना सांभाळू शकत नाहीत. प्रत्येक गोष्ट धमकाविण्याची सर्वांना मुर्ख करण्याची स्ट्रॅटेजी जी सकाळपासून चालू आहे ती आता बंद करण्यात यावी.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, मला तर आता यांच्या बुध्दीची कीव करावीशी वाटत आहे. न्यायालयाच्या कस्टडीत असलेली कागदपत्रे गहाळ झालेली आहेत, याला सरकार कसे जबाबदार आहे ? सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपण इतके फ्रस्ट्रेशनमध्ये जाल, असे वाटले नव्हते.

( काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाद ककुळवहिवाट व शेतजमीन आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन ( विदर्भ प्रदेश ) (दुसरी सुधारणा ) विधेयक

**L. A. BILL NO. XX OF 2016**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, THE HYDERABAD TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1950 AND THE MAHARASHTRA TENANCY AND AGRICULTURAL LANDS (VIDARBHA REGION) ACT.)

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री): अध्यक्ष महाराज, सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 20 महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम,हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1950 आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन ( विदर्भ प्रदेश ) अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधयेक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** अनुमती देण्यात आली आहे.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 20 मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** करविषयक कायदे ( कर बसविणे, सुधारणा व विधीग्राहयीकरण )विधेयक

**L. A. BILL NO. XVIII OF 2016**

(A BILL FURTHER TO AMEND CERTAIN TAX LAWS IN OPERATION IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.सुधीर मुनगंटीवार ( वित्त मंत्री ): अध्यक्ष महाराज, सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 18 महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** अनुमती देण्यात आली आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 18 मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

------

....7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** विवादित थकबाकी तडजोड विधेयक

**L. A. BILL NO.XIX OF 2016**

(A BILL TO PROVIDE FOR SETTLEMENT OF ARREARS IN DISPUTE UNDER VARIOUS ACTS ADMINISTERED BY THE SALES TAX DEPARTMENT AND THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.सुधीर मुनगंटीवार ( वित्त मंत्री ) : अध्यक्ष महाराज, सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 19 विक्रीकर विभागाकडून अंमलबजावणी केल्या जाणा-या विभिन्न अधिनियमाखालील विवादातील थकबाकीची तडजोड करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** अनुमती देण्यात आली आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 19 मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

-------

टी-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

( पुढे सुरु.......

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मी सार्वभौम सभागृहाचे आणि शासनाचे एका गंभीर विषयाकडे लक्ष वेधणार आहे. श्रीमती रोहिनी सॅलियन या पब्लिक प्रॉसिक्युटर होत्या. त्यांनी सर्वांच्या समोर सर्व कागदपत्रे हवाली केलेली आहेत. श्रीमती रोहिनी सॅलियन असे म्हणतात की, "...an official from the Special NIA Court came to her looking for the documents. One of the staff from the special court enquired with me if I am in the possession of the key documents, including several witness statements recorded under Section 164 of the Criminal Procedure Code, which, he said, were not traceable in the court." त्या पुढे असेही म्हणतात की, "...she had handed over all documents to the designated special prosecutor Avinash Rasal in the presence of NIA officials." मला काही कळत नाही. ही फार महत्वाची मालेगावमध्ये ब्लास्टच्या संदर्भातील गंभीर केस आहे. आपल्याला एवढे वाईट का वाटत आहे. आम्ही संबंधिताला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत असताना आमच्या मनात आता शंका निर्माण झालेली आहे. म्हणून मी हा मुद्दा मी उपस्थित करीत आहेत. मालेगावमध्ये ब्लास्टमधील आवश्यक असणारी कागदपत्रे हरवली असतील तर सरकारने त्याचा तपास केला पाहिजे आणि त्यासाठी सरकारने या विषयी ताबडतोब निवदेन करावे अशी आमची आग्रहाची मागणी आहे.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, सन्माननीय माजी मंत्री सर्वश्री. जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून महत्वाचा मुद्दा सभागृहामध्ये उपस्थित केलेला आहे. सभागृहात आता औचित्याचे मुद्दे सुरु होते. त्यानंतर शासकीय विधेयके पुर:स्थापनार्थ घेण्यात आलेली होती. अशा प्रकारे सभागृहाचे विधीवत कामकाज सुरु असताना सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सभागृहात माहिती दिलेली आहे. सरकारकडे या विषयी आता कोणतीही माहिती उपलब्ध नाही. सदर माहिती तपासून घ्यावी लागणार असल्यामुळे त्यासाठी वेळ लागणार आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा रेकॉर्डवर आलेला आहे. माननीय न्यायालयाची कोणतीही बाब गंभीरच असते. न्यायालय देखील याबाबत सरकारला कळवित असते. त्यामुळे

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश बापट..............

सन्माननीय सदस्यांनी वकीली करण्याची आवश्यकता नाही. सभागृहात लगेच माहिति देणे शक्य नसते. त्यामुळे या विषयासंदर्भातील चर्चा थांबवून लक्षवेधी सूचना पहिली चर्चेला घेण्यात यावी, अशी माझी माननीय पीठासीन अधिकाऱ्यांकडे विनंती आहे.

श्री. नसीम खान : अध्यक्ष महोदय, सन्माननीय गटनेते श्री. जयंत पाटील यांनी महत्वपूर्ण आणि गंभीर मुद्याकडे शासनाचे लक्ष वेधलेले आहे. मालेगाव ब्लास्टमधील प्रमुख आरोपी प्रज्ञासिंह ठाकुर यांना आतंकवादी कायद्यांतर्गत अटक केलेली आहे. हे प्रकरण माननीय न्यायालयात प्रलंबित आहे. सदर प्रकरणातील कागदपत्रे हरवलेली आहेत. ही बातमी सत्य असेल तर ते अतिशय गंभीर आहे. त्यामुळे शासनाने यासंदर्भात निवेदन केले पाहिजे, अशी आमची मागणी आहे.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. राहुल बोंद्रे )** : शासनाने या प्रकरणाच्या संदर्भातील निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी सरकारला निवेदन करण्यासाठी निदेश दिल्याबद्दल मी आभार व्यक्त करीत आहे. मंत्री महोदयांनी लवकरात लवकर निवेदन करावे असे आम्ही म्हणत नाही. परंतु, सदर विषय अतिशय गंभीर असल्यामुळे आज सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी या विषयी शासनाने निवेदन करावे अशा प्रकारे माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी निदेश दिलेले आहेत, त्याप्रमाणे शासनाने कार्यवाही करावी.

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सभागृहात वर्तमानपत्राच्या बातमीच्या आधारे मुद्दा उपस्थित करता येतो किंवा येत नाही एवढीच माहिती मला हवी आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, आता आपण लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊ या. मी या विषयी शासनाला निवेदन करण्याबाबत सांगितलेले आहे.

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

श्री. गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, मी महत्वाच्या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधणार आहे. सभागृहात मंत्री महोदय उपस्थित आहेत. इस्लामपूरमध्ये बारावीच्या परीक्षा केंद्रावर 5 जिल्ह्याचे सीआयडी कार्यक्षेत्र असलेल्या डीवायएसपी श्रीमती दिपाली काळे ही आपल्या मुलाला

......3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गुलाबराव पाटील........

परीक्षेत मदत करण्यासाठी श्रीमती वैशाली शिंदे, डीवायएसपी यांच्या मदतीने परीक्षा केंद्रावर गेली होती. परीक्षा केंद्रावर जाऊन त्यांनी फिजिक्सचा पेपर फोडलेला आहे. यासाठी संबंधित प्राचार्याने त्यांना मदत केलेली आहे. हे सर्व सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून येत आहे.

अध्यक्ष महोदय, आज त्या ठिकाणी गुंडगिरी आणि अवैध धंदे सुरु असून, त्याकडे डीवायएसपींचे लक्ष नाही. त्यामुळे या डीवायएसपीची तातडीने बदली करावी किंवा त्यांची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. संबंधित डीवायएसपी शासनाला बदनामी करण्यासाठी षडयंत्र करीत आहेत. अशा संबंधित डीवायएसपीला तातडीने निलंबित केले पाहिजे. अन्यथा त्यांची बदली करुन चौकशी करण्याची गरज आहे, अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : शासनाने या प्रकरणी योग्य ती दखल घ्यावी. आता लक्षवेधी सूचना क्रमांक एक चर्चेला घेण्यात येईल.

श्री. गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, एका पेपरफुटीमुळे सभागृहात संबंधित मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला होता. पेपरफुटीमुळे एका मुख्यमंत्र्याला आपल्या पदावरुन पायऊतार व्हावे लागले होते. संबंधित डीवायएसपी परीक्षा केंद्रावर जाऊन पेपर फोडत असतील आणि यासंदर्भात सभागृहात आम्हाला उत्तर न देता पीठासीन अधिकारी पुढील कामकाज करणार असतील तर ते चुकीचे आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्य श्री. गुलाबराव पाटील यांना सांगू इच्छितो की, शासनाने या प्रकरणी दखल घ्यावी असे मी ऑलरेडी रुलिंग दिलले आहे.

आता लक्षवेधी सूचना क्रमांक एक चर्चेला घेण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, वर्तमानपत्राच्या माध्यमातून बातमी समजल्यानंतर मी तत्काळ चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. वर्तमानपत्रातील बातमी सभागृहात काढता येत नाही. संबंधित डीवायएसपीची बदली करण्याचा अधिकार मला नाही. या प्रकरणी काय घडले आहे, त्याचा अहवाल मी देणार आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : ठीक आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक एक चर्चेला घेण्यात येईल.

.....4....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : राज्यातील गॅस कंपन्यांकडील ग्राहकांची आणि जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांची वर्षातून दोनदा तपासणी करणे

**मु.शी.** : राज्यातील गॅस कंपन्यांकडील ग्राहकांची आणि जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांची वर्षातून दोनदा तपासणी करण्यायासंबंधी सर्वश्री नितेश राणे, हर्षवर्धन सपकाळ, अस्लम शेख, अमीन पटेल, डॉ.संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावीत, श्री.अबु आझमी वि.स.स., वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. नितेश राणे ( कणकवली ) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील गॅस कंपन्यांकडील ग्राहकांची संख्या आणि पुरवठा विभागाकडे असलेली ग्राहकांची संख्या यामध्ये १ कोटी १४ लाखांची तफावत असल्यामुळे या ग्राहकांना रॉकेलचा पुरवठा करण्यात येत असून त्यामध्ये गैरव्यवहार होत असल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, राज्यातील तेल कंपन्यांकडील आकडेवारीनुसार एक गॅस सिलिंडर जोडणी असलेल्यांची संख्या १ कोटी ११ लाख ७२ हजार ४०९ असणे, दोन गॅस सिलिंडर असलेल्यांची संख्या १ कोटी ११ लाख ४० हजार ६९४ अशी असणे, परंतु पुरवठा विभागाकडे केवळ १ कोटी ९ लाख गॅस सिलिंडरधारकांची संख्या असल्याने या आकडेवारीत १ कोटी १४ लाखांची तफावत असल्याचे आढळून येणे, तसेच गत तीन महिन्यांपासून राज्यातील पुणे शहर, सोलापूर, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, परभणी, गोंदिया या जिल्ह्यांतील लाभार्थ्यांना धान्य मिळाले नसणे, यामुळे जनमानसात पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने चौकशी करुन जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांची वर्षातून दोनदा तपासणी करुन करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. गिरीष बापट ( अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

......5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नितेश राणे : अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या प्रकरणी गैरव्यवहार झालेला असून, ते सिध्द झालेले आहे.

U-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नितेश राणे..

मंत्री महोदय श्री.बापट साहेब या प्रकरणात गैरव्यवहार सिध्द झालेला आहे. गैरव्यवहार करणाऱ्यांविरुध्द आपण काय कारवाई करणार आहात?

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महाराज, माझी लक्षवेधी सूचना ही राज्यातील गॅस वितरणासंदर्भातील आहे. यामध्ये कोठेही गैरव्यवहार झालेला नाही. यात काही विभागामध्ये अन्नधान्य न मिळाल्याचा संबंध होता. सन्माननीय सदस्य श्री.नितेश राणे गॅसची जोडणी हा विषय आहे. आपल्याला दुसरे काही अपेक्षित असेल तर मला माहित नाही. आज जी लक्षवेधी सूचना आहे, ज्याला मी छापल्याप्रमाणे म्हटले ती गॅस जोडणी तसेच केंद्र सरकारकडून रॉकेलचा पुरवठा कमी होतो, यासंदर्भातील आहे.

श्री.नितेश राणे : अध्यक्ष महाराज, दिनांक 10 फेब्रुवारी 2016 रोजी रॉकेलचा गैरव्यवहार झालेला आहे, त्यासंदर्भात माझा प्रश्न आहे.

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महाराज, राज्यातील काही जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी गॅस वितरणाबरोबरच रॉकेलचे वितरण केले जाते. काही ठिकाणी धाडी घालून काही वितरकांना पकडलेले असून त्यांची संख्या 212 आहे. काही लोकांचे लॉयसन्स रद्द केलेले आहेत. दिवसेंदिवस राज्यामध्ये रॉकेलचा पुरवठा कमी कमी होण्याचे कारण असे आहे की, अडीच कोटी गॅसधारक आपल्या राज्यात आहेत. विशेषतः ग्रामीण भागात रॉकेल लागते. केंद्र सरकारने आपल्या राज्याला 21 टक्के कोटा ठरवून दिलेला होता. मी स्वतः माननीय केंद्रिय मंत्री महोदयांना भेटून 7 टक्के कोटा वाढवून घेतला. काही ठिकणी रॉकेल पुरवठा करणाऱ्या टँकरवर जीपीएस सिस्टीम बसविण्याची सक्ती केली होती. असोसिएशन आणि यांनी त्याचा गैरवापर केला. सरकारचा अन्नधान्याचा पुरवठा तसेच गॅस यासाठी जीपीएस सिस्टीम बसविण्याचा निर्णय अंतिम झालेला आहे. काही ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहे. राज्यात जे गैरव्यवहार झाले त्यातील 52 लोकांची लायसन्स रद्द केली आहेत, तसेच काहींना दंडही केला, परंतु दंड हा क्वॉंटिटीवर असतो त्यामुळे दंड किती केला हे मी सांगत नाही. याची तपासणी तालुका पातळीपासून ते वितरकापर्यंत झालेली आहे.

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महाराज, रॉकेलचा काळा बाजार हा महाराष्ट्राला



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हर्षवर्धन सपकाळ...

भेडसावणाऱ्या गंभीर समस्यांपैकी एक गंभीर बाब आहे. केंद्र सरकारकडून महाराष्ट्र राज्याला रॉकेलच्या सबसिडीपोटी 2 हजार कोटी रुपये मिळतात. रॉकेल 38 रुपयात सरकार घेते. 22 रुपये सबसिडी देते आणि 16 रुपये लिटरने ग्राहकांना रॉकेल दिले जाते. महाराष्ट्र राज्याला दोन हजार कोटी रुपयांची सबसिडी मिळते. या दोन हजार कोटी रुपयांपैकी बुलढाणा जिल्ह्यासाठी 108 कोटी रुपयांतून मोताळा तालुक्यासाठी 20 कोटी रुपये मिळतात. ही 20 कोटी रुपयांची रक्कम खर्च होणार नाही यासाठी 100 टक्के गॅस कव्हरेज करण्याचा प्रस्ताव मी दिनांक 6 जून 2015 रोजी मंत्री महोदयांना दिलेला आहे. माझे स्पेसिफिक तीन प्रश्न आहेत. मी दिलेला प्रस्ताव मंत्री महोदय स्वीकारणार आहात काय? हा प्रश्न आपल्या अखत्यारित असला तरी वितरक, गॅस कंपनी आणि राज्य सरकार यांची मोट बांधून बुलढाणा आणि मोताळा तालुक्यात 100 टक्के गॅस कनेक्शन देण्याचा निर्णय आपण घेणार आहात काय? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, आधार कार्ड आल्यानंतर लिंकीगच्या बाबतीत देशातील पहिला जिल्हा अमरावती होता.

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महाराज, रॉकेलच्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, आता राज्यामध्ये रेशन कार्डवर आधार सिडींग करण्याचे काम चालू आहे. नांदेड जिल्ह्यात 98 टक्के काम पूर्ण झाले आहे. वेगवेगळ्या जिल्ह्यात वेगवेगळी टक्केवारी आहे. काही ठिकाणी 60 टक्के, 62 टक्के, 70 टक्के, 80 टक्के काम झालेले आहे. केंद्र सरकार यामध्ये मॉनिटरींग करते. 15 एप्रिल पर्यंत हे काम पूर्ण होणार आहे. ज्या रेशन कॉर्डला आधार सिडींग झाले नाही एकतर ते कार्ड बोगस असतील. अशी बोगस कार्डची संख्या राज्यात खूप मोठी आहे. त्याचा आकडा माझ्याकडे आला नाही. दिनांक 15 एप्रिल पर्यंत मी ते कॅलक्युलेट करु शकत नाही. जे रेशन कार्डवर आधार सिडींग करणार नाही त्याचे कारण असे की ते बोगस असतील आणि पकडले जातील. ही संख्या किती आहे हे आपल्याला दिनांक 20 एप्रिल, 2016 नंतर कळेल. ज्यांना गॅस सिलेंडर आहे त्याचे स्टॅम्पिंग रेशन कार्डवर व्हायला पाहिजे, परंतु दुर्दैवाने ते झाले नाही. आपल्या राज्यात 2 कोटी 32 लाख गॅसधारक आहेत. त्यातील 1 कोटी 18 लाख कार्डावर वेगवेगळ्या कारणाने नोंदच नाही. आधार कार्डच्या बाबतीत पार्लमेंटमध्ये कायदा मंजूर झाला.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट....

त्यापूर्वी हाय कोर्टाने सांगितले होते की, आधार कार्डचे कोणावर बंधनकारक नाही, कोणी स्वेच्छेने केलेतर ठीक आहे. पण आता कायदा झाल्यामुळे त्याची गती वाढत आहे. काही ठिकाणी रेशन कार्ड हा पुरावा मानला जात नाही. अन्नधान्य वितरणाकरिता सिस्टीम म्हणून आपण रेशन कार्डचा उपयोग करतो. 2 कोटी 32 लाख मधून 1 कोटी 18 लाख रेशन कार्डावर स्टॅम्पिंग व्हायचे आहे. बीपीसी, एचपीसी, आणि आयओसी या कंपन्यांशी आम्ही पत्रव्यवहार केल्यानंतर त्यांना बोलाविले. आम्ही बैठक घेतली तेव्हा त्यांनी केंद्र सरकारला पत्र लिहिले की, अशा प्रकारची मागणी आम्हाला होत आहे. केंद्राने त्यासंदर्भात उत्तर दिले नाही. कारण राजस्थान राज्यात हाय कोर्टात एक केस प्रलंबित आहे. आता दिल्लीत सर्व राज्यातील सचिवांची आणि पुरवठा मंत्र्यांची बैठक झाली त्यामध्ये या कंपन्यांना हे काम देण्याचे निश्चित झाले आहे. महाराष्ट्रात आपल्या माहितीप्रमाणे जवळपास 1 कोटी 12 लाख एवढ्या वितरकांची नोंद रेशन कार्डवर व्हायची आहे. राज्य शासनाला रॉकेल विकताना तोटा होण्याचे कारण असे की, रेशन कार्डावर गॅसचा शिक्का नसतो. मागील पंधरा दिवसामध्ये 7 लाख लोकांचे स्टॅम्पिंग करुन घेतले. मी आपल्याला केंद्र सरकारच्या निर्णयाची माहिती देतो म्हणजे त्याचा राज्यात कसा उपयोग होईल, हे आपल्या लक्षात येईल. देशातील 12 हजार एलपीजी गॅस वितरकांना जानेवारी 2013 ते जानेवारी 2015 या दोन आर्थिक वर्षात केलेल्या विक्रीचा आधार घेतला आणि सर्व्हे केला. सन 2014-2015 मध्ये स्टॅम्पिंगमुळे आणि आधार कार्डामुळे 12 हजार 700 कोटी रुपयांची बचत होणार आहे. आता आपण थेट बॅंकेत पेमेंट करणार आहोत. काळ्या बाजारातून लोक गॅस न्यायचे आणि त्यानंतर आपल्याकडे त्याची नोंद होत असे. त्यातून इतके पैसे आपले वाचणार आहेत. आपण डीपीटी सिस्टीम सुरु केली असल्यामुळे त्याचा आपल्याला फायदा होणार आहे. ही एक वेगळी योजना आपल्या राज्यात चालू करीत आहोत. आपण पुणे आणि अमरावती हे दोन जिल्हे पायलट प्रोजेक्ट म्हणून घेतले आणि केंद्र सरकारला कळविले. यापुढील काळात आपल्याला रॉकेल द्यावेच लागणार आहे. कधी लाईट गेली, अंत्य संस्कार, कोकणात फवारणी, बोटी चालविणे यासाठी रॉकेलची गरज पडते. सन्माननीय सदस्यांनी यासाठी पाठपुरावा केलेला आहे. या दोन जिल्ह्यांचा पायलट प्रोजेक्ट पूर्ण झाल्यानंतर बुलढाणा जिल्ह्याचा तिसरा क्रमांक लावू.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रदीप नरके : अध्यक्ष महाराज, रॉकेलचा पुरवठा माणसी दोन लिटरप्रमाणे आपल्याला करण्यात येत होता. आमच्या ग्रामीण भागात ज्यांच्याकडे गॅसचे कनेक्शन आहे, अशांचा रॉकेलचा पुरवठा बंद केला.

यानंतर V-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदीप नरके ....

परंतु, अनेक ठिकाणी लोकांचा सर्व्हे होत असताना गोबर गॅस असताना एलपीजी, सिलेंडर गॅस नसताना ग्रामीण भागातील लोकांनी गॅस आहे असे सांगितले. गाई व म्हशीच्या शेणापासून तयार होणारा गोबर गॅस ग्रामीण भागात वापरला जात असताना गॅस आहे असे सांगितल्यामुळे अनेक लोकांचा रॉकेलचा पुरवठा बंद झाला आहे. अशा ठिकाणी फेरसर्व्हे करुन त्यांचा रॉकेल पुरवठा परत सुरु करणार काय ?

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, गॅसचे सिलेंडर छोटे असते, गोबर गॅसचे सिलेंडर मोठे असते. परंतु, तरीही आपण याचा कोल्हापूर पुरता सर्व्हे करु, केला असेल तर तो तपासून घेऊ, गोबर गॅस ज्यांच्याकडे आहे त्यांनाही रॉकेल देण्याची व्यवस्था केली जाईल.

श्रीमती प्रणिती शिंदे : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये रॉकेल व्यतिरिक्त अन्नधान्याचा देखील उल्लेख आहे. गेले 3 नाही तर गेले 12 महिने सोलापूर शहर, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, परभणी, गोंदिया या शहरांमध्ये एपीएल कार्डधारकांना अन्नधान्याचे वितरण झालेले नाही. नोव्हेंबर, 2014 पासून युपीए सरकारची अन्नधान्य सुरक्षा योजना एपीएल कार्ड धारकांसाठी बंद करण्यात आलेली आहे. त्यामध्ये देखील फक्त 30 टक्के लोकांना काही प्रमाणात धान्य मिळत आहे. ज्या 30 टक्के कुटुंबांना हे धान्य मिळत आहे, त्याचा क्रायटेरिया काय आहे, एपीएल कार्डधारकांपैकी कोणती 30 टक्के कुटुंबे धान्य देण्यासाठी निवडण्यात आली ? जोपर्यंत आधार लिंकेज होत नाही, तोपर्यंत त्यांना धान्य मिळणार की नाही, यावरही शासनाचे धोरण अजून स्पष्ट नाही, त्याबद्दल खुलासा करावा. जे आधार लिंकेजेस केले जात आहे, त्याबाबत सांगावयाचे झाले तर, मागच्या 1 वर्षात फक्त 20 टक्के आधार लिंकेज झाले आहे. येणाऱ्या काही दिवसात ते होताना दिसत नाही. आपण रेशन दुकानदारांना सांगितले आहे की, तुम्ही त्यांचे आधार लिंकेज केले पाहिजे, ते चुकीचे ठरत आहे. कारण बऱ्याच लाभार्थ्यांचे धान्य बंद झाले आहे. दोन वर्षांपासून ते रेशन दुकानात जातच नाहीत त्यामुळे त्यांचे आधार लिंकेज होत नाही. त्यामुळे रेशन दुकानदारांकडून हे काम न करता, शासकीय कर्मचारी नेमून बायोमेट्रिक व आधार लिंकेजचे काम आपण आहात काय, ही अन्नधान्य सुरक्षा योजना आपण या एपीएल कार्डधारकांसाठी पुन्हा एकदा सुरु करणार आहात काय ?

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 20 टक्क्यांपर्यंत आधार लिंकिंग झाले आहे. माननीय पंतप्रधानांनी संपूर्ण देशभर याचे मॉनिटरिंग केले. चीफ सेक्रेटरींबरोबर दर आठवड्याला बोलणे होते. त्यानंतर विशेष व्यवस्था करुन कलेक्टर, डिव्हिजनल कमिशनर आणि अन्न पुरवठा खात्यातील लोकांनी विशेष मोहिम केली. ही मोहिम करताना आधारचा फॉर्म दुकानात ठेवलेला होता. जो कोणी रेशन घेण्यास दुकानात येईल त्याला पहिल्यांदा आपण आधारचा फॉर्म भरायला लावत होतो. मला या सभागृहात सांगायला आनंद वाटतो की, राज्यामध्ये कालच्या दिवसापर्यंत 79 टक्के आधार लिंकिंग झालेले आहे. आज जे आधार लिंकिंगला जात नाहीत, त्याचे कारण म्हणजे एक तर ते बोगस आहेत. एका ठिकाणी आधार कार्डचे लिंकेज झाले असेल तर दुसऱ्यांदा सापडतील. आपण असे सांगितले आहे की, त्यांना रेशन द्या पण त्यांच्या कार्डवर आपल्याला आधार लिंकिंगचा स्टॅम्प करावाच लागेल. काही ठिकाणी आधार लिंकिंग करीत आहेत, म्हणून बोगस कार्ड घेऊनच जायची नाहीत, ती न मिळाल्याने त्यांना रेशन मिळत नव्हते.

अध्यक्ष महोदय, मी राज्यातील माहिती घेतलेली आहे, माझ्याकडे तालुकानिहाय माहिती आहे. लक्षवेधी सूचनेमध्ये विचारल्याप्रमाणे नाशिक, पुणे शहर, सोलापूर, अमरावती, औरंगाबाद आणि गोंदिया या ठिकाणची यादी मी वाचून दाखवितो. यादीत प्राधान्याने अंत्योदय आणि बीपीएलबाबतची माहिती आहे. जानेवारी महिन्यात बीपीएलला राज्यामध्ये 95 टक्के उचल झाली. अंत्योदयलाही 95 टक्के झाली. फेब्रुवारी महिन्यामध्ये बीपीएलला 97 टक्के उचल झाली आणि अंत्योदयला 95 टक्के झाली. मार्च महिन्यामध्ये 97 टक्के बीपीएलला झाली आणि 91 टक्के अंत्योदयला झाली.

अध्यक्ष महोदय, यामध्ये एकच प्रॉब्लेम आहे की, बोगस कार्ड सापडू नये म्हणून जे रेशन दुकानात येत नाहीत त्यामुळे आज जिल्ह्याजिल्ह्याच्या ठिकाणी आपला लाखो रुपयांचा माल वाचत आहे. जी उचल मागच्या 6 महिन्यांपूर्वी होती ती उचल आता काही लाख टनांनी कमी झाली आहे. ही उचल कमी होणारच आहे. काही ठिकाणी काही व्यावसायिकांनी बोगस कार्डचे गठ्ठे आपल्याकडे ठेवले होते, ज्यामध्ये माणूस येणार नाही पण त्याच्या कार्डवर नोंद करायची आणि तो गहू, तांदूळ गोदामात ठेवायचा व बाहेर मीलमध्ये रवा व इडलीचे पीठ करण्याकरिता द्यायचा, यावर आता चाप

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश बापट ....

बसलेला आहे. या राज्यामध्ये आपण कोणाही बीपीएल, अंत्योदय कार्डधारकाला अन्नापासून वंचित करणार नाही. एपीएलच्या संदर्भात मागे येथे विषय उपस्थित झाला होता. जुन्या सरकारने एपीएलला अन्न सुरक्षा कायद्यात धान्य देण्याचा प्रस्ताव नव्हता, आपण याची माहिती करुन घ्यावी. परंतु, तरीही मागच्या सरकारमध्ये ते देण्यात येत होते. त्याचा वर्षाला साधारणपणे 1400 ते 1500 कोटी रुपये होता, त्यामुळे नवीन सरकारने निर्णय घेतला की, एपीएलला अन्न सुरक्षा योजनेचा फायदा द्यायचा नाही. परंतु, आता या आधार लिंकअप मधून जे 2 ते 3 हजार कोटी रुपयांचे धान्य वाचणार आहे, कारण आता त्याचा काळाबाजार करता येणार नाही आणि म्हणून हे वाचल्यानंतर बायोमेट्रिक सुरु झाल्यानंतर आज राज्यात अंत्योदय व बीपीएलला ज्याप्रमाणे अन्नधान्य देतो, त्याचप्रमाणे एपीएलला बायोमेट्रिक व आधार लिंकअप पूर्ण झाल्यानंतर देण्याचा सरकारने विचार केलेला आहे.

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, मला मंत्री महोदयांना 3 प्रश्न विचारावयाचे आहेत. माननीय पंतप्रधानांनी काही दिवसांपूर्वी असे सांगितले की, देशामध्ये एखाद-दुसऱ्या कोटी लोकसंख्येने गॅस सबसिडी परत केली. महाराष्ट्रात अशा किती लोकांनी गॅस सबसिडी परत केली, याची माहिती आपण या सभागृहाला द्यावी. मुख्यमंत्री महोदयांनी लातूरमध्ये दुष्काळी भागामध्ये मजुरांना अन्न सुरक्षा कायदा लागू करणार आणि अन्न पुरवठा करणार अशी घोषणा महिन्याभरापूर्वी केली. त्याच बरोबर दुष्काळी भागातील मजूर, कामगार व हमालांनासुध्दा आपण अन्न सुरक्षा योजना लागू करणार काय, अन्न सुरक्षा कायद्याची जवळपास 85 ते 90 टक्के इतकी व्याप्ती आपण ग्रामीण भागामध्ये साध्य केली आहे. मात्र शहरांमध्ये अजूनही ही व्याप्ती 45 ते 50 टक्के इतकी आहे. शहरांमध्येसुध्दा येणाऱ्या काळात ही व्याप्ती ग्रामीण भागाइतकीच 85 ते 90 टक्के इतकी आपण नेणार काय ?

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, गॅस सबसिडी परत केलेल्यांच्या आकडेवारीबाबत सांगावयाचे झाले तर, या सर्व ऑल इंडिया कंपन्याच आहेत. त्यांचे सेंट्रलाईज कॉम्प्युटरायजेशन होते. परंतु, मी याबाबतची माहिती मागवून पटलावर ठेवतो. मी स्वतः ही सबसीडी घेत नाही. कारण पंतप्रधान महोदयांनी हे देखील आव्हान केले होते की, ज्यांची परिस्थिती चांगली आहे,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश बापट ....

त्यांनी ही सबसिडी घेऊ नये. याबाबतच्या राज्यातील आकडेवारीची माहिती मी पटलावर ठेवतो किंवा आपल्याला ती कळविण्यात येईल. लातूरमध्ये मुख्यमंत्री महोदयांनी जे सांगितले आहे, त्याबाबत मला हे सांगावयाचे आहे की, अडीच-तीन महिन्यांपूर्वी जेव्हा राज्यात पाणी टंचाईपासून ते शेतकऱ्यांच्या प्रश्नांपर्यंत दुष्काळाची परिस्थिती सुरु झाली, तेव्हा सरकारने एक निर्णय घेतला की, 14 दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमध्ये गरीब शेतकऱ्यांना बीपीएलच्या रेटने अन्नधान्य द्यायचे. पहिल्यांदा असे वाटत होते की, हा आकडा 25 ते 30 लाखांवर जाईल. परंतु, तो 68 लाखांवर गेला. आज राज्यामध्ये आपण ग्रामीण भागातील 68 लाख शेतकऱ्यांना हे धान्य देत आहोत. यानंतर आपण असा मुद्दा उपस्थित केला की, शेतमजूर, भूमीहीन, मजूर व कामगारांनाही यामध्ये धान्य द्यायचे काय ? याबाबत आम्ही लगेच राज्यात सर्व्हे सुरु केला. ही संख्या 25 लाखांवरुन 68 लाखांवर गेली. नेमकी ही संख्या किती आहे, तर साधारणपणे 15 दिवसांत ही संख्या सर्व भागातून आमच्याकडे आलेली आहे. सरकारने याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे की, जसे शेतकऱ्यांना आपण बीपीएलचे धान्य देत होतो तसेच याही मजुरांना धान्य द्यायचे. त्याचा आकडा पूर्ण झाल्यानंतर त्या त्या जिल्ह्यांना आदेश देऊन शेतमजुरांनाही धान्य देण्यात येईल.

**तालिका सभाध्यक्ष** : मला असे वाटते की, या लक्षवेधी सूचनेला भरपूर न्याय मिळालेला आहे, आता आपण पुढे जाऊ.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री गोपालदास अग्रवाल : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री जी ने दो बातें कही है. 1 करोड 15 लाख से ज्यादा कार्डधारकों के गॅस कनेक्शन के कार्ड स्टॅम्पींग नहीं हुए है. गॅस और रॉकेल का बहुत कालाबाजार चालू है. इसलिए यह रिकन्सिलिएशन का काम आप कितने दिनों में पूरा करने वाले है ? महाराष्ट्र में अन्न सुरक्षा कायदा लागू करने लिए...जैसा कि आपने अभी सकारात्मक बात की है. हजारों करोड़ रुपये का अन्नधान्य बच रहा है. पूरे खर्च के लिए 1500 करोड़ रुपये लग रहे थे. इसलिए आपने इस योजना को बंद करने का निर्णय लिया. बायोमेट्रिक और आधार कार्ड का लिंकेज करके यह योजना कितने महीनों में शुरु करने का सरकार का निर्धार है ?

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, या संदर्भात राज्य सरकारने आपल्याला पूर्ण परवानगी दिली. बायोमॅट्रीकचा सर्व अभ्यास करुन त्याची आयटीबरोबर बोलणी करुन, ह्या आठवड्यात किंवा मागील आठवड्यात झाली असेल, परंतु याच्या टेंडर प्रोसेसल सुरुवात झालेली आहे. आपल्या राज्यामध्ये 52 हजार 132 दुकाने आहेत. आपल्याकडे सहा विभाग आहेत. नागपूर विभागात सहा जिल्हे असून तेथे सहा जिल्ह्यांचे वेगळे टेंडर काढले जाईल. कारण मुंबईच्या व्यक्तीने टेंडर भरले तर त्याला गडचिरोलीतील दुकानात काम करता येणार नाही. मी असा विचार केला की, राज्याचे एक टेंडर काढण्यापेक्षा सहा विभागात टेंडर काढण्यास सोयीस्कर राहील. त्यामुळे सहा विभागात टेंडर काढण्यात आले असून त्याची प्रोसेस सुरु झालेली आहे. त्यासंदर्भात वर्तमानपत्रात येईल. टेंडर आल्यानंतर तीन ते चार महिन्यामध्ये बायोमॅट्रीक पद्धत सुरु होईल. अन्न सुरक्षा कायद्यात एपीएलला घेण्याचे बंधन नाही. तरी देखील राज्य सरकार सहानुभूतिपूर्वक विचार करीत आहे. कारण जुन्या काळात एपीएलच्या याद्या बरोबर झाल्या नाहीत. अनेक एपीएलमधील व्यक्ती बीपीएलमध्ये असायला पाहीजे होते आणि अनेक बीपीएलमधील व्यक्ती एपीएलमध्ये असायला पाहीजे होते. परंतु तेव्हा रेशन दुकानदाराने याद्या करायला दिल्यामुळे हा सर्व गोंधळ झालेला आहे. त्यामुळे बीपीएलला जे धान्य दिले जाते ते एपीएलला देण्यासंदर्भात बायोमॅट्रीक पद्धत सुरु झाल्यावर ज्या अन्नाची बचत होईल, ते एपीएलला देण्याबाबत सरकार सकारात्मक विचार करीत आहे.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसीम खान : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, या वर्षी उचल कमी झालेली आहे. म्हणजेच धान्य सरप्लस झालेले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. सरप्लस झालेले धान्य अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत राहिलेल्या लोकांना त्यांच्या उत्पन्नाची दरवाढ करुन त्यांचा समावेश करणार काय, तसेच राज्यात मराठवाडा व विदर्भासह अनेक ठिकाणी दुष्काळ आहे. त्या भागातील लोक शहराकडे येत आहेत.शहरात आलेल्या अशा लोकांचे टेम्परवारी कार्ड बनवून त्यांना शहरात रहातील तोपर्यंत अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत दोन, तीन रुपये किलो दराप्रमाणे धान्य देण्याचे आमच्या शासनाचे धोरण होते. शासनाकडे धान्य सरप्लस झालेले आहे. त्यामुळे मुंबई, ठाणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक इत्यादी शहरामध्ये येणाऱ्या लोकांचे टेम्परररी रेशनकार्ड बनवून त्यांन अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत दोन, तीन रुपये किलोने धान्य देणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, धान्य सर प्लस होण्याचे कारण असे आहे की, आपण आधार कार्ड कम्पलसरी केल्यामुळे बोगस कार्डधारक जात नाहीत. पुणे शहर आणि जिल्ह्यामध्ये आताच 2 लाख 75 हजार कार्ड अशी सापडली की, ज्यावर लिंकप केले जात नाही. याचा परिणाम म्हणजे आम्ही त्यांना अन्नधान्य देत नाही. त्यामुळे उचल कमी झाली. आधारकार्ड लिंकपचे काम पूर्ण झाल्यानंतर राज्यातील अशी बचत एकत्र करण्याची आवश्यकता आहे. बचत होणारे धान्य आणि एपीएलला लागणारे धान्य यामध्ये थोडे कमी पडले तरी सरकार देण्यास तयार आहे. 15 एप्रिल नंतर आधारलिंकपचे काम पूर्ण झाले, की नेमकी किती बचत होईल ते कळणार आहे. एपीएल धारकांकरिता किती धान्य कमी पडेल ते देखील कळेल. धान्य कमी पडले तर त्याबाबत सरकार सहानुभूतिपूर्वक विचार करेल. धान्य देण्याचा सरकारचा विचार आहे. दुष्काळी भागामध्ये वेगवेगळ्या ठिकाणाहून आता मागणी होत आहे. शहरामध्ये आलेले लोक कुठून येतात हे विचारण्याची गरज नाही. निश्चितच ते जास्त दुष्काळी भागातूनच येत असतील. पुणे शहरामध्ये मी स्वतः एका छावणीवर गेलो होतो. तेथे शंभर, सव्वासे लोक थांबलेले होते. ते सर्व बाहेर गावचे विशेषतः मराठवाड्यातील होते. माझ्यासोबत पुरवठा अधिकारी होते. आपल्याला देशामध्ये कायद्याने मागेल त्याला अन्नधान्य द्यायचे आहे. अन्नधान्याकरिता असलेल्या रेशन कार्डचा वापर हा इतर कोणत्याही पुराव्याकरिता करता येत नाही. आता अशी भीती आहे की, अशा पद्धतीने धान्याचे वाटप

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

गिरीश बापट.....

सुरु झाले तर मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणात लोंढे येऊ शकतात. तरीही त्याकरिता काही मर्यादा घालावी लागणार आहे. परंतु ही लोक उपासी राहू नये, याकरिता पाऊस पडेपर्यंत जिल्हाधिकारी यांच्यामार्फत त्यांची तपासणी करण्यात येईल. तपासणी करण्याचे कारण असे आहे की, हे लोक बाहेर गावाहून आले आहे काय, याचा पुरावा पहावा लागणार आहे. अन्यथा एपीएलमध्ये नाकारलेले गावातील लोक तेथे घुसण्याची भीती आहे. म्हणून हे काळजीपूर्वक करण्याची गरज आहे. त्यामुळे खेडे गावातून आलेल्या अशा लोकांची तपासणी करुन, त्यांचे पुरावे बघून ते उपाशीपोटी राहू नये, याकरिता सरकार त्यांना धान्य देण्याचा सहानुभूतिपूर्वक विचार करेल.

**तालिका सभाध्यक्ष (श्री राहुल बोंद्रे) :** सम्माननीय सदस्य श्री अबु आजमी साहब, क्या आपका प्रश्न गैस कनेक्शन के बारे में है ? यह लक्षवेधी गैस कनेक्शन के बारे में है.

श्री अबु आझमी : आप सब की बात सुन रहे है, मेरी बात क्यों नहीं सुन रहे है ?

**तालिका सभाध्यक्ष :** एक लक्षवेधी कितने समय तक चलाएंगे ?

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, पुण्यामध्ये मराठवाड्यामधील शंभर ते सव्वासे लोक आल्याचे मंत्री महोदयांनी कोट केले. मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री माननीय एकनाथराव खडसे यांनी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, मराठवाड्यातील एकही माणूस मराठवाडा सोडून बाहेर गेलेला नाही. यामध्ये आपण सांगत असलेली बाब खरी आहे की, ते सांगत असलेली बाब खरी आहे. यामधील वस्तुस्थिती काय आहे. शासन कोणाची दिशाभूल करीत आहे. एक मंत्री म्हणत आहेत की, स्थलांतर झाले आहे आणि दुसरे मंत्री म्हणत आहे की, स्थलांतर झालेले नाही. आपण अशा प्रकारे महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल करीत आहात.

श्री. गिरीष बापट : माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे हे सांगत असलेली बाब खरी आहे व मी सांगत असलेले बाब सुद्धा खरी आहे. मी याचे कारण सांगतो. माझ्याकडे काही लोक आले, तेव्हा मी स्वतः बघायला येणार असल्याचे त्यांना सांगितले. काही लोक नगरहून आले आहेत. वेगवेगळ्या जिल्ह्यातून लोक आलेले आहेत. मी मघाशी जाणिवपूर्वक म्हटले की, अशी लोक कोणत्या जिल्ह्यातून आली, त्याबाबत तपासणी करावी लागेल. विशेषतः मराठवाडा, सोलापूर या

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री गिरीश बापट.....

भागातील अनेक लोक पुण्यासारख्या शहरात वर्षानुवर्षे रहात आहेत. आपण कुठले आहात असे त्यांना विचारल्यावर मी मराठवाड्यातील आहे, मी सोलापूरचा आहे, मी बीडचा आहे, असे त्यांच्याकडून सांगितले जाते. सांगत असताना अशी माहिती सांगितली जाते. परंतु त्यांचे मायग्रेशन होते तेव्हा ते खरोखर आता तेथे रहात होते काय आणि त्या भागातून इकडे आले आहे काय, याचे व्हेरिफिकेशन करावे लागणार आहे. आता लोंढ्याने मायग्रेशन नाही. परंतु आता शेतावर काम मिळत नाही. त्यांना विचारल्यावर नांदेड, सोलापूर, बीड चा असल्याचे सांगितले जाते. मी ज्यांना भेटलो ते वेगवेगळ्या जिल्ह्यातून यापूर्वीच तेथे स्थायिक झाले असतील. त्यामुळे आम्ही ते व्हेरिफाय करीत आहोत. परंतु कोणी कोठूनही आला तरी तो अन्नाविना जगतो आहे, असे होणार नाही. त्यांना पावसाळ्यापर्यंत म्हणजेच निदान तीन महिने तरी अशा प्रकारे धान्य देण्याची व्यवस्था सरकारकडून केली जाईल.

श्री अबु आजमी : अध्यक्ष महोदय, मैं मंत्री जी के काम से बहुत संतुष्ट हूं. मंत्री जी के पास जो भी काम लेकर जाता हूं तो वे मेरा काम प्रायोरिटी पर करते है. गैस से सिर्फ खाना पकता है, लाइट नहीं जलती है. मेरा इलाका स्लम का इलाका है. वहाँ के झोपड़ों में लाइट ही नहीं आ रही है. वहां सबस्टेशन नहीं बन रहा है. बच्चों को पढ़ने के लिए लाइट की जरूरत है.आप रॉकेल भी नहीं दे रहे है. उनको रॉकेल मिलना चाहिए. रॉकेल पांच लीटर मिलता है तो दुकान वाले चार ही लीटर रॉकेल देते है. कोई गरीब आदमी बात करता है तो उसको धक्के मारकर भगा देते है. इसकी चेकींग होनी चाहिए. राशन लेने के लिए लोग जाते है तो कहते है कि कोटा खत्म हो गया है. आप 1 से 5 तारीख में क्यों नहीं आए ? ऐसा कहा जाता है. लोगों को पगार 10 तारीख को मिलती है. ऐसा सिस्टम होना चाहिए कि 1 से लेकर 30 तारीख तक कभी भी आदमी जाए तो उसको उसके कोटे का राशन मिलना चाहिए. क्या ऐसा आदेश आप देंगे ?

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, असा आदेश आहेच. परंतु आपण एक स्ट्रीक्टली सूचना केलेली आहे. राज्यातील ज्या रेशन दुकानामध्ये माल जाईल तेथील वीस ते पंचवीस लोकांना दुकानामध्ये माल आल्याचे एसएमएसद्वारे कळविले जाते. बरेचशे लोक माल घेऊन जातात. काही वेळेला फार थोडा माल राहिल्यामुळे विक्री होत नाही म्हणून तेथे दुकानदार बसत

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश बापट.....

नाही, अशी वस्तुस्थिती आहे. दुकानदाराकडे आलेला माल कार्डधारक आल्यावर कम्पलसरी दिला पाहीजे. मग त्याच्याकडून सदरहू माल चार दिवसात दिला जात असेल, पाच दिवसामध्ये दिला जात असेल किंवा पंधरा दिवसात दिला जात असेल, असे त्याच्यावर बंधन आहे.

...X

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट......
असे ज्या दुकानात माल मिळत नसेल त्यांची यादी दिली किंवा नावे सांगितली तर त्या भागामध्ये विभागाच्या अधिकाऱ्यांना पाठवून त्यांची तपासणी करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी लाईटबाबतचा मुद्या उपस्थित केला आहे. हे खरे आहे की, झोपडपट्टीमधील वातवरण अतिशय वेगळे आहे. एक वेळ गॅस असतो परंतु लाईट नसते. कारण ती झोपडपट्टी खाजगी आहे, अधिकृत आहे की अनधिकृत आहे, अशा प्रकारचा वाद असतो. लोकांना वितरण करण्यासाठी जे रॉकेल ठेवण्यात आले आहे ते स्वयंपाक करण्यासाठीचे आहे. लहान दिवे लावून अनेक ठिकाणच्या झोपडपट्टीमध्ये लोक राहतात. ज्याच्याकडे गॅस सिलेंडर आहे त्याला रॉकेल द्यावयाचे नाही, असा शासनाने नियम केला आहे. रॉकेल इतर कारणासाठी देखील वापरण्यात येते परंतु त्यांचा विचार केला तर रॉकेलचे गणित जमणार नाही. प्रथमच राज्यातील 1 कोटी 13 लाख रेशनधारकांच्या शिधापत्रिकेवर रॉकेल संबंधी स्टॅम्प मारण्यात आला आहे. सदरहू शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्यात येणारे रॉकेल शिल्लक राहले तर गरीब घरातील लोकांना दिवाबत्ती लावण्यासाठी देण्याकरिता सकारात्मक विचार करण्यात येईल. काही खेडेगावामध्ये अंत्यसंस्कार करण्यासाठी रॉकेल मिळत नाही. यासर्व बाबींचा अभ्यास केलेला आहे. जनतेची काळजी घेण्याकरिता व गरीब माणसांना मदत करण्यासाठी माझ्या खात्यामार्फत काम करण्यात येईल.

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, मी नव्याने प्रश्न विचारणार नाही, मी जो प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर मंत्री महोदयांकडून देण्यात आले नाही. त्याबाबत मला बोलावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, सुरुवातील धुळे व अमरावती जिल्ह्यापाठोपाठ बुलडाणा जिल्ह्याचा समावेश मंत्री महोदयांनी केला त्याबाबत मी त्यांचे आभार व्यक्त करतो. मी यापूर्वी सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात त्यांच्या विभागाकडून करण्यात येणारा पाठपुरावा व सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. परंतु त्यावर अंतिम निर्णय होत नाही त्याकरिता सर्व सभासदांना बोलवून बुलडाणा जिल्ह्याच्या प्रश्नाचा निपटारा करण्यात येईल काय ?

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील पुणे व अमरावती जिल्ह्यामध्ये पायलट प्रोजेक्ट राबविण्यात येत आहे. सदरहू प्रकरणी तिसऱ्या क्रमांकावर बुलडाणा जिल्ह्यास प्राधान्य देण्यात येईल. तसेच, सदरहू प्रोजेक्टला केंद्र शासनाकडून मंजूरी देण्यात येत असल्याने बुलडाणा जिल्ह्यासंदर्भात मंजूरी मिळविण्याकरिता दिल्ली येथे जात असताना सन्माननीय सदस्य श्री.हर्षवर्धन सपकाळ यांना माझ्या समवेत नेऊन त्यांचा प्रस्ताव मान्य करण्यात येईल.

-------------

**तालिका सभाध्यक्ष (श्री.राहूल बोंद्रे) :** माननीय महिला व बालकल्याण मंत्री महोदया यांना सभागृहात एक निवेदन करावयाचे आहे, त्यांना ते करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** सेंट कॅथरिन होम, अंधेरी या संस्थेतील प्रवेशितावर होत आलेल्या अन्यायाबाबत.

**मु.शी.:** सेंट कॅथरिन होम, अंधेरी या संस्थेतील प्रवेशितावर होत आलेल्या अन्यायासंबंधी माननीय महिला व बाल विका मंत्र्यांचे निवेदन.

श्रीमती पंकजा मुंडे (महिला व बाल विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करते :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----------

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : झोपडपट्टी पुनर्वसन प्रकरणी दोषी अधिकारी व विकासकांवर कठोर कारवाई करणे बाबत

**मु.शी.** : झोपडपट्टी पुनर्वसन प्रकरणी दोषी अधिकारी व विकासकांवर कारवाई करण्यासंबंधी श्री.अनिल गोटे वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. अनिल गोटे (धुळे शहर) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"श्री.साईबाबा नगर सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) भूकर क्रमांक १ (भाग) व २ (भाग) लोअर परेल विभाग, जी/दक्षिण, धोबीघाट, सातरस्ता, मुंबई येथे आलेली झोपडपट्टी पुनर्वसन योजना, महालक्ष्मी येथे असलेले ऐतिहासिक धोबीघाट हटवून त्याठिकाणी पुनर्वसन योजना राबविण्याचा कट संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने रचण्यात आल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये उघडकीस येणे, त्यातून झालेला भ्रष्टाचार, विकासकाशी संगनमत करुन शासनास दिशाभूल करणारी माहिती देऊन प्रत्यक्ष १५१६ झोपडीधारकांपैकी ८५४ झ ोपडीधारकांना सभेची नोटीस वेळेवर मिळू नये व त्यांना मतदान करता येवू नये यासाठी रचण्यात आलेल्या कटामुळे ८५४ झोपडीधारक मतदानापासून वंचित राहणे, त्यामुळे शासनाच्या अटीनुसार ७० टक्केची संमती सिध्द न होणे, झोपडपट्टी पुनर्वसन तसेच मुंबईतील हेरिटेज दर्जाच्या धोबीघाटाच्या पुनर्वसनास केवळ ३१ टक्के झोपडपट्टीधारकांची संमती असतांना उक्त योजना राबविण्यात येणे, परिणामी ८५४ झोपडपट्टीधारकांना अपात्र ठरवून त्यांना पुनर्वसनाचा हक्क नाकारण्यात येणे, परिणामी ८५४ झोपडपट्टीधारक बेघर होणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, विकासकास पाठिशी घालण्याचा होत असलेला प्रयत्न, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन यास जबाबदार असणाऱ्या दोषी विकासकांवर कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री रविंद्र वायकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, मी उपस्थित केलेल्या लक्षवेधीच्या उत्तरामध्ये सांगितले आहे की, बरेचसे झोपडपट्टीधारक शासन निर्णय दिनांक 15 मे, 2015 अन्वये पात्र होण्याची शक्यता आहे. याचा अर्थ अपात्र झोपडपट्टीधारकांना गृहीत धरुन मे.ओमकार रियालिटर्स प्रोजेक्ट प्रा.लि. यांची विकासक म्हणून नियुक्ती करण्यात आली हे खरे आहे काय ? पात्र झोपडपट्टीधारक असलेल्या 70 टक्के झोपडीधारकांनी अनुमती दिली नसल्याने टप्प्याटप्प्याने त्यांची परवानगी घेण्याची तरतूद कायद्यामध्ये आहे काय ? खरेदी-विक्री केलेल्या 183 झोपडपट्टीधारकांची संमतीपत्रे दाखल केली आहेत, असे लक्षवेधीच्या उत्तरामध्ये सांगितलेले आहेत. धोबी घाट येथील वारसा जतनश्रेणी प्रमाणे नमूद केला नाही. त्यामुळे जवळजवळ 497 झोपडपट्टीधारक वारसाहक्क न लावल्याने पुनर्वसनापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय ?

श्री.रवींद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनिल गोटे यांनी सदरहू लक्षवेधी उपस्थित केली आहे.

अध्यक्ष महोदय, शासन निर्णय 16 मे, 2015 प्रमाणे झोपडपट्ट्या पात्र होण्याची शक्यता यासंदर्भात प्रश्न विचारलेला आहे. ज्यावेळी मुंबई शहरामध्ये झोपडपट्टी पुनर्विकास योजना आणण्यात आली होती त्यावेळी सन 1995 पर्यंत झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या व्यक्तीस पात्रतेचे प्रमाणपत्र देण्यात येत होते. सन 1995 पर्यंत झोपडीधारक व्यक्तीला पात्र घोषित करण्यात येत होते. परंतु त्यासंदर्भात सभागृहाने सांगितले की, व्यक्ती ऐवजी जे झोपडे असेल त्याला पात्र करण्यात यावे व ही बाब सर्वानुमते मान्य करण्यात आली. त्यानंतर तत्कालीन सरकारने सन 2000 पर्यंतच्या झोपड्यांचा समावेश पात्रता यादीमध्ये करण्याचा निर्णय घेतला व तो दिनांक 16 मे, 2015 च्या अनुषंगाने आताच्या मुख्यमंत्री महोदयांनी कायम केला. त्यामुळे सदरहू शब्द लक्षवेधीच्या उत्तरामध्ये वापरण्यात आला आहे. सन 1995 ते 1 जानेवारी, 2000 पर्यंतचे जेवढे झोपडपट्टीधारक असतील त्यांना पात्रतेच्या निकषामध्ये बसवता येते, असा त्याचा अर्थ आहे.

अध्यक्ष महोदय, टप्प्याटप्पयाने झोपडपट्टीधारकांच्या परवानगी संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. ज्यावेळी एखादा प्रस्ताव सादर करण्यात येतो त्यावेळी त्यास सर्व लोकांनी परवानगी दिलेली असते असे नाही. सदरहू लक्षवेधी जवळपास 4-5 वेळा सदनामध्ये चर्चेला आली आहे.

यानंतर Y-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्र्यांच्या उत्तराला माझा आक्षेप आहे. या लक्षवेधीच्या माध्यमातून मंत्र्यांचे उत्तर जर समाधानकारक आले असेल आणि शासनाची भूमिका जर स्पष्ट झाली असेल तर ही लक्षवेधी लावण्याचे कारण काय आहे याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. कारण या ठिकाणी संशय व्यक्त केला गेला आहे. यामध्ये न्यायालयाचा आदेश असेल आणि न्यायालयाने निर्णय दिला असेल तर या लक्षवेधीचा हेतू स्वच्छ आहे काय याचे स्पष्टीकरण करावे ?

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. अनिल गोटे साहेब सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांना प्रश्न विचारला आहे, त्यामुळे त्याचे उत्तर माननीय मंत्री महोदय देतील.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचना लावणे हा माननीय अध्यक्षांचा हक्क आहे. लक्षवेधी सूचना लागल्यानंतर त्या अनुषंगाने उत्तर देणे शासनाला गरजेचे आहे. त्यामुळे शासनाने उत्तर दिलेले आहे.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, माझा अध्यक्षांच्या अधिकारावर माझा आक्षेप नाही. पण ही लक्षवेधी स्वीकारीत असताना विधीमंडळातील सचिवांनी माननीय अध्यक्षांना सांगणे गरजेचे होते की, ही लक्षवेधी सूचना पूर्वी झालेली आहे. या विषयाचा निर्णय झालेला असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना स्वीकारु नये. याचा अर्थ असा होतो की, सन्माननीय सदस्यांनी ही लक्षवेधी सूचना स्वीकारण्यासाठी दबाव आणला असेल तर याची चौकशी करुन ती जर पुन्हा टाकली असेल तर आणि शासनाने निर्णय दिला असेल तर या संदर्भात शासनाने स्पष्टीकरण करणे गरजेचे आहे. अध्यक्षांच्या येथून सचिवांनी याचे स्पष्टीकरण करणे गरजेचे आहे. ही लक्षवेधी पूर्वी झाली असेल तर त्याचे रेकॉर्ड द्यावे आणि त्यावरील शासनाच्या निर्णयाने सभागृहाचे समाधान झाले असेल तर ती पुन्हा पुन्हा टाकण्याचा संशय विधिमंडळाच्या कामकाजावर येतो. म्हणून या संदर्भात माझी हरकत आहे.

श्री. अनिल गोटे : सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी असे वक्तव्य केले की लक्षवेधी सूचना लावणाऱ्या सदस्यांनी अध्यक्षांवर दबाव आणला आहे. माननीय अध्यक्ष हे दबावाला घाबरतात हा माझा आक्षेप आहे.

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. अनिल गोटेसाहेब आपली लक्षवेधी सूचना लागली आहे. आपल्या लक्षवेधी सूचनेला न्याय मिळेल. कदाचित या लक्षवेधीला न्याय मिळाला नसावा म्हणून ही पुन्हा लागली असावी. मंत्री महोदय आपण न्याय मिळेल असे बघावे.

श्री. अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, मी सांगतो की ही लक्षवेधी का लावण्यात आली आहे. 21 एप्रिल 2015 रोजी या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला शासनाने मान्यता दिलेली आहे. शासनाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, दिनांक 16.5.2015 अन्वये पात्र होण्याची शक्यता आहे. याचा अर्थ मी पहिल्यांदा म्हटल्याप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये हे पात्र नसताना याच बिल्डरला परवानगी देण्याचे कारण काय आहे, हा एक भाग आणि दुसरा मी प्रश्न विचारला होता की, एका वेळेला जर 70 टक्के लोकांन अनुमती दिली नसेल तर टप्प्याटप्प्याने अशी अनुमती घेतली जाते काय ?

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. अनिल गोटे आपण प्रश्न विचारावेत.

श्री. अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, याचे कारण असे आहे की, ओंकार बिल्डरने तेथील लोकांच्या सह्या घेऊन झोपडपट्टी पुनर्वसन अधिकाऱ्यांकडे त्या सुपूर्द केलेल्या आहेत हे अतिशय संशयास्पद आहे. शासनाच्या उत्तरामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, यामध्ये 786 लोकांची संमतीपत्रे आहेत.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. अनिल गोटे आपण वेळ घालविण्याऐवजी प्रश्न विचारावेत. मंत्री महोदय आपल्या लक्षवेधीला न्याय देतील.

श्री. अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, या आधी ही लक्षवेधी अशीच गुंडाळण्यात आली आहे. या योजनेमध्ये 1116 पात्र झोपडपट्टीधारक आहेत. यामध्ये एकूण 1299 लोकांनी संमती दर्शविली असली तरी त्यापैकी 786 लोकांनी संमतीपत्र दिलेले आहे. याचा अर्थ शासनाच्या नियमानुसार 70 टक्के लोकांची यास अनुमती नव्हती. यामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन विकास योजनेतील अधिकारी आणि महानगरपालिकेचे अधिकारी यांनी भ्रष्टाचार करुन या बिल्डरला परवानगी दिलेली आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की,

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. अनिल गोटे आपण माझ्याकडे लक्ष देऊन बोलावे. आपसात पुन्हा कशाला बोलता. त्यामुळे पुन्हा आपल्या लक्षवेधीला न्याय मिळणार नाही.

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, त्यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे. राष्ट्रवादी आता भ्रष्टवादी झाले आहेत. याचा अर्थ असा की, यामध्ये 70 टक्के लोकांची संमती नसताना झोपडपट्टी पुनर्वसन विकास योजनेतील अधिकारी आणि महानगरपालिकेचे अधिकारी यांनी परवानगी दिली आहे का, आणि दिली असल्यास यासंबंधी सरकार गांभीर्याने विचार करुन अशा अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय मंत्री महोदयांनी स्पेसिफिक उत्तर द्यावे, जेणेकरुन लक्षवेधी सूचनेला न्याय मिळेल.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य एवढे बोलल्यानंतर त्यांना सविस्तर उत्तर देणे माझे कर्तव्य आहे. सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न विचारला की, याच बिल्डरला परवानगी का दिली. पहिला विकासक हा लोखंडवाला म्हणून होता. त्याने देखील अशा पध्दतीचे प्रपोजल दिले होते. त्याने दिलेले प्रपोजल दिल्यानंतर ते स्वीकारण्यात आले. त्यानंतर जी पात्रता निश्चित करावयाची होती ती देखील सांगण्यात आली. पात्रता दिल्यानंतर कोण बिल्डर आणावा हे तो सिध्द करु शकला नाही की, त्याच्या बाजूने किती सदस्य आहेत. त्यामुळे त्यावेळी तो प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात आला. यासंबंधीचे अधिकार त्या सोसायटीला असतात आणि त्या सोसायटीने ठरवावयाचे असते की कोण विकासक आणायचा. हे शासन ठरवित नाही. यामध्ये कोण बिल्डर द्यावा किंवा कसे यामध्ये शासनाची भूमिका नसते. त्या सोसायटीने नंतर ओंकार रियल्टर्स म्हणून बिल्डर आणला आणि त्यांचे त्या ठिकाणी इलेक्शन झाले असेल किंवा त्या सोसायटीच्या संमतीने तो आणला असेल आणि त्यांनी तो प्रस्ताव दिलेला आहे. त्यामुळे घोटाळा झाला असे म्हणता येणार नाही.

Z-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, एप्रिल, 2015 ला परवानगी देण्यात आलेली आहे आणि उत्तरामध्ये दिनांक 16.5.2015 चा रेफरन्स दिलेला आहे. झोपडपट्टीधारक पात्र नसताना त्यांचे प्रपोजल कसे पाठविण्यात आले. यामध्ये नेमके काय झाले याची मंत्री महोदय चौकशी करणार आहेत की नाही एवढाच माझा प्रश्न आहे.

श्री.रवींद्र वायकर : अध्यक्ष महोदय, ज्यावेळेला एखाद्या सोसायटीला वाटले की हे बरोबर नाही, त्याची कॅपेसिटी नाही तर ते दुसरा विकासक आणू शकतात. सन 2000 चा निर्णय हा निवडणूकीपूर्वी झाला होता. याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी एक बैठक घेऊन दिनांक 16.5.2015 नुसार पात्रता निश्चित केली. त्यांनी जे प्रपोजल आणले होते ते मान्य करण्यात आले. याबाबतीत जर भ्रष्टाचार झाला असे आपल्याला वाटत असेल तर आपल्याला आणि संबंधित अधिकाऱ्याला बोलावून याबाबतीत चौकशीत करण्यात येईल.

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, झोपडपट्टी पुनर्वसन कायद्यांतर्गत धोबीघाट या योजनेअंतर्गत त्याच परिसरात येतो असे सुचविण्यात आलेले आहे. याला ऐतिहासिक महत्व आहे, हेरिटेज ग्रेड असावा अशी शक्यता नाकारता येत नाही. माझा प्रश्न आहे की, या धोबी घाटला हात लागणार नाही किंवा धक्का लागणार नाही हे सभागृहामध्ये जाहीर करणार काय?

श्री.रवींद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमित देशमुख यांनी जो प्रश्न केला आहे ही खरी गोष्ट आहे. याठिकाणी धोबीघाट आहे. साईबाबा सोसायटीतील डेव्हलपमेंट प्लॅनिंगमध्ये जे रिझर्वेशन आहे आणि ही ग्रेड-3 मध्ये येत असल्याने त्यावर डेव्हलपमेंट होऊ शकते. परंतु धोबीघाटला हात लावला गेलेला नाही. भविष्यामध्ये त्याचे ग्रेड-3 मध्ये डेव्हलप करायचे असेल, बाजूच्या जागेवर करायचे असेल तर त्याचे रिझर्वेशन आकोमोडेशन असल्याकारणाने त्याठिकाणी करता येईल. हे पुरातन वास्तूमध्ये मोडत नाही. परंतु ती पुरातन वास्तू आहे. या पुरातन वास्तूचे नक्की जतन करण्यात येईल.

श्री.सुनिल शिंदे : अध्यक्ष महोदय, या साईबाबा नगरमध्ये रहिवाश्यांबरोबर काही धोबी लोक सुध्दा राहतात आणि त्यांच्या सुकवण्या सुध्दा त्या परिसरात आहेत. पुनर्वसन होत असताना परंपरागत धोबी लोकांची कपडे सुकवण्याची जागा आहे. या पात्र झालेल्या धोबी व्यवसायिकांचे आणि रहिवाश्यांचे पुनर्वसन त्याच जागेवर होईल काय? दुसरा प्रश्न असा की, या प्रकल्पाबाबत

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल शिंदे.......

वर्तमानपत्रातून किंवा मेडियाच्या माध्यमातून सातत्याने वेगवेगळ्या बातम्या येत असल्यामुळे त्याठिकाणी धोबी संघटना आणि रहिवाशी संघटना हे सातत्याने चिंतीत आहेत. शिवाय बिल्डर आणि त्यांच्या दलालांकडून दहशतीची वागणूक दिली जाते. या खात्याचे मंत्री म्हणून कोणीतरी जबाबदारीने बोलले पाहिजे. आपण या सर्वांना बोलावून अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन या प्रकल्पाबाबत त्यांना खात्री देणार काय? याठिकाणी सोसायटीच्या नावाखालीविकासकाचे काही दलाल याठिकाणी प्रचंड दहशत निर्माण करीत आहेत. जे कपडे सुकवणी करणारे धोबीघाट आहेत ते येथून कसे निघून जातील किंवा जे रहिवाशी आहेत ते भितीपोटी कसे निघून जातील. या भितीपोटी एकही रहिवाशी किंवा धोबी पुढे यायला मागत नाही. पोलीसांकडे जायला मागत नाही. या खात्याचे मंत्री म्हणून आपण या दहशतीची चौकशी करुन दोषी असलेल्या व्यक्तींवर कारवाई करणार काय? मुंबई महानगरपालिकेकडून कालच या रहिवाश्यांना व धोबी व्यवसायिकांना पत्र आलेले आहे की, आपण याठिकाणी काम करीत असल्याचा पुरावा लागेल. याठिकाणी ब्रिटीशकालीन धोबीघाट आहे. धोबीघाटाच्या पलीकडे ही मंडळी साईबाबा नगरमध्ये गेली अनेक वर्षे राहत आहेत. त्यांच्या कपडे सुकवण्या त्याठिकाणी आहेत. महानगरपालिकेकडून त्यांना अशाप्रकारे पत्र आलेले आहे. या पत्राबाबत मी संशय व्यक्त करतो की, कुणाच्या तरी दबावाखाली येऊन हे पत्र पाठविले गेलेले आहे. या पत्राची सविस्तर माहिती घेऊन त्याच्यावरील कारवाईला आपण स्थगिती देणार काय?

श्री.रवींद्र वायकर : अध्यक्ष महोदय, ज्याठिकाणी हा धोबीघाट आहे त्याठिकाणी हा कपडे धुण्याचा आणि सुकवण्याचा व्यवसाय चालू होता आणि हा व्यवसाय चालू असताना त्याठिकाणी जी जागा आहे. त्या जागेवर विकासक आले असे आपण सांगितले. सन्माननीय सदस्य श्री.अमित देशमुख यांनी सांगितले की ते धुण्याचे काम करायचे आणि दुसऱ्या बाजूला सांगता की, त्याठिकाणी त्यांची वाळवणी आहेत. या वाळवणीवर त्यांच्या रस्स्या असतात आणि त्या रस्स्यांवर कपडे सुकत घालतात. आज मुंबई महापालिकेच्या माध्यमातून एक पत्रक आलेले आहे. ही जागा मुंबई महानगरपालिकेची आहे. या मुंबई महानगरपालिकेच्या जागेवर डेव्हलप करताना त्यांना 2,017.15 चौरस क्वेअरमीटर एरिया देण्यात येणार आहे. त्यामध्ये त्यांना कशा पध्दतीचे बांधकाम

........3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रवींद्र वायकर........

पाहिजे याचा विचार करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना बोलावून विकासकाने बांधकाम करुन द्यायचे. याबाबत बैठक घेण्यात येईल त्यावेळेला याचा विचार केला जाईल. आपण दुसरे सांगितले की, त्याठिकाणी दहशत होते. दहशतवादामुळे नागरिक पोलीस स्टेशनला जाऊ शकत नाहीत. जर अशा काही गोष्टी नजरेस आल्या तर आणि असे काही पोलीस स्टेशनला गेले असतील तर याठिकाणी दहशत होऊ देणार नाही आणि शासन त्यांच्यावर कडक कारवाई करेल. अशा पध्दतीने जर कोणी दहशत करीत असेल तर त्याच्यावर उचित ती कारवाई केली जाईल.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, या प्रश्नाचे जे उत्तर देण्यात आलेले आहे. या उत्तरामध्ये असे सांगण्यात आलेले आहे की, 1299 झोपडपट्टी धारकांची वैयक्तिक संमती पत्रे सादर केली. त्यातील 786 लोकांनी स्वाक्षरी केलेली संमती पत्रे आहेत. यामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, पात्र होण्याची शक्यता आहे. पुढे जाऊन उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, 1116 पात्र सभासदांच्या 70.43 टक्के सभासदांनी संमती पत्रे दिल्याचे दिसून येते आणि मागच्या पानावर जी आकडेवारी दिली आहे ती 42 टक्के, 60 टक्के अशीच आहे. ज्या 1299 सभासदांनी वैयक्तिक संमती पत्रे दिलेली आहेत त्यातील 1116 पात्र सभासद आहेत असा त्याचा अर्थ काढायचा काय? 1116 पात्र असतील तर त्यातील 1012 लोकांना कुरीअरद्वारे नोटीसा पाठविल्या आणि त्या स्विकारल्या. 104 लोकांना स्पीड पोष्टद्वारे नोटीसा पाठविल्या. सभेसाठी फक्त 660 सभासद आले. 660 लोकांपैकी 659 लोकांनी गुप्त मतदान केले. त्यापैकी 470 पात्र सदस्यांनी संमती दिली. 470 चे प्रमाण 1116 मध्ये काढले तर ते 43 टक्के होते. 1116 सभासद पात्र असतील तर त्या सर्वांची संमती घेणे आवश्यक आहे. तुम्ही सभा बोलावली त्याठिकाणी काही आले असतील, काही नाही आले नसतील तेवढ्याचाच आधार घेतला आणि कार्यक्रम सुरु झाला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

AA-1........

श्री. जयंत पाटील .........

मला माहिती नाही नियम, कायदा काय आहे ? आकडेवारी आणि जे मुद्दे समोर आलेले आहेत. ते बघता मंत्री महोदय हे स्पष्ट करतील का ? पात्र असणा-या सदस्यांच्या पैकी 70 पेक्षा जास्त सदस्यांनी लेखी पत्राद्वारे मान्यता दिलेली आहे. त्याची जी प्रोसिझर आहे ती सर्वांची पूर्ण झाली असेल तर तक्रार करायला जागा नाही. पण ती झाली अशी शंका यावी असे या दुस-या पानावरील पहिल्या परिच्छेदावरुन वाटते आहे. एवढी सभागृहाला त्यांनी माहिती द्यावी.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, ज्या वेळेला मे.ओमकार रियल्टर्स् प्रा.लि. यांची त्या सोसायटीने विकासक म्हणून नेमणूक केल्यानंतर त्यांनी संमती पत्रे दिली त्याच्या अनुषंगाने शासनाच्या माध्यमातून ज्यावेळेला तेथे असे होत होते. त्यावेळेला शासनाने निर्णय घेतला की, याबाबत बैठक घ्यावी. त्या पध्दतीने शासनाने मागील पानावर उत्तर दिलेले आहे की, सहकार कक्षामार्फत एक सभा आयोजित केली. या सहकार कक्षाच्या माध्यमातून सहाय्यक निबंधकांच्यामार्फत जागा निश्चित केली. तिथे जेवढे लोक होते त्या सर्व 1116 लोकांना नोटीसा पाठविण्यात आल्या. काही लोकांना मिळाली नाही म्हणून ती स्पिड पोस्टाच्या माध्यमातून पाठविण्यात आली. शासनाने तिथे बैठक घेतली. दिनांक 26.3.2015 रोजी सभा आयोजित केली. नोटीसा पाठविलेल्या झोपडपट्टीवासियांची संख्या 1116 होती. 104 नोटीसा स्पिड पोस्टच्या माध्यमातून पाठविल्या होत्या. त्या लोकांना नोटीसा पाठविल्यानंतर किती उपस्थित राहील याच्यावर प्रश्न होता. त्या ठिकाणी जवळजवळ 660 लोक उपस्थित झाली. त्या 660 मधील एक अपात्र होता. 559 लोकांनी मतदान केले. विकासकाच्याबाजूने 470 लोकांनी मतदान केले. त्या ठिकाणी असलेल्या उपस्थितीच्या माध्यमातून ही टक्केवारी 70 टक्यांपेक्षा जास्त होती. म्हणून त्याला मान्यता देण्यात आली.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न हा असा आहे की, 1116 सदस्यांपैकी 70 टक्के की हजर असणा-यांपैकी 70 टक्के एवढे मला सांगा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.....2/-

श्री.रविंद्र वायकर : जे उपस्थित राहिले त्याच्या 70 टक्के गृहीत धरले.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर असा आहे की, मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. विकास नियंत्रण नियमावलीतील प्रचलित तरतूदीनुसार सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत 70 टक्यांपेक्षा जास्त सदस्यांची संमती असल्यामुळे असे उत्तर दिले तर ही प्रचलित तरतुद कुठली आहे ? मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. एकूण झोपडपट्टीमध्ये जेवढया झोपडया असतील त्याचे अनेक्स्चर परिशिष्ट-2 झाल्यानंतर जेवढया झोपडयांना पात्रता दिली असेल. हे पात्रता दिलेल्या झोपडयांच्या 70 टक्के किवा सभागृहात उपस्थित 660 लोक दाखविली आहेत. जागेवर 60 लोक उपस्थित राहिले आणि त्यातील 70 टक्के म्हणजे 42 लोकांनी संमती दिली. 42 लोकांच्या आधारावर 1200 झोपडपट्टीवासियाचे भवितव्य ठरविणार आहात का ? म्हणून प्रचलित तरतूद कुठली आहे. हा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, आपण 1299 झोपडपट्टीधारकांची संमती पत्रे सादर केली होती. बरेचशे झोपडीधारक शासन निर्णय गृहनिर्माण विभाग दि.16.5.2015 अन्वये पात्र होण्याची शक्यता आहे. ज्याची शक्यता आहे त्याच्या आधारावर लवकर निर्णय घेण्याची घाई कशासाठी लागली आहे. या हेरिटेजच्या प्रकरणावर सन्माननीय सदस्य श्री.अमित देशमुख बोलले आहेत. हया विषयावर मी नंतर येतो जर मला प्रश्न विचारण्याची संधी दिली तर. माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. उपस्थित सदस्यांपैकी 70 टक्के किंवा पात्र सदस्यांपैकी 70 टक्के याचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा ? हे झोपडपट्टी धारक पात्र होतील या अपेक्षेवर असे निर्णय घेण्याचा अधिकार कुठल्या ॲथॉरिटीला कुठल्या नियमानुसार शासनाने दिला आहे असे माझे दोन प्रश्न आहेत.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, पात्र 1116 झोपडपट्टीधारकांपैकी 70 टक्के लोकांनी लेखी संमती दिलेली आहे. लेखी संमती दिल्यानंतर त्याठिकाणी मतदान घेण्यात आले.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, त्या मिटींगमध्ये सदस्यांनी सांगितले हया स्वाक्षऱ्या आमच्या नाहीत. अशी विचारणा करण्यात आली होती. त्यानंतर मिटींग कशासाठी घेतल्या होत्या ? तर एस.आर.ए. विभागातील सहकार विभागाचे अधिकारी पाठवून ती मिटींग घेण्याचे कारणच हे होते की, आमच्या स्वाक्षऱ्या नाहीत असे लोकांनी आक्षेप घेतले होते. हे आक्षेप घेण्यात आले त्याप्रकरणाची माहिती शासनाकडे आहे का ?

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, पहिला प्रश्न होता त्याचे उत्तर मी पुन्हा सांगतो. 1116 पैकी 70 टक्के लोकांची लेखी संमती आहे. त्यानंतर मतदार घेतले त्यावेळी उपस्थितांच्या 70 टक्के लोकांचे मत त्याच्या बाजूने झाले. हे दुस-या प्रश्नाचे उत्तर आहे. शासनाकडे अशा तक्रारी आल्या तर त्याची नक्कीच दखल घेतली जाईल.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर या लक्षवेधीला अजून किती वेळ द्यायचा. सन्माननीय सदस्यांनी कृपया जागेवर बसावे.

श्री.रविंद्र वायकर : पात्र जी लोक होती त्यातील 70 टक्के लोकांनी संमती दिलेली आहे. अशा पध्दतीचे ॲनेक्स्चर परिशिष्ट-2 आहे. माझ्याकडे जी माहिती आहे ती नक्की तिच आहे. त्यामध्ये उपस्थितानी जे इलेक्शन घेतले त्याच्यामध्ये इलेक्शन झाल्यानंतर जे उपस्थित होते त्याच्या 70 टक्के लोकांनी संमती दिलेली आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : आता सन्माननीय सदस्य श्री.अमित देशमुख आणि सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर म्हणाले की, हा धोबीघाट ऐतिहासिक आहे. त्याचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता त्याला धक्का लागार नाही हे पहावे. यामध्ये एकंदरीत सदनाची भावना दिसते आहे.

( काही सदस्य उभे राहून एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करतात )

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.पराग अळवणी : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे की, सुरुवातीला 70 टक्यापेक्षा जास्त लोकांनी संमती पत्र दिली असल्यामुळे त्यानंतर जेव्हा अग्रीमेंट झाल्यानंतर उपस्थितांपैकी 70 टक्के मोजे गेले. कारण पूर्वी संमती पत्रे होती. येथे 183 लोक कदाचित नंतर पात्र होतील. यासापेक्ष त्यांना 70 टक्यांमध्ये मोजले गेले. त्या 183 पैकी आजच्या घडीला किती मंडळी पात्र झाली.

श्री.अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेच्या उत्तराच्या दोननंबर वरील पानावर म्हटले आहे की,....

BB-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल गोटे.....

दिनांक 26 मार्च,2015 रोजी नियोजित संस्थेची विशेष वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली. मला शासनाच्या या गतीशिलतेचे भयंकर आश्चर्य वाटते. दिनांक 26 मार्च,2015 रोजी सर्वसाधारण सभा घेण्यात येते त्यामध्ये 70 टक्के लोकांनी मान्यता दिली म्हणून सांगण्यात येते. व्हेरिफिकेशन कधी करण्यात आले ? या संदर्भातील दिनांक 21 एप्रिल ची ऑर्डर माझ्याकडे आहे. यानंतर केवळ 25 दिवसानंतर ही ऑर्डर काढण्यात आली. 25 दिवसांमध्ये एवढी प्रक्रिया पूर्ण कशी झाली ? गृहनिर्माण मंडळाच्या अधिका-यांचा रिपोर्ट आला. शासनाच्या उत्तरातूनच मी यांना पकडलेले आहे. मला सांगा अशी कोणती गतीशिलता होती, ज्यावेळी याला मान्यता देण्यात आली ?

श्री.रवींद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी 183 च्या बाबत विचारले. हे 183 लोक ॲडिशनल आहेत. ती लोक ॲडिशनल असल्याकारणाने त्यांना गृहित धरण्यात आलेले आहे. दिनांक 16.5.2015 प्रमाणे 2000 च्या निकषाप्रमाणे ते पात्र होतील, असा त्याचा अर्थ होतो. या योजनेला या पूर्वी 70 टक्के लोकांची संमती होती. पूर्वीचीही एक योजना होती. परंतु याबाबत पुन्हा खात्री करण्यासाठी सभा आयोजित केली होती. एसआरएने जी बैठक लावली त्या अनुषंगानेच ती बैठक लावली होती. शासनाची कोणतीही योजना ही एस्पिडाईट झालीच पाहिजे. मागील शासनामध्ये ती झाली नसेल तर या शासनामध्ये ते करणे गरजेचे आहे. या योजनेमध्ये जर काही तक्रारी असतील तर त्याबाबत हायपॉवर कमिटीकडे अप्लाय करता येते. त्या पध्दतीने हायपॉवर कमिटीने यापूर्वी ॲक्शन घेतलेली आहे. हायपॉवर कमिटीने ॲक्शन घेतल्यानंतर पुन्हा कोर्टात गेले होते. कोर्टाने पुन्हा याबाबत निर्णय दिलेला आहे. यामुळे ती एक्सपायरी करण्यात आलेली आहे.

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने खूप चर्चा झाली. माझ्या तालुक्यातील काही लोक भैरवनाथ गृहनिर्माण सहकारी संस्था,चारबंगला, अंधेरी येथे 20-25 वर्षापासून राहत आहेत. एसआरए कायद्याच्या अनुषंगाने ती संस्था निर्माण झाली होती. त्या संस्थेच्या माध्यमतून काही लोकांवर अन्याय झाला. याकरिता सन्माननीय गृहनिर्माण मंत्री श्री.प्रकाश महेता साहेबांच्या चेंबरमध्ये बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये जे अपात्र असतील आणि त्यांच्यावर अन्याय झाला असेल, त्याबाबत योग्य ती कारवाई करावी, अशी विनंती केली गेली होती. ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश आबिटकर.....

या प्रश्नाच्या अनुषंगाने मी प्रत्यक्षात एसआरएमध्ये गेलो होतो. तेथे एसआरएमध्ये चुकीच्या पध्दतीने ॲनेक्चर टू करीत असताना व बेकायदेशीरपणे खोटे कागदपत्रे तयार करुन गंभीर अशा पध्दतीच्या चूका करणारे अधिकारी मला दिसले. एसआरए मध्ये मी एका बाबीचा शोध घेण्याकरिता गेलो असता मला ही परिस्थिती दिसली तर या पूर्ण एसआरए मध्ये किती घोळ असेल, याची कल्पनाच केलेली बरी. भैरव गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या ॲनेक्चर टू मध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करुन संबंधित एसआरए अधिका-यांना सस्पेंड करण्याबाबत निर्णय शासन घेणार आहे का ? या अनुषंगाने जे अपात्र लाभार्थी असतील त्या लोकांना योग्य पध्दतीने न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे का ?

श्री.रवींद्र वायकर : होय.

------

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: पंचायत समिती,मोहाडी येथील मग्रारोहयोच्या कामांना मान्यता देताना आर्थिक गैरव्यवहार होणे.

**मु.शी.**: पंचायत समिती,मोहाडी येथील मग्रारोहयोच्या कामांना मान्यता देताना आर्थिक गैरव्यवहार होणे यासंबंधी सर्वश्री चरण वाघमारे, उदेसिंग पाडवी, बंटी भांगडिया, विजय रहांगडाले, ॲड.रामचंद्र अवसरे, ॲड.आकाश फुंडकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चरण वाघमारे ( तुमसर ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पंचायत समिती, मोहाडी (जि.भंडारा) येथे परिविक्षाधीन खंडविकास अधिकारी, रुजू झ ाल्यापासून महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कुशल आणि अकुशल कामांना मान्यता देताना सिंचन विहिरीचा धडक कार्यक्रम बाजूला ठेवून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करणे, शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन न करता ज्यांनी आर्थिक गैरव्यवहार केले त्यांच्याच कामांना प्रशासकीय मान्यता दिली असणे, सन २०१५-१६ च्या महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या नियोजनात समाविष्ट नसलेल्या ११ गावातील ५६,९९,१३०/- रुपयांच्या कामांना पंचायत समितीच्या मासिक सभेची मंजुरी न घेता प्रशासकीय मान्यता देणे, ग्रामसेवकांना धमक्या देणे, पंचायत समितीच्या सभापतींना विश्वासात न घेता विविध विकासाची कामे करणाऱ्या व परिविक्षाधीन कालावधीत गैरव्यवहार करणाऱ्या परिविक्षाधीन खंडविकास अधिकारी यांची चौकशी करुन कारवाई करणे तसेच सदर योजनेमध्ये होणारा गैरव्यवहार थांबविण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्रीमती पंकजा मुंडे ( रोजगार हमी योजना मंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चरण वाघमारे : अध्यक्ष महोदय, लेखी उत्तरामध्ये परिच्छेद क्रमांक 03 मध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख केलेला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत प्रशासकीय मंजूरी दिलेली कामे ग्रामसभेच्या नियोजनात असून पंचायत समिती सभा ठरावान्वये मूळ नियोजन तसेच मासिक सभा ठरावान्वये पूरक नियोजनास मंजूरी देण्यात आलेली आहे. पुरक नियोजन मंजूरीच्या ठरावामध्ये 29 ग्रामपंचायत कडील एकूण 1195 कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे. परंतु अनावधानाने 13 ग्रामपंचायतीच्या नावाचा उल्लेख असून गोषवारा मात्र 29 ग्रामपंचायत कडील 1195 कामांचा आहे. याचा अर्थबोध होत नाही. यामध्ये असून हा शब्द वापरायचा आहे की नसून याचे स्पष्टीकरण दिसत नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामांना मंजूरी देतांना संबंधितांकडून आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबतच्या तक्रारीत तथ्य दिसून येत नाही. परिविक्षाधीन खंड विकास अधिकारी यांचे एकंदरीत कामकाज पाहता समाधानकारक असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, भंडारा यांनी कळविले आहे. खरे तर पंचायत समितीच्या सभापतींनी 15 मार्च,2016 रोजी सीईओ कडे प्रशासकीय कामाची चौकशी करावी, अशी तक्रार केली. 31.3.2016 रोजी त्यांनी दुसरी तक्रार केली.

विनाचौकशी जिल्हापरिषदेचे सीईओ अशा प्रकारची उत्तरे देऊन सभागृहाची दिशाभूल करीत आहेत का ? अशी शंका मला येत आहे. एमआरइजीएसचे नियोजन मंजूर करीत असतांना ग्रामसभेकडून पंचायत समितीकडे ठराव जातो. तेथून तो ठराव जिल्हापरिषदेकडे जातो. याकरिता सर्वसाधारण सभा मंजूरी देत असते. पूरक नियोजनात आणि मूळ नियोजनात नसलेल्या नियोजनबाह्य कामांना प्रशासकीय मान्यता देऊन मोठया प्रमाणात गैरव्यवहार करण्याबाबतची माझी तक्रार होती. या संदर्भात या खंड विकास अधिका-याने एवढी हिम्मत का केली ? मागील वेळीही मी या खंड विकास अधिका-याबाबत मी सभागृहात विषय आणला होता. मागील हिवाळी अधिवेशनात मी प्रश्न मांडला होता. मोहाडी तालुक्यातील अनेक मजूरांचे एका वर्षापासून पेमेंट झाले नाही. त्या खंड विकास अधिका-याने सभागृहाला अशी माहिती दिली होती सर्व मजूरांचे मजूरांचे पेमेंट झालेले आहे. 19 मार्च रोजी अधिवेशन चालू असताना पंचायत समितीची मी आमसभा घेतली होती.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चरण वाघमारे.....

पंचायत समितीच्या आमसभेमध्ये सरपंच यांनी मला सांगितले की, मोहाडी तालुक्यातील निलतखूर येथील 15 मजूरांचे पेमेंट झालेले नाही. बिरगाव येथील 72 मजूरांचे पेमेंट झालेले नाही. नवेगाव बुद्रुक येथील 75 मजूरांचे पेमेंट करण्यात आलेले नाही. खंड विकास अधिका-यांनी सभागृहाला दिलेली माहिती व त्या अनुषंगाने माननीय मंत्र्यांनी दिलेले उत्तर खोटे आहे. यावरुन त्यांच्या असे लक्षात आले की, सभागृहात विषय आल्यानंतरही माझे कोणी काही बिघडवू शकत नाही. म्हणून नियोजनबाहय कामांना प्रशासकीय मान्यता देण्याच्या चुका पुन्हा करण्यात आलेल्या आहेत. माझी मानननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, या खंड विकास अधिका-यावर शासन निलंबनाची कारवाई करणार आहे का ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय,या संदर्भातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा अहवाल माझ्याकडे प्राप्त आहे. या संदर्भात कामामध्ये व नोंदणीमध्ये किरकोळ स्वरुपाच्या चूका झालेल्या असून कामामध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही, असे अहवालात म्हटलेले आहे. दिनांक 22 मार्च,2016 रोजी हा अहवाल दिलेला आहे. या अहवालामुळे सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नसल्यास या संदर्भात पुन्हा तपासणी करण्याचा निर्णय शासन घेऊ शकते. रोजगार हमी योजनेच्या कामाची प्रोसिजर असते. मजूरांचे बजेट होते. 15 ऑगस्ट रोजी ग्रामसभेच्या माध्यमातून गावाचे बजेट होते. त्यानंतर ते पंचायत समिती व जिल्हापरिषदेच्या जनरल बॉडीकडे ठरावाकरिता पाठविले जाते. त्यानंतर जिल्हाधिकारी यांच्याकडे अंतिम निर्णयाकरिता पाठविले जाते. राज्य शासनाकडेही याबाबतचा तपशील पाठविला जातो. केंद्र शासनाकडे देखील हे सर्व स्क्रुटिनी करुन पाठविले जाते. पुरवणी बजेटमधून याकरिता ग्रामपंचायतीला अधिकार दिले जातात. सन 2015-2016 मध्ये 21 लक्ष मनुष्य दिवसांचे उद्दिष्टाबाबत पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात निर्णय झालेला आहे. त्यापैकी 12 लक्ष मनुष्य दिवस पूर्ण झालेले आहे. काम पूर्ण झाले नाही अपूर्ण आहे कामाच्या बाबतीत कोठेही याबाबत तक्रार नाही. आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे आढळून आलेले नाही. सन्माननीय सदस्यांना या अहवालाबाबत समाधान नसेल व तक्रारी असतील तर सीईओ आणि उपायुक्त, इजीएस यांना सांगून पुन्हा तपासणी करुन याबाबत शासन निर्णय घेईल.

सीसी-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. योगेश सागर )**

श्री. चरण वाघमारे : अध्यक्ष महोदय, शासनाचा धडक सिंचन विहिरीचा कार्यक्रम सुरु आहे. मोहाडी पंचायत समितीमध्ये 229 विहीरींचे टार्गेट दिले असताना, नियोजनामध्ये हजारो विहीरींचा समावेश असताना सुध्दा 125 विहीरींना प्रशासकीय मान्यता दिल्याचे उत्तरात म्हटलेले आहे. पूरक योजनांमध्ये संबंधित कामांचा समावेश केलेला नाही. पूरक नियोजनाचे बुकलेट सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची आवश्यकता आहे. सदरहू बुकलेटमध्ये मी आरोप केलेली 16 कामे असतील तर मी लक्षवेधी सूचना परत घेण्यास तयार आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांना चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. तसेच नियोजनबाह्य कामाला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे अशा अधिकाऱ्यांना निलंबित केले जाईल काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, विभागाकडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा रिपोर्ट प्राप्त झालेला आहे. सदर अहवालात कोणताही गैरव्यवहार झालेला नाही, असे नमूद केलेले आहे. ग्रामसभेला रोजगार हमीमध्ये सर्वाधिक अधिकार दिलेले आहेत. ग्रामसभेच्या माध्यमातून मंजूर झालेले काम पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेला वगळता येत नाही. त्यामुळे ग्रामसभेमध्ये ठराव मंजूर करुन एखादे काम मंजूर केलेले असेल तर कायद्याने ते काम करता येते. एमआरईजीएस कायद्यातील आराखड्यात ग्रामपंचायतीने एखाद्या कामास मंजुरी दिलेली असेल तर ते काम त्यांना करता येते, असा त्यामध्ये निर्णय घेतलेला आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी धडक सिंचन विहीरींच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केलेला आहे. सदरहू कार्यक्रम अवरावती विभागातील बुलडाणा, अकोला, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यांमध्य मंजूर झालेला आहे. भंडारा जिल्ह्यात धडक सिंचन विहीरीचा कार्यक्रम मंजूर झालेला नाही. रोजगार हमी योजनमध्ये जिल्ह्यासाठी 700 विहीरींचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे. यानुसार मोहाडी पंचायत समितीच्या क्षेत्रात 229 विहीरींचे उद्दिष्ट आहे. 125 विहीरींना प्रशासकीय मान्यता देऊन त्या पूर्ण केलेल्या आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या रिपोर्टमध्ये बीडीओ प्रोव्हिशनरी आहे. त्यांनी किरकोळ चुका केलेल्या आहेत. पण कोणताही आर्थिक गैरव्यवहार झालेला नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला रिपोर्ट सन्माननीय सदस्यांना मान्य नसल्यास पुन्हा चौकशी केली जाईल. जर या प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे लक्षात येताच पुढील

......2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे......

कारवाई केली जाणार आहे. सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी आहे असी समजली जाते. पंचायत समितीमध्ये 29 कामांपैकी 13 कामांचा पृष्ठ क्रमांक 5 वर उल्लेख नाही आणि पृष्ठ क्रमांक 6 वर जी कामे पूर्ण आहेत, त्याचा गोषवारा दिलेला आहे. त्यामुळे त्यात गैरव्यवहार झालेला आहे, असे बोलता येणार नाही. सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने पुन्हा तपासणी केली जाईल, एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री. संग्राम थोपटे : अध्यक्ष महोदय, लक्षवेधीच्या उत्तरात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा यांनी सदर परिविक्षाधीन खंडविकास अधिकाऱ्याचे कामकाज समाधानकारक असल्याचे नमूद केलेले आहे. सदरहू उत्तरात कनिष्ठ अधिकाऱ्याच्या चुकीवर वरिष्ठ अधिकाऱ्याकडून पांघरुन घालण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे दिसून येत आहे. मंत्री महोदयांनी किरकोळ स्वरुपाची चुक झाल्याचे उत्तर दिलेले आहे. तसेच या प्रकरणी अधिक चौकशी करण्याची तयारी दर्शविलेली आहे.

अध्यक्ष महोदय, संबंधित अधिकाऱ्याची चौकशी विभागीय स्तरावर फेरतपासणी करण्यासाठी आदेश मंत्री महोदया देतील काय ?

अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेतील निवेदनात चौथ्या परिच्छेदात असे म्हटले आहे की, सन 2015-2016 मध्ये मोहाडी पंचायत समितीला महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत 229 सिंचन विहीरींचे उद्दिष्ट देण्यात आले असून, आतापर्यंत तांत्रिक मान्यता मिळालेल्या 125 पैकी 125 विहीरींना प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे. तरी, उर्वरित विहीरींना तातडीने प्रशासकीय मान्यता दिली जाईल काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, मी यापूर्वीच दिलेले आहे. आम्ही पुनर्तपासणीची तयारी दर्शविलेली आहे. बीडीओची तक्रार असेल तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत चौकशी केली जाते, अशी प्रोसिजर आहे. त्यामुळे सर्वच अधिकाऱ्यांवर अविश्वास दाखविणे हे देखील योग्य होणार नाही. सन्माननीय सदस्यांना चौकशी अहवाल अहवाल मान्य नसेल तर त्याही

.....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे......

उपर जाण्यासाठी प्रोव्हिजन आहे. उपायुक्त ईजीएस यांच्या माध्यमातून चौकशी करण्याबाबतचे आदेश देण्यात येतील. त्यांच्याकडून अहवाल प्राप्त होताच, त्यानुसार पुढील नियमानुसार कार्यवाही केली जाणार आहे. जर सदर अहवालात आर्थिक गैरव्यवहार झालेला असेल तर नक्कीच कारवाई केली जाणार आहे.

श्री. चरण वाघमारे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी गैरप्रकार झालेला नाही, असे उत्तर दिलेले आहे. कॅटल शेडच्या नावाखाली माझ्या मतदारसंघात धोप गावात एक शॉपिंग कॉम्प्लेक्ससाठी पेमेंट काढलेले आहे. व्यापारी गाळ्याचे पेमेंट काढलेले आहे. डोंगरगावातील सरपंचांनी एमआरईजीएसच्या कामासाठी बीडीओ पैशाची मागणी करीत असल्याचे मला सांगितले होते. त्यानंतर मी बीडीओला फोन करुन तुम्ही पैसे कशाला मागता असे त्यांना म्हणलो होतो. त्यानंतर बीडीओ यांनी सरपंचाची त्याच दिवशी 39 अंतर्गत कारवाई करण्याची शिफारस केली होती. कलम 139 (ब) मध्ये जोपर्यंत सीईओ पंचायत विस्तार अधिकारी यांच्या दर्जाचा अधिकारी नसेल तर त्या अधिकाऱ्याला अधिकृत प्राधिकृत करीत नाही तोपर्यंत त्या ग्रामपंचायतीची चौकशी करण्याचा अधिकार नाही, अशी प्रोव्हिजन आहे. बीडीओला 39 अंतर्गत कारवाई करण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यांच्या अधिकाराखाली आम्ही काम करायचे, मी बॉस आहे असे समजून बीडीओ काम करीत असेल तर ते अतिशय चुकीचे आहे. या प्रकरणी पंचायत समितीच्या सभापतींनी दिनांक 15-03-2016 आणि दिनांक 31-03-2016 अशा प्रकारे दोन वेळा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केलेला होता. असे प्रकार बीडीओंकडून होत असतील तर ते योग्य नाही. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या पत्राची कोणतीही चौकशी केलेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी बीडीओचे काम समाधानकारक आहे असे उत्तर देत असतील तर ते चुकीचे आहे. अशा संबंधित खंडविकास अधिकाऱ्याला निलंबित करावे आणि सीईओ यांची विभागीय चौकशी करावी अशी माझी मागणी आहे.

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, चुक कोणी केली आहे की नाही असे माझे म्हणणे नाही. मी अहवालानुसार सन्माननीय सदस्यांना माहिती दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांचे

......4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे......

अहवालावर असमाधान असेल तर उपायुक्त ईजीएस यांच्या माध्यमातून सदरहू अहवालाची पुन्हा तपासणी केली जाईल. त्यामुळे ज्यांनी अहवाल दिलेले आहे आणि तो चुकीचा दिलेला आहे असे निदर्शनास येताच त्यांच्यावर देखील कारवाई केली जाणार आहे. मी कोणतेही नकारात्मक उत्तर दिलेले नाही. तक्रारीच्या माध्यमातून मला सभागृहात डायरेक्ट निलंबित करता येणार नाही. कारण संबंधित अधिकाऱ्याच्या कामासंदर्भातील अहवाल सकारात्मक आलेला आहे. उपायुक्त ईजीएस यांच्या माध्यमातून सदरहू अहवालाची सत्तता पडताळून घेण्यासाठी पुन्हा एकदा सखोल चौकशी केली जाणार आहे. त्यानंतर योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे. सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने सखोल चौकशी केली जाणार आहे.

डॉ. जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, सीईओचा रिपोर्ट आलेला आहे. यामध्ये किरकोळ चुका आणि अनियमितता दर्शविलेली आहे. तरी, किरकोळ चूका आणि अनियमिततेचे स्वरुप काय आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, पंचायत समितीने जी टिप्पणी तयार केलेली आहे, त्यामध्ये 29 कामांना मंजुरी दिली होती. यापैकी 13 कामांचा उल्लेख त्या ठिकाणी झालेला आहे आणि 16 कामांचा उल्लेख झालेला नाही. ही किरकोळ चूक आहे. एकूण 1195 कामांची संख्या आहे. ही गोषवाऱ्यात दिसून येत नाही. विभागाने कामाची तपासणी ऑन दी फिल्ड केली तेव्हा कामामध्ये कोणताही गैरव्यवहार आढळून आलेला नाही असे सीईओंचे म्हणणे आहे. हे अनियमिततेचे स्वरुप आहे.

श्री. चरण वाघमारे : अध्यक्ष महोदय, 19 मार्च, 2016 रोजी पंचायत समितीची आमसभा घेतली होती. आमसभेमध्ये घेण्यात आलेल्या विषयाची खात्री करुन घेण्यात आली होती. ग्रामसेवक, सरपंच आणि जिल्हाधिकारी उपस्थित होते. आमसभेमध्ये घेण्यात आलेल्या विषयाची अवतरण प्रत सोबत आणलेली आहे आणि मंत्री महोदयांना दिलेली आहे. बीडीओंनी मागील वेळेस चुकीची माहिती कशा प्रकारे दिली याबाबत मी मंत्री महोदयांना माहिती दिलेली आहे. सद्य:स्थितीत

....5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चरण वाघमारे......

मजुरांचे पेमेंट करण्यात आलेले नाही. त्याची देखील अवतरण प्रत आहे. जी कामे नियोजनात नाहीत, या कामांची देखील आमसभेत चर्चा झालेली होती. याही ठरावाची अवतरण प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. इतके पुरावे माझ्याजवळ असताना बीडीओच्या विरोधात कारवाई का केली जात नाही असा माझा प्रश्न आहे. संबधित बीडीओला तत्काळ निलंबित करावे, अशी माझी मागणी आहे.

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, बीडीओच्या संदर्भातील अहवाल माझ्याकडे आहे. सदर अहवाल संबंधित बीडीओ यांच्याबद्दल सकारात्मक आहे. सन्माननीय सदस्यांनी पशुसंवर्धनाचे शेडमधील वाळ्यांना परवानगी दिल्याची माहिती दिलेली आहे. याबाबतचा उल्लेख प्रश्नात नाही. मी याबाबत वेगळी चौकशी करणार आहे.

DD-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे...

त्या चौकशीचा अहवाल पूर्ण प्राप्त करुन त्यात तथ्य असेल तर त्यांच्याविरुध्द निलंबनाची कारवाई करण्यात येईल.

-----------------

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**आजच्या कामकाजपत्रिकेतील मराठवाड्यासबंधीचा नियम 293 चा प्रस्ताव सोमवारी चर्चेला घेण्यासंबंधी**

श्री.सुभाष साबणे : अध्यक्ष महाराज, सभागृहाच्या आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर 9 वा विषय मराठवाड्यासंदर्भातील आहे. मराठवाड्यात अतिशय भयावह अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. नियम 293 चा प्रस्ताव सोमवारी प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर चर्चेला घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर) :** ठीक आहे. माननीय अध्यक्षांच्या दालनात सदरचा प्रस्ताव सोमवारी घेण्याचे ठरले आहे.

श्री.प्रशांत बंब : अध्यक्ष महाराज, मराठवाड्याचा प्रस्ताव जवळपास चार दिवसापासून सतत पुढे ढकलला जात आहे. सदरचा प्रस्ताव सोमवारी प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर त्वरित घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** यासंदर्भात माननीय अध्यक्ष निर्णय घेतील. आता आपण विरोधी पक्षाचा नियम 293 चा प्रस्ताव चर्चेला घेऊ.

श्री.जयदत्त क्षिरसागर : अध्यक्ष महाराज, विरोधी पक्षाचा नियम 293 चा प्रस्ताव सोमवारी ऐवजी मंगळवारी घेण्यात यावा. सोमवारीला आमची अडचण आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** माननीय अध्यक्षांच्या दालनात हे ठरलेले आहे. माननीय अध्यक्ष कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये आहेत. माननीय अध्यक्षांच्या दालनात जे ठरले आहे त्यात कृपया बदल करु नका.

श्री. जयदत्त क्षिरसागर : अध्यक्ष महाराज, विरोधी पक्षाचा नियम 293 चा प्रस्ताव सोमवार ऐवजी मंगळवारी घेण्यात यावा.

**तालिका सभाध्यक्ष:** सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात माननीय अध्यक्षांशी बोलून ठरवावे. आता आपण सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवरील दहाव्या क्रमांकावरील नियम 293 चा विरोधी पक्षाचा प्रस्ताव चर्चेला घेऊ.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महाराज, सभागृहाच्या आजच्या कामकाजपत्रिकेवरील सुरुवातीला दाखविलेला नियम 293 चा प्रस्ताव शासकीय विधेयक घेतल्यानंतर चर्चेला घेण्यात यावा, असे आपण आदेश दिले होते.

**तालिका सभाध्यक्ष :** मराठवाड्यासंबधीचा नियम 293 चा प्रस्ताव सोमवारी चर्चेला घेऊ.

श्री.नसीम खान : अध्यक्ष महाराज, काल आपणच निर्णय दिला होता की, लक्षवेधी सूचना संपल्यानंतर ज्या सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर बोलायचे आहे, त्यांना बोलण्याची संधी दिली जाईल.

**तालिका सभाध्यक्ष** : सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवरील बुधवार, दिनांक 6 एप्रिल, 2016 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला नियम 293 चा प्रस्ताव आता चर्चेला घेऊ. सन्माननीय सदस्य श्री.सदानंद चव्हाण हे या प्रस्तावावर ऑन लेग आहेत.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महाराज, आज या दोन्ही चर्चा पुढे ढकलल्या आहेत काय, याबाबत मला आपले रुलिंग हवे आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** आता आपण मुंबईची आणि कोकणची चर्चा सुरु करणार आहोत.

श्रीमती प्रणिती शिंदे : अध्यक्ष महाराज, सभागृहात एकही मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

**तालिका सभाध्यक्ष** :माननीय मंत्री महोदया श्रीमती पंकजा मुंडे उपस्थित आहेत...(अडथळा)... त्या संपूर्ण महाराष्ट्राच्या मंत्री आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.सदानंद चव्हाण यांनी मुंबई आणि कोकणच्या नियम 293 च्या चर्चेला सुरुवात करावी.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही

**मु.शी.**: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही या विषयावर सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, बाळासाहेब थोरात, भास्कर जाधव, मो. आरिफ नसीम खान, जितेंद्र आव्हाड, गोपालदास अग्रवाल, जयदत्त क्षीरसागर, विजय वडेट्टीवार, हनुमंत डोळस, नितेश राणे, पांडुरंग बरोरा, अब्दुल सत्तार, डॉ. सतीश पाटील, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री नरहरी झिरवाळ, सुनिल केदार, दिपक चव्हाण, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री अस्लम शेख, वसंतराव चव्हाण, डी.पी.सावंत, कालीदास कोळंबकर, मधुकरराव चव्हाण, काशीराम पावरा, अमिन पटेल, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री जयकुमार गोरे, राहुल बोंद्रे, अमित झनक, अमर काळे, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री डी. एस. अहिरे, हर्षवर्धन सपकाळ, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री कुणाल पाटील, शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, ॲड. त्र्यंबक भिसे, सर्वश्री अमित देशमुख, बसवराज पाटील, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव

( प्रस्ताव पुढे सुरु ...

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण ) : अध्यक्ष महाराज, 1 मार्च 2015 रोजी अवकाळी पावसामुळे जे आंबा काजूचे नुकसान झालेले आहे त्याची नुकसान भरपाई जाहिर झाली असून त्याचे वाटपही झालेले आहे. परंतु रत्नागिरी जिल्ह्यातील पंचनाम्यातील तफावतीमुळे काही लाभार्थ्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही, ते वंचित राहिलेले आहेत. तसा पत्रव्यवहार शासनाकडे झालेला आहे. त्या तारखेची रक्कम सुमारे 16 कोटी रुपये आहे. सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडून महसूल कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. सुधारित प्रस्तावासाठी निधी मंजूर होऊन वंचित लाभार्थ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत मी आपल्या मार्फत शासनाला विनंती करीत आहे.

अध्यक्ष महाराज, माननीय जलसंधारण मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. जलसंधारण महामंडळाला मुदतवाड मिळाली नव्हती म्हणून चालू असलेल्या कामाचे देयके गेल्या दीड वर्षापसून मिळालेली नव्हती. परिणामी धरणांची कामे ठप्प झालेली आहेत. सध्या जलसंधारण महामंडळाला मुदतवाढ देण्यासंबंधीचे विधेयक विधानसभेत आणि विधानपरिषदेत मंजूर झालेले आहे. त्या महामंडळाला निधी उपलब्ध करुन देऊन कामाचे देयक अदा करुन लवकरात लवकर कामे सुरु करावीत. कोकणातील जी कामे रद्द केलेली आहेत ती पुन्हा विचारात घेऊन सुरु करण्याची माझी विनंती आहे. लोकशाही आघाडी सरकार असताना 1999 मध्ये तत्कालीन पंतप्रधान आदरणीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या वाढ दिवसाच्या निमित्ताने अतिशय महत्वाच्या चार योजना जाहिर केल्या होत्या. त्यामध्ये संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजना, स्वजलधारा, राष्ट्रीय पेयजल योजना, पंतप्रधान ग्राम सडक योजना यांचा समावेश होता. आता केंद्रात रालोआचे सरकार आल्यानंतर राष्ट्रीय पेयजल योजना पूर्णपर्ण ठप्प झालेली दिसते. परिणामी कोकणातील खेड्यापाड्यात पाण्याची अतिशय वाईट अवस्था झालेली आहे. पाण्याची योजना पुन्हा सुरु कराव्यात, यासाठी केंद्र सरकारकडे शासनाने प्रयत्न करावेत.

अध्यक्ष महाराज, शाळेमध्ये 20 पेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. कोकणात डोंगराळ, दुर्गम भागात धनगरवाडी, गौर वाड्या-वस्त्या डोंगर माथ्यावर आहेत. शासनाने 20 पेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या शाळांच्या बाबतीत अशा प्रकारचा निर्णय घेतला तर तेथिल विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतील. काही ठिकाणी अजून रस्ते पोहोचलेले नाहीत. म्हणून शासनाने कोकणासाठी विशेष बाब म्हणून 20 पटसंख्येपेक्षा

..4



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सदानंद चव्हाण.....

कमी असणाऱ्या शाळा बंद होऊ नयेत, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महाराज, कोकणामध्ये जलसंपदा विभागावर अन्याय होत आहे. माझ्या मतदारसंघातील कुडप नावाची एक योजना तत्कालीन जलसंपदा मंत्री श्री.सुनिल तटकरे यांनी सुरु केली होती. त्यावेळी स्थानिक मंडळींनी ती योजना चुकीने स्पीडअप केल्यामुळे रद्द करण्यात आली. ही अत्यंत चांगली योजना पुन्हा सुरु करावी आणि कोकणामध्ये जलसंपत्तीची जी कामे ठप्प झालेली आहेत ती लवकरात लवकर चालू करावीत, अशी मी विनंती करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

--------

यानंतर EE-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसीम खान (चांदीवली) : अध्यक्ष महोदय, आज म.वि.स. नियम 293 अन्वये मुंबई व कोकणातील समस्यांवर जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्यावर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, हे खूप दुर्दैव आहे की, ज्या मुंबईला आपण देशाच्या आर्थिक राजधानीचा दर्जा दिलेला आहे, ज्या मुंबई व कोकणाच्या माध्यमातून सर्वात जास्त टॅक्स केंद्र शासनाला जात आहे, त्या मुंबईवरील चर्चेचा हा गेल्या 6 दिवसांपूर्वीचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावावर आपण रोज अर्धा तास-एक तास अशाप्रकारे आपण चर्चा करीत आहोत. मला आपल्या माध्यमातून शासनाकडे मागणी करावयाची आहे की, या मुंबई व कोकणातील समस्यांवर या सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत, त्यावर गांभीर्याने विचार करुन मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर द्यावे व त्यावर तोडगा काढण्यासाठी निर्णय घ्यावा.

अध्यक्ष महोदय, आपण सुध्दा मुंबईतील आहात, आपण महानगरपालिकेत निवडून गेला आहात, आज मुंबई शहराची काय अवस्था आहे ? आज मुंबई शहरामध्ये पाण्याची टंचाई आहे. रस्त्यांची परिस्थिती काय आहे हे आपण पाहिले आहे. आज या मुंबई शहरांमध्ये अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. मुंबईची लोकसंख्या वाढली आहे, ही खरी गोष्ट आहे. परंतु, जसजशी लोकसंख्या वाढते त्याप्रमाणे त्यांना नागरी सुविधा मिळाल्या पाहिजेत की नाहीत ? या नागरी सुविधा देण्याचे अधिकार, जबाबदारी कोणाची आहे ? आज मुंबई महानगरपालिका ही या देशातील सर्वात मोठी महानगरपालिका आहे. या देशातील एका छोट्या राज्याचे जेवढे बजेट असेल त्याच्यापेक्षा जास्त बजेट या मुंबई महानगरपालिकेचे आहे. तरीही या मुंबईकरांना नागरी सुविधा मिळत नाहीत, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

अध्यक्ष महोदय, आज पाण्याची टंचाई संपूर्ण राज्यामध्ये आहे, मुंबई शहरातही तीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. 20 टक्के पाणी कपातीच्या नावाखाली 40 ते 50 टक्के पाण्याची कपात सुरु आहे. झोपडपट्टीतील लोकांना पाणी मिळत नाही. झोपडपट्टीतील लोकांना 1-2 हंडे पाण्यासाठी 2-2, 3-3 तास लाईन लावावी लागत आहे. यावर आपण या सदनात अनेकवेळा चर्चा केलेली आहे. मुंबई

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसीम खान ....

महानगरपालिकेत देखील ही चर्चा झाली की, मुंबईच्या जवळ समुद्र किनारा आहे. चेन्नईमध्ये ज्याप्रमाणे ट्रिटमेंट प्लांटमध्ये पाण्यावर ट्रिटमेंट करुन ते लोक पाणी घेत आहेत त्याप्रमाणे मुंबई शहरातील लोकांना का मिळत नाही, तो ट्रिटमेंट प्लांट का लावता येत नाही, त्यावर कारवाई का होत नाही ? ते सुरु करण्याची गरज आहे. येणाऱ्या काळात पाण्याची, पावसाची काय परिस्थिती आहे हे आपण पाहिले आहे. शासन व महानगरपालिका म्हणून या मुंबई शहरातील लोकांना पाण्याची सुविधा व्यवस्थित मिळावी, त्यांना 100 टक्के पाणी सप्लाय व्हावा याकरिता ही व्यवस्था करण्याची गरज आहे. चेन्नईमध्ये ज्याप्रमाणे ट्रिटमेंट प्लांटद्वारे खारे पाणी गोडे करुन सप्लाय करण्याची व्यवस्था सुरु करण्यात आली आहे, त्याप्रमाणे मुंबई शहरातही करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

आज आपण या राज्यामध्ये मुंबई उपनगरात आपण पहिली मेट्रो रेल सुरु केली. मुंबईची मेट्रोल रेल सुरु करताना पूर्व उपनगर ते पश्चिम उपनगर आणि पश्चिम उपनगर ते पूर्व उपनगरच्या लोकांना मदत मिळेल, दिलासा मिळेल या संकल्पनेतून आमच्या कॉंग्रेस लोकशाही आघाडीच्या सरकारने तो प्रयत्न केला होता आणि त्याला यशही मिळाले होते. त्यावेळी आम्ही सर्व लोकांना आश्वासन दिले होते.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. योगेश सागर)**: माननीय महसूल मंत्री महोदयांना एक निवेदन करावयाचे आहे.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**इस्त्रायलच्या शिष्टमंडळाचे अभिनंदन करण्याबाबत**

श्री. एकनाथराव खडसे ( कृषी मंत्री ) : अध्यक्ष महोदय, मला निवेदन करण्याची अनुमती दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, इस्त्रायल देशाचे कृषी मंत्री माननीय श्री. युरी ॲरियल हे इस्त्रायल देशातील कृषी मंत्रालयातील 15 वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळासह महाराष्ट्र भेटीवर असून ते आज आपल्या विधिमंडळाच्या कामकाजाचे अवलोकन माननीय अध्यक्ष यांच्या गॅलरीतून करीत आहेत, हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो. आपण सर्वांनी इस्त्रायल देशाचे कृषी मंत्री व शिष्टमंडळाचे स्वागत करुया.

भारत व इस्त्रायल देशात कृषी विकासासाठी अनेक स्वरुपाचे सामंजस्य करार झाले असून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना इस्त्रायल तंत्रज्ञानाद्वारे उत्पादनामध्ये वाढ, पाण्यामध्ये बचत, फलोत्पादन, काढणीपश्चात तंत्रज्ञान इत्यादी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीद्वारे सोयीसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्याबद्दल महाराष्ट्र सरकारच्या कृषी खात्यातर्फे मी इस्त्रायल देशाचे कृषी मंत्री माननीय श्री. युरी ॲरियल यांना धन्यवाद देतो.

महाराष्ट्रातील संत्रा, हापूस आंबा, केशर आंबा, डाळिंब गुणवत्ता केंद्राची स्थापना करुन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना उच्च उत्पादनवाढीसाठी तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्यात इस्त्रायलच्या कृषी मंत्रालयाचा फार मोठा सहभाग आहे. भविष्यात सुध्दा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना इस्त्रायल तंत्रज्ञानाद्वारे विविध सेवासुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत आज या सभागृहातील गॅलरीत उपस्थित असलेले इस्त्रायल देशाचे कृषी मंत्री व त्यांच्या समवेत आलेले शास्त्रज्ञ व अधिकारी प्रयत्नशील राहतील, अशी आशा मी व्यक्त करतो.

.........



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही

**मु.शी.**: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही या विषयावर सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, बाळासाहेब थोरात, भास्कर जाधव, मो. आरिफ नसीम खान, जितेंद्र आव्हाड, गोपालदास अग्रवाल, जयदत्त क्षीरसागर, विजय वडेट्टीवार, हनुमंत डोळस, नितेश राणे, पांडुरंग बरोरा, अब्दुल सत्तार, डॉ. सतीश पाटील, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री नरहरी झिरवाळ, सुनिल केदार, दिपक चव्हाण, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री अस्लम शेख, वसंतराव चव्हाण, डी.पी.सावंत, कालीदास कोळंबकर, मधुकरराव चव्हाण, काशीराम पावरा, अमिन पटेल, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री जयकुमार गोरे, राहुल बोंद्रे, अमित झनक, अमर काळे, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री डी. एस. अहिरे, हर्षवर्धन सपकाळ, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री कुणाल पाटील, शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, ॲड. त्र्यंबक भिसे, सर्वश्री अमित देशमुख, बसवराज पाटील, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरु ...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसीम खान : अध्यक्ष महोदय, मी मुंबईच्या मेट्रो रेल्वेवर बोलत होतो. मुंबईची पहिली मेट्रो रेल्वे सुरु करण्यात आली, त्याचा लाभ लाखो लोकांना मिळण्यास सुरुवात झाली. जेव्हा आपण राज्यातील पहिली मेट्रो रेल्वे या मुंबई उपनगरातील लोकांकरिता सुरु केली, त्यावेळेस आम्ही सर्वांनी निर्णय घेतला होता की, त्याचे तिकीट कमीतकमी 10 रुपये असेल. आता ते 40 रुपयांपर्यंत

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसीम खान ....

गेलेले आहे. अनेक वृत्तपत्रात अशी बातमी येते की, ते वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. मला आपल्या माध्यमातून शासनाला हे सांगावयाचे आहे की, आज 40 रूपयांचे हे दर खूप जास्त आहेत. हे दर कमी करण्याची गरज आहे. तसेच, येणाऱ्या काळात हे दर वाढणार नाहीत याची काळजी घेण्याची जबाबदारी राज्य सरकारने घेतली पाहिजे. मेट्रोच्या प्रवासाचे दर वाढता कामा नयेत.

अध्यक्ष महोदय, आज एसआरएच्या योजनेबाबत आपण अनेक चर्चा करीत आहोत. स्लम फ्री मुंबईची घोषणा आपण केलेली आहे. हाऊसिंग स्टॉक बनविण्याचा निर्णय मुख्यमंत्री महोदय व शासनाने घेतलेला आहे. मेक इन महाराष्ट्राच्या कार्यक्रमामध्ये हाऊसिंग स्टॉकचा निर्णय आपण घेतलेला आहे. अनेक विकासकांची निवड आपण करीत आहात परंतु जोपर्यंत स्लम फ्री मुंबई करण्याची जी अट आहे, रिहॅबिलीटेशन स्कीमची जी अट आहे, आमच्या शासनकाळात झोपडीमध्ये राहणाऱ्या लोकांनी ती झोपडी विकली असेल, ती विकत घेणारा माणूस त्या झोपडीत राहत असेल व ती झोपडी दिनांक 1.1.2000 ची असेल तर त्याचेही पुनर्वसन झाले पाहिजे असा निर्णय आपण केला आहे. ती झोपडी दिनांक 1.1.2000 ची असेल, चाळीतील रूम दिनांक 1.1.2000 ची असेल त्याची पात्रता तपासण्यासाठीची अट शिथिल करण्याऐवजी या शासनाने एक जी.आर. काढलेला आहे. त्यामध्ये जे बाकीचे पुरावे देऊन लोकांना पात्र करण्याची संधी होती ती सुध्दा काढण्यात आलेली आहे. त्यावेळेस पासपोर्टचा एव्हिडन्स मान्य होता. महाराष्ट्र शासनाच्या ट्रान्सपोर्ट विभागाच्या माध्यमातून मिळणारे ड्रायव्हिंग लायसन्सही मान्य करण्यात आले होते. महानगरपालिका व राज्य शासनाच्या विविध विभागाशी संबंधित इतर कागदपत्रांना मान्यता देण्यात आली होती. ती सुध्दा वगळून
टाकलेली आहे. मला आपल्या माध्यमातून शासनाकडे मागणी करावयाची आहे की, पूर्वी जेवढी कागदपत्रे होती ती सर्व कागदपत्रे पुरावा म्हणून गृहीत धरण्याबाबतचा जी.आर. बदलला पाहिजे. जेणेकरून या मुंबई व मुंबई उपनगरात राहणाऱ्या लाखो झोपडवट्टीवासीयांचे पात्रतेच्या आधारावर पुनर्वसन होईल.

FF-1/...

SEB/ AKN/ ST/ 15:10

श्री. नसीम खान.....

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेने दत्तक वस्ती योजना सुरु केलेली आहे. योजना चांगली आहे. परंतु योजना राबविणारे लोक कोण आहेत. महानगरपालिकेने या योजनेकरिता प्रत्येक वार्डामध्ये खाजगी संस्थेला कॉन्ट्रॅक्ट दिलेला आहे. 20 ते 25 माणसांच्या नावाखाली कॉन्ट्रॅक्ट घेतले जात आहेत. यापैकी पाच माणसे कामाला लावून 15 लोकांचा पगार घरबसल्या घेतला जात आहे. या योजनेच्या माध्यमातून मुंबई महानगरपालिकेमध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार सुरु आहे. उपनगरातील कुठल्याही चाळीमध्ये किंवा झोपडपट्टीमध्ये गेल्यास कचऱ्याचे ढिग दिसून येतात. साफसफाई होत नाही, याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात चौकशी करुन ज्या ज्या संस्थेतील लोक दोषी आढळतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, रोडची कामे व नाल्यांच्या साफसफाईसंदर्भात अनेक तक्रारी येत आहेत. पावसाळ्यापूर्वी मुंबईतील सर्व नाल्यांची साफसफाई करण्यासाठी कॉन्ट्रॅक्ट दिला जात असतो. नाल्यांची साफसफाई किती टक्के केली जाते. यासंदर्भात काय नियम असतात. नाल्यामध्ये किती खोलपर्यंत साफसफाई झाली पाहीजे, किती कचरा काढला गेला पाहीजे, त्याचे मोजमाफ कसे केले पाहीजे, यासंदर्भात मुंबई महानगरपालिकेमध्ये मोठे रॅकेट आहे. यासंदर्भातील चौकशी महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांमार्फत करुन चालणार नाही. याबाबत एसआयटी मार्फत चौकशी करुन दोषी कॉन्ट्रॅक्टदारांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. मुंबई महानगरपालिकेतील रस्त्यांच्या कामामध्ये कोट्यावधी रुपयांचा घोटाळा झाला. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यामध्ये हस्तक्षेप केला. संबंधितांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले. यासंदर्भात महानगरपालिकेमध्ये चौकशी करण्याची सुरुवात झाली. यासंदर्भात टाईम्स ऑफ इंडिया या वर्तमान पत्रामध्ये एक न्युज आली आहे. कॉन्ट्रॅक्टरांची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याला धमकी देण्यात आलेली आहे. चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यास फोनवरुन धमकी देणारा कॉन्ट्रॅक्टदार कोण आहे, याची चौकशी होऊन त्या कॉन्ट्रॅक्टदारावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

........2.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसीम खान.....

अध्यक्ष महोदय, मुंबई शहर व मुंबई उपनगरातील अनेक समस्या आहेत. ट्रॅफीकची समस्या आहे, पार्किंगची समस्या आहे. मुंबई उपनगरामधील कुठलाही रोड पाहिल्यास तो 50 टक्के जास्त पार्किंगमध्ये एन्क्रोचमेंट झालेला आहे. यासंदर्भात पॉलीसी आहे. पार्किंग करण्यासंदर्भात अनेक विकासकांना त्यासंदर्भातील योजनेकरिता मंजुरी दिलेली आहे. परंतु पार्किंग प्लॉटचे काय होते, याची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. पार्किंगचा स्पेस नसल्यामुळे रहिवाशी मुंबईतील रस्त्यांवर पार्किंग करण्यासाठी बाध्य झालेले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी होऊन दोन, तीन तास ट्रॅफिक जॅम होते. यासंदर्भात उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. मी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांवर गंभीरतेने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. नाल्याच्या साफसफाईमध्ये भ्रष्टाचार होत आहे, दत्तक वस्ती योजनेमध्ये भ्रष्टाचार होत आहे, रस्त्यांच्या कामामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. या सर्व भ्रष्टाचाराची चौकशी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याकडून न करता सीआयडी किंवा सीबीआय मार्फत करण्याची करण्यात यावी व दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी माझी आपल्या मार्फत सरकारकडे मागणी आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद.

---*---

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सरदार तारा सिंह (मुलुंड) : अध्यक्ष महोदय, आपने मुझे बोलने के लिए मौका दिया है उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं.

अध्यक्ष महोदय, अभी यहाँ पर ट्राफिक का मुद्दा उपस्थित किया गया है. मैं सुबह घर से निकलता हूं. मुझे यहाँ आने के लिए 2.30 घंटे का समय लगता है. मेरा कोई प्रश्न होता है तो आप कहते है कि सरदार तारा सिंह किधर है ? ट्राफिक की बहुत बड़ी समस्या है.

**तालिका सभाध्यक्ष** : इसलिए सरकार ने आपको आमदार निवास में रुम दिया है.

सरदार तारा सिंह : अध्यक्ष महोदय, जो स्लॅब गिरता है उस ओर पहले ध्यान देना चाहिए. मैंने पहले भी दो-तीन बार प्रस्ताव दिया था. आज दिल्ली की सरकार ने वहाँ पर जिस तरह से काम किया है कि 2,4,6,8,10 नंबर की गाड़ी एक दिन चले और 3,5,7,9 नंबर की गाड़ी एक दिन चले. यदि इस तरीके से गाड़ियां चलेगी तो ट्राफिक की समस्या हल हो सकती है और जनता को परेशानी कम होगी. आज ऐसी स्थिति है कि आप कितना भी प्रयास कीजिए, आप कहीं से भी आईए, आपको यहाँ आने के लिए दो घंटे का समय लगता है. मेरा निवेदन है कि आप इस कुर्सी पर बैठकर कुछ कर सकते है तो कीजिए. 2,4,6,8 नंबर की गाड़ी एक दिन चलाईए ओर 3,5,7,9 नंबर की गाड़ी एक दिन चलाओ. इससे मुंबई की जनता को फायदा होगा.

**तालिका सभाध्यक्ष** : यह तो दिल्ली के सी.एम.श्री केजरीवाल का आइडिया है.

सरदार तारा सिंह : ही आयडीया त्यांनी माझ्याकडून घेतलेली आहे. ती आयडीया मी दिली, ती आपण घेतली नाही. परंतु त्यांनी घेतली.

अध्यक्ष महोदय, कचरे के डम्पींग ग्राऊंड में रोज आग लगती है. उस आग ने मुझे बीमार कर दिया. आप कहते है कि चेम्बूर में कचरा डालने की जो समस्या है वह बंद करेंगे. मी 20 वर्षापासून आमदार आहे. 20 वर्षापासून माझी एकच मागणी असते की हरिओमनगरचा कचऱ्याचा डम्पींग ग्राऊंड बंद करा. त्याचे काय झाले ? मैं मुख्यमंत्री जी का ह्दय से अभिनंदन करना चाहता हूं. उन्होंने कहा कि मैं मुंबई में डम्पींग ग्राऊण्ड नहीं आने दूंगा. मुलुंड में अभी एक ओर डम्पींग ग्राऊंड आने वाला था. लेकिन मुख्यमंत्री जी ने कहा कि पूरी मुंबई में कहीं भी डम्पींग ग्राऊंड आने नहीं दिया जाएगा. मैं उम्मीद करता हूं कि कम से कम हरिओमनगर

.....4.





UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सरदार तारा सिंह.....

में जब लोग आए थे तब से कचरे का डम्पींग ग्राऊंड है. आज वहाँ पर 5 हजार लोगों की वसाहत है. लोग रात को फोन करते है. क्या करना है, कैसे करना है? यह एक डम्पींग ग्राऊंड की समस्या है. मुख्यमंत्री जी ने निर्णय लिया कि मुंबई से हम कचरा हटाएंगे. मैं जब स्टॅण्डींग कमिटी का चेअरमन था, त्यावेळी सुध्दा माझ्याकडे बरीच माणसे येत होती. हे कचऱ्याचे काम आम्हाला देवून टाका. हम इस कचरे को बदलकर कोयला बना डालेंगे. उस वक्त मैंने ऑर्डर दिया था कि अगर यह कचरा कोई कम्पनी आकर लेती है, उस कचरे को कोयले में कन्वर्ट करते हैं तो उनको दिया जाना चाहिए. 15-20 साल हो गए. स्टॅण्डींग कमिटी छोड़कर मैं यहाँ आ गया हूं. फिर भी वह प्रश्न हल नहीं हुआ. आज यह सभी का प्रश्न है. जब से ये आग लगी है तब से मुंबई के लोग विचार करने लगे हैं कि कचरे का डम्पींग ग्राऊंड चाहे मुलुंड, कांजूरमार्ग, देवनार में हो, इसका क्या होगा ? मेरा इतना ही निवेदन है कि हम कचरे के बारे में सोचते हैं परंतु आल्टरनेटीव जगह नहीं मिलती है. कचरे को कहाँ पर डाला जाए ? मुख्यमंत्री जी से मेरा निवेदन है, मुख्यमंत्री दिलदार नेता हैं, वे ही इस बारे में कोई निर्णय करेंगे तो मैं समझता हूं कि डम्पींग ग्राऊंड का प्रश्न हल होगा.

अध्यक्ष महोदय, माझा मुलुंड विभाग आहे. मुलुंड में पुरानी पानी की पाइपलाइन है. म्युनिसिपालटी की पुरानी पानी की पाइपलाइन पहाड़ी तक है. हर चौथे दिन पानी की पाइपलाइन टूट जाती है. इस कारण से लोगों को पानी नहीं मिलता. पानी बेकार चला जाता है. आपल्याला माहित आहे की मी दर रविवारी पडघा, शहापूरला जातो. जब मैं वहाँ से आता हूं... तानसा, वैतरणा से पानी की पाइपलाइन आती है. कोई न कोई उसमें छेद कर देते हैं. इस कारण से पानी 6-6 घंटे वेस्ट जाता है. पाइपलाइन की देखभाल करना म्युनिसिपालटी का काम है. यह पानी की पाइपलाइन थाना तक आते आते इसमें कई जगहों पर छेद हो जाते हैं. कुछ लोग पानी की पाइपलाइन तोड़ देते हैं, क्योंकि उनको पानी नहीं मिलता है. म्युनिसिपालटी से मेरा निवेदन है, पहले उनकी ट्रॉली चलती थी, कहां पर लिकेज है, कहां क्या समस्या है, वह देखते थे. अब इस काम की ओर देखा नहीं जाता है. बीएमसी ने थाना से लेकर तानसा और वैतरणा तक जो पानी की लम्बी पाइपलाइन है उस पर वॉच रखनी चाहिए.

......5.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सरदार तारा सिंह.....

कोई पाइपलाइन तोड़कर पानी वेस्ट तो नहीं कर रहा है, यह देखना चाहिए. मुझे उम्मीद है कि मैंने जो प्रश्न यहाँ उपस्थित किए हैं उस ओर ध्यान दिया जाएगा. भगवान सबको खुशी दे ताकि एक अच्छा काम हो. गुढीपाडवा की आप सभी को लाख लाख बधाई देता हूं, धन्यवाद.

---*---

...GG/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल शिंदे (वरळी) : अध्यक्ष महोदय, म.वि.स.नियम 293 अन्वये प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. विरोधी पक्षाने मांडलेला हा प्रस्ताव म्हणजे "आपलं ते बाळ, दुसऱ्याचं ते कार्टे" अशा प्रकारचा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेमध्ये आपणही नगरसेवक होता व मी ही होतो. सदनामध्ये आरोप करणारे बरेचसे सहकारी महत्वाचे निर्णय होत असताना त्याकडे दुर्लक्ष करीत होते. परंतु आता त्यांच्या लक्षात येत आहे की पुन्हा आमची सत्ता मुंबई महानगरपालिकेमध्ये येणार आहे. त्यामुळे मुंबईकरांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा त्यांचा हा प्रयत्न आहे.

अध्यक्ष महोदय, मला खात्री आहे की, मागील 16-17 महिन्यामध्ये मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली विशेष करुन कोकण, मुंबई व माझ्या वरळी विभागासाठी शासनाने काही निर्णय घेतले आहेत. सदरहू निर्णयामुळे पुन्हा एकदा मुंबईतील जनता महानगरपालिकेमध्ये आमची सत्ता आणेल, असा मला विश्वास आहे. याबद्दल मुख्यमंत्री महोदय, गृहनिर्माण मंत्री महोदय व गृहनिर्माण राज्यमंत्री यांचे मी अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, बीडीडी चाळीचा पुनर्विकास करण्यात येणार, असे आम्ही मागील अनेक वर्षे ऐकत आलो आहोत. एका माजी मुख्यमंत्री महोदयांनी या चाळीतील लोकांना सव्वा दोनशे चौरस फुटाचे घर देण्याचा प्रस्ताव बासनामध्ये गुंडाळून ठेवला. त्यानंतर आघाडी सरकारने साडे तीनशे चौरस फुटाचा प्रस्ताव तयार केला होता, त्या प्रस्तावाची फाईल मंत्रालयाला लागलेल्या आगीमध्ये जळून गेल्याचे सांगण्यात येते. परंतु या शासनाने मागील महिन्यामध्ये बीडीडी चाळीच्या विकासाचा मसूदा तयार केला, मंत्रिमंडळामध्ये त्याला मान्यता घेतली, त्याबद्दल मी या शासनाचे बीडीडी चाळीच्यावतीने अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील 21 उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव मागील 10-12 वर्षापासून शासनाकडे प्रलंबित होता. यासंदर्भातशासनाकडून कधी सांगण्यात येत होते की, म्हाडा व खाजगी विकासकाच्या माध्यमातून विकास करु, कधी सांगण्यात येत होते की, फक्त म्हाडाच्या माध्यमातून करु. परंतु आमच्या या सरकारने याप्रकरणी तातडीने म्हाडाच्या माध्यमातून सदरहू इमारतींचा विकास करण्याचा निर्णय घेतला. सदरहू इमारतींचा विकास शिर्के कंपनी याविकासकाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. आमदारांच्या प्रत्येक कामामध्ये ई-टेंडर प्रक्रिया



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल शिंदे.....

राबविण्यात येते व शिर्के कंपनीला हा नियम लावण्यात आला नाही. या कंपनीस कोणत्या नियमाने 21 इमारतीच्या विकासाचे काम देण्यात आले ? शिर्के कंपनीने तयार केलेल्या जुन्या इमारतींच्या कामा संदर्भात लोकांना शंका आहे. या कंपनीच्या माध्यमातून गिरणी कामगारांची घरे बांधण्यात आली होती त्यांचा दर्जा पाहता या 21 इमारतींच्या संदर्भात त्यांच्याकडून करण्यात येणाऱ्या कामाबाबत लोकांमध्ये शंका आहे. त्यामुळे सदर प्रकरणी पुनर्विचार करणे शासनाचे कर्तव्य आहे.

अध्यक्ष महोदय, मागील 10-12 वर्षापासून अनेक एसआरए प्रकल्पासंदर्भातील निर्णय मागील शासनाने प्रलंबित ठेवले होते. माझ्या मतदार संघात व्ही.पी.नगर नावाची एसआरए योजना आहे. या योजनेमध्ये 800 ते 900 सदस्य असून ते 10 वर्षापासून विकासक त्यांची योजना पूर्ण करील याची वाट पाहत आहेत. परंतु विकासकांनी ती योजना पूर्ण केली नाही किंबहुना अनेक रहिवाशांना ट्रान्झीट कॅम्प किंवा इतर ठिकाणी नेऊन ठेवले होते व तो त्यांचे भाडेही वेळेवर देत नव्हता. परंतु या शासनाने "चेंज ऑफ डेव्हलपर" संदर्भात निर्णय घेऊन संबंधित विकासकाला बाजूला केले व रहिवाशांना विकासक नेमण्याचा अधिकार दिला. या सरकारचा हा निर्णय निश्चितपणे अभिनंदनीय आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या वरळी विभागाबाबत अजून एक निर्णय शासनाने घेतला आहे. सेंच्युरी चाळ व बॉम्बे डाईंग या मिलच्या परिसरामध्ये राहणारे जे कामगार होते त्यांना घर देण्याची योजना शासनाने केली होती. सदरहू योजनेनुसार त्यांना अतिशय कमी क्षेत्रफळाचे घर दिले जाणर होते. याप्रकरणी मी व सन्माननीय सदस्य श्री.कालिदास कोळंबकर यांनी फंजीबल एफएसआयच्या माध्यमातून क्षेत्रफळ वाढवून देण्यासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांकडे मागणी केली होती. त्यानुसार मंख्यमंत्री महोदयांनी निर्णय घेतल्यामुळे सदर भागातील लोक खूश आहेत. हे सर्व निर्णय आमच्या सरकारच्या कारकिर्दीमध्ये होत आहेत, हे मी सर्वांच्या निदर्शनास आणून देत आहे.

अध्यक्ष महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडर यांची 125 वी जयंती आपण साजरी करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री.कालिदास कोळंबकर व मी मागणी केली होती की, चैत्यभूमी येथे "सतत तेवणारी भीमज्योत" ठेवण्यात यावी. आता पुन्हा मी सदनाच्या माध्यमातून मी ही मागणी करीत असून माझ्या मागणीचा विचार मुख्यमंत्री महोदयांनी करावा, अशी माझी कळकळीची विनंती आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल शिंदे.....

अध्यक्ष महोदय, मुंबई शहर आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. या शहरास आपण अजून व्यापक बनवावयास चाललो आहोत. आपण या शहराची कक्षा किंवा दर्जा उंचावणार आहोत. याप्रकरणी वरळी विभागास या सरकारने "स्मार्ट सिटी" म्हणून प्राधान्य दिले आहे. या विभागामध्ये महानगरपालिकेच्या शाळा असून त्यामध्ये चांगले शिक्षण मिळत असले तरी एकही खाजगी शाळा नाही. आधुनिक युगाकडे जात असलेल्या आमच्या विभागातील रहिवाशांना वाटते की, आमच्या विभागात चांगले कॉन्व्हेंट स्कुल असले पाहिजे. आमच्या विभागाच्या बाजूच्या विभागातील शाळेत गेल्यानंतर आमच्या मुलांना राईट ऑफ एज्यूकेशनच्या नावाखाली प्रवेश नाकारण्यात येतो. मुंबई महानगरपालिका स्वायत्त संस्था आहे, त्यांच्या निर्णयामध्ये आपण हस्तक्षेप करता कामा नये, हे मला माहीत आहे. परंतु या विभागाची वाटचाल स्मार्ट सिटीकडे होत असताना येथे अनेक महानगरपालिकेच्या शाळा व इमारती उपलब्ध होत आहेत. त्यामुळे आमच्या विभागामध्ये असलेल्या महानगरपालिकेच्या इमारती खाजगी संस्थेला देऊन तेथे खाजगी शाळा सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाने महानगरपालिकेला द्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, कोकण हे आमचे जन्मस्थान आहे व त्यावर बोलल्या शिवाय आम्हाला रहावत नाही. त्यामुळे मी आता कोकणाच्या विषयावर बोलत असताना मला श्री.ग.दि.माडगुळकर हे कोकणातील नसले तरी त्यांनी कोकणावर एक गीत लिहीले आहे ते मला आठवते,

"गोमू माहेरी जाते रे नाकवा,
हिच्या गोव्याला कोकण दाखवा."

अध्यक्ष महोदय, या गीतामधून कोकणाचे संपूर्ण महत्व दिसून येते. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव सदनामध्ये तळमळीने कोकणाच्या विषयावर बोलत असताना वेगवेळया मागण्या मांडल्या आहेत. काजू, आंबा या फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग कोकणामध्ये आले पाहिजेत, बंदरांचा विकास झाला पाहिजे, शुटींगसाठी चांगली स्थळे निर्माण झाली पाहिजे, पर्यटन स्थळांना चांगल्या सुविधा दिल्या पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा हा "पर्यटन जिल्हा" घोषित करण्यात आला परंतू अद्याप

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल शिंदे.....

तेथील समुद्र किनाऱ्यावर शौचालये नाहीत, त्यामुळे पर्यटकांची अडचण होते. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांचे मनापासून आभार मानले पाहिजे की, त्यांनी ही सर्व व्यथा मांडली आहे. मागील 15 वर्ष ते ज्या सरकारमध्ये होते त्या सरकारने यासर्व सुविधा कोकणाला दिलेल्या नाहीत त्यामुळे ही संधी आमच्या सरकारला प्राप्त झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, मला खात्री आहे की माननीय मुख्यमंत्री हे सर्व करुन दाखवतील. आमच्या श्री.उध्दव साहेबांचा "करुन दाखवणे" हा ध्यास आहे व मुख्यमंत्री महोदय हे त्यांच्या जवळचे सहकारी असल्याने त्यांनी घेतलेले निर्णय त्यांना निश्चित आवडतील.

यानंतर HH-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनिल शिंदे......

जाता जाता एक खंत व्यक्त करतो की, मी स्वतः ज्या गावात राहतो. मी स्वतः ज्या गावामध्ये राहतो. त्या गावापासून जवळ जवळ 15-20 किलोमिटरवर कोयना वीज प्रकल्प आहे. अजूनही आमच्या त्या गावात सणासुदीला गेलो तर लोडशेडींग असते. गणपतीला गावाला गेलो की, जास्त वीज वापरल्यानंतर त्या ठिकाणी लोडशेडींग करण्यात येते. त्यामुळे कोकणामध्ये विशेषतः ज्यांच्या गावाजवळून वीज निर्मिती होऊन या संपूर्ण राज्याला जाते ते गावच सणासुदीला अंधारात असते. या विभागाचे मंत्री अतिशय कार्यक्षम आहेत. त्यांनी माझ्या या विनंतीची नोंद घ्यावी आणि त्या संदर्भात निर्णय घेऊन आमचे गाव वीजेचे भारनियमन मुक्त गाव म्हणून प्रयत्न करावा.

अध्यक्ष महोदय, जाता जाता एक सूचना करतो की, मुंबई गोवा महामार्गावरील अपघातांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यमुना एक्सप्रेस-वेच्या धर्तीवर या ठिकाणी आपण सी.सी.टी.व्ही., आपतकालीन संपर्काचे बुथ प्रत्येकी 25 किलोमिटरवर असावेत. पॅथ-वे लाईन आणि मोबाईल यंत्रणा उभारण्याची त्या ठिकाणी नितांत आवश्यकता आहे. मुंबई गोवा महामार्ग सदर यंत्रणा उभारण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी, ही माझी या ठिकाणी विनंती आहे. धन्यवाद.

--------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

2.........

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (विरोधी पक्षनेता) : अध्यक्ष महोदय, नियम 293 अंतर्गत हा जो प्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी मुंबई बरोबरच कोकणाचीही चर्चा होऊन अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. मुंबई शहराचा विचार करताना मागील काही वर्षापासून दोन पक्षांची सत्ता मुंबई महानगरपालिकेमध्ये राहिलेली आहे. या सत्ताधिशांनी या शहराची कशी वाट लावली याची अनेक उदाहरणे सांगता येतील. अनेक वर्षापासून, शालेय जीवनापासून आणि कॉलेज जीवनापासून आम्ही मुंबईला येत आहोत. या सभागृहात 25 वर्षे झाली आहेत. पण मुंबई शहरात फार काही मूलभूत सुधारणा झाल्या आहेत अशी वस्तुस्थिती नाही. मुंबई महानगरपालिकेसारखी मोठी महानगरपालिका, श्रीमंत आणि स्वायत्त महानगरपालिका आहे, सरकारच्या कोणत्याही अनुदानावर या महापालिकेचा विकास अवलंबून नाही. तरीही या शहराच्या अनेक समस्या आजही अनिर्णित आहेत. त्यांच्यावर निर्णय होत नाही. महाराष्ट्राच्या वाढत्या शहरीकरणाबरोबरच बाकीच्याही शहरांच्या समस्या बऱ्याच आहेत. परंतु या मुंबईसारख्या नगरीमध्ये म्हणजे जी आपल्या राज्याची राजधानी आहे, स्थानिक स्वराज्य संस्था आहे, येथे लोकप्रतिनिधी आहेत, प्रशासन आहे. राज्य सरकारची देखील महापालिकेवर अंकूश ठेवण्याची जबाबदारी होती. परंतु मी मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे सत्तेमध्ये असलेल्या पक्षांनी मुंबई महापालिकेची कशी वाट लावली हे या निमित्ताने पहायला मिळेल. घनकचरा व्यवस्थापनाच्या उडालेल्या बोजवाऱ्याचे उदाहरण ताजे आहे. देवनार डंम्पिग ग्राऊंडला जी आग लागली आहे, त्या संदर्भात मला वाटते की, त्याची धग अधिक प्रमाणात मातोश्रीला लागली आहे. आणि त्या आगीची उब भारतीय जनता पक्षाला लागल्याचे चित्र दिसते आहे. या आगीमुळे आरोग्याचे प्रचंड गंभीर प्रश्न निर्माण झाले असताना या दोन पक्षांच्या एकमेकांवर राजकीय आग पाखडण्यामध्ये मुंबईचे संपूर्ण जनजीवन प्रदुषित झाल्याचे वास्तव्य आपल्याला पहायला मिळाले आहे. देवनार डंम्पिग ग्राऊंडच्या बाबतीत असे का घडले तर ग्लोबल एन्व्हायरमेंट नावाच्या एका कंपनीला कंत्राट दिले होते. या कंत्राटाची मुदत संपल्यानंतर त्याला मुदतवाढ मिळाली. आगीनंतर त्या कंत्राटदाराने कामामध्ये जो निष्काळजीपणा दाखविला त्याबाबत आणि इतर सर्व बाबतीत महानगरपालिकेकडून जी प्रभावी कार्यवाही व्हायला पाहिजे ती झाली नाही आणि त्यामुळे धुराच्या विळख्यात सापडलेल्या लोकांना त्रास होऊन झालेला लोकांच्या आरोग्याचे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

प्रश्न निर्माण झाले. याची जबाबदारी मुंबई महानगरपालिकेने स्वीकारली पाहिजे. जे कंत्राटदार आहेत त्यांनी या संपूर्ण प्रकारामध्ये आपले हात साफ केलेले आहेत. संबंधित कंत्राटदार आणि कंपनीवर फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांना ताबडतोब अटक होणे आवश्यक होते. या संपूर्ण प्रकारामध्ये राज्य सरकारने महापालिकेला पाठीशी का घातले हे समजायला कारण नाही आणि महापालिकेने त्या कंत्राटदाराला पाठीशी का घातले हे समजायला कारण नाही.

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते देवनार डंम्पिंग ग्राऊंडच्या बाबतीत बोलताना ज्या कंपनीला हे काम दिले गेले होते, त्यांनी दिरंगाई केली असताना महानगरपालिकेने त्यांना पाठीशी घातले असा जो काही युक्तिवाद करीत आहेत तो धादांत खोटा आहे, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते म्हणतात ते बरोबर आहे की, डंम्पिग ग्राऊंडवर आज जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्यामुळे मुंबईकरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे आणि त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. परंतु कन्सल्टंटने सांगितल्यानुसार पर्यावरण खात्याच्या नियमानुसार डंम्पिग ग्राऊंड फिलिंगचे काम ज्या कंपनीला दिले होते त्या कंपनीने ते काम करण्याबाबत जे निर्णय घेतले आणि महानगरपालिकेने त्यांच्याशी जे करार केले होते त्यामध्ये ती जमीन लिजवर देण्याबाबतची कंडीशन ही राज्य सरकारने घातली होती हे सत्य आहे आणि ते कंडीशन नगरविकास खात्याने घातले होते. यासंबंधीची माहिती सन्माननीय विरोधी पक्षनेते कागदपत्रे मागवून ते पटलावर ठेऊन पाहू शकतात. असे असताना तीन वर्षे या सदनामध्ये याबाबत चर्चा झाली आहे. राज्य सरकारच्या नगरविकास खात्याकडे ती फाईल पडून राहिली, त्याच्यावर अनेकवेळा क्युरीज काढल्या गेल्या. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी त्या फाईलवर कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतला नाही, तोपर्यंत ज्या कंपनीला हे काम दिले होते त्या कंपनीने हे काम दुसऱ्या कंपनीला टेकओव्हर करणे आणि दुसऱ्या कंपनीने तिसऱ्या कंपनीकडे टेकओव्हर करणे या बाबी जेव्हा महानगरपालिकेच्या लक्षात आल्या की, या ठिकाणी मिसचीफ करण्यात येत आहे, त्यावेळी महानगरपालिकेने हे कंत्राट रद्द करण्याचा निर्णय घेतला आणि कंडीशनप्रमाणे काम न करणाऱ्या कंत्राटदारावर महापालिकेने कार्यवाही केली.

4......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष** : आपण या ठिकाणी भाषण करु नका.

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, मला खुलासा करण्यास अनुमती द्यावी. सन्माननीय विरोधी पक्षनेते या ठिकाणी चुकीची माहिती देत आहेत. त्यामुळे ज्या गोष्टी विरोधी पक्षनेते बोलले आहेत ते पटलावरुन काढून टाकण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, एक गोष्ट खरी आहे की, सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू यांना आता सामना दैनिकामध्ये जागा मिळाली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांची जबाबदारी आता बऱ्यापैकी संपली असे मला वाटते.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू साहेब अशा प्रकारची राजकीय टीका ऐकायची असते.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, त्यांच्या नावाताच प्रभू असल्यामुळे त्यांना चिंता करण्याचे कारण नाही. अध्यक्ष महोदय, या डंम्पिग ग्राऊंडच्या संदर्भात झालेल्या प्रदुषित वातावरणामुळे ज्या ज्या स्तरावर कार्यवाही होण्याची आवश्यकता होती, मग त्यामध्ये महापालिका असेल किंवा राज्य सरकार असेल आणि सुदैवाने महाराष्ट्राचे केंद्रीय पर्यावरण मंत्री आहेत, त्यांनी सुध्दा या विषयाकडे ज्या गांभीर्याने पहायला पाहिजे होते तेवढे पाहिले नाही. पण मला या ठिकाणी अंतर्गत प्रदुषणामुळे म्हणजे दोन पक्षाच्या भांडणांमुळे मुंबई मात्र प्रदुषित झाली आहे हे वास्तव आपण मान्य केले पाहिजे. या डंम्पिग ग्राऊंडच्या बाबतीत एस.आय.टी. नेमण्यात येऊन त्या समितीचा अहवालही आला आहे असे आम्हाला माहिती आहे. मग सरकार हा अहवाल का उघड करीत नाही. जनतेला एकदा कळू द्यावे की, याच्या पाठीमागे काय दडले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे त्यासंबंधी हरकत कोणावर आहे आणि कशासंबंधी आहे त्याचे उत्तर आपोआप मिळून जाईल. मुंबई महापालिकेत असलेल्या दोन सत्ताधाऱ्यांमध्ये दररोज वर्तमान पत्रातून वाचण्यात येते की, चिखलफेक सुरु आहे. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. मुंबईचे भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष आणि सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार साहेबांनी मागे मुंबईच्या नालेसफाईमध्ये सांगितले होते की, शेकडो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे.

II-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील..........

त्यांच्या पक्षाचे खासदार आहेत. ते सांगतात की डंपिंग ग्राऊंडमध्ये फार मोठा घोटाळा झालेला आहे. या सर्व प्रकारामुळे लोकांचा जीव चाललेला आहे. केंद्रीय मंत्री येतात आणि सांगतात की, मरीन ड्राईव्हवर एलईडी दिवे लावा. एलईडी दिवे पांढरे लावायचे का लाल लावायचे यावरुन वाद चालू आहे. लोकांचा जीव धोक्यात घालून आपले कुरघोड्यांचे राजकारण चालू ठेवणार असणार असाल तर मुंबईची जनता हे उघड्या डोळ्यांनी बघत राहणार काय? दोन पक्षामध्ये मतभिन्नता असू शकते. कुरघोडीच्या राजकारणातून मुंबईची जी वाट लागलेली आहे त्याचे हे द्योतक आहे. मुंबई महानगरपालिकेच्या भ्रष्टाचाराबाबत तर किती बोलले जाते. नाले सफाई, रस्ते यात भ्रष्टाचार झालेला आहे आणि यामध्ये मुंबई महानगरपालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. दिवे लावण्यावरुन सुध्दा भ्रष्टाचाराचे मुद्दे पुढे आले. एलईडी दिवे लावण्यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप महापालिकेतील एक पक्ष करतो. तुम्ही कोणतेही दिवे लावा, पण तुमच्यामध्ये सुधारणा झाली नाहीतर उद्याच्या येणाऱ्या काळामध्ये मुंबईची जनता तारे चमकविल्याशिवाय राहणार नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, घनकचरा विल्हेवाट प्रकरणी मुंबई महापालिकेने कठोर शब्दात ताशेरे ओढले. जोपर्यंत मुंबई महानगरपालिका घनकचऱ्याची व्यवस्था करीत नाही. तोपर्यंत बांधकामाला परवानगी देऊ नका. एका बाजूला नाले सफाई, रस्त्यांची दुर्दशा, आरोग्य सेवेची वाताहत अशा अनेक मुद्दयांमुळे मुंबई दुर्लक्षित झालेली आहे. याठिकाणी महापालिकेचे जे कौतुक चालले आहे ते पोकळ आहे. या देशातील सर्वात भ्रष्ट महापालिका म्हणून मुंबई महापालिकेचे नाव टाईम्स ऑफ इंडिया वर्तमानपत्रामध्ये उल्लेख केलेला आहे. मुंबई महापालिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने बांधकामामध्ये सरासरी 2 हजार रुपये प्रति क्वेअर फुट किंमत कमी होऊ शकते असे वक्तव्य केले होते. यामध्ये बिल्डर असेल, महापालिकेचे कर्मचारी असतील, अशा पध्दतीने महापालिकेचा कारभार चाललेला आहे. महापालिकेच्या आयुक्तांबद्दल मी बोलणार नाही कारण सर्वांना माहिती असते. महापालिकेचे महापौर सुध्दा आता टक्केवारीची भाषा करतात. महापौर स्वतः सांगतात की

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील..........

माझ्यामुळे पेपरचा खप वाढतो. म्हणून या भ्रष्टाचाराची मुळे किती खोलपर्यंत रुजलेली आहेत हे याठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. मुंबईवर चर्चा होत असताना माझा मुख्य मुद्दा हाच होता की, राज्य सरकारने त्या-त्या सरकारकडे बोट दाखविण्यापेक्षा महापालिकेची सत्ता आपल्याकडे बऱ्याच वर्षापासून आहे आणि आपण मुंबईचे काय केले हे लोकांना आता समजले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मागच्या आठवड्यात बीडीडी चाळीचा प्रश्न याठिकाणी चर्चेला आला होता. त्यावेळी त्याचा पुनर्विकास करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. म्हाडाने याचा पुनर्विकास करावा, परंतु त्यांच्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर नाही, चांगल्या सुविधा नाहीत. म्हणून तेथील लोकांना चाळीचा पुनर्विकास करण्यासाठी स्वायतत्ता दिली पाहिजे अशी तेथील रहिवाश्यांची मागणी होती. सरकारने स्थानिक रहिवाश्यांच्या भावनेचा आदर करत त्यांना तशाप्रकारची मोकळीक दिली पाहिजे. मुंबईच्या बंद पडलेल्या गिरण्यांबाबत सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली. गिरणी कामगार हे मुंबईचे वैभव होते. सन 1995-1999 च्या काळापासून एक तृतीयांश धोरण आणले आणि गिरण्या बंद पडायला सुरुवात

झाली. त्यामुळे हजारो कामगार विस्थापित झाले. माजी विधानसभा अध्यक्ष कै.दत्ताजी नलावडे यांना कधी पैशाचा मोह झाला नाही. ते कामगारांसोबत त्याच चाळीत राहिले आणि आपली जीवनयात्रा संपविली. आज गिरणी कामगारांची काय अवस्था आहे. नाईलाजास्वत त्यांना वेगवेगळ्या क्षेत्रात जावे लागले आणि याचे परिणाम मराठी माणसाला, विशेषतः मुंबईकरांना भोगावे लागले. म्हणून राज्य सरकारने या गिरणी कामगारांच्या बाबतीत निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. त्याठिकाणी बिल्डरांचे भले करण्यात आले आणि त्यांना पाहिजे तेवढा एफएसआय देण्यात आला. गिरणी कामगार हा मुंबईचा आत्मा होता. मुंबई महापालिकेतील लोक गिरणी कामगारांच्या जीवावर सत्तेवर आले, त्या महापालिकेतील लोकांनी सुध्दा या कामगारांचा कधी विचार केला नाही. सरकार जबाबदारी पाडेल किंवा नाही त्याचे परिणाम सरकार भोगेल, पण मुंबई पालिका म्हणून तुमची जबाबदारी काय होती. याबाबत महापालिका काहीही करायला तयार नाही, अशी परिस्थिती आज याठिकाणी आहे. आता नुकताच जो मेक इन इंडियाचा कार्यक्रम केला, यात मुंबईचा गिरणी कामगार कुठे आहे. अनेक मिलच्या बाबतीत आपण अनुभवले त्यांची आज काय परिस्थिती आहे.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील..........

बिल्डरांकडून गिरणी कामगारांची मोठ्या प्रमाणात लुट झालेली आहे. गिरणी कामगारांना काय मिळाले. आपण एक समिती स्थापन केली, लोकांना घरे द्यायला सुरुवात केली, असे काहीही केलेले नाही. आता 7 लाखामध्ये घर घेऊ शकतो काय, स्वस्त घरे आहेत काय? गिरणी कामगारांच्या जीवावर अनेक लोक मोठे झाले, पण या गिरणी कामगारांच्या पदरी काय पडले.

अध्यक्ष महोदय, अजूनही गिरणी कामगार मोर्चे काढतो आहे, हक्काची घरे मागतो आहे. त्याच्या डोक्यावरील छत गेलेले आहे, तो आपल्या डोक्यावर छत मागतो आहे याचाही विचार याठिकाणी करायला पाहिजे. मुंबई महापालिकेने लोकांच्या सर्वांगिण विकासासाठी विचार करायला पाहिजे होता. आज मेट्रो रेल्वेची काय अवस्था आहे. लता मंगेशकर यांनी विरोध केला. आम्ही देश सोडून जाऊ. कन्ट्री फस्ट असे आपलेच म्हणणे आहे., मग नागरिक नंतरचा आहे. त्यावेळी सरकारने काही विचार केला असेल की, बोरीवलीला 5 एकर जागा देतो, बंगला बांधून देतो. जनमाणसाची कुचंबना करायची, त्यांना सुविधा द्यायच्या नाहीत. आज आपण एखाद्या मोठ्या माणसाबद्दल बोललो तर त्याचा अवमान होतो, मग त्याची माफी मागा. मी त्यांचा आदर राखूनच बोलतो. त्यात जाण्याचा माझा हेतू नाही, एक उदाहरण म्हणून मी सांगत आहे. इच्छाशक्तीचा केवढा मोठा अभाव आमच्यामध्ये होता. सर्वांसाठी घरे ही योजना केंद्र सरकारने जाहीर केली. सन 2022 पर्यंत 19 लाख घरे आपण देणार आहात. सरकारने मुंबईमध्ये 19 लाख घरे बांधण्याचा संकल्प केलेला आहे. 3 लाख रुपये प्रती घर प्रमाणे 19 लाख घरे सरकार सन 2019 पर्यं पूर्ण करणार आहे. सन 2019 पर्यंत मुंबईमध्ये 19 लाख घरे बांधत असताना त्याला काही इन्फ्रास्ट्रक्चर आहे, प्लॉट आहेत, रस्ते आहेत, काय आहे? आज मुंबईची पाणीपुरवठ्यापासून सार्वजनिक सेवेची जी वाताहत झालेली आहे त्यातून सरकार काय साध्य करणार आहे. शिवसेना अध्यक्षांनी एक घोषवाक्य महापालिकेच्या लोकांकरिता वापरले होते, सत्ताधाऱ्यांसाठी एक घोषणा आहे. घर हम बनायेंगे, पर तारीख नही बतायेंगे असे आपल्या सरकारचे धोरण आहे. हम घोषणा करेंगे, पर तारीख नही बतायेंगे असे आपल्या सरकारमध्ये चाललेले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

JJ-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.......

मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येमुळे येणाऱ्या लोकांच्या रोजंदारीकरिता, सुविधेकरिता लागणाऱ्या आवश्यक सुविधा पुरविण्याच्या बाबतीतमध्ये सरकारची इच्छा शक्ती कमी पडताना दिसते. आज आपण मुंबई झोपडपट्टी पुनर्वसना प्रकल्प राबवितो. धारावीमधील झोपडपट्टी सुधार योजनेचे काम सुरु होणार आहे. दुर्देवाने जे प्राधिकरण स्थापन केले आहे. त्यासंबंधी परवा माननीय मुख्यमंत्र्यांच्या समवेत बैठक झाली. त्या ठिकाणी मी सूचना केली ती मान्य करण्यात आली. तेथे रिड्रेसल फोरम स्थापन करा. कारण तेथे कोणाला झोपडपट्टीधारक धरायचे, कोणाला धरायचे नाही, पुरावे मागायचे, पुराव्याच्या बाबतीत अडचणी निर्माण करायच्या म्हणजे तो माणूस तेथे विस्थापित होईल अशा तऱ्हेने अधिकाऱ्यांची मनमानी सुरु आहे. पुन्हा बिल्डर लोकांचे आणि अधिका-यांचे संगनमत सुरु होते. शेवटी त्याची झळ राज्यकर्त्यांना सुध्दा लागतेच. यामध्ये राज्यकर्त्यांचा संबंध आहे किंवा नाही आहे हा नंतरचा भाग आहे. परंतु अगोदर ग्राऊंडवर जे काम व्हायला पाहिजे त्याबाबत सरकारने आता काळजी घेतली तर झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रकल्प असो किंवा धारावीचा पुनर्वसन प्रकल्प असो या दोन्हीच्या बाबतीमध्ये सरकारने अधिक गांर्भीयाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईच्या भोवती आदिवासी पाडे आहेत. आरे कॉलनीमधील आदिवासी पाडयांची काय अवस्था आहे ? मी एकदा तेथे स्वत: गेलो होतो. तेथे सुविधा नाहीत. मुंबईला मायानगरी म्हटले जाते. ते लोक नर्कामध्ये राहत असल्यासारखी आदिवासी बांधवांची अवस्था आहे. आदिवासींचे आरे कॉलनी व नॅशनल पार्कमध्ये जवळजवळ 222 पाडे आहेत. त्यांच्या सभोवताली टॉवर उभे आहे. मुळापासून जो तेथे राहणारा आदिवासी आहे त्याची काय अवस्था आहे ? आदिवासींच्या दृष्टीने मुंबई ही मायानगरी आहे की नर्क नगरी आहे ? असा त्यांना प्रश्न पडत असेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.......

अध्यक्ष महोदय, स्वच्छ भारत, स्वच्छ मुंबई असे अनेक मोठे नारे दिले गेले. स्वच्छ भारत अभियान, जलसाक्षरतेचे पुष्कळ ढोल बडविले. गेल्या आठवडयात सभागृहामध्ये चर्चा होत असताना दहिसर, पोयसर, ओशिवारा आणि मिठी नदी या नदयांची अवस्था काय आहे ? हया नदया आय.सी.यु. मध्ये गेलेल्या आहेत. अशा प्रकारे स्वत: ज्येष्ठ जलतज्ञ श्री.राजेंद्र सिंह यांनी नदयांच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे. या फक्त मुंबईच्या जलवाहिन्या नाहीत. मुंबईचे जीवन सुरक्षित व स्वच्छ ठेवण्याचे काम या नदयांवर आहे. या नदयांच्या पोट नदया आहेत. आज त्यांची काय परिस्थिती आहे ? या नदयांच्या साफसफाईवर महानगरपालिका किती खर्च करते. नाले सफाईबाबत मी अनेक वेळा बोललो आहे. फक्त गाळ काढण्याचे काम चालू आहे. मुंबई महापालिकेत भांडणे कशामुळे होत आहेत, नदया प्रदुषित आहेत याबाबत कोणाला खंत, खेद वाटत नाही. नाले सफाईतला गाळा कोणाच्या हाताला किती लागला ? त्यातुन गाळा निघालाच नाही, परंतु गाळ काढण्याचा वाटा कोणाला मिळाला ? हया बातम्या रोज वाचनात येतात. म्हणून महापालिकेमध्ये अशा त-हेने काम चालू आहे. यामध्ये इच्छाशक्ती नाही.

अध्यक्ष महोदय, मागे सभागृहामध्ये चर्चाकरताना मी सांगितले होते. संपूर्ण मुंबई महानगरपालिकेच्या भ्रष्टाचारामध्ये एकदा विस्ताराने चौकशी करण्याची आवश्यकता आहे. तेथे कशामध्येही तारतम्य राहिलेला नाही. इतकी श्रीमंत महानगरपालिका आहे. त्याचे कौतुक आम्ही ऐकतो. या शहराच्या संदर्भात पुष्कळ बोलता येईल. मुंबईकरिता ज्या गोष्टी प्राधान्याने करायला पाहिजेत. त्या करण्याच्या बाबतीत राज्य सरकारला मर्यादा असल्यातरी मुंबई महानगरपालिकेने अधिक काम करण्याची गरज आहे. मुंबई शहरात होत असलेली बांधकामे असतील, झ ोपडपट्टीच्या संदर्भात असेल, जलनि:सारणाचा प्रकल्प असेल, पाणीपुरवठयाच्या बाबतीत अनेक गोष्टी आहेत किंवा पायाभूत सुविधा तयार करण्याच्याबाबतीत मुद्दे असतील, अशा अनेक मुद्यांवर चर्चा करता येईल.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.......

अध्यक्ष महोदय, आपण अतिरिक्त घरे बांधून जादा चटई क्षेत्र देण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये बिल्डर लोकांचा फायदा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपला याबाबत हेतू काय होता ? लो कॉस्ट हौसिंगचे प्रोजेक्ट आणायचे. आपण या बिल्डर लोकांना फायदा करत लो कॉस्ट हौसिंगच्या संदर्भात कधी विचार केला का ? मुंबईतील मराठी माणूस गोरेगांव, बोरिवली, दहिसरच्या पुढे गेला, जो दादर, माटुंगा, वांद्रे पर्यंत राहत होता. मुंबईमध्ये चुकुन मराठी सापडणार नाही. सर्व वसाहती बाहेर गेलेल्या आहेत. घरांच्या किंमती दोन कोटी, तीन कोटी या मोठयाप्रमाणात वाढलेल्या आहेत. मराठी माणूस डोळया समोर ठेवून राजकारण केलेले आहे. मराठी माणसाची अस्मिता जागृत करुन तुम्ही त्याच्या भावनेला हात घातला. त्या मराठी माणसाकरिता कोणत्या योजना केल्या ? महानगरपालिकेच्या सत्तेत येऊन काय केले ? ते एकदा आम्हाला कळू द्या. एकदा आम्हाला समजले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, बेस्टमध्ये वाहन चालक पदावर काम दिले म्हणजे मराठी माणसाचे कल्याण झाले का ? मुंबई महानगरपालिकेमध्ये कंत्राटीपध्दीवर गटार उपसायला लावले म्हणजे कल्याण झ ाले का ? प्रत्येक वेळी मराठी माणसाच्या नावाने ढोल बडवता, त्याच्या उत्कर्षाकरिता त्याच्या कल्याणासाठी काही योजना केल्या आहेत का ? त्याच्या भावनिक राजकारणाचा प्रश्न करुन फक्त मत मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. यासंदर्भाने मुंबईच्या अनेक समस्या उभ्या राहतात. त्या विषयी मी फार चर्चा करणार नाही. बांधकामाचे नियमबाहय परवाने दिले जातात. मुंबई महानगरपालिकेचे चार-चार आयुक्त आहेत. वॉर्ड ऑफिसर असताना मुंबईमध्ये एवढी अनधिकृत बांधकामे झाली आहेत, ती का थांबली नाहीत ? तेथे एवढे चांगले सिनिअर आय.ए.एस. ऑफिसर देतो, मोठे अधिकारी देतो, असे सांगण्यात येते. शहर विस्तारामध्ये मला नेहमी प्रश्न पडलेला आहे की, अनधिकृत झोपडपट्टया होत आहेत, सरकारी जागेवर अतिक्रमणे होत आहेत, एवढी सगळी यंत्रणा महानगरपालिकेला दिलेली आहे, मग ही अतिक्रमणे का झाली ?

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.......

त्या-त्या अधिका-यांच्या काळात अतिक्रमणे झालेली होती, मग त्या आयुक्तांनी ती का हटविली नाहीत ? माझा मुळातच प्रश्न आहे की, ती अतिक्रमणे का होऊ दिली ? झोपडपट्टया का वाढू दिल्या ? सरकारी रेकॉर्डवर त्यांना का येऊ दिले ? त्यांना सुविधा देण्याचे काम आपल्याला करावेच लागेल. मानवतेचा दृष्टीकोन ठेवल्यानंतर त्याबाबतचा विचार करावाच लागेल. आपण अनेक वर्षापासून काम करता मग हे अपयश का आले ? मालवणी येथील दुर्घटनेत निरपराध लोक विषारी दारु पिऊन मेली. तिकडे गाडी आत जात नाही म्हणून मी मुद्दाम मोटर सायकलवरुन फिरलो. तेथे गेल्यानंतर मला अतिशय वाईट वाटले, तेथे नर्कात गेल्यासारखी अवस्था आहे. तेथे कशा पध्दतीने माणसे राहतात, दोन तीन मुले घेऊन त्यांच्या बायका पुढे यायच्या, नवरा वारला आहे असे सांगायच्या, त्यांच्याबाबत लोक सहज म्हणणार की तो गावटी दारु, विषारी दारु पिऊन मेला असे म्हणणे फार सोपे आहे. त्यावेळी मी त्या महानगरपालिका आयुक्ताला निलंबित करण्याची मागणी केली. असे धाडस तुमच्या आहे का ? तुम्ही काय करणार ? त्या वॉर्ड ऑफिसरला निलंबित करणार.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेचा आयुक्त, उपायुक्त असेल, ॲडिशनल कमिशनर, वॉड ऑफिसर हे प्रभागामध्ये किती वेळा जातात, वॉर्डामध्ये किती वेळा जातात याची तुम्ही माहिती घ्या. शेवटी मल्टीपल ॲथॉरिटी जेव्हा काम करतात तेव्हा प्रश्न येत नसेल. काही राज्य सरकारच्या अखत्यारित काम करीत असतील, काही महानगरपालिकेच्या अखत्यारित असतील, काही एम.एम.आर.डी.ए. च्या अखत्यारित असेल शेवटी जबाबदारी कोणाची आहे ? ही आमची जबाबदारी, मग तमक्याची जबाबदारी आहे का ? मी एकदा मुंबई महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर नावाच्या दवाखान्यात गेलो होतो. दवाखान्याची काय परिस्थिती आहे ? तेथे डायलॅसिस मशिन बंद ठेवायला लागले आहेत, कारण तुम्ही खाजगी कंपनीकडे मशिन चालवायला दिली होती.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील .....

डायलसीस मशीनमुळे वेळीच उपचार झाला असता तर बऱ्याच जीवनांची हानी टाळता आली असती. त्यावेळी मी स्वतः दवाखान्यात गेलो, डॉक्टरांना भेटलो, ते म्हणाले किती दिवस मशीन चालवायची याबाबत आमचा करार आहे, आता आमचा नाईलाज आहे.

अध्यक्ष महोदय, पेशंटला माहिती असते का, मी यावेळी मरणार आहे, मला यावेळी मशीन लागणार आहे ? तुम्ही मुंबई महानगरपालिकेच्या हॉस्पीटलची प्रॉपर्टी कोणाला तरी चालविण्यास दिलेली आहे. पण याच्या परिस्थितीबाबत आपण कधी चौकशी केली आहे काय ? मालवणीच्या घटनेनंतर तिकडे कोणी गेलेच नाही.

**तालिका सभाध्यक्ष** : मी माननीय विरोधी पक्ष नेते यांना डिस्टर्ब करीत नाही पण त्यांना सांगू इच्छितो की, याबाबतची माहिती चर्चेकरिता या सभागृहात आणण्याची आवश्यकता आहे. खरे तर आपण उल्लेख केलेली संस्था मुंबई शहरात 96 मशीन चालवते. फ्री ऑफ कॉस्टमध्ये डायलसीस करतात. डायलसीस पेशंट ऑन बेड असतात. त्यांनी ते नाकारुन दुसरे पेशंट डायलसीस घेण्यास सुरुवात केली तर ऑन बेड पेशंटची मोठी अडचण होते. मागे चर्चेच्या वेळी या विषयाचा उल्लेख झाला होता. ती संस्था आता या सर्वातून बाहेर पडलेली आहे, त्यामुळे मुंबईमधील डायलसीसचे 100 मशीन बंद पडले आहेत. सबसीडाईज्ड डायलसीस म्हणजे फ्री ऑफ कॉस्ट डायलसीस होते. पण आता त्या संस्थेने काम बंद केले आहे. तुम्ही बाहेर नाशिक, पुणे, प्रवरानगर, अहमदनगरमध्ये किंवा जेथे मागाल तेथे ती संस्था सेवा देतील. पण मुंबईमध्ये काम करण्यास त्यांचे आता स्वारस्य राहिलेले नाही.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, मी त्या संस्थेला दोष देऊ इच्छित नाही. पण माझे म्हणणे आहे की, तुम्ही त्या सेवाभावी संस्थेला काम दिले असेल, त्यांच्याशी करार केला असेल, कराराच्या अटीच्या बाहेर ते जाऊ शकत नाही व तुम्हीही जाऊ शकत नाही. पण ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. मुंबई महानगरपालिकेने 55 हजार कोटी रुपये फिक्स डिपॉझीटमध्ये कशाला ठेवले आहेत ? यातून तुमचे हॉस्पीटल तुम्ही इक्वीप करावेत. मुंबई महानगरपालिकेच्या सायन हॉस्पीटलचीही वाईट अवस्था आहे. तेथे माझा मुलगा न्युरॉलॉजीचा अभ्यासक्रम घेत होता, त्यानेही सांगितले की, येथे फार वाईट अवस्था आहे. तेथे् ऑपरेशन

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील .....

झालेला पेशंट मृत झाला. मुळ पेशंट बाजूच्या बेडवर होता व हॉस्पीटलने दुसऱ्याच बेडवरील पेशंटचे ऑपरेशन केले. तसेच जीवंत पेशंट घेऊन गेले व मृत पेशंट तेथेच ठेवला होता. यातील विनोदाचा भाग सोडून द्या, पण तुम्हाला मी यातील फॅक्ट सांगत आहे. असा तेथे अनियंत्रित कारभार झालेला आहे. दुर्दैवाने मुंबई महानगरपालिकेत प्रोफेशनल मॅनेजमेंट नावाची गोष्ट राहिलेली नाही. पॉलीटीकल मॅनेजमेंट चालू आहे. त्यामुळे अशा घटना होणारच आहेत. आपण स्वत: मुंबई महानगरपालिकेच्या दवाखान्याची दुरावस्था जाऊन पहावी. रेसीडंट मेडीकल ऑफीसरची अवस्था पहावी, त्यांच्या रेसीडन्सची अवस्था जाऊन पहावी. तेथील बेसीक ॲमेनिटीची अवस्था जाऊन पहावी. तेथे अतिशय अपुऱ्या सुविधा आहेत. तेथे युनीयन असली पाहिजे व त्या युनीयनच्या लोकांनींही हे देखील पाहिले पाहिजे. गरीब माणूस कोठे जाणार, तेथे अत्यंत अपुऱ्या सुविधा आहेत. मी स्वत: सायन हॉस्पीटल व केईएम हॉस्पीटलला गेलो आहे. मुंबई महानगरपालिका मोठी असून त्यांच्याकडे खूप पैसा आहे. त्यामुळे तेथे निश्चितपणे चांगल्या आरोग्य सुविधा देता येतील. तालिका सभाध्यक्ष महोदय आपणही कधी तरी एखाद्या हॉस्पीटलला जाऊन या, तुम्ही कधी गेले असाल तर तेथे त्यांनी काही स्टँडर्ड मेंटेन केले आहे का याचा खुलासा करावा.

**तालिका सभाध्यक्ष** : मी माननीय विरोधी पक्ष नेते यांना सांगू इच्छितो की, त्यांनी आता भाषण कन्क्लुड करावे.

श्री.सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, आम्ही कोणाला डायलसीसवर पाठवत नाही, तुम्ही काळजी करु नका. तुम्ही मला बोलू द्या.

श्री.सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्ष नेते हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हॉस्पीटलच्या स्थितीबाबत सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. सायन, केईएम, नायर ही मुंबई शहरातील अद्यावत अशी हॉस्पीटल आहेत. पेरीफरल हॉस्पीटल देखील मुंबई महानगरपालिका चालवत आहे. (अडथळा)

**तालिका सभाध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांना सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडे असलेल्या माहितीच्या आधारे ते निवेदन करीत आहेत. आपणास काही वेगळे सांगायचे असेल तर सांगा.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते भाषण करीत असताना मुंबई महानगरपालिकेवर वारंवार बोलले तर सतत श्री.सुनील प्रभू हे उभे राहून हरकत घेत आहेत. माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांना येथे बोलण्याची संधी मिळणार आहे. आपणास पाहिजे ते आपण बोलू शकता, आपणास स्वातंत्र्य आहे. पण माननीय विरोधी पक्ष नेत्याच्या बोलण्याच्या स्वातंत्र्यावर आपणास अशी गदा आणता येणार नाही. माननीय विरोधी पक्ष नेते बोलत असताना असे वारंवार अडथळे आणणे योग्य नाही. काही चुकीचे रेकॉर्डवर गेले असेल तर जे तुमचे अर्ग्यूमेंट असेल ते करा. माननीय विरोधी पक्ष नेते स्वत: त्या हॉस्पीटलमधे गेले होते, त्यांना आलेले अनुभव ते येथे करीत आहेत.

**तालिका सभाध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना सांगतो की, सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांनी माननीय श्री.एकनाथराव खडसे हे जेव्हा विरोधी पक्ष नेते होते तेव्हा त्यांना बोलताना बघितलेले दिसत नाही.

श्री.सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा अधिकार आहे. त्यांनी जे असेल ते बोलावे. राज्य सरकार सत्य उत्तर देईल. पण ते वारंवार ज्या प्रकारे महानगरपालिकेच्या हॉस्पीटलचा उल्लेख करीत आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ज्याबाबतचा उल्लेख केलेला आहे त्यासाठी सन 1888 च्या कायद्याच्या सेक्शन 61 अन्वये मुंबई महानगरपालिकेचे हॉस्पीटल व शाळा ऐच्छिक कर्तव्यामध्ये आणण्यासाठी येथे कायदा आणावा असा त्यांनी आग्रह धरला तर आपण या सर्व बाबी व्यवस्थित करु शकतो

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांची काळजी घेत आहे. त्यांचे आरोग्य बिघडू नये म्हणून माझा प्रयत्न आहे. शेवटी केव्हा तरी मुंबईचे आरोग्य सुधारले पाहिजे, मुंबईच्या आरोग्याची वाट लागली आहे. मुंबई महानगरपालिकेबाबत मी अनेकदा बोललो आहे. आता परत परत काय बोलणार. परत या सर्वांना मुख्यमंत्री महोदय व मंत्री महोदय क्लिन चीट देणार आहेत. कारण तुम्हाला पर्याय नाही. तुम्हाला सहनही होत नाही व सांगता येत नाही अशी तुमची अवस्था आहे. मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत आमची एकच मागणी होती की, त्यांच्या गैरकारभाराची चौकशी करण्यात यावी. याबाबत वर्तमानपत्रांनी अनेकदा रकाने छापले आहेत. तरीही सरकार शुध्दीवर येण्यास तयार नाही. मुंबईतील वाहतुक कोंडीची तशीच समस्या मोठी आहे.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष** : मी माननीय विरोधी पक्ष नेते यांना सांगू इच्छितो की, आता कन्क्लुड करावे, या प्रस्तावावर 6 तासापेक्षा जास्त चर्चा झालेली आहे.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, मी एमएमआरडीएबाबत बोलू इच्छितो. मी ओशीवरा येथील ट्रॅन्झीट कॅम्पमध्ये गेलो होतो. तेथे अत्यंत वाईट अवस्था आहे. तेथील भाडे वाढविले आहे. ज्यांना मुळ जागा ट्रॅन्झीट कॅम्पमध्ये द्यायला हवी होती त्यांना जागा दिलेली नाही. एमएमआरडीएचे एम.डी. श्री.मदान यांना विचारले की, तुम्ही कधी ट्रॅन्झीट कॅम्पला भेट दिली का ? ते म्हणाले की, मी आमच्या अधिकाऱ्याला पाठवितो. मी त्यांना विचारले की, एम.डी. म्हणून तुम्ही स्वतः तेथे गेला आहात काय ? तेथे सरकारचा करोडो रुपये खर्च झाला, पाण्यासारखा पैसा वाहिला आहे. मी त्यांना स्वतः याबाबत विनंती केली की, तुम्ही एकदा एमएमआरडीएच्या ट्रॅन्झीट कॅंपला भेट द्या. एमएमआरडीए एक मोठा हत्ती झालेला आहे. मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात मुंबई महानगरपालिकेवर अतिक्रमण करणारी व्यवस्था निर्माण झालेली आहे. निदान हे अतिक्रमण तरी व्यवस्थित करावे. एमएमआरडीएकडे पैसा आहे पण त्याकडे कोणी काहीच पहायला तयार नाही. मुंबई मेट्रो, मेट्रो-3 चे उदाहरण घ्या. या मेट्रोची काय वाट लागणार आहे, हे तुम्हाला आता हळूहळू कळणार आहे. याची डबर तुम्हाला वाहून न्यावी लागेल तेव्हा तुम्हाला त्याची अडचण लक्षात येईल की, वस्तुस्थिती काय आहे. पण कोणताही प्रकल्प करताना त्यासंबंधी लोक उद्या शंका उपस्थित करणार नाहीत याचाही विचार केला पाहिजे. मुंबई मेट्रोचे दर देशातील इतर कोणत्याही मेट्रोच्या दरापेक्षा प्रती कि.मी. जास्त व खर्चिक आहेत. चेन्नई मेट्रो, दिल्ली मेट्रो, कोलकत्ता मेट्रोचे दर पहावेत. यामुळे मुंबई मेट्रोकरिता येणारा खर्च वाजवीपेक्षा कितीतरी जास्त आहे अशी तक्रार आलेली आहे. सरकारने ही तक्रार तपासून घ्यावी. मी आरोप करणार नाही की, मुंबई मेट्रोची कॉस्ट किती किलोमीटरने वाढली आहे. कारण सांगितले जाते की येथे फॉस्फेट रॉक आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर LL-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

यामध्ये एस्कलेटर्सचा खर्च जास्त आहे. कोणत्याही प्रकल्पाची सुरुवात सरकारवर भ्रष्टाचाराच्या आरोपांनी होऊ नये,असे मला वाटत आहे. यामध्ये शासनाने तपासणी करावी. मी सूचना करीत आहे. शासनावर कोणताही आरोप करीत नाही. अन्यथा या मेट्रोचे रूळ ब्रिजवर टाकण्याऐवजी शासनाला ते समुद्रात नेऊन टाकावे लागतील, अशी वेळ येऊ नये, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, लंडन शहराचे महापौर वॉरिज जॉनसन यांनी आता जगातील 12 महत्त्वाच्या शहराबाबत वर्णन केलेले आहे. "मुंबईचे अश्रू" म्हणून मुंबईच्या संस्कृतीबाबत लंडन शहराचे महापौर यांनी एक लेख लिहिलेला आहे. सोयीसुविधा, रस्ते, पाणी, स्वच्छता आणि राहणीमान याबाबतीत मुंबईला कोणीही गृहित धरत नाही. पण सांस्कृतिक आघाडीवर या शहराला आता पुन्हा उतरती कळा लागलेली आहे. जगातील 12 महत्त्वाच्या शहरांमधून मुंबईचा क्रमांक 12 वर आलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहर हे सांस्कृतिक व साहित्यक चळवळीचे केंद्र होते. ग्रंथालये,चित्र प्रदर्शने, फिल्मी सोसायटया, संग्रहालये, व्याख्याने या गोष्टींनी मराठी माणसाच्या जगण्याला सांस्कृतिक आयुष्य बहाल केले होते. जे लोक आज मराठी माणसांवर राजकारण करीत आहेत, ते आज मराठी माणसाला विसरलेले आहेत. लंडन शहराच्या महापौरांना मराठी माणसाची काळजी आहे. मुंबईतील सत्ताधारी लोकांना मात्र मुंबईची काळजी नाही. त्यांना केवळ मराठी माणसाचे मते पाहिजेत. बदलत्या जीवनशैलीत मराठी अस्मितेचे राजकारण करणा-या राजकीय पक्षानेच या संस्कृतीला खांदा दिलेला आहे, असे या लेखामध्ये म्हटलेले आहे. या अहवालामध्ये असे म्हटलेले आहे की, लंडनमध्ये 162 वस्तु संग्रहालये आहेत, मुंबईत केवळ 06 वस्तुसंग्रहालये आहेत. लंडनमध्ये 757 कला दालने आहेत. मुंबईत केवळ 152 कला दालने आहेत. लंडनमध्ये एका वर्षात 32,448 नाटकाचे प्रयोग होतात. मुंबईत मात्र दरवर्षी केवळ 8750 नाटकाचे प्रयोग होतात.

अध्यक्ष महोदय, खाद्यसंस्कृतीच्या बाबतीत बोलायचे झाले तर राज्याच्या राजधानीत 13000 उपहारगृहे आहेत. लंडनमध्ये 37,000 उपहारगृहे आहेत. अस्सल मराठी पदार्थाच्या बाबतीत दादर आणि गिरगाव येथील काही 4-5 उपहारगृहे सोडली तर अन्यत्र कोठेही मराठी खाद्यसंस्कृती जपण्याचा प्रयत्न केलेला नाही. ...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

कोल्हापूर येथे पांढरा आणि तांबडया रश्श्याची परंपरा जपली जाते. नागपूर येथे सावजी भोजन संस्कृतीची परंपरा जपली जाते. मुंबईमध्ये मराठी माणसाची अस्मिता असणारी खानावळ दाखवावी. ज्या ठिकाणी मराठी माणसाला जेवणाचा आस्वाद घेण्यासाठी जागा आहे, अशी जागा मला दाखविण्यात यावी. त्याच्यावर सर्व शेट्टी लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. असे म्हटले तर मी प्रादेशिक वाद करीत आहे, असे म्हटले जाईल. आम्हाला तो वाद निर्माण करायचा नाही. किमान मराठी माणसाने कष्टाने आपली संस्कृती व अस्मिता जपणे आवश्यक आहे. आता मराठी माणसाची खाद्यसंस्कृती वडापावच्या आधारावर शिल्लक राहिलेली आहे. दत्ता वडापाव व शिव वडापाव मुंबईमध्ये राहिलेले आहेत. शिव वडापाव याबाबत मी परवा बोललो होतो. ते यांना रुचलेले नाही.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरावर चर्चा होत असताना अनेक बाबींचा उल्लेख करता येईल धारावी, बालिका नगर, गांधी नगर, शांती नगर, शाहू नगरच्या बाबत बोललो आहे. रेल्वे प्रॉपर्टीज तेथील काही स्लम्स डेव्हलपमेंटमध्ये घेण्याबाबत माननीय मुख्यमंत्री यांनी विचार करु असे म्टलेले आहे. मेक इन महाराष्ट्र आणि मेक इन इंडिया या प्रकल्पाचे ओपनिंग राज्यात झालेले आहे. आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीचा पुनर्विकास करण्याचा विचार चालू आहे. मेक इन महाराष्ट्रा मार्फत मेक इन धारावी या नवीन नावाने धारावी झोपडपट्टीचा पुनर्विकास करावा लागेल. सरकारची इच्छाशक्ती चांगली असेल तर हे होईल. मुंबई शहराकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या सत्तेमध्ये दोन दशकांपासून असणा-या मंडळींनी या निवडणुकीत निदान लोकांना देखावा करण्याचा प्रयत्न करावा. शेवटी मुंबई शहर म्हणजे आर्थिक राजधानी असे त्याचे नाव होते. ते नाव आता हळू हळू कमी झालेले आहे. त्याचे आता डिसेंट्रलायजेशन होत चालले आहे. बँगलोर, चेन्नई, हैद्राबाद, दिल्ली, अहमदाबादला आता सर्व फ्लो चालला आहे. एवढीच आता अपेक्षा आहे, आता तरी अधोगती थांबवा मुंबई शहराला लागलेली

उतरती कळा लक्षात घ्यावी. अन्यथा आगामी महापालिकेच्या निवडणुकीमध्ये लोक तुम्हाला सत्तेतून उतरविल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा मी देत आहे. ....3

07-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) LL-3

JN/ AKN/ ST/ 16:10

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

अध्यक्ष महोदय,कोकणासंदर्भात मी दोन-तीन सूचना करणार आहे. कोकण हे पर्यटन वाढीस वाव असणारे क्षेत्र आहे. 720 कि.मी. कोस्टलाईन एरिया कोकणाला लाभलेला आहे. मेरिटाईम पध्दतीने कोस्टलाईन डेव्हलपमेंट होणे आवश्यक आहे. कोकणात व्हर्जिन बिचेस आहेत, त्याला सीआरझेड लागू करुन कोकणाचा श्वास कोंडलेला आहे, तो सर्वप्रथम मोकळा करण्याची गरज आहे. आंबा उत्पादक शेतक-यांबाबत मी मंत्री असतांना घोषणा केली होती. त्या ठिकाणी आंबा प्रोसेसिंग सेंटर होणे आवश्यक आहे. कोकणातून मुंबईमध्ये 400-500 कि.मी. आंबा येतो. प्रवासामुळे तो खराब होतो, त्याचा दर्जा कमी होतो. त्या ऐवजी कुलिंग सेंटर्स व प्रि कुलिंग सेंटर्स रत्नागिरी भागाच्या कोस्टल लाईनमध्ये सुरु करण्यात यावे. या कुलिंग सेंटर्समध्ये आंबा ठेवून कंट्रोल टेंपरेचरमध्ये किंवा ए.सी. कंटेनर्समधून आणावा. त्यामुळे प्रोसेसिंग चांगले होऊन आंब्याचा दर्जा चांगला राहील. मुंबईचा हापूस आंब्याचा दर्जा जगात मान्य झालेला आहे. यामुळे त्याकरिता चांगले वातावरण निर्माण होईल. काजू प्रोसेसिंग इंडस्ट्री फ्रुट प्रोसेसिंग इंडस्ट्रीला वाव देणे आवश्यक आहे. कोकणातील वैभव पर्यटन असून तेथे पर्यटन व प्रक्रिया उद्योगांना अधिक वाव देण्याची आवश्यकता आहे. कोकण विकासाला नवीन दिशा देण्याचा प्रयत्न शासनाने करावा. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----

एमएम-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी (मानखुर्द-शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, मैं नियम 293 का माननीय विरोधी पक्ष का जो प्रस्ताव है, उस पर बोलने के लिए खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, मानखुर्द-शिवाजीनगर में डम्पींग ग्राऊण्ड एक राजनीतिक मुद्दा बन गया है. कभी श्री किरीट सोमय्या जी शिवसेना पर हमला कर रहे हैं, कभी शिवसेना बीजेपी पर हमला कर रही है. वहां के लोकल लोगों के बारे में कोई विचार नहीं कर रहे हैं. लोकल लोगों की स्थिति बहुत खराब है. वहां बिमारियां बहुत बढ़ रही है. श्री जावडेकर जी ने कहा है कि तीन महीने में उसको बंद कर दिया जाएगा. तीन महीने में उसका कुछ भला होना चाहिए. वहां लोगों की हालत बहुत खराब है. माफिया ऑपरेट कर रहा है, ऐसा कहा जा रहा है. लोकल लोग...वहां आग लगायी जा रही है. अभी तक किसी माफिया की गिरफ्तारी नहीं हुई है. यह सिर्फ जबानी बातें है. जो गरीब लोग वहां कचरा चुनते थे, जिनकी रोजी-रोटी थी, जिनको एन्ट्री पास मिला था, 250 गरीब लोगों के एन्ट्री पास रद्द कर दिए गए हैं. उनकी रोजी-रोजी का सवाल पैदा हो गया है. अभी तक यह जाहीर नहीं हुआ कि उनकी कोई गलती है. उनकी रोजी-रोटी बंद नहीं होनी चाहिए. यह इलाका बहुत गरीब है.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिका की बात की जाए तो रोड विभाग का 3 हजार करोड़ रुपये का भ्रष्टाचार पिछले 4-5 सालों से हुआ है. समाजवादी पार्टी ने यह मुद्दा कार्पोरेशन में उपस्थित किया है. 6 ठेकेदारों की मोनोपोली है. उनको पूरी पॉलिटिकली मदद मिल रही है. मेयर भी कहते है कि इसमें बहुत बड़ा भ्रष्टाचार हुआ है, इसकी इन्क्वायरी होनी चाहिए. 500 मीटर के काम की जगह पर 600 मीटर के काम का पैसा लिया जा रहा है. रास्ता बनाने के लिए जो जो आइटम डाले नहीं गए, जिन आइटम का इस्तेमाल नहीं हुआ है, उसका नाम उसमें लिखा हुआ है. मैं माननीय मुख्यमंत्री जी से कहना चाहता हूं कि इस बारे में इन्क्वायरी कब की जाएगी? भ्रष्टाचार की इन्क्वायरी होनी चाहिए. ऐसा कहते हैं कि ---

"बर्बाद-ए- गुलिस्ता करने को बस एक ही उल्लू काफी है,
हर शाख पर उल्लू बैठा है अंजाम-ए-गुलिस्ता क्या होगा"

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.....2.

श्री अबु आजमी.......

अध्यक्ष महोदय, जो भी बात कर रहा है, जहां भी बात हो रही है, हर स्कीम में भ्रष्टाचार हो रहा है. हर जगह बेईमानी हो रही है. इस बारे में कठोर कदम उठाए जाने चाहिए. भारत माता की जय का मुद्दा लेकर बड़ी बड़ी बात की जा रही है. जो लोग देश को कंगाल कर रहे हैं, जो लोग भ्रष्टाचार करके देश को बर्बाद कर रहे हैं उनको देशद्रोही कहना चाहिए. उन पर सही कार्रवाई होनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, म्हाडा की इमारतें तो बहुत सारी बन गई हैं. कांदिवली, चर्चगेट, आजाद मैदान, कुर्ला, चारों तरफ से लाखों लोग लाकर मानखुर्द-शिवाजीनगर में बसा दिया गया. अब उनको पानी चाहिए. वहां पर पानी की मात्रा बढ़ायी नहीं गई. जितने ज्यादा आदमी वहां बसाए गए उसको ध्यान में रखते हुए पानी की मात्रा बढ़ायी नहीं गई. बिल्डिंगों में सुविधाएं नहीं है. ड्रेनेज की लाइन नहीं है. सिवरेज लाइन नहीं है. पीने के पानी में गटर का पानी आ रहा है. इस बारे में कोई ध्यान नहीं दिया जा रहा है. म्हाडा की जो खाली बिल्डिंग हैं उनको दलालों, अधिकारियों के जरिए लोगों को, इनोसेन्ट बायर को बेच दिया जा रहा है. लोग उसमें आकर रह रहे हैं. साल भर के बाद फिर उनको निकाल दिया जा रहा है. लोग सड़क पर आकर चिल्ला रहे हैं. इस बारे में कड़ी कार्रवाई होनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, एमएमआरडीए, म्युनिसिपालटी और पुलिस की मिलीभगत से बहुत सारे लोगों ने फ्लैट खरीद लिये हैं. लोगों को बर्बाद किया जा रहा है. सरकार ने इस बारे में कोई कदम उठाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, हमारे एरिया में नटवर पारीख नाम की एमएमआरडीए की एक बिल्डिंग है. 12 बिल्डिंग खाली पड़ी है. पिछले 6-7 सालों में उन बिल्डिंगों के बाथरूम के दरवाजे, शौचालय के दरवाजे व अन्य सामान निकालकर ले गए हैं. लोग सड़क पर पड़े हैं उनको देने के लिए जगह नहीं है. 12 बिल्डिंगों में 1100 फ्लैट खाली पड़े हैं. इस ओर सरकार ने ध्यान देना चाहिए.

अध्यक्ष महोदय, ट्रान्जिट कॅम्प में लोग 40 सालों से पड़े हैं. हालत ऐसी है कि वहाँ दीवारों में दरार पड़ गई है, पीने के लिए पानी नहीं है, शौचालय की व्यवस्था नहीं है. वहाँ पर स्पार्क नाम की कंपनी है, देखभाल करती है, कई करोड़ों रुपये लोगों से जमा करके

.....3.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी.....

बिजली का बिल दिया ही नहीं है. बिजली का बिल बाकी पड़ा है. इस बारे में सरकार ने कोई कदम उठाना चाहिए. स्पार्क कंपनी की इन्क्वायरी होनी चाहिए. लोग अंधेरे में रह रहे हैं. लोगों को पीने के लिए पानी नहीं मिल रहा है. इस ओर ध्यान दिया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, एसआरए योजना के बारे में कहना चाहूंगा. सरकार ने कहा है कि सन 2022 तक मुंबई को स्लम फ्री कर देंगे. मेरे अपने क्षेत्र की बात बताना चाहता हूं. ॲनेक्श्चर इश्यू नहीं हो रहे है. वहां पर स्टाफ नहीं है. डिप्टी कलेक्टर का....हेल्थ का इश्यू है. वे वहां बैठते नहीं हैं. सरकार ने रेसिडेन्शियल झोपड़ों की ट्रान्सफर फीस 40 हजार रुपये और कमर्शियल झ ाोपड़ों की फीस 60 हजार रुपये कर दी है. इतना पैसा देने की झोपड़पट्टी वालों की हैसियत नहीं है. रेसिडेन्शियल के लिए 10 हजार रुपये ओर कमर्शियल के लिए 25 हजार रुपये करेंगे तो लोग शायद इतना पैसा भर सकेंगे. एसआरए के बारे में सरकार ने व्हाईटपेपर निकालना चाहिए. बहुत सारे डेवलपर का सबमिशन हो चुका है, लेकिन काम बिल्कुल नहीं हो रहा है, काम रुका हुआ है. एसआरए के चीफ का काम अच्छा है. सरकार ने उनको सपोर्ट करना चाहिए. उनको आगे बढ़ाना चाहिए. वहां पर बहुत सारे डिसीजन रुके हुए है. सरकार ने जल्द से जल्द निर्णय लेना चाहिए. सरकार सही तरीके से स्लम का सर्वे करना चाहती है, कौनसा लिगल और कौनसा इल्लीगल है, इसके लिए जल्द से जल्द स्टाफ का बंदोबस्त करना चाहिए.

अध्यक्ष महोदय, आज ट्राफिक की बहुत बड़ी समस्या है. गाड़ियों को जाने के लिए जगह ही नहीं रहती है. दक्षिण मुंबई में कोई गाड़ी घुस नहीं सकती. पार्किंग की बहुत बड़ी समस्या है. शाम को यहाँ से मालाड जाना है तो 3.00 घंटे का समय लगता है. सरकार ने इस बारे में गंभीरता से विचार करना चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

---------

....4.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.**: जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक

**मु. शी.** : L. A. BILL NO. XIV OF 2016 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

श्री. एकनाथराव खडसे ( महसूल मंत्री ) : अध्यक्ष/सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 14 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, मी विधेयकातील उद्देश व कारणे सांगणार आहे. महाराष्ट्रातील औद्यागिक विकास जलदगतीने व्हावा, रोजगार निर्मिती व्हावी यासाठी प्रयत्न केला जात आहे. शासनाने वेगवेगळ्या कारणांसाठी वेगवेगळ्या जमिनी दिलेल्या आहेत. भोगवटादार-2 अशा प्रकारच्या जमिनी आहेत. ट्रान्सफर करीत असताना जमिनीतून अनर्जित रक्कम घेतली जाते. लीजच्या जमिनी किंवा अन्य जमिनी या वेगवेगळ्या कारणासाठी आणि वेगवेगळ्या प्रयोजनासाठी दिलेल्या आहेत. जमिनीच्या संदर्भात शर्तभंग झाला म्हणून शासन त्या परत घेऊन दंड लावण्याची कारवाई करणार आहे. जमिनी ज्या प्रयोजनासाठी दिलेल्या आहेत, ते प्रयोजन बदलून देण्यासाठी वारंवार मागणी केली जाते. अशा वेळी राज्याच्या विकासाठी उपलब्ध असलेल्या जमिनींचा उचित वापर जलदगतीने करणे शक्य व्हावे म्हणून कायद्यातील तरतूदीचे सुलभीकरण करणे यासाठी सध्याच्या कूळ कायद्यातील तरतूदी अन्वये विनापरवानगी हस्तांतरणाच्या प्रकरणाच्या शेतजमिनी मोठ्या प्रमाणात विवादात अडकून पडेलेल्या आहेत. तसेच कलम 63 अन्वये खरेदी केलेल्या जमिनीच्या बाबतीत खरेदी परवानगीच्या अटी, शर्तीभंगामुळे आणि पूर्वपरवानगी विषय अटी व शर्तीची पूर्तता न केल्यामुळे मोठ्या प्रमाणावरील जमिनी विवादात अडकून पडलेल्या आहेत. या अडकून पडलेल्या जमिनी विकास प्रक्रियेसाठी उपलब्ध होऊ शकतील.

......5......



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे........

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र कूळ वहिवाट व शेत जमीन अधिनियमाच्या कलम 43चा भंग झाल्यामुळे विवादात अडकलेल्या जमिनीचा व्यवहार खालील नमूद केलेल्या बाबींच्या पूर्ततेनंतर विधीग्राह्य समजण्यात येतील. (1) संबंधित जमीन धारकाने धारण केलेल्या एकूण जमिनीचे क्षेत्र हे जमीन धारणेच्या क्षेत्रापेक्षा आहे, अशा स्वरुपाचे एक विधेयक पूर्वी मांडले होते. आता सदरहू विधेयकाच्या संदर्भात दुसरी सुधारणा आणली जात आहे. कोणत्या प्रवर्गातीन वर्ग-2ची भाडेपट्टयाची जमीन ही वर्ग-1ची करावी याकरिता अधिसूचनेमध्ये तशा स्वरुपाचे प्रयोजन केलेले होते. आता आपण विधेयक क्रमांक 14 मध्ये नव्याने कोणत्या प्रवर्गातील वर्ग-2ची भाडेपट्टयाची जमीन वर्ग-1ची करावी असा निर्णय कोणत्या स्तरावर घ्यावा, त्यासाठी किती अधिमूल्य आकारावे आणि रुपांतरण आकार वसूल करण्यासाठी प्रस्तुत विधेयक पारित झाल्यानंतर शासन सविस्तर नियम करणार आहे. आता प्रत्येक केस मंत्रालयापर्यंत येते असते. मंत्रालयातून काही परवागनी मिळवावी लागते. यासाठी प्रधान सचिव महसूल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्याचा प्रस्ताव आहे. प्रधान सचिव महसूल यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या माध्यमातून सखोल अभ्यास केल्यानंतर जी सुधारणा करावयाची आहे, त्यासंदर्भातील प्रस्ताव राज्य शासनाला दिला जाणार आहे. अशा प्रकारच्या समित्या आपण यापूर्वी नेमलेल्या होत्या. प्रधान सचिव महसूल यांच्या अध्यक्षतेखालील समिती आपल्याला आवश्यक त्या तरतूदी सुचविणार आहेत. समितीने सुचविलेल्या तरतूदीनुसार शासन रुल्स, नियम तयार करणार आहे. अशा नियमांच्या अनुसरुन जमिनी ज्या ज्या टप्प्यावर, जिल्हाधिकारी, आयुक्त, अपीलात असेल तरच मंत्रालात निर्णय घेता येणार आहे. प्रधान सचिव महसूल यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे. गठित समितीला अधिकार देणे आणि रुल्स तयार करण्याचे अधिकार महसूल विभागाला देण्यासाठी विधेयक मांडलेले आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. योगेश सागर )** : सन्माननीय सदस्य सर्वश्री. सुभाष पाटील, धैर्यशील पाटील यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी जे प्रस्ताव दिलेले आहेत ते त्यांनी मांडावेत.

.......6...



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष.......**

(प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.)

आता सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावरील भाषणांस सुरुवात करावी.

......7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे ( कोरगाव ) : अध्यक्ष महोदय, सदरहू विधेयकाच्या अनुषंगाने मी एक ते दोन सूचना करणार आहेत.

अध्यक्ष महोदय, लीजवरील जमिनी अनेक संस्थांना आणि हौसिंग सोसायट्यांना दिलेल्या आहेत. काही ठिकाणीच्या लीजवरील जमिनी लीज संपल्यानंतर दुसऱ्याकडून मागणी केली जाते. परंतु, त्या ठिकाणी वास्तू किवा सोसायटी उभी असते.

अध्यक्ष महोदय, आपण आपल्या मतदारसंघातील सह्याद्री हौसिंग सोसायटीचे नेतृत्व करीत आहात. ही सुध्दा कापड बाजारातील कामगारांना लीजवर दिलेली सोसायटी आहे. लीज संपणार म्हणून संबंधित सोसायटीवर टांगती तलवार असते. मंत्री महोदयांनी सचिवांनी नियमावली केल्यानंतर मंत्रालयात निर्णय घेतला जाणार आहे, असे उत्तर दिलेले असून, ते स्वागतार्ह आहे. ज्या संस्थाचे भोगवटादारा-2 असेल अशा संस्थाचे भोगवटादार-1 करण्यासाठी निर्णय घेतला जाणार आहे. तसेच महसूलाच्या बाबतीत लीज प्रॉपर्टीचा अधिकार संबंधित सोसायटीला देण्यासाठी निर्णय सदरहू विधेयकाच्या माध्यमातून त्यांना मिळणार आहे काय ? जर असा अधिकार त्यांना मिळणार नसेल तर तसा अधिकार देण्यासाठी निर्णय घेणार काय असा माझा प्रश्न आहे.

NN-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे. . . .

35-40 वर्षाची लीज संपल्यानंतर मूळ सहकारी संस्थेला ती जागा हस्तांतरित केल्यानंतर सदरची त्यांच्या मालकीची होईल, अशा रितीने निर्णय घ्यावा, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

------------

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : अध्यक्ष महाराज, 1971 मध्ये माझ्या मतदारसंघातील काही गावांमध्ये भोगवटदार - दोन च्या जमिनी दिल्या गेल्या. जेव्हा धरणे बांधली होती तेव्हा शेतकऱ्यांची भोगवटदार- एकची जमीन घेतली त्याऐवजी सरकारने त्यांना भोगवटदार- दोनच्या जमिनी पुनर्वसनासाठी दिली. 40- 50 वर्षानंतरही शेतकऱ्यांच्या जमिनी भोगवटदार-दोनच्या होत्या. ज्या शेतकऱ्यांना भोगवटदार- दोनच्या जमिनी दिल्या होत्या, त्यातील काही लोक मृत्यू पावले आहेत . अशा परिस्थितीत भोगवटदार- दोनच्या जमिनी त्यांच्या मुलाला, नातवाला विक्री करणे शक्य होत नाही. ज्यांची जमीन धरणाच्या बॅक वॉटरमध्ये गेली म्हणून शासनाने त्यांना दुसरी जमीन दिली . सन्माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात त्यावेळी महसूल मंत्री होते. भोगवटदार- दोनच्या जमिनी भोगवटदार- एक मध्ये वर्ग मध्ये करण्यासंदर्भात आदेश काढले. त्या शेतकऱ्यांनी भोगवटामूल्य भरुनही भोगवटदार- एक मध्ये त्या जमिनी कन्व्हर्ट केल्या नाहीत, त्यामुळे शेतकऱ्यांना मनःस्ताप होत आहे. माझ्या मतदारसंघातील सावंगा विठोबा आता त्या गावाचे नाव नया सावंगा झालेले आहे. या गावातील भोगवटदार- दोनच्या जमिनी भोगवटदार-एक मध्ये कन्व्हर्ट करण्यासंदर्भात मंत्री महोदयांनी स्पष्ट खुलासा केला तर बरे होईल. एवढे बोलून मी माझे भाषण पुरे करतो.

--------------

......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील (इस्लामपूर): अध्यक्ष महाराज, माननीय महसूल मंत्र्यांनी जमीन महसूल संहिता 1996 मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक या सभागृहात चर्चेला आणलेले आहे. भोगवटदार- एकच्या जमिनी भोगवटदार- एक मध्ये कन्व्हर्ट करण्यासंबंधी विनाविलंब कोणत्याही अडथळयाशिवाय जलद आणि सुलभ अशी लोकांची सेवा करण्याचा मानस या विधेयकाद्वारे महसूल मंत्री महोदयांचा स्पष्ट दिसतो आहे. वरकरणी पाहता ही सुधारणा फार चांगली आहे. ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी भोगवटदार-2 मधून भोगवटदार-एक मध्ये करीत असताना अनेक प्रश्न उपस्थित केले जातात. ती हाताळण्याची प्रक्रिया या विधेयकाद्वारे सुलभ होईल यात शंका नाही. सरकारने शेतकऱ्यांकडे बघून हे विधेयक आणले आहे. काही उद्योगाच्या सुलभीकरणासाठी हे विधेयक आणलेले आहे काय, याबाबत मंत्री महोदयांनी स्पष्ट खुलासा केलेला नाही. या विधेयकाची कारणे व उद्देश वाचले तर या विधेयकाचा उद्देश आपल्या लक्षात येऊ शकतो.

अध्यक्ष महाराज, यापूर्वी सरकारने अनेक उद्योगांना जमिनी दिलेल्या आहेत, उद्योगांना त्यांचा उद्देश बदलण्याची इच्छा असेल तर या विधेयकाद्वारे मोकळिक मिळणार आहे. गेल्या तीस वर्षाचा मुंबईचा इतिहास पाहिला तर या मुंबईमध्ये अनेक उद्योग असे आहेत की, ज्या उद्योगांनी आपली जमीन डेव्हलप केलेली आहे. कमिर्शियल रेटने त्या उद्योगांना बाहेर जाण्यासाठी परस्पर परवानगी मिळत गेली. कदाचित माझे चुकत असेल, परंतु मला शंका आहे की, एखाद्या उद्योगाला सरकारने 30 वर्षासाठी जमीन दिली असेल तर त्याचा ठिकाणी उद्देश बदलण्याची संधी या विधेयकातून त्यांना मिळणार आहे. त्या जमिनी आता अधिक किंमती झालेल्या असल्यामुळे त्या जमिनीवर विकासकाचे चेहरे आता दिसायला लागतील. तेथून उद्योग बाहेर जाईल. अशा एक दोन कंपन्या आहेत. यामध्ये बॉम्बे डाईंग आणि दुसरी एल ॲण्ट टी या कंपन्यांनी बृहन्मुंबईतील जमीन विकली आणि आपले मॅन्युफॅक्चरिंग ॲक्टिव्हिटी गुजरात राज्यातील वाफी येथे शिफ्ट केले. आपल्या राज्यात बेरोजगारांच्या हाताला काम देण्यासाठी . . . (अडथळा). . . सन्माननीय मंत्री श्री.गिरीश बापट बसून सन्माननीय सदस्या श्रीमती मिसाळ ताईंशी बोलत आहेत. माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी बसून कॉमेंट करणे हे असंसदीय आहे., अध्यक्ष महाराज, हे आपण त्यांना ताबडतोब कळवावे . . . (अडथळा). . .

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महाराज, मी सन्माननीय सदस्यांशी काहीही बोललो नाही. मी सन्माननीय सदस्या श्रीमती मिसाळ ताईंना एवढेच म्हणालो की, आपण जरा थांबा. पुण्याला आपण बरोबर जाऊ. यात काही गैर असेल तर माहित नाही. यामध्ये सभागृह कोठेही डिस्टर्ब झालेले नाही. हे विधेयक अधिकाधिक लांबवून विधेयक डिस्टर्ब करण्याचा सन्माननीय सदस्यांचा हेतू नसेल असे मला वाटते. म्हणून सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावर बोलायला सुरुवात करावी.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, मला असे ऐकू आले की, हा बाबा कधी बसेल त्यानंतर तुम्ही पुण्याला जावा. . . . .(अडथळा) . . . ताई नाही म्हणत नाहीत याचा अर्थ खरे आहे ते. मला या विधेयकासंदर्भात एक शंका आहे . मी विधेयक लांबविण्यासाठी या ठिकाणी उभा नाही. मला थोड्या वेळापूर्वी सचिवांमार्फत माहिती दिली, त्यामध्ये तसा उद्देश दिसत नाही . मुंबई, पुणे, नाशिक या शहरांमधील उद्योग शहराच्या मध्यभागी आलेले आहेत तर काही शहराच्या जवळ आलेले आहेत. उद्योगांना वेगवेगळ्या कारणांसाठी ज्या जमिनी दिलेल्या आहेत, त्याची काळजी शासन कसे घेईल, अशी मला शंका आहे. मला खात्री आहे की, मंत्रीमहोदय यांचे स्पष्टीकरण देतील. यासदंर्भात आपण सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमणार आहात. कोणत्याही जमिनीचा निर्णय घेण्यापूर्वी सचिवांची समिती जे रुल्स तयार करेल, ते रुल्स जे सन्माननीय सदस्य या विधेयकावर बोलतील, त्यांच्या ई मेलवर आपण पाठवावेत त्यामुळे आम्हाला कळेल की, नेमके काय रुल्स केलेत. त्यातून पारदर्शीपणाचा उद्देश देखील पूर्ण होईल, असा मला विश्वास आहे .

अध्यक्ष महाराज, माझे तीन मुद्दे आहेत. या विधेयकातील सुधारणा करण्यासंदर्भात सचिवांची समिती गठित झाल्यानंतर ती समिती रुल्स तयार करील. मंत्री महोदय श्री.खडसे साहेब तसे करणार नाहीत, परंतु शेवटी लोक भेटायला येत असतात त्यामुळे काही बदल होत असतात. कोणत्या जमिनी मोकळ्या ठेवायच्या आणि कोणत्या भोगवटदार- दोन मधून भोगवटदार- एक मध्ये कन्व्हर्ट करण्यासाठी संमती द्यावयाची, याबाबतचा निर्णय समिती घेणार आहे.

यानंतर OO-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील .....

परवा माननीय श्री. एकनाथराव खडसे यांनी मला खाजगीत थोडीशी माहिती दिली. आज मी सचिवांकडून देखील माहिती घेण्याचा प्रयत्न केला. सध्या तरी उद्देश चांगला दिसत आहे. परंतु, या उद्देशाने कोणत्याही प्रकारे उद्योजक, धनिक आणि या राज्यात नव्याने गुंतवणूक करण्यास येणाऱ्यांच्या ताब्यात आपल्या राज्य सरकारच्या जमिनी जाऊ नयेत. आपण आपल्या सरकारच्या मालकीच्या ज्या जमिनी वेगवेगळ्या कारणांनी जनतेला दिलेल्या आहेत, त्या जमिनी आपण त्यांच्या नावावर सहजरित्या काही प्रिमियम घेऊन करणार आहोत. त्यामुळे आपल्या महाराष्ट्र सरकारच्या ताब्यातील जमिनींची संख्या किंवा एरिया कमी करण्याचा धाडसी निर्णय आपण घेत आहात. एका बाजूला आपण लोकहिताची भूमिका मांडत आहात. परंतु, त्यातून राज्याचे कोठेही अहित होणार नाही याची काळजी मंत्री महोदय या बिलातून घेतील, अशी अपेक्षा व्यक्त करतो व माझे लांबलेले भाषण पूर्ण करतो.

..............

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हर्षवर्धन सपकाळ ( बुलढाणा ) : अध्यक्ष महोदय, हा मुद्दा या ठिकाणी लागू आहे की, गैरलागू आहे हे माननीय श्री. एकनाथराव खडसे यांनी जरूर पहावे. ज्या आदिवासींच्या जमिनी आहेत त्या देखील वर्ग-2 प्रमाणेच असतात. परंपरेने आदिवासी जी जमीन कसतो, ती कोणालाही विकता येत नाही. तिला वर्ग-1 चा दर्जा नाही, ही बाब योग्य आहे, मात्र एखादा आदिवासी कास्तकार असेल आणि त्याने ती जमीन खुल्या प्रवर्गातील किंवा इतर माणसांकडून विकत घेतली असेल व इतर माणसाकडून विकत घेतलेली ही जमीन जर त्याला परत विकायची असेल तर, या संदर्भात शासनाची सुस्पष्टता आढळून येत नाही. या संदर्भात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या स्वरूपाचे निकष व वहिवाट आढळून येते. आदिवासींनी ही जमीन खुल्या प्रवर्गातील किंवा इतर माणसांकडून घेतली असेल व नंतर त्याला ती विकायची असेल तर, याबाबीचाही खुलासा किंवा स्पष्टता नियमात आढळून येत नाही. त्यामुळे या जमिनीचे व्यवहार होताना फार मोठा गोंधळ होतो. ही समिती गठित करीत असताना आदिवासीने ती जमीन इतर माणसांकडून विकत घेतली असल्यास, ती जमीन कोणत्या प्रवर्गात ट्रिट करावी, याचाही निर्णय सदरच्या समितीत करता आला तर, अधिक चांगले होईल, अशी सूचना मी या निमित्ताने करतो.

...........

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी ./ मु.शी. :** कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे

श्री. गिरीश बापट (संसदीय कार्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

अध्यक्ष महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या आज गुरुवार, दिनांक 7 एप्रिल, 2016 रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी 3.00 वाजता भरलेल्या बैठकीमध्ये विचारविनिमय करुन शुक्रवार दिनांक 8 एप्रिल, 2016 ते बुधवार, दिनांक 13 एप्रिल, 2016 पर्यंतचा विधानसभेच्या कामकाजाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे.

( प्रेस : येथे कार्यक्रम छापावा. )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--------

..5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.**: जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. XIV OF 2016 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

( चर्चा पुढे सुरु....

श्री. अतुल भातखळकर ( कांदिवली पूर्व ) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम 29 मध्ये काही सुधारणा सुचविणाऱ्या विधेयकावर बोलण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचे महसूल मंत्री व आमचे जेष्ठ नेते माननीय श्री. एकनाथराव खडसे यांनी गेल्या 15-17 महिन्यांच्या कालखंडामध्ये या खात्याच्या संदर्भात क्रांतिकारी व जनहिताचे असे अनेक निर्णय घेतलेले आहेत. अशा अनेक चांगल्या निर्णयांच्या मार्गातील हा एक अधिक चांगला निर्णय आहे, त्यामुळे मी या विधेयकाचे स्वागत करण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, शासकीय जमिनी या महाराष्ट्रामध्ये, मुंबई शहरामध्ये अनेकांना अनेक कारणाकरिता दिलेल्या आहेत. ज्या मुद्याचा उल्लेख सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. जयंत पाटील यांनी केला, ती वस्तुस्थिती आहे. परंतु, त्याच बरोबर अशाप्रकारच्या जमिनी या अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांना काही ठिकाणी 1950, 1960 साली अनेक जणांना आपापली घरे बांधण्याकरिता दिलेल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला तर या राज्यात हजारो नाही तर लाखो लोक अशाप्रकारच्या शासकीय जमिनीवर बांधलेल्या गृहसंकुलांमध्ये राहत आहेत. हा जो पूर्वीचा कायदा आहे या कायद्यामुळे त्यांच्याकरिता या सर्व गोष्टीसाठी खूप संकटे उभी राहतात. सोसायटी रिडेव्हलप करावयाची असेल किंवा सोसायटीत एखाद्याला फ्लॅट विकत घ्यायचा असेल तर त्याला कलेक्टरची परमिशन लागते. अनेक ठिकाणी सरकारी कार्यालयांमध्ये खेटे घालावे लागतात आणि मग जो सहज, साधा, सोपा, सरळ व्यवहार असला पाहिजे तो साधा, सरळ, सोपा, व्यवहार न राहता त्याकरिता सुद्धा शासनाच्या दरबारी जाऊन त्याला अनेक ठिकाणी अनेक गोष्टींची करामत दाखववी लागते, त्यानंतरच त्याचे सदनिका घेण्याचे जे एक स्वप्न असते ते पार पडले जाते.

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अतुल भातखळकर .....

मुंबई शहरातही अशी अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे वर्ग-ब च्या जमिनी वर्ग-अ मध्ये आणण्याचा अत्यंत स्तुत्य अशाप्रकारचा कायदा या ठिकाणी आणला आहे, याकरिता मी या कायद्याचे स्वागत करतो. परंतु, ही वस्तुस्थिती आहे की, औद्योगिक कामाकरिता जमिनी दिल्या, त्याचा निर्णय सचिवस्तरावरची समिती करेल की, कुठल्या जमिनी करायच्या, कुठल्या जमिनी करायच्या नाहीत.

अध्यक्ष महोदय, या विधेयकावर बोलत असताना माननीय महसूल मंत्र्यांना आपल्या माध्यमातून माझी विनंती आहे की, ज्या ठिकाणी सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत किंवा 30-40 वर्षापासून कोणी बंगला बांधला आहे, ज्यामध्ये 2-3 लोक भाडेतत्त्वावर राहत आहेत, अशा ठिकाणी मात्र सहजतेने त्या त्या जमिनी 'अ' वर्गात आणण्याची प्रोसीजर केली पाहिजे.

माझ्या माहितीप्रमाणे या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात एक याचिका देखील दाखल झालेली आहे, त्यामध्ये असेही म्हटले गेले आहे की, आम्ही या संदर्भात 600 टक्क्यांपर्यंत प्रिमियम घेणार. या लोकांकडून 600 टक्के प्रिमियम घेतला, तर कोठलीच गोष्ट रिडेव्हलपमेंट होणार नाही. त्यामुळे मला असे वाटते की, हा निर्णय झाल्यानंतर, कायद्यात हा बदल झाल्यानंतर, ही निर्णय करणारी जी समिती असेल त्यांनी त्या जमिनीचा वापर कशाकरिता केला जात आहे, याची नीट विभागणी करुनच त्या संदर्भातील निर्णय केला पाहिजे.

या मुंबई शहरामध्ये, महाराष्ट्रामध्ये सर्वसामान्य, मध्यमवर्गीय लोक जे अशा पद्धतीच्या भाडेपट्टयाच्या किंवा मालकीच्या जमिनीवर जरी राहत असले तरी मूळ जमीन कलेक्टरने दिली आहे, त्यामुळे सदनिका हस्तांतरित करायची असेल तरी, कलेक्टरची परमिशन लागते, अशाप्रकारचे नियम आहेत. त्यामुळे अशा सोसायट्यातील लोकसुध्दा ही जमीन एकदाची आपल्या नावावर करण्याकरिता खूप मोठ्या प्रमाणावर उत्सुक आहेत. त्या जागेचा अन्य कामासाठी वापर करण्यासही ते उत्सुक असतात. या सर्व बाबींचा विचार करीत असताना, या सर्वसामान्य लोकांचा विचार करुन या संदर्भातील निर्णय करावेत, एवढेच या विधेयकाच्या निमित्ताने मी सुचवितो व पुन्हा एकदा या विधेयकाचे स्वागत करतो, महसूल मंत्री महोदयांना खूप खूप धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द समाप्त करतो.

..........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अमिन पटेल (मुंबादेवी) : अध्यक्ष महोदय, मी सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 14 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) या विधेयकावर माझे मत मांडण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, इस बिल की दो चीजों पर ध्यान देने की बहुत आवश्यकता है. स्पेसिफिक कैटेगरी को हम चेंज करने जा रहे है. जहां अर्बनाईजेशन हो गया है, एग्रीकल्चरल लैंड है उसको कन्वर्ट करने का परमिशन दिया जा रहा है. दूसरी तरफ स्कूल, हॉस्पिटल के लिए रिजर्वेशन वैसा ही रखने की बात है. इसके रूल्स बाद में बनेंगे. विधेयक में चेंज करने जा रहे है. रूल्स का पूरा पॉवर रेवेन्यू सेक्रेटरी को दिया गया है. इसका प्रिमीयर चार्ज बाद में कितना होने वाला है ? उस पर कंट्रोल होना बहुत जरूरी है. ऐसा प्रिमीयम न हों कि कुछ लोगों को फायदा करने के लिए प्रिमीयम कम रखा जाए. कुछ लोगों को फायदा न करने के लिए प्रिमीयम ज्यादा रखा जाए. रूल्स बनाते वक्त इस बारे में ध्यान रखना बहुत जरूरी है. कल ऐसा न हो कि स्पेसिफिक लोगों को फायदा करने के लिए रूल्स में प्रावधान हो जाए. इसलिए मेरी विनती है कि जब इसके रूल्स बनाए जाएंगे तो सामान्य लोगों को ध्यान में रखते हुए रूल्स बनाए जाए, उसके प्रिमीयम निश्चित किए जाए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

............



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित देशमुख (लातूर शहर) : अध्यक्ष महोदय, मी या बिलासंदर्भात मंत्री महोदयांना दोन, तीनच प्रश्न विचारणार आहे. महाराष्ट्र शासनाने या नवीन बिलाद्वारे सदरहू धोरण आणण्याचे ठरविले आहे. राज्यामध्ये अनेक निमशासकीय संस्था आहेत. त्यामध्ये महानगरपालिका, औद्योगिक वसाहती, पोर्ट ट्रस्ट इत्यादी अनेक संस्थांच्या ठिकाणी भाडेपट्टयाने जमिनी दिलेल्या आहेत. या बिलाचा त्यावर काय परिणाम होणार आहे. यामुळे शासनाला महसूल वाढीमध्ये काही उपयोग होणार आहे काय आणि सर्वसामान्यांना काय दिलासा मिळणार आहे, यावर मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण करावे, अशी मी विनंती करतो.

-----

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी सर्वप्रथम एक बाब स्पष्ट करु इच्छितो. आपल्या राज्यामध्ये शासकीय जमिनी विविध व्यक्ती व संस्थांना दिलेल्या आहेत. त्यामध्ये काही कब्जा हक्काने तर काही भाडेपट्ट्याने दिलेल्या आहेत. साधारणतः राज्यामध्ये कब्जाहक्काने 1 लाख 4 हजार 394 भूखंड दिलेले आहेत. मग ते 100 एकर, 25 एकर असे भूखंड असू शकतील. तसेच 9 हजार 628 भूखंड भाडेपट्ट्याने दिलेले आहेत. म्हणजेच एकंदरीत 1 लाख 14 हजार 22 भूखंड कब्जाहक्काने व भाडेपट्ट्याने दिलेले आहेत. मी स्पष्ट करु इच्छितो की, यामध्ये नेमल्या जाणाऱ्या सचिवांना आपण अधिकार देत नाही. आपल्याकडे जमिनीचे विविध प्रकार असून ते कब्जाहक्क दोनचे आहेत. सन्माननीय सदस्य प्रा. विरेंद्र जगताप यांनी सांगितले की, पुनर्वसनाच्या जमिनीमध्ये जमिनीच्या ऐवजी जमीन दिली जाते. तो प्रकल्पग्रस्त असतो. त्याची वर्ग-1 ची जमीन घेतली जाते. परंतु त्याला वर्ग-2 ची जमीन दिली जाते. हा त्याच्यावर अन्याय आहे. म्हणजे प्रकल्पग्रस्तांच्या ज्या ज्या ठिकाणी वर्ग-2 च्या जमिनी केल्या असतील, म्हणजे आतापर्यंत त्या दिलेल्याच आहेत. ह्या सर्व वर्ग-2 च्या जमिनी वर्ग-1 च्या करण्याची गरज आहे. कारण त्याची मालकी आहे, त्याचा तो अधिकार आहे, त्याचा तो हक्क आहे. परंतु त्याच्यावर तो अन्याय झाल्यासारखे होते. तसेच आपल्याकडे भोगवटादार वर्ग-2 म्हणून ज्या जमिनी दिल्या जातात, तसेच सेझ जमीनधारक म्हणजेच युएलसी ॲक्टच्या नंतरच्या जमिनी म्हणजेच हार्बर लॅण्ड सिलींगच्या बाहेर ज्या जमिनी जमा झाल्या त्या जमिनी. काही सिलींग ॲक्ट आल्यानंतर त्याच्या बाहेरील जमिनी, अतिरिक्त ठरलेल्या जमिनी. तसेच आपण मघाशी म्हणालात की, काही जमिनी उद्योगांसाठी देखील आहेत. काही उद्योगांनाही आपण दोन, तीन प्रकारच्या जमिनी देतो. उद्योजक उद्योग उभा करीत असताना तो स्वतःच्या पैशाने जमिनी विकत घेतो, परंतु त्यासाठी तो भूसंपादन कायद्याचा आधार घेतो. मला ही जमीन संपादन करुन द्यावी, मी त्याचा योग्य मोबदला देतो, अशी सरकारकडे येऊन मागणी करतो. अशा जमिनी त्याच्याच मालकीच्या आहेत, त्याच्याच पैशाने घेतलेल्या आहेत, परंतु त्यामध्ये आपल्या कायद्याचा वापर केलेला आहे. म्हणून अशा संदर्भात राज्य सरकारच्या परवानगीशिवाय त्याला त्या जमिनी विकता येत नाही किंवा रुपांतरीत करता येत नाही अशा जमिनी. तसेच या ठिकाणी सहकारी गृहनिर्माण संस्थेचा विषय उपस्थित झाला. सहकारी गृहनिर्माण संस्थेला देखील जमिनी दिलेल्या आहेत. काही सहकारी संस्थाना जमिनी 30

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे.....

वर्षाकरिता, तर काहींना 49 वर्षाकरिता तर काहींना दिर्घ मुदतीकरिता दिलेल्या आहेत. या जमिनीवर त्यांनी सहकारी गृहनिर्माण संस्था उभ्या केल्या. त्या उभ्या करीत असताना आज अशी परिस्थिती आहे की, त्या ठिकाणी 100 लोकांचे फ्लॅट्स आहेत, 50 लोकांचे बंगले आहेत. त्या सरकारी जमिनी त्यांना घराच्या वापराकरिता दिलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना ज्या ज्या वेळेस हस्तांतरण करावे लागते, ज्या ज्या वेळेस देखभाल दुरुस्ती करावी लागते, त्या वेळी त्यांना सरकारची परवानगी घ्यावी लागते. हस्तांतरण करायचे असेल तर त्यांना राज्य सरकारला विशिष्ट निधी द्यावा लागतो. म्हणून यासंदर्भात अशा स्वरुपाची मागणी बऱ्याच ठिकाणाहून आली. सन्माननीय सदस्य श्री. अतूल भातखळकर यांनी तीन, चार वेळेस अशा सहकारी गृहनिर्माण संस्थांकरिता विरोधी पक्षात असताना सुद्धा मागणी केली होती आणि आताही मागणी केलेली आहे. तसेच त्यांनीच नव्हेतर अनेक सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली आहे. नाहीतरी ह्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जमिनी सरकारला परत येणारच नाही. आपल्याला त्या परत घेताच येणार नाही. घ्यायच्या जरी ठरविल्या तरी एवढ्या मोठ्या इमारती ताब्यात घेणे किंवा पाडणे आणि त्यांना बेघर करणे शक्य नाही. या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जमिनी आपण परत घेऊ शकत नाही, अशी परिस्थिती आहे. मी मघाशी वरळी येथील हौसिंग सोसायटीचे उदाहरण दिले होते. तेथे आमदारांसाठीच फ्लॅट विकत घेत असताना वर्षाचा कालावधी लागतो. मंत्रालय, जिल्हाधिकारी इत्यांदी ठिकाणी परवानगीची आवश्यकता भासते. यासंदर्भात माझ्यावर काही सन्माननीय सदस्य हे काय चालले आहे, असे म्हणून संतापले. परंतु तो कायदा आहे. अशा स्वरुपाच्या हौसिंग सोसायटीच्या जागा देखील त्या हौसिंग सोसायटीच्या नावाने लावण्याचा या समितीच्या माध्यमातून विचार करणार आहोत. त्या संदर्भात काय निर्णय घ्यावा, वेगवेगळ्या जमिनीसंदर्भात किती अनर्जित रक्कम घ्यावी. यासंदर्भात समिती शिफारस करेल. एनएकरिता 75 टक्के रक्कम घेतली जाते. नॉन एनए असेल तर 50 टक्के घेतली जाते किंवा तो अधिकार सरकारला एक रुपयाने द्यायचा. अशा संदर्भात किती रक्कम घ्यावी, याकरिता समिती केलेली आहे. परंतु अशा गृहनिर्माण संस्थांनी मागणी केली तर ती जमीन त्याच्या मालकीची देणे, त्या जमिनीमध्ये त्यांचा एफएसआय किंवा टीडीआर जे त्यांना उचित असेल, जे शिल्लक असेल कायद्याने बसत असेल ते 100 टक्के अधिकार त्या संस्थेला त्या ठिकाणी प्राप्त होतील अशा संदर्भात. दुसरी बाब अशी की, यामध्ये

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे.....

वर्ग-2 ने प्रदान केलेल्या सदनीका, भूखंड हस्तांतरण करण्यासाठी व प्रत्येक हस्तांतरणाच्या वेळेस आपल्याला अनर्जित फी भरावी लागते. ती जमिनच त्यांच्या मालकीची केली, तर संस्थेला अधिकार येतात. त्यांनी कोणाला द्यायची, कशा पद्धतीने दुरुस्ती करायची आहे, कशा रितीने वापरायची आहे याचा त्यांना अधिकार येईल. परंतु आज तसे नसल्यामुळे त्यांचा सरकारकडे येऊन कालापव्यय होतो. त्यांना नेहमी मंत्र्यांकडेच यावे लागते. महसूल खात्यामध्ये पूर्वी पासूनची परंपरा आहे की, काहीही असले तरी, अधिकार खाली असला तरी अंतिम अधिकार त्या मंत्र्यांना आहेत. परंतु आता मंत्रिपातळीवर आल्यापेक्षा सदनिका वगैरे हस्तांतरण करण्याचे अधिकार पूर्णतः जिल्हाधिकारी यांना दिले जाणार आहे, त्यामुळे येथे येण्याची गरज पडणार नाही. त्याबाबत जिल्हाधिकारी आवश्यक तो निर्णय घेऊ शकेल. तसेच जिल्हाधिकारी यांनी कोणत्या पद्धतीने द्यावे, या संदर्भातील शिफारस म्हणजेच किती पैसे भरायचे, कसे द्यायचे इत्यादीबाबतची शिफारस समिती करेल. हस्तांतरासाठी आपल्याकडे अनेक व्यक्ती तयार आहेत. परवानगीच्या प्रतिक्षेत आहेत. आमच्याकडे अनेक लोक असे आहेत की, ही जमीन आमच्या मालकीची करुन द्या, ही आम्हाला 99 वर्षाच्या कराराने दिलेली आहे, आज तिला 50 वर्षे झालेले आहेत, 49 वर्षे राहिलेली आहेत. अशी जमीन संबंधितास स्वतःच्या मालकीची करुन हवी आहे. आपल्याला माहीत आहे की, ही जमीन आपण 99 वर्षाच्या आत घेऊ शकत नाही. परंतु त्याला अशी अडचण होते की, त्याला काहीही फेरबदल करायचा असला तर प्रत्येक फेरबदल करण्यासाठी सरकारकडे यावे लागते. कोणताही फेरबदल करायचा असला की, पैसे भरावे लागतात. अशा जमिनी मालकीच्या करुन द्याव्यात, असे म्हटले तर अशा जमिनी राज्य सरकार त्यांच्या मालकीच्या करुन देईल. त्यासाठी आवश्यक तो किती निधी घ्यायचा, म्हणजेच कायद्याच्या चौकटीत राहून आवश्यक किती पैसा घ्यावा, हे ठरलेले आहे. अनर्जित रक्कम कशी घ्यावी, एनएसाठी किती घ्यावी, शहरी भागात किती घ्यावी, ग्रामीण भागात किती घ्यावी, रेडीरेकनरच्या दरात भाव असतात, त्यानुसार या जमिनीच्या संदर्भात कार्यपद्धतीचे सुलभीकरण झाले पाहीजे, अशा स्वरुपाचे या कायद्यामध्ये करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, आपण या ठिकाणी औद्योगिक प्रयोजनासाठी असे म्हटले आहे. राज्यात औद्योगिक व आर्थिक विकास जलद गतीने व्हावा, तसेच यातून रोजगाराची निर्मिती होऊन शासनाच्या उत्पन्नातही वाढ व्हावी. यासाठी पारदर्शकता, प्रशासकीय गतीमानता व उद्योग सुगमता

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे.....

Ease of doing business. या उद्देशाने भोगवटादार वर्ग-2 किंवा सरकारी पट्टेदार म्हणून घोषित केलेल्या जमिनीचा धारणाधिकार हा भोगवटादार वर्ग-1 करण्याच्या संदर्भात यामध्ये सुलभ होऊ शकेल. उद्योजकांना शेकडो एकर जमिनी लागतात.

...QQ/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे......

त्या जमिनी सलग असाव्यात, अशी त्यांची अपेक्षा असते. अशा वेळी काही जमिनी या कुळ कायद्यातील, इनामी, खाजगी व्यक्तींच्या किंवा एखाद्या प्रयोजनासाठी राखीव ठेवलेल्या जागा अशा प्रकारच्या असतात. यासर्व जागांची सोडवणूक करण्यामध्ये उद्योजकाची कित्येक वर्षे निघून जातात. उद्योजकाला तातडीने जमीन मिळाली तर तो तातडीने उद्योग उभा करतो. अनेक वेळा कुळ कायदा, आदिवासी जमीन यांच्या खरेदी प्रकरणी खूप विलंब लागतो. यामध्ये सुलभिकरणास चालना देणे आवश्यक आहे. जसेकी; पुनर्वसनाच्या जमिनी भोगवटादार - वर्ग 1 रुपांतरीत करण्यासंदर्भात मी यापूर्वी सांगितले आहे. अशा स्वरुपाच्या राज्य सरकारने भाडे तत्वावर किंवा भोगवट्याने दिलेल्या जमिनी - वर्ग 1 करण्यासंदर्भात परवानगी देण्यात येईल. बऱ्याचशा जमिनी अशा प्रकारच्या कार्यपध्दतीमध्ये अडकलेल्या असल्याने त्यासंदर्भातील अनेक केसेस मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहेत.

अध्यक्ष महोदय, मी आदिवासींच्या संदर्भात मी उल्लेख केला होता. या कायद्यामध्ये आदिवासींचा उल्लेख नाही. आदिवासींच्या जमिनी संदर्भात वेगळे कायदे व नियम आहेत. आदिवासींने आदिवासींना जमीन विकण्याच्या संदर्भात परवानगी आहे. परंतु आदिवासींची जमीन बिगर आदिवासींना देण्याच्या संदर्भात विशिष्ट प्रणाली आहे. आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना विकण्याकरिता शक्यतो परवानगी देण्यात येत नाही. परंतु त्यासंदर्भात अशा प्रकारच्या जमिनी विक्री करण्याची आवश्यकता असेल, त्यासंदर्भात माननीय न्यायालयाचे आदेश असतील तर त्या जमिनी विक्री करण्यासाठी परवानगी देण्यात येते. आदिवासींच्या जमिनी उद्योजकांना विक्री करावयाच्या असतील व आदिवासी स्वत:हून त्यांची जमिनी उद्योजकास विकण्याकरिता तयार असेल तर त्या जमिनीच्या खरेदी-विक्रीमध्ये सुलभता यावी याकरिता कोणते नियम असावे यासंदर्भातील नियम हे गठीत करण्यात येणारी समिती सूचवणार आहे.

अध्यक्ष महोदय, कृषी व अकृषीक प्रयोजन - वर्ग 2 च्या जमिनीच्या संदर्भात भोगवटादार - वर्ग 1 च्या जमिनी, भोगवटादार - वर्ग 2 च्या जमिनी, सरकारी पट्टेदार जमिनी व त्यासह अनेक जमिनी राज्यात भोगवटादार - वर्ग 2 सदरी आहेत. काही जमिनी भोगवटादार - वर्ग 3 च्या जमिनी आहेत, काही गायरान जमिनी आहेत. गायरान जमिनीच्या संदर्भात माननीय सर्वोच्च



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे......

न्यायालयाने निर्णय दिलेला आहे, त्यामुळे त्यासंदर्भात काही निर्णय घेता येणार नाही. परंतु भोगवटादार - वर्ग 2 च्या जमिनीमध्ये अनेक प्रकार असून त्यामध्ये इनामी जमिनींचाही समावेश आहे. इनामी जमिनीचे जवळपास 50 ते 60 प्रकार असून त्यामध्ये देशमुख इनाम, पाटील इनाम अशा प्रकारच्या इनामी जमिनींचा समावेश आहे. तसेच, मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणात मदतमास जमिनी, खिदमतमास जमिनी आहेत. खिदमतमास जमिनी या अल्पसंख्यास समाजातील मुस्लीम समाजाच्या आहेत. अशा प्रकारच्या जमिनींच्या संदर्भात वेगवेगळे नियम आज अस्तित्वात आहेत. या जमिनींचे एकत्रिकरण करुन या जमिनी त्या-त्या क्षेत्रात सुलभीकरणाने योग्य मोबदला किंवा मालकाच्या सदरी त्याचे नाव लावण्याकरिता भोगवटा - वर्ग 1 मध्ये घेतल्या तर त्यांची मालकी होऊ शकते. अशा प्रकारे मालकी हक्क द्यावयाच्या राज्यात किती तरी जमिनी आहेत व त्या आपण मालकी हक्काने देऊ शकतो. अनर्जित रक्कम लावण्यासंदर्भात कोणत्या जमिनीच्या संदर्भात कोणत्या प्रकारचे नियम करावयाचे ते ठरविण्यात येईल. शासनाला यामधून किती फायदा होऊ शकतो, हे मी यापूर्वी सांगितले आहे. यासर्व जमिनी रुपांतरीत केल्या तर बाजार मुल्याच्या 50 टक्के किंवा 75 टक्के यापैकी समिती जो दर ठरवेल त्या दराने अशा स्वरुपाच्या जमिनीच्या माध्यमातून राज्य सरकारला 40 ते 50 हजार कोटी रुपये उपलब्ध होऊ शकतील. याप्रकरणी मोठ्या प्रमाणात लोकांची मागणी असून सदरील जमिनी त्यांच्या ताब्यात आहेत. अशा शेकडो प्रकारच्या जमिनी आहेत, त्यामधील उप गट, त्यावर ज्याची मालकी आहे, त्यामध्ये कूळ आहे, अशा जमिनी आहेत. कूळ जमिनींच्या बाबतीत काही प्रकरणी मालक मी आहे परंतु कूळ दुसरा लागला आहे, काही प्रकरणी मालक मी आहे परंतु भाडेपट्ट्याने दुसऱ्याकडे आहे, काही प्रकरणी मालक मी आहे परंतु कराराने दुसऱ्याला दिलेली आहे, असे आहे. अशा किती तरी प्रकारच्या जमिनी राज्यात आहेत. यासर्व जमिनींच्या संदर्भात अभ्यास करुन त्यासंदर्भात समिती शिफारस करेल, त्याकरिता त्यासंदर्भातील निर्णय आज सरकार घेणार आहे. आवश्यकतेनुसार, मागणीनुसार भोगवटादार - वर्ग 2 च्या जमिनी भोगवटादार - वर्ग 1 करता येतील. सरकार सरसकट यासंदर्भात निर्णय करु शकत नाही. याप्रकरणी नियम करण्याकरिता समिती नियुक्त करुन समितीने

...3

श्री.एकनाथराव खडसे......

केलेल्या शिफारशीमधील कोणत्या शिफारशी स्वीकारावयाच्या, कोणत्या शिफारशीमध्ये सुधारणा करावयाची यासंदर्भातील निर्णय मंत्रिमंडळाच्या माध्यमातून घेण्यात येईल. यामुळे राज्यातील अशा जमिनींच्या प्रकरणीची प्रक्रिया सुलभ होईल. लोकांना अशा प्रकारच्या जमिनी संदर्भात मंत्रालयामध्ये नेहमी यावे लागते, त्यांची प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याने त्यांचा वेळ जातो, पैसा जातो.

अध्यक्ष महोदय, मागच्या आठवड्यामध्ये 30-35 वर्षे ज्या जमिनींचे दावे सुरु आहेत त्यासंदर्भात विधेयक मांडण्यात आले होते. महसूल खात्यामध्ये एखाद्या व्यक्तीने जमिनीचा दावा दाखल केला की त्याचा वकील निश्चिंत राहतो. हा दावा दोघांच्याही नातवापर्यंत चालत राहतो. त्यामुळे महसूल खात्याच्या अख्त्यारीतील दिवाणी दाव्यांचा निकाल एका वर्षाच्या आत त्या-त्या स्टेजवर लावण्याचा कायदा या सरकारने केला आहे. अशा दाव्यांचा निकाल लावण्याप्रकरणी विशिष्ट परिस्थितीत फार तर 6 महिन्यांची मुदवाढ देता येईल. या कायद्यामुळे 35 ते 40 वर्षे चालणाऱ्या दाव्यांचा निकाल एका वर्षात लागणार आहे. याप्रकरणी मंत्रालयीन विभागाकडे असलेले बहुतांशी अधिकार जिल्हाधिकारी व आयुक्त स्तरावर देण्यात आले आहेत. यापुढे सदरहू दाव्यांचे निर्णय आयुक्त पातळीपर्यंत होतील. आयुक्तांचा निर्णय संबंधित व्यक्तीस अमान्य असेल तर तो न्यायालयामध्ये दाद मागू शकतो, त्याला मंत्रालयामध्ये येण्याची आवश्यकता भासणार नाही. याप्रकरणीचा विलंब टाळण्याच्या दृष्टीकोनातून काही कायदे या सरकारने केले आहेत.

अध्यक्ष महोदय, हा कायदा सरसकट मालकी हक्क लावण्याच्या संदर्भातील आहे. याप्रकरणी आताच्या जमिनींना वारसा लागत नाही. वर्ग-2 भोगवट्याची जमिनी खरेदी केल्यानंतर त्याला वारस लागत नाही. परंतु सदरहू जमीन वर्ग-1 भोगवट्याची करुन दिली तर त्यास पिढीजात वारस लागेल. कायमची मालकी देण्यासंदर्भातील हजारो एकर जमिनी वेगवेगळ्या कारणास्तव अतिक्रमण म्हणून पडून आहेत. गाव पातळीच्या ठिकाणी या जमिनींवर काही लोकांनी अतिक्रमण केले आहे. अशा जमिनींच्या संदर्भात केस टू केस जिल्हाधिकारी विचार करतील व आवश्यकता भासली तर संबंधितास त्याबाबत मंत्रालयामध्ये दाद मागता येईल. मंत्रालयातून अशा

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे......

प्रकारच्या विषयासंदर्भात काहीच कार्यवाही होणार नाही, असे नाही. सदरहू प्रकरणीचे सर्वच निर्णय खालील स्तरावर झाले पाहिजे, असा या विधेयकाचा हेतू आहे. या विधेयकाची स्पष्टता सदनास आली असेल त्यामुळे सदरहू विधेयक मंजूर करण्यात यावे, अशी माझी सदनाला विनंती आहे.

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, महसूल मंत्री महोदयांनी या विधेयकासंबंधी अतिशय चांगले स्पष्टीकरण दिले आहे. सदरहू प्रस्तावित कायद्यानुसार आकारण्यात येणारा प्रिमिअम सहकारी गृहनिर्माण संस्था व औद्योगिक संस्था यांच्या संदर्भात वेगवेगळा असावा, अशी मी सूचना केली होती. याबाबत सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रस्तावित कायद्यानुसार प्रिमिअम किती व कशा प्रकारे आकारण्यात यावा, याबाबत विचार करण्यासाठी समिती गठीत करण्यात येत आहे. मुंबई सारख्या शहरामध्ये रेडी रेकनरच्या 75 टक्के दराने प्रिमिअम आकारला तर तो गृहनिर्माण संस्थांना भरणे शक्य होणार नाही.

यानंतर RR-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे.....

अशा ठिकाणी रेडीनेकनरच्या किंमतीनुसार ती परिस्थिती, तो विभाग, त्या ठिकाणचे व्यवहार, किती वर्षे झाले आहेत, अगदीच 25 आणि 50 वर्षे झाली असतील तर डेप्रिशिएशनच्या माध्यमातून त्यासंबंधी किंमत येईल याबाबतचा अभ्यास करुन समिती जसा सूचना करील आणि जशी शिफारस करील त्यानुसार आकारण्यात येईल.

---------

2......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष पाटील (अलिबाग) : अध्यक्ष महोदय, विषय महत्वाचा आहे, मी ज्या जिल्ह्यातून प्रतिनिधीत्व करतो तेथे जमिनींचे भाव भार मोठे आहेत. आधीच्या सरकारांनी रायगड जिल्ह्यातील मोक्याच्या जमिनी खासगी शिक्षण संस्थांना दिलेल्या आहेत. माझा मतदार संघामध्ये मौजे आवास येथे 1995 साली युती शासनाने कोहिनूर इन्स्टिटट्यूटला जमीन दिली. पण त्या संस्थेने पुढे काहीही खर्च केला नाही, कोणतेही कामकाज केलेले नाही. त्यांना 30 वर्षाची मुदत होती. आता शासन ती जमीन त्यांच्या नावावर करताना आताच्या रेडीरेकनरच्या दराने करणार आहे काय, मुरूड येथे कोंडी प्रकल्पासाठी जमीन देण्यात आली. ज्याला जागा दिली त्याने तेथे वाडी लावली. त्याचाही करार संपुष्टात आलेला आहे. इतर राज्यांमध्ये जमिनीचे भाव कमी आहेत. ज्या शैक्षणिक संस्थांना जमिनी देण्यात आल्या आहेत त्या शैक्षणिक संस्थांनी त्या ठिकाणी काहीच कामकाज केलेले नाही. असे करताना आपल्याला रायगड जिल्ह्यामध्ये वेगळा निकष लावावा लागेल, कारण त्या ठिकाणी जमिनीला भाव भरपूर आहे. जागा कमी असताना स्थानिक लोकांना जमिनी दिल्या नाहीत. ज्यांना जमिनी दिल्या आहेत ते बाहेरच्या जिल्ह्यातील आहे की, ज्यांना जिल्ह्याशी काहीही संबंध नाही. अशी एकच जमीन नाही तर हजारो एकर जमिनी आहेत. आपल्या या बिलामागील जो उद्देश आहे की, महसूल मिळाला पाहिजे. आमच्या जिल्ह्यामध्ये आंदोलन झाले. कूळ कायद्याच्या संदर्भात आम्ही 15 दिवसांपूर्वी माननीय महसूल मंत्र्यांकडे अपिल केले आहे. यामध्ये जे जमिनी कसतात त्यांच्या नावावर सरकार जमिनी करायला तयार नाही. पनवेल तालुक्यातील मौजे खाणाव येथील शेतकऱ्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे अपिल केले आहे. महसूल मंत्र्यांकडे दोन वेळा अपिल झाले आहे. माझ्या मतदार संघातील मुरुड येथील तीच परिस्थिती आहे. पण त्याला निकाल लागत नाही. आपण संस्थांना कमी दराने जमिनी देण्यास आमचा विरोध नाही. पण ज्या लोकांनी जमिनी बळकाविल्या आहेत त्या त्यांच्या नावावर करताना सध्याच्या दराप्रमाणे त्यांच्याकडून पैसे घ्यावेत किंवा त्या जमिनी परत घेण्यात याव्यात. प्रश्न असा आहे की, रायगड जिल्ह्यामध्ये सीआरझेड आहे. आम्हाला कचरा टाकण्यास जागा देण्यास कोणी तयार नाही.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष पाटील साहेब आपण पुन्हा भाषण सुरु करणार असाल तर हे बरोबर नाही.

3......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, विषय महत्वाचा आहे. आपण मला आज रोखू शकत नाही, कारण मी बिलावर बोलत आहे. मला पण कायदा समजतो.

**तालिका सभाध्यक्ष** : मंत्री महोदयांच्या रिप्लायनंतर बिलावर एवढा वेळ भाषण करता येत नाही. म्हणून मी आपल्याला मुद्दे मांडण्यासाठी संधी दिली आहे. त्यामुळे आपण फक्त मुद्दे मांडावेत.

श्री. सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, मी या बिलावर नापसंती दिलेली आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** नापसंतीच्या वेळेला आपण सभागृहात उपस्थित नव्हते.

श्री. सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, आपल्या म्हणण्यानुसार गुरचरण जागा विकता येत नाही. माझ्या मतदार संघातील गुरचरण जमीन सरपंच, ग्रामसेवक यांनी जाहीर लिलाव करुन विकली आहे. आम्ही जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत. आता आपण गोवंश हत्त्या बंदी कायदा केला आहे. आमच्या येथे गुरचरण जागाच शिल्लक नसल्यामुळे त्या जनावरांनी कोठे जायचे, आम्ही वेगवेगळ्या माध्यमातून बोलण्याची संधी मिळण्यासाठी वेळ मागतो त्यावेळी अध्यक्ष सांगतात दोनच मिनिटे बोलावे. परंतु आता माझ्याजवळ भरपूर मिनिटे आहेत.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष पाटील साहेब आपल्याला मी पुन्हा सांगतो की, मंत्री महोदयांच्या उत्तरानंतर बिलावर जास्त वेळ बोलता येत नाही.

श्री. सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, आपण आम्हाला संधीच दिली नाही. इतर सन्माननीय सदस्य बोलले आणि त्यानंतर मंत्री महोदय उत्तरासाठी उठले.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष पाटील साहेब आपल्या अगोदर सर्वांना संधी देण्यात आली होती. आपण सभागृहात उपस्थित नव्हते.

श्री. सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, मी लाईट लावला होता. अध्यक्ष महोदय, आम्ही सकाळी 9 वाजल्यापासून सभागृहातील कामकाज ऐकत असतो. आता मी पाच मिनिटे महत्वाच्या विषयावर बोलतो, कृपया ऐकून घ्यावे. मी काही फालतू बोलत नाही.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष पाटील साहेब सर्वजण बोला असे म्हणत असल्यामुळे आपल्याला पाहिजे तेवढा वेळ बोलावे. आता मी आपल्याला रोखणार नाही. पाहिजे तर एक तास बोलावे.

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, आपण मला डिस्ट्रब करु नका त्यामुळे माझा वेळ जातो.

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे. आपण भरपूर वेळ बोलावे.

श्री. सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, आपण ज्या शैक्षणिक संस्थांना जमिनी दिल्या आहेत त्या त्यांच्या नावावर करणार आहात काय, मासेमारीसाठी लोकांनी जमिनी घेऊन त्यावर बागायती लावल्या आहेत, त्या जमिनी आपण परत घेणार आहात काय, आपण आता गावठाण विस्तारासाठी परवानगी देत नाही, गुरचरण जमिनीवरील अतिक्रमणे आपण हटविणार आहात काय, हे माझे प्रश्न आहेत.

---------

5……

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : अध्यक्ष महोदय, आदरणीय मंत्री महोदयांनी उत्तरादाखल सांगितले की, देवस्थानच्या जमिनीसंबंधी ज्यांचे कूळ आहे, त्या कूळाच्या जमिनी एक तर टेनन्सी ॲक्टच्या 129 बी प्रमाणे चॅरिटेबल हेतूसाठी किंवा शैक्षणिक हेतूसाठी किंवा मेडिकल पर्पजकरिता एक्झम्प्शन आहे. असे असताना त्यावरील कूळे 1958 किंवा 1959 दरम्यानची आहेत. ती कूळे मयत झालेली आहेत. काही देवस्थानांच्या जमिनीवर टेनन्सी ॲक्टच्या कलम 120 नुसा काही अवैध कब्जेदार आहेत. यासंबंधी त्यांच्या वेगवेगळ्या कोर्टामध्ये केसेस सुरु आहेत. कारण मूळ देवस्थानमध्ये शेत वहिवाट करणारे कूळ आहेत ते देवस्थानला खंडही देत नाही किंवा निधीही देत नाहीत. काही देवस्थानामध्ये झाडझूड करण्यास आणि दिवा लावण्यास देखील पैसा नाही. अत्यंत वाईट परिस्थिती देवस्थानांची झालेली आहे. तेव्हा ही जमीन देवस्थानचे जे मूळ मालक आहेत त्यांनाच या जमिनी दिल्या पाहिजेत असा माझा आग्रह आहे. कारण त्यांचे ट्रस्टी आहेत त्या ट्रस्टचे कामकाज व्यवस्थित असताना केवळ 1958 किंवा 1959 चे कूळ आहे असू म्हणून जर ते जमिनीचा ताबा घेऊन मालक होऊ पाहत असतील तर त्यांना कायद्याने मालक करणे बरोबर नाही. त्या संपूर्ण जमिनी महाराष्ट्रात देवस्थानच्याच ताब्यात राहिल्या पाहिजेत आणि त्यांच्या माध्यमातून देवस्थानचा चॅरिटेबल पर्पज साध्य झाला पाहिजे, अशी अपेक्षा या कायद्याच्या निमित्ताने करतो. जे अवैध कब्जेदार आहेत आणि ज्यांच्या कोर्टामध्ये केसेस आहेत त्या या कायद्याच्या अंतर्गत येतील काय, याचेही स्पष्टीकरण आपल्या उत्तरामधून आले पाहिजे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, देवस्थानाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जी विचारणा केली आहे त्याचा या बिलाशी संबंधी नसून त्यासाठी वेगळी समिती आहे आणि वेगळा कायदा आहे. कारण देवस्थान हा असा प्रकार आहे की, त्याला मालक नाही. कारण अर्चक हा देवस्थानाचा मालक होऊ शकत नाही. त्याला पूजेसाठी नेमलेले असते पण तो मालक नाही. या ठिकाणी असलेले कूळ हे स्वत: जमीन कसतो आणि त्यामुळे तो मालकी हक्कासारखा असतो. तो स्वत: कसतो, उत्पन्न काढतो आणि उपभोग घेतो. पण त्याचा या बिलाशी संबंध नाही.

सन्माननीय सदस्य श्री. सुभाष पाटील यांनी रायगड जिल्ह्यासंबंधी जे तीन प्रश्न उपस्थित केले त्यामध्ये गायरान जमिनीच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने 2011 मध्ये आदेश दिल्याप्रमाणे अशा जमिनी आता कोणत्याही व्यक्तीला देता येत नाहीत. त्याबाबतीत सरकारने ठरविले तर सरकारी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे.....

प्रयोजनासाठी, निमसरकारी प्रयोजनासाठी वापरता येईल. परंतु खासगी व्यक्तीला देता येणार नाही. त्यामुळे अशा स्वरूपाचा लिलाव करून कोणी परस्पर 2011 नंतर जमीन विकली असेल तर आपण मला त्यासंबंधी पत्र द्यावे. त्यानुसार त्याची चौकशी करु आणि ती जमीन सरकारजमा करु. हा जो व्यवहार आहे तो नियमबाह्यच आहे, बेकायदेशीर आहे. त्यामुळे त्याची तपासणी करु आणि त्याची खात्री करू, दुसरे म्हणजे जमिनीच्या प्रवर्गानुसार मग त्यामध्ये शैक्षणिक, व्यापारी, वाणिज्यिक, इंडस्ट्री, रूग्णालय, निवासी, शेती, जिमखाना, क्रिडांगण अशा स्वरूपात आपण जमिनी दिलेल्या आहेत. आता तरी शैक्षणिक संस्थांना जमिनी मालकी हक्काने देण्यासंदर्भात या सरकारने निर्णय घेतलेला नाही. कारण त्या क्रिडांगण, शैक्षणिक प्रयोजन आणि ट्रस्टसाठी दिलेल्या जमिनी आहेत. ट्रस्ट आणि सोसायटी यामध्ये अंतर आहे. त्यामुळे ट्रस्टच्या संदर्भात अशा स्वरूपाचे काही निर्णय असतील त्या संदर्भात समितीला काही सूचना करु की, यासंबंधी काही निर्णय घेता येईल काय, त्यावर समितीच्या ज्या शिफारशी येतील त्यानंतर त्याचा विचार करता येईल. पण तूर्त ट्रस्ट या नावाखाली क्रिडांगणासाठी, शैक्षणिक कारणांसाठी, दवाखान्यांसाठी, जिमखान्यासाठी, औद्योगिक वापरासाठी जर जमिनी दिल्या असतील तर त्या जमिनी या कायद्यानुसार आज तरी यामध्ये समाविष्ट केलेल्या नाहीत.

SS-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे..........

समितीने शिफारस केल्यानंतर याबाबत वेगळा विचार करता येईल. एमआयडीसीच्या जमिनी या सरकारी जमिनी नाहीत. त्या महामंडाळाच्या जमिनी आहेत, त्या त्यांनी संपादित केलेल्या आहेत. त्याचा पैसा महामंडळाने दिलेला आहे. त्यामुळे त्याचा याच्याशी संबंध नाही. मच्छीमारांना दिलेल्या ज्या जमिनी आहेत. या जमिनी त्यांना भाडे तत्वावर दिलेल्या होत्या. पण त्याचे प्रयोजन वेगळे आहे. मच्छीमारांनी मासे काढत असताना, मासे सुकविण्यासाठी समुद्राच्या किनाऱ्यावर अशा जमिनी मोठ्या प्रमाणावर दिलेल्या आहेत. पण त्या त्याच प्रयोजनासाठी वापराव्यात अशी शर्त त्यामध्ये घातलेली असल्यामुळे त्या प्रयोजनाव्यतिरिक्त खाजगी मालकीने अशा जमिनी देता येणार नाहीत.

------------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष पाटील : (अलिबाग) : अध्यक्ष महोदय, या संस्थानाच्या वापरासाठी जागा दिलेली आहे, त्याचा त्यांनी वापर केलेला नाही. कोळंबी उत्पादनासाठी त्याठिकाणी जागा दिली, तेथे त्यांनी वाडी लावली. शिक्षण संस्थांना 30 वर्षाच्या कराराने ज्या जागा दिलेल्या आहेत, त्यांचा करार संपलेला आहे. या जमिनी सरकारने ताब्यात घ्याव्यात. यात सरकारचा फायदा आहे, मी सरकारच्या फायद्याचे बोलतो. नाही तर दुसरा कोणी बोलला असता मला द्या, माझ्या संस्थेला द्या. मी एकही जागा घेतलेली नाही. ज्या विनावापर जागा आहेत त्याचा वापर करा. रायगड जिल्ह्यातील जमिनीला सोन्याचा भाव आहे. त्याचा सरकारला उपयोग करता येईल. मी या मूळ जमिनी संदर्भात प्रश्न लावला होता, पण तो बाद करण्यात आला, अतारांकित करण्यात आला. विधान परिषद सभागृहामध्ये वरूर पाण्याचा प्रश्न उपस्थित केला होता. पण त्याच्यावर कारवाई झालेली नाही. ती कारवाई यानिमित्ताने व्हायला पाहिजे. एवढेच या निमित्ताने सांगतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------------

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, शैक्षणिक कारणासाठी अशा जमिनी दिल्या असतील किंवा अन्य कारणासाठी दिल्या असतील. त्या शर्तीवर दिलेल्या जमिनी आहेत. आपण म्हणता त्याप्रमाणे जर शैक्षणिक संस्थांनी त्याचा भंग केला असेल तर अशा जमिनी ताब्यात घेता येतील. परंतु त्यांनी जर नियमानुसार त्याचा वापर केला असेल तर अशा जमिनी क्रीडा क्षेत्रात असतील, शैक्षणिक किंवा हॉस्पीटलसाठी असतील आणि त्याची लीज मुदतीत वाढविली नाही. तरी त्यांना मुदतवाढ देण्याच्या संदर्भात संधी दिली जाईल आणि त्यांना लीज वाढवून देण्यात येईल. परंतु शर्त भंग झाला असेल, शाळेसाठी दिलेल्या जागा व्यापारासाठी वापरल्या असतील, दुकानासाठी वापरल्या असतील अशा शर्तभंगाबद्दल त्यांच्यावर कारवाई करता येईल. परंतु नियमाचा भंग झाला तर त्याठिकाणी दंड करुन, योग्य रितीने पैसा वसूल करुन ते नियमात करण्याची कायद्यात तरतूद आहे. त्यामुळे हे विधेयक आता मंजूर करावे अशी माझी विनंती आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 1 व 2 विधेयकाचे भाग झाले.

संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि क्रमांक 14 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष** : सन 2016 चे वि.स.वि क्रमांक 14 एकमताने संमत झाले आहे.

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन)
(महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO. II OF 2016 (A BILL FURTHER TO AMEND THE CONTRACT LABOUR (REGULATION AND ABOLITION) ACT, 1970, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय देशमुख (कामगार राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 2 कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, 1970, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, सध्याच्या जागतिकीकरण आणि उदारीकरण युगामध्ये औद्योगिक प्रगतीच्या समांतराने रोजगार निर्मिती होणे आवश्यक आहे. तसेच सरकारी हस्तक्षेप कमी होणे व प्रक्रियेमध्ये सुलभीकरण आणणे आवश्यक झालेले आहे. जेणेकरुन सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना याचा फायदा होईल. शासन त्यामुळे असे प्रस्तावित करीत आहे की, कंत्राटी कामगार कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सध्या लागू असलेली किमान कामगार संख्या 20 ची अट 50 करावी यामुळे ठेकेदारांना मदत होईल. तसेच ठेक्यांची अंमलबजावणी तत्परतेने करता येईल. या कायद्यामुळे जास्तीत जास्त रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे, सुक्ष्म व लघुउद्योगांना तसेच छोट्या ठेकेदारांना कामकाज सोयीचे होण्यासाठी तसेच कायदा लागू होण्यासाठी सदर अटीत 20 कामगारांची तरतूद 50 पर्यंत नेण्याचे प्रस्तावित आहे. सदर उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी सदरचा मसुदा तयार करण्यात येत आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आम्ही बोलणारच आहोत. परंतु मंत्री महोदयांनी सर्वांगाने याचे परिणाम, कारण एवढे स्पष्ट केले तर आमची भाषणे करण्याची जबाबदारी कमी होईल्.

.......5

श्री.विजय देशमुख : अध्यक्ष महोदय, देशातील औद्योगिकरणामध्ये वाढ व्हावी या उद्देशाने केंद्र सरकारने मेक इन इंडिया धोरण जाहीर केले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्रात मेक इन महाराष्ट्र हे धोरण जाहीर केलेले आहे. उद्योग धंद्यातील कायदे व नियम सुलभ करण्याकरिता हा कायदा करण्यात आलेला आहे आणि याकरिता पावले उचलली आहेत. त्यातील कामगार हा केंद्रस्थानी मानून उद्योगांना चालना मिळेल व महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रात नवीन रोजगार निर्माण होईल. यादृष्टीने कामगार कायदा अधिनियमात बदल करण्याचा प्रस्ताव आहे. नवीन कामगारांना नवनवीन उद्योग यावेत, त्यांच्या हाताला कामे मिळावीत यासाठी हे विधेयक आहे.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या मनात जे काही प्रश्न आहेत, त्यात मुळात आपण 20 चे 50 का करीत आहोत. आता किमान 20 कंत्राटी कामगार ठेवले की, त्याला रजिष्ट्रेशन करावे लागते. या ठेकेदाराला जर 20 पेक्षा जास्त कामगार लावायचे झाले तर परत त्यांना रजिस्ट्रेशन करायला यावे लागते. त्यांना ज्या खेपा घालाव्या लागतात त्यात त्यांचा वेळ जातो. म्हणून अधिक रोजगार उपलब्ध व्हावा. यासाठी या विधेयकाच्या अंतर्गत 50 पर्यंत कंत्राटी कामगारांच्या रजिष्ट्रेशची सुट देण्यात येते. सुट देत असताना अनेक सन्माननीय सदस्य या विधेयकाबाबत मला व्यक्तीगत भेटले आणि सांगितले की, यात अधिकचे जे कामगार घेत आहात त्यांना कंत्राटी कामगार कायद्याच्या अंतर्गत आज ज्या कामगारांना फायदा मिळतो तो वाढीव कामगारांना मिळणार नाही.

TT-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश महेता..........

तर ते सर्वच्या सर्व म्हणजे 30 अधिक घेतले, काहींनी 100 घेतले, काहींनी 200 घेतले आणि त्याचे रजिस्ट्रेशन केले. त्यासर्वांना आता कंत्राटी कामगारांना जेवढा पी.एफ. असो, रझिस्टर असो, इ.एस.आय.ची मदत असते ती त्याला मिळते, कंत्राटी कामगाराला मिनिमंम व्हेजेस मिळतो. म्हणून कामगारांच्या कोणत्याही हक्कावर गदा येत नाही. ठेकेदाराने एका कंपनीमध्ये 20 कंत्राटी कामगार लावले, त्याच कंपनीत त्याला अधिकची लोक लावायची झाली, तर पुन्हा त्याला रजिस्ट्रेशन करायला लागत होते आणि त्याचे दोन तीन महिने त्याच्यात जायचे, म्हणून तुम्हाला 50 पर्यंत सरसकट रजिस्ट्रेशन दिले. 50 पर्यंत रजिस्ट्रेशन करण्याची गरज नाही. एवढा छोटासा एक लाईन पुरता मर्यादित हा विषय आहे. चर्चेच्या माध्यमाने श्री.शशिकांत भाऊंनी, अनेक सन्माननीय सदस्यांनी वरच्या सभागृहामध्ये कामगारासंबंधी विषय मांडले.

अध्यक्ष महोदय, प्रथा केव्हा सुरु झाली, आपण राजकीय बोलायचे नाही. कंत्राटी प्रथा आणली कोणी, कोणासाठी तेव्हा आणली ? असे सर्व राजकीय बोलायला गेलो तर कामगारांवर अन्याय करतो असे होईल. आज कंत्राटी कामगारांची अवस्था चांगली नाही हे आम्ही मान्य करतो. या अधिवेशनात सर्वपक्षीय कामगार क्षेत्रातील बाहेरचे युनियनचे प्रतिनिधी, मालक प्रतिनिधी अशी समिती बनवितो व घोषित करतो. त्या समितीमध्ये केंद्र बिंदू कंत्राटी कामगारांचे मिनिमंम व्हेजेस वाढविण्यासंबंधी आणि इतर सुविधा वाढविण्यासंबंधीचा राहील. कामगार कायद्यामध्ये रिफॉर्मच्या अनेक सूचना मित्रांनी बैठकांमध्ये केल्या. गेली दिड वर्षामध्ये अनेक सुनावन्यांमध्ये फंडामेन्टल लेबर लॉ्ज् मध्ये कुठे कुठे बदल करायचे आहेत असे प्रश्न समोर आले.

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश महेता..........

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांचे काय मत आहे, ते मी जाणून घेतले आहे. म्हणून निवेदन करताना आम्ही इतके स्पष्ट निवेदन करतो आहोत. त्यांनी या बिलाच्या माध्यमातून सर्व प्रश्न विचारले, त्यांचे प्रश्न स्विकारले, याचे पूर्ण स्पष्टीकरण करुनच हे बिल आणलेले आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी विनंती केली की, तुम्ही सर्वांशी बोलून घ्या. तसे सर्वांशी बोललो. खालच्या सभागृहातील आणि वरच्या सभागृहातील जे जे कामगार क्षेत्रात काम करतात किंवा कामगारांच्या बद्दल ज्यांच्या मनात या बिलाच्या संदर्भाने असो, किंवा अनेक दुसरे प्रश्न असो त्या सर्व प्रश्नांचा एकत्रित विचार करुन दिड वर्षाच्या आपल्या कार्यकालामध्ये सर्वांनी नक्की करुन लेबर लॉ रिफॉर्म् करावा. त्यामुळे आजच्या विषयामुळे कामगार, कंत्राटी कामगारांवर फार मोठी गदा येणार आहे असे अजिबात नाही. कंत्राटी कामगाराला आज जो हक्क मिळतो आहे तोच मिळणार आहे. 30 अधिक कामगार भरले तर त्यांना अधिक रोजगार कसा उपलब्ध होईल. त्याप्रमाणे अधिकच्या 30 लोकांच्या भरतीसाठी परत त्यांनी मंत्रालयात, कामगार विभागात, आयुक्तांकडे फे-या मारु नयेत. एवढया साध्या कारणासाठी हा कायदा आणतो आहोत.

अध्यक्ष महोदय, मला असे वाटते की, या विषयावर सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी ठरवले तर तीन तास बोलू शकतात. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी ठरविले तर दोन तास बोलू शकतात, त्यामुळे सर्वांनी एकत्रितपणाने विचार करुन कामगार कायद्यामध्ये योग्यरितीने सुधारणा करायची आहे, ही भूमिका घेऊन मी हे करतो आहे, त्याबद्दल तुम्ही मनात शंका धरु नका. आम्ही बोलतो एक आणि करतो एक असे नाही. कारण त्या कमिटीमध्ये तुम्ही सुध्दा असणार आहात. जेव्हा तुम्ही असणार तेव्हा त्या विषयावर व्यवस्थितपणे विचार करु. आजचे बिल हे फक्त ज्या ठेकेदाराकडे फक्त 20 जणांचे रजिस्ट्रेशन आहे, त्यांना जेव्हा अधिक कामगार लागतात, त्यासाठी त्यांना परत रजिस्ट्रेशनसाठी यावे लागते. म्हणून त्यांना 50 कामगारांपर्यंतची सुट देतो आहोत. 30 लोकांना रोजगार मिळत असेल तर चांगले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे ( कोरेगाव ) : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी कंत्राटी कामगारांबद्दल जे बिल आलेले आहे, ते 32 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठवावे, अशा प्रकारची विनंती चर्चेच्या माध्यमातून करणार आहे. खरे म्हटले तर मंत्री महोदयांनी कंत्राटी कामगारांच्या बाबतीमधील मुद्दा हया ठिकाणी व्यक्त केला. त्यांनी जे स्पष्टीकरण केले, ते माझ्या माहितीप्रमाणे बिलाच्या बाबतीत आणि त्यांच्या स्पष्टीकरणामध्ये थोडीशी तफावत दिसते आहे. नवीन सरकारच्या भूमिकेतून युतीचे शासन आले.

अध्यक्ष महोदय, सरकार बदलल्यानंतर माननीय मुख्यमंत्री असतील, माननीय पंतप्रधान असतील त्यांनी परदेशात, देशात, राज्यात दौरे करुन उद्योगपतीचे असलेले काही प्रश्न जाणून घेण्याचा प्रयत्न केला असेल आणि या प्रयत्नाच्या माध्यमातून काही महत्वाचे मुद्दे या ठिकाणी उद्योग धंद्याला सुलभता व्हावी, उद्योग धंद्यासाठी पायघडया घालण्याच्या संदर्भात काही निर्णय घ्यायचे असेल, अशा प्रकारचा हा विषय घेत असताना, कामगार मंत्री किंवा राज्य शासन म्हणून काही निर्णय त्या त्या खात्याने घ्यावे अशा प्रकारची आमची मानसिकता आहे.

अध्यक्ष महोदय, मला माहिती नाही परंतु काही राज्यामध्ये काही मंत्री आपल्या अधिकाराच्या कक्षेतून बाहेर जाऊन काम करतात असे माझे म्हणणे आहे. हा प्रस्ताव उद्योग खात्याने आणलेला होता. परवाच्या दिवशी सुध्दा याबाबतीमध्ये महाराष्ट्रामधल्या आमच्या कामगार संघटनांनी एक दिवसाचा लाक्षणिक बंद केला. माननीय पणन मंत्री आणि माननीय उद्योग मंत्र्यांनी ती बैठक घेतली. सोमवारी आपल्या तिघांच्या उपस्थितीमध्ये बैठक घेण्याबाबत निर्णय घेतला. त्यामध्ये हेच विषय आहेत. उद्योग खात्याच्या असलेल्या फेब्रुवारी 2016 च्या या मागण्यांच्या माध्यमातून, तुमच्या परिपत्रकाच्या माध्यमातून पाहायला मिळाले.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे.........

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र हा देशामध्ये सर्व कायदे होत असताना अंमलबजावणी करणारे राज्य म्हणून ओळखले जाते. श्री.स.का. पाटलांपासून ते श्री.जॉर्ज फर्नांडिस, श्री.दत्ता सामंत अशा अनेक नेत्यांनी या महाराष्ट्रातून देशाला दिशा दाखविली. मी नेहमी म्हणतो, हुतात्मा चौकात पाहिले तर, कामगाराची ओळख, बाबू गेनू पासून, देशाच्या स्वातंत्र्यापासून, अनेक लोकांनी या कामगार चळवळीमधून या देशाला स्वातंत्र्य काळापासून या देशाला लढा उभा करण्याचे नेतृत्व दिले. माथाडी कामगार सारखा कायदा सुध्दा प्रथम महाराष्ट्रात बनविण्यात आला. श्री.नरेंद्र तिडके असतील, श्री.चव्हाण असतील, श्री.वसंतराव नाईक असतील, श्री.वसंतदादा पाटील असतील, श्री.शरदचंद्रजी पवार साहेब असतील, ज्या ज्या लोकांनी या राज्याचे नेतृत्व केले त्या त्या लोकांनी प्राधान्याने या कामगार शक्तीला फार मोठी ताकद देण्याच्या बाबतीत निर्णय घेतला.

UU-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे .....

यामध्ये अनेक पक्ष आहेत. अनेक पक्षाच्या कामगार संघटनांच्या चळवळीही तेवढयाच स्ट्राँग आहेत. अगदी भाजपाच्या व शिवसेनेच्यासुध्दा कामगार चळवळी असतील. आपण दत्ताजी साळवी यांचेसारखे नेतृत्व पाहिले आहे. कम्युनिष्ट आंदोलनातून उभे राहिलेले नेतृत्व या कामगार चळवळीने पाहिले आहे. हे सर्व करीत असताना आशिया खंडामध्ये जो कायदा नाही तो कायदा आणण्याचे धाडस या राज्याने केले आहे. माथाडी कामगार कायद्याबाबत आपण माननीय राज्यपालांच्या व इतर भाषणातही सांगितले आहे. आता ऊस तोडणी कामगार व घरेलू कामगारांसह सर्व कामगारांकरिता अशा प्रकारचा कायदा बनविण्याचा निर्णय शासन करीत आहे असे सुतोवाच माननीय राज्यपालांच्या भाषणात केलेले आहे. आपण कायदा करण्याबाबत भूमिका व्यक्त केलेली आहे. राज्यातील नेतृत्व बदलण्याची धमकसुध्दा कामगार चळवळीने दाखवून दिलेली आहे. दत्ता सामंत सारखा कामगार नेता स्वतःचे आमदार व खासदारांसह कामगार चळवळीच्या ताकदीवर या राज्यामध्ये फार मोठी शक्ती उभी करु शकला. अण्णासाहेब पाटील मराठा महासंघाचे नेतृत्व करीत होते. या चळवळीतून बोध घेत बीपीटीमध्ये काम करताना या चळवळीला धागा देत देत मराठा महासंघाची त्यांनी व्याप्ती व शक्ती वाढविली. असे कायदे आपण महाराष्ट्रात आणत आहोत की, त्यांची अंमलबजावणी देशातील इतर कोणत्याही राज्यात होत नसेल. मिनिमम वेजेस ॲक्ट, शॉप ॲक्ट, लेबर ॲक्ट, फॅक्टरी ॲक्टच्या अंमलबजावणीच्या निमित्ताने या राज्य सरकारने योग्य ती भूमिका राबविली. त्याचे समर्थन कायद्याच्या चौकटीमध्ये जाऊनसुध्दा केले गेले. पोलीस यंत्रणा, मालकांचा त्रास होत असेल तर फार मोठी ताकद देण्याचा प्रयत्न प्रत्येक राज्य सरकारने केलेला आहे. घाम गाळणाऱ्या लोकांना न्याय मिळाला पाहिजे ही प्रामाणिक भूमिका व मानसिकता त्यामध्ये निश्चित होती. अनेक कायदे, नियम व नियमावली केली गेली. यांची अंमलबजावणी करीत असताना सरकारने कोणत्याही प्रकारचे मालकधार्जीणे धोरण घेतले नाही ही वस्तुस्थिती या राज्यानेसुध्दा पाहिली आहे. अशा पध्दतीने राज्यात असलेल्या नियमावलीप्रमाणे कामगार कायद्याची अंमलबजावणी करणारे राज्य म्हणून ओळखले जात आहे. पण सरकार आणत असलेल्या या विधेयकामुळे कामगार चळवळीला कोणताही अधिकार व आधार असणार नाही. अशी शंका मला या विधेयकातून दिसून येत आहे. मी शॉप ॲक्ट व माथाडी कायद्याबाबतही बोललो आहे. एक कामगार

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे .....

असला तरी त्याला सुरक्षित अशा कामगार कायद्याचे कवच या कामगार चळवळीच्या माध्यमातून व नियमावलीच्या माध्यमातून कामगारांना मिळत होते. अशा प्रकारे काम करीत असताना, बाल कामगारांबाबतचा कायदाही या राज्याने करुन दाखविला आहे. बालकामगारांचा वापर करणाऱ्या मालकांवर आपण दंडात्मक आणि इतर कारवाई करण्याबाबत धाडससुध्दा आपण दाखविले आहे. काल माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, शिक्षणापासून वंचित राहणारी मुले दिसली तर राज्य शासनाकडून अशा मुलांमागे प्रत्येकी 1 हजार रुपये देण्याची योजना त्यांनी जाहीर केली आहे. पण मी दूरचे सांगत नाही. बाल कामगार कोणत्या शाळेमध्ये जातो ? असे अनेक कामगार आहेत की, लहान हॉटेलपासून ते विविध ठिकाणी काम करतात ही वस्तुस्थिती आहे. यातून राज्य शासनाची भूमिका विस्तृतपणे कायदे करुन प्रसिध्दी मिळविण्यापुरती आहे की काय अशी श्ंका येते. मी किती बालकामगार दाखवू ? कामगार खात्याची यंत्रणा राबवायची म्हटले तर आज हे कामगार खाते लंगडे झालेले आहे. हे आताच झाले असे नाही. या खात्यामध्ये असलेल्या सर्व मंडळीकडे पाहिले तर लक्षात येते की, या खात्यामध्ये आता कोणीही येणार नाही. या कामगार खात्यामध्ये पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या व्हॅकन्सी असतानासुध्दा आज दुर्दैवाने प्रचंड शॉर्टफॉल अधिकारी व कर्मचारी यांचा आहे. असिस्टंट कमीशनर, डयेप्युटी कमीशनर नाहीत. या खात्याचे सचिव किंवा आयुक्त म्हणून येण्यास आयएएस अधिकाऱ्यांना उत्कंठा नसते ही सत्य परिस्थिती आहे. याच्या कारणांचा शोध अजूनपर्यत कोणी घेतलेला नाही. यापुढे जाऊन आपण एक काम करुन टाकलेले आहे. कायद्यात बदल केलेला आहे की, कोणत्याही अधिकाऱ्याने यापुढे उद्योगपतींची, उद्योगधंद्यांची व कारखान्यांची चौकशी करायची नाही, कोणतीही व्हिजीट करायची नाही. अशा प्रकारचे सुलतानी कायदे करुन अधिकारी वर्गाचा अधिकार काढून घेण्याच्या बाबतीत प्रयत्न केले जात आहेत. अशा अनेक प्रश्नामुळे फार मोठे संकट कामगारांच्या अधिकारावर येऊ शकते. हा कायदा उद्योग खात्याने आणला. त्यात आपण मेक इन इंडियामधून रोजगार उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. त्याची आकडेवारी तुम्ही सांगितली. यामध्ये मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, 30 लाख लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. हा रोजगार देशात निर्माण होणार आहे की राज्यात निर्माण होणार आहे याचे स्पष्टीकरण करावे. मला सांगावे लागेल

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे .....

की, हे उद्योगधंदे आणत असताना, रोजगार उपलब्ध होत असताना या कामगारांना कोणत्या कायद्याखाली आपण संरक्षित करणार आहात. एका मालकाला संरक्षित करण्यासाठी या मातीतील पाणी, रस्ते, वीज, जमीन आपण देणार आहोत. या सर्व सुविधा आपण याकरिता देतो की, स्थानिक बेरोजगारांना तेथे नोकऱ्यां उपलब्ध व्हाव्यात व त्यांना कामधंदा मिळावा. तसेच स्थानिकांचे पोट भरण्यासाठी लघुउद्योगास चालना मिळावी म्हणून आपण मोठे उद्योगधंदे आणत आहोत. बाहेरच्या लोकांनी येथे येऊन मोठे व्हावे याकरिता आपण उद्योगधंदा आणत आहोत असे नाही. आपल्या राज्याचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढावेत व आपल्याकडील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा या हेतूने आपण आणत आहोत. पण याच तरुण बेरोजगारांना भविष्यात कंत्राट पध्दतीने वेठबिगारासारखे वेठीस धरण्यासाठी पाठवत असाल तर या सारखे कोणतेही दुर्दैव नाही.

अध्यक्ष महोदय, पूर्वी असा कायदा होता की, 20 कामगार असले तरी त्या मालकाला संपूर्ण रेकार्ड ठेवावे लागत होते. त्यामध्ये जीपीएफ व ग्रॅच्युटी मिळत होती. त्यांचे कॉम्पेसेशन, मेडीकल फॅसिलीटी, मिनिमम वेजेस ठरविलेले होते.

अध्यक्ष महोदय, माझा अभ्यास चुकीचा असेल तर मंत्री महोदयांनी याचे स्पष्टीकरण करावे. यामध्ये कामगारांच्या संख्येची मर्यादा 20 वरुन 50 केली गेली. तत्पूर्वी 40 कामगारांची मर्यादा केली. नंतर कोणाच्या तरी मागणीवरुन 40 वरुन 50 अशी कामगार संख्येची मर्यादा केली गेली. याचे मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण करणे गरजेचे आहे.

यानंतर V V-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे.......

मला असे कळले आहे की, 50 कामगारापर्यंत कोणतेही कायद्याचे बंधन राहणार नाही. शासन ज्याप्रमाणे 100 कामगारांचा कारखाना बंद करताना शासनाची परवागनी घ्यावी लागत होती. तीच परवानगी 200 कामगारांना घेण्याबाबत शासनाने त्यामध्ये आता सूट दिलेली आहे. मालक एवढे हुशार असतात. मॅनेजमेंट हुशार असते. आता श्री.मुकेश अंबानी यांनी रिटायर्ड आयएएस ऑफिसर्स लेबर मॅनेजमेंटकरिता एचआर म्हणून नेमतात. ते तर त्यांच्यापेक्षाही हुशार असतात. मी उदाहरण म्हणून सांगतो. एखाद्या कंपनीमध्ये शंभर कामगार असतील तर तो बंद करण्याकरिता पूर्वी काय होत होते की, 100 कामगार असल्यानंतर कंपनी बंद करण्याकरिता शासन म्हणून कामगार खात्याकडे परवानगी मागावी लागत हाती. कारखाने बंद करण्यासंदर्भात शासनाची एनओसी असल्याशिवाय निर्णय घेता येत नव्हता. आता कंपनी चालू असतानाही मालक एकाच कंपनीमध्ये दोन - दोन सब कंपन्या काढतात. कायद्याच्या चौकटीतून सूट मिळण्याकरिता कायद्याच्या चौकटीची अंमलबजावणी करण्याची गरज पडू नये पळवाट मिळावी,याकरिता कंपनीचे मालक असे करतात. कंपनीचे आवार एकच आणि कंपनीचा पॅसेज एकच कंपनीचा कारखाना एकच असताना दोन -दोन कंपन्या दाखवायच्या आणि कायद्यातून पळवाटा काढणे योग्य नाही. आता 100 कामगारांची कंपनी बंद करीत असताना 200 कामगारांबाबतची सूट दिलेली आहे. याबाबत मंत्रिमहोदयांनी माहिती रेकॉर्डवर आणि पटलावर ठेवावी. या राज्यामध्ये 200 कामगारांपेक्षा कमी कामगार असलेल्या आणि 200 कामगारांपेक्षा जास्त कंपन्या असलेल्या किती कंपन्या आहेत ? 400 कामगारांची कंपनी म्हटली तरीही त्यामध्ये 200 -200 कामगारांचे दोन डिव्हीजन्स दाखविले जातात. असे केले तर कायद्याचा वचकच राहणार नाही.

अध्यक्ष महोदय, पूर्वी मालकांवर संपूर्ण काम बंद करण्यासंदर्भात शासनाचा कायद्यासंदर्भात अंकुश होता. कंपनी मालकाला कायद्यातील तरतुदीनुसार शासनाची एनओसी भेटल्याशिवाय कामगारांची देणी दिल्याशिवाय पळता येत नव्हते. आज बघत आहात आपण आज सुप्रिम कोर्टापर्यंत केसेस चालू आहेत. आज अशा अनेक कंपन्या आहेत, ज्या बंद पडल्यानंतर त्यातील कामगार अनेक वर्षापासून रोजी रोटी गेली म्हणून आपल्या न्याय्य हक्कांकरिता कोर्टामध्ये खेटे घालत आहेत. तरीही त्यांना न्याय मिळालेला नाही.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे.......

त्यापैकी काही कामगारांचे दु:खद निधन झाले. एनआरसी संदर्भातील बैठक झाली त्यावेळी कामगार मंत्री म्हणून आपले नाव श्री.प्रकाश महेता जरी असले तरी आपण खरोखर कामगारांची बाजू घेऊन बोलत आहात कामगारांची बाजू घेत आहात याचे मी समर्थन करतो. या कामगारांपैकी काही लोक मृत पावली काही लोक रिटायर्ड झाली, आज त्या लोकांची देणी सुध्दा वर्षानुवर्ष तशीच पडून आहेत. आज अशा किती केसेस आहेत, याचे तरी स्पष्टीकरण द्यावे. आता राज्य शासनाकडे, कोर्टामध्ये आणि फार सोपे झालेले आहे. खरे तर कधी कधी अधिकारीच याला फुस लावतात की, विलंब करायचा असेल किंवा ही प्रक्रिया लांबवायची असेल, कायद्याची अंमलबजावणी करायची नसेल तर कोटार्त जावे. मग संबंधित माणूस सिव्हील कोर्टात जातो. कधी तो इंडस्ट्रीयल कोर्टात जातो. अशा प्रकारे सुप्रिम कोर्टापर्यंत केस लांबत लांबत जातो. या संदर्भातील ॲक्ट इंम्पिलमेंट करण्यासाठी माणूस बेचिराख होतो. परंतु त्याला त्या कायद्यानुसार न्याय मिळत नाही. याकरिता येणारा खर्च पाहिल्यानंतर तो कायदा नसलेलाच बरा, असे कुठेतरी वाटायला लागते. ही वस्तुस्थिती आहे, ही प्रत्येकाला माहिती आहे. आज प्रत्येक डिव्हीजनमध्ये पाहिले तर ठाणा, नाशिक, पुणे येथे कमीत कमी बंद पडलेल्या 80 टक्के कामगारांची देणी आज निश्चितपणे मिळालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. कायदा असताना देखील सुरक्षित नसलेला माणूस कायदा नसताना किती सुरक्षित राहील, असे प्रश्नचिन्ह आमच्यासारख्या लोकप्रतिनिधीच्या मनात उभे राहते. आमचा विरोध याच गोष्टीला आहे ? हे राज्य या ठिकाणी कायद्याचे राज्य म्हणून प्रसिध्द आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, कोरम नसतानाही नियमाच्या विरुध्द आपले सभागृह चालू शकत नाही. कोरम असला तर चालवा सत्तारुढ पक्षाची जबाबदारी आहे. संसदीय कार्यमंत्री यांचीही खरी म्हणजे कोरम ठेवण्याची जबाबदारी आहे. त्यांना सांगून कोरम उपस्थित राहण्याकरिता बेल मारा. सन्माननीय सदस्यांना आत बोलवा. काही सन्माननीय सदस्य लॉबी मध्ये बसलेले आहेत. या बिलावरील सन्माननीय सदस्यांचे एवढे चांगले सुविचार ऐकण्याकरिता सदस्य आत येऊ शकत नसतील तर ते योग्य नाही. कोरमकरिता बेल वाजविण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट : सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे पोट तिडकीने कामगारांच्या बिलावर आपले विचार मांडत आहेत. असे असताना त्यांच्याच पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे त्यांना कसे काय डिस्टर्ब करु शकतात ? सभागृहाचे कामकाज चालू ठेवा. मी सन्माननीय सदस्यांना उपस्थित राहण्याकरिता निरोप देतो. तोपर्यंत बिल होऊन जाईल.

( कोरमची बेल वाजविण्यात येते.)

....डब्ल्यूडब्ल्यू-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे.......

अध्यक्ष महोदय, मला मंत्री महोदयांनी मघाशी मला तशा प्रकारचे कायद्यात काही नाही असे सांगितले होते. मला महाराष्ट्र कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे दिनांक 30 मार्च, 2016 रोजी पत्र दिलेले आहे. मंत्री महोदयांना देखील असे पत्र प्राप्त झालेले असेल, असे मला वाटत आहे. सदर पत्रात त्यांनी काय म्हटले आहे ते मी वाचून दाखविणार आहे.

विषय : "कंत्राटी कामगार कायद्यातील प्रस्तावित बदलांना विरोध करण्याबाबत.

प्रिय महोदय,

महाराष्ट्र राज्य कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने आम्ही खालील निवेदन करीत आहोत.

महाराष्ट्र राज्य कामगार संघटना संयुक्त कृती समितीमध्ये बीएमएस, भारतीय कामगार सेना, इंटक आयटक, सिटू, हिंदू, मजदूर सभा, एनटीयूआय इत्यादी मध्यवर्ती कामगार संघटना तसेच राज्य व केंद्र सरकार, एल.आय.सी. बॅक्स इत्यादी कामगार संघटनाच्या फेडरेनशन्सचा समावेश आहे.

महाराष्ट्र सरकारने कॉन्ट्रॅक्ट लेबर ( रेग्यूलेशन ॲण्ड ॲबॉलेशन ॲक्टमध्ये) खालील अमेंडमेंट प्रस्तावित केली आहे. सध्या कंत्राटदाराला 20 कामगार कंत्राटी पध्दतीने कामावर ठेवावयाचे असल्यास त्याला कामगार खात्याकडून प्रमाणपत्र प्राप्त (लायसन्स) प्राप्त करावे लागते.

**तालिका सभाध्यक्ष** : सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, प्रस्तावित अमेंडमेंटनुसार 50 कामगारापर्यंत कंत्राटी कामगार ठेवायचे असल्यास त्याला कामगार खात्याकडून प्रमाणपत्र प्राप्त करण्याची आवश्यकता राहणार नाही. या अमेंडमेंटमुळे लक्षावधी कंत्राटी कामगार कायद्यांच्या संरक्षणापासून वंचित होणार आहेत. कंत्राटी कामगारांना नोकरीची सुरक्षितता लाभणार नाही. भविष्यनिर्वाह निधी, बोनस, कामगार विमा योजना इत्यादी सर्व कामगार कायद्यांचे संरक्षण काढून घेण्यात येणार आहे. कॉन्ट्रॅक्ट लेबर ( रेग्युलेशन ॲण्ड ॲबॉलेशन ) ॲक्ट अन्वये कंत्राटी कामगारांना समान कामास समान वेतनाचा अधिकार देणात आला आहे. मालकावर आणि कंत्राटदारावर हजेरी कार्ड, मस्टर

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे.......

रोल, ओळखपत्र देण्याचे बंधन घालण्यात आले आहे. ही बंधने आता त्यांच्यावर राहणार नाहीत. कॅन्टीन, रेस्ट रुम, स्वच्छता गृह इत्यादी विषयक नियम पाळण्याचे बंधन मालकावर व कंत्राटदारावर राहणार नाही. त्यामुळे कामगारांचे जीवन गुलामगिरीचे व वेठबिगार सदृश होईल. कोणत्याही कायद्यातील बदल कामगारांचे अधिकार व हक्क वाढविण्यासाठी केले जातात. परंतु, प्रस्तावित बदलांमुळे कायद्यानुसार कामगारांना दिलेले अधिकार व संरक्षण काढून घेण्यात येणार आहे. शासनाचे हे कृत्य भारतीय राज्य घटनेच्या मार्गदर्शक तत्वांच्या विरोधी आहे. म्हणून आपण कॉन्ट्रॅक्ट लेबर ( रेग्युलेशन व ॲबॉलेशन ) ॲक्ट मधील प्रस्तावित बदलांना विरोध करावर व हे बिल पास होऊ देऊ नये, अशी कळकळीची विनंती त्यांनी केलेली आहे".

अध्यक्ष महोदय, मघाशी मंत्री महोदयांनी दिलेल्या क्लेरिफिकेशनमध्ये आणि या क्लेरिफिकेशनमध्ये खूप मोठी तफावत आहे. मंत्री महोदयांनी 20 कामगारांसाठी संरक्षण होते, आता कायद्याप्रमाणे 50 कामगारांना संरक्षण मिळणार आहे. 21पासून हजार कामगार असले तरी अशा कामगारांना कायद्यामध्ये संरक्षण देण्याची मागणी केली जात आहे. 50 कामगारांना कायद्यानुसार संरक्षण मिळणार आहे. या ठिकाणीच आमचा आक्षेप आहे. 20 कामगारांची चौकट सोडून 50 कामगारांसाठीची तरतूद केलेली आहे. आताची कंत्राटी पध्दत काय आहे ? सद्य:स्थितीत मिनिमम व्हेजेस ॲक्टमध्ये किती कामगारांना कव्हर केले जाते. किती ॲक्टमध्ये लागू केले जाते. किती कामगार कायदे आणि ते कशा पध्दतीने पाळले जातात याचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे. कंत्राटदार नेमला जातो. असा कंत्राटदार स्थानिक नेमला जातो. असा कंत्राटदार दादागिरी किंवा बाहुबलीच्या जोरावर स्थानिक लोकांनी कायदा मान्य केला तर तो मारहाण करीत असतो. संबंधित कंत्राटदार कायद्याची अंमलबजावणी करण्यास प्रचंड विरोध करीत असतो. कंपनीची मॅनेजमेंट कायदा लागू करण्यासाठी असावी की, कंपनीच्या मॅनेजमेंट वेगळ्या प्रकारचा अधिकार वापरुन वेगळ्या प्रकारची ताकद वापरुन वेळ पडली तर पोलीस यंत्रणेची मदत घेऊन कामगार चळवळीला दाबण्याचा आणि चिरडण्याचा प्रयत्न करतात, अशी वस्तुस्थिती आहे.

XX-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे .....

गेल्या नऊ दहा वर्षापासून इंजिनिअर झालेली मुले कंपन्यांमध्ये कंत्राटी पध्दतीने काम करीत आहेत. पुणे, रायगड येथे जी इंडिस्ट्री हब आहे तेथे कामगार आयुक्तांनी तपासणी केली तर कंपनीमध्ये असलेल्या कमगारांपैकी 10 टक्के कामगार कायम असतील आणि 90 टक्के कामगार कंत्राटी पध्दतीने काम करीत आहेत. शासनाने कामगारासंबंधी केलेल्या कायद्याची अंमलबाजणी या कंपन्या करीत नाहीत. कंत्राटी पध्दतीने हे कामगार काम करीत असल्यामुळे यांना कधीच न्याय मागण्याचा हक्क कंपनीकडे रहात नाही. गुजरात राज्याचे उदाहरण मी या ठिकाणी देणार नाही . आज चिन सारख्या देशामध्ये कामगारांना न्याय मागण्याची परवानगी दिली जात नाही. जागतिक बाजारपेठेमध्ये कामगारांच्या मागण्यांचा उद्रेक झाल्यामुळे कंपन्या बंद पडतात. इंजिनिअरिंगचे शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांना कंपन्यामध्ये कायमस्वरुपी नोकरी मिळत नसेल तर मुले इंजिनिअरिंगकडे सुध्दा वळत नाहीत. आठ, दहा वर्षे कामगारांना कंपन्यामध्ये कायम केले जात नाही, ही अतिशय दुर्दैवी बाब आहे.

अध्यक्ष महाराज, मी जास्त लांबचे उदाहरण देणार नाही. आपल्या विधिमंडळात कायदे तयार केले जातात, परंतु मंत्रालय, तसेच जिल्हा परिषदा या सारख्या कार्यालयात आज 70 टक्के लोक कंत्राटी पध्दतीने काम करीत आहेत. पूर्वी एक काळ असा होता की, या विधिमंडळाने कायदा केल्यानंतर त्याची अंमलबजावणी जशीच्या तशी केली जात असे, त्याच ठिकाणी आज कंत्राटी पध्दतीने कामगार नियुक्त केले जात आहेत. आमच्या पक्षाचे सरकार असताना आम्ही ते करु शकलो नाही म्हणून तसे धाडस आपण करु शकणार नाही, ही सरकारची भूमिका योग्य नाही .

अध्यक्ष महाराज, आम्ही शेतकऱ्यांचे तसेच कामगारांचे प्रतिनिधी म्हणून निवडून येतो. परवाच्या दिवशी कामगार विभागाच्या मागण्यांवर चर्चा होती त्या दिवशी केवळ सन्माननीय सदस्य श्री.प्रशांत ठाकूर आणि अन्य एक दोन सन्माननीय सदस्यांनी कामागारांच्या समस्यांविषयी प्रश्न उपस्थित केले. याच विधिमंडळाच्या अखत्यारित अधिवेशन सत्रामध्ये काम करणाऱ्या जवळपास 40 लोकांना कायम करण्यासाठी मी सरकारला भाग पाडले. गेल्या पंधरा, वीस वर्षापासून मंत्रालय तसेच आमदार निवासामध्ये ही मंडळी काम करीत होती .

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी :** रेन्टल ॲक्ट संदर्भात वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांवरुन भाडेकरुंमध्ये असलेले भीतीचे वातावरण

**मु.शी.:** रेन्टल ॲक्ट संदर्भात वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांवरुन भाडेकरुंमध्ये असलेले भीतीचे वातावरण यासंबंधी कामगार मंत्र्यांचे निवेदन

श्री.प्रकाश महेता (कामगार मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने पुढील निवेदन करतो .

अध्यक्ष महाराज, गेल्या चार पाच दिवसापासून वर्तमानपत्रातून आलेल्या बातम्यांमुळे मुंबई तसेच राज्यातील भाडेकरुंमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. केंद्र सरकारच्या आदेशावरुन रेन्ट कंट्रोल ॲक्टमध्ये बदल होणार आहे त्यामुळे भाडेकरुंना वेठीस धरले जाणार आहे, याबाबत सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री राज पुरोहित, मंगलप्रभात लोढा या सन्माननीय सदस्यांनी शासनाची भूमिका स्पष्ट करावी, अशी सूचना केली. या सूचनेवर मी माझे निवेदन करु इच्छितो की, रेन्टल ॲक्ट संदर्भात निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणामुळे मी आज सकाळी माननीय केंद्रिय शहरी विकास मंत्री श्री.व्यंकय्या नायडू तसेच सह सचिव श्री.मिश्रा यांना एकत्रितरित्या भेटलो. मॉडेल रेन्ट ॲक्टसंदर्भात केंद्र सरकार राज्यांशी चर्चा करीत आहे. पंतप्रधान आवास योजनेमध्ये जे सूचित केले आहे त्यामुळे भाडेकरुंवर फार मोठी गदा येणार आहे. यामुळे भाडेकरुंना घराबाहेर काढले जाणार आहे . भाडेकरुंना 100 रुपये भाडे आकारणी केली जात होती ती आता वीस हजार रुपये होणार आहे, अशाप्रकारचे भीतीचे वातावरण भाडेकरुंमध्ये निर्माण झालेले आहे, अशी असंदिग्धता भाडेकरुंमध्ये आहे. मी या निवेदनाद्वारे स्पष्ट करु इच्छितो की, मॉडेल रेन्ट ॲक्टसंदर्भात केंद्र सरकारने राज्य सरकारकडून सूचना मागविल्या आहेत. याबाबतीत कोठलाही विचार राज्य सरकार तसेच केंद्र सरकारने केलेला नाही. पंतप्रधान आवास योजनेतंर्गत .... (अडथळा)... आपले कामगारांच्या हिताच्या दृष्टीने जसे तोंडपाठ आहे तसे माझेही भाडेकरुंच्या दृष्टीने तोंडपाठ आहे. आपण कामगारांसबंधी सकाळपर्यंत बसून चांगला धोरणात्मक निर्णय घेऊ. ......(अडथळा) ...... गेल्या तीस वर्षापासून आम्ही बघितलेले आहे...... (अडथळा).... माननीय केंद्रिय मंत्री श्री.व्यंकय्या नायडू यांनी स्पष्टपणाने सांगितले की, महाराष्ट्र राज्यातील

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता...

विशेषतः मुंबई, ठाणे या शहरातील भाडेकरुंचे हक्क अबाधित राहणार असून त्याला कोठलीही बाधा येणार नाही. शासन भाडेकरुंच्या हक्काचे परिपूर्णपणे संरक्षण करील. अशाप्रकारची शासनाची भूमिका मी स्पष्ट करीत आहे.

-------------

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री राज पुरोहित : अध्यक्ष महोदय, माननीय गृहनिर्माण मंत्री श्री प्रकाश महेता जी ने जो निवेदन किया है और दो दिन पहले माननीय मुख्यमंत्री जी ने निवेदन किया है जो पुरे महाराष्ट्र और मुंबई शहर के भाडुतों के मन में जो भय का वातावरण था, विशेष रूप से मैं श्री प्रकाश महेता जी को धन्यवाद देना चाहता हूं. हम तीनों दिल्ली में जाकर श्री वैकय्या नायडू जी से मिले और स्थिति स्पष्ट की. मुंबई और महाराष्ट्र के भाडुतों के मन में भय का वातावरण है, 200 गुना भाड़ा बढ़ जाएगा. इनको घर से बाहर निकाल दिया जाएगा. मॉडेल रेंट एक्ट लागू हो जाएगा. लोगों का जीवन उध्वस्त हो जाएगा. जैसा कि माननीय मंत्री जी ने स्पष्ट कहा है, केंद्र सरकार ने स्पष्ट किया है कि जो मॉडेल रेंट एक्ट है, एक पॉलिसी स्टेटमेंट है, राज्य ने लेना या नहीं लेना यह राज्य सरकार पर निर्भर है. इसलिए किसी भी प्रकार से भाडुतों को डरने की कोई जरूरत नहीं है. किसी भी भाडुतों को बाहर नहीं निकाला जाएगा. श्री प्रकाश महेता जी ने समय निकालकर भाडुतों को न्याय देने का काम किया इसलिए मैं इस सरकार को बहुत बहुत धन्यवाद देना चाहता हूं. नेता होने के नाते एकता संघ की ओर से मैं उनका अभिनंदन करना चाहता हूं. श्री प्रकाश मेहता जी का आभार व्यक्त करता हूं. भाडुतों को न्याय मिला. भाडुतों का डर खत्म हुआ. धन्यवाद.

यानंतर YY-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, निवेदनाबद्दल मंत्री महोदयांना धन्यवाद दिलेले आहेत. मी फक्त एकच सूचना व विनंती करु इच्छितो की, केंद्रीय गृहनिर्माण सचिव खात्यातील अधिकारी आणि राज्यातील गृहनिर्माण सचिव खात्यातील अधिकाऱ्यांची एक बैठक या 15 दिवसांत, महिन्याभरात तातडीने करावी. प्रस्तावित अंतरिम मसुदा हा केंद्र सरकार कॅबिनेटपुढे जेव्हा केव्हा नेईल त्या आधी राज्य सरकारला स्वत:चे मत मांडण्याचा अबाधित अधिकार आहेच परंतु, त्या मसुद्यामध्येच राज्यातील भाडेकरुंचे हितही यावे, यासाठी तातडीच्या बैठकीची विनंती मी राज्य सरकारकडे करतो आणि आता तरी हे भय गेल्याबद्दल धन्यवाद.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, अतिशय महत्त्वाचे निवेदन मंत्री महोदयांनी केलेले आहे. जी बातमी काही दिवसांपूर्वी वृत्तपत्रात आली होती, तिच्यामध्ये बरेच तथ्य आहे हेही या निमित्ताने सिद्ध होते. माझ्या मनातील शंका आपल्या निवेदनाने दूर झालेली नाही. केंद्र सरकारकडून ज्यावेळेस कायदा केला जाईल, त्याच्या फ्रेममध्येच राहून आपल्याला आपला कायदा करता येऊ शकतो. आपण केंद्र सरकारने गृहनिर्माणाबाबत भाडेकरुच्या बाबतीत रेंट ॲक्टला टच होणारा कायदा केला तर, तो कायदा हा केंद्र सरकारच्या कायद्या पलीकडे जाऊ शकणार नाही. त्याच्या पलीकडे आपल्या कायद्याला अधिकार व अर्थ राहणार नाही.

सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार म्हणत आहेत ते महत्त्वाचे आहे. ताबडतोबीने ते म्हणत आहेत, तशी बैठक बोलवावी. मुंबईतील, महाराष्ट्रातील भाडेकरुंच्या हिताला धक्का लागणार नाही. त्यांचे भाडे दामदुप्पटीने वाढणे वगैरे शंका सांगून मी वेळ घेत नाही. परंतु, अशा कोणत्याही गोष्टी होणार नाहीत, याची जबाबदारी माननीय श्री. प्रकाश महेता आपण घेतली पाहिजे. मुंबई महानगरपालिकेची निवडणूक जवळ येऊ लागली आहे, तिचा संबंध फार आहे. तुम्हाला पुण्यात बसून मुंबईच्या लोकांची गंमत पाहण्याची सवय लागली आहे. मुंबईत बिचारे सन्माननीय सदस्य श्री. राज पुरोहित किती कष्ट करतात हे आम्हाला माहीत आहे. आज सकाळी मी एका ठिकाणी गेलो असता तेथील माणसे मला म्हणाली की त्यांना सन्माननीय सदस्य श्री. राज पुरोहित यांना भेटायचे आहे. ओव्हल मैदानात सर्कसची परवानगी पाहिजे, वगैरे करिता मोठे शिष्टमंडळ मंत्री महोदयांऐवजी सन्माननीय सदस्य श्री. राज पुरोहित यांना भेटायला जाते कारण ते जागरुक



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील ....

आमदार आहेत. ते मतदारसंघाची किती काळजी घेतात हे मला जवळून माहीत आहे. हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. आपण कृपा करून यासाठी सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांची सूचना मान्य करावी आणि त्या बैठकीला आमच्या सारख्या लहान लोकांनाही बोलावण्याचा प्रयत्न करावा. यासंबंधात ज्या संघटना, 1-2 संस्था आहेत त्या सन्माननीय सदस्य श्री. राज पुरोहित यांना माहीत आहेत, त्यांच्या प्रतिनिधींनाही आपण कृपया बोलवावे.

**तालिका सभाध्यक्ष :** मंत्री महोदय आपण सर्व सन्माननीय सदस्यांना एकत्रितरित्या उत्तर द्यावे. आता बिलावरील चर्चा पूर्ण होईल असेल मला वाटत नाही.

श्री. सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी जे निवेदन केले, त्या निवेदनाचे या सदनामध्ये खऱ्या अर्थाने मुंबईकरांच्यावतीने स्वागत केले पाहिजे. याचे कारण परवा वृत्तपत्रात छापून आलेल्या बातमीनंतर शहरातील अनेक भाडेकरुंच्या मनात भितीचे वातावरण होते. अशाप्रकारचा रेंट ॲक्ट आल्यानंतर भाडे दुप्पटी-तिप्पटीने वाढेल काय, याबाबतचा संभ्रमही होता. परंतु, आज मंत्री महोदयांनी निवेदन केले, केंद्रीय मंत्र्यांना भेटून त्यांच्याकडून जी काही माहिती उपलब्ध झाली, ती या सभागृहासमोर सादर केली.

माझी मंत्री महोदयांना एवढीच विनंती आहे की, राज्य सरकारच्यावतीने मसुदा तयार करीत असताना आपण सचिवांना बोलवाच परंतु सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार माझे एवढेच मत आहे की, या सदनाच्या सदस्यांची देखील एक समिती हे बिल करीत असताना नेमली आणि त्यांच्याकडून आलेले सजेशनही यामध्ये अंतर्भूत केले, त्याचबरोबर या सदनाच्या बाहेर भाडेकरुंच्यावतीने जे अनेक लोक अनेक वर्ष संघर्ष करीत आहेत, जे हित जपण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांच्यापैकी काही सदस्यही या समितीत नेमले गेले तर त्यांचे जे म्हणणे आहे ते अंतर्भूत करुन त्यांना आवश्यक असणाऱ्या गोष्टी केल्या जातील.

दुसरे असे आहे की, केंद्र सरकारने माझ्या माहितीप्रमाणे जरी हे बिल केले असले तरी देखील ज्या शिफारशी राज्य सरकारला मंजूर नसतील त्या स्वीकारणे किंवा नाकारणे ही राज्य सरकारची जबाबदारी असणार आहे. त्यामुळे भाडेकरुंच्या विरोधात अशाप्रकारच्या कुठच्या शिफारशी करण्यात आल्या तर, मुंबईच्या हिताच्यादृष्टीने त्या राज्य सरकार नाकारुही शकते. त्यामुळे आपण निवेदनामध्ये याचाही अंतर्भाव करावा, अशी माझी विनंती आहे.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील व ॲड. आशिष शेलार यांनी जी मिटिंग घेण्यास सांगितलेली आहे, ती 15 दिवसांच्या आत महाराष्ट्रातील गृहनिर्माणच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांसह होणारच आहे. मी परत एकदा स्पष्ट करतो की, केंद्र सरकारचे माननीय मंत्री यांना राज्याची भूमिका आम्ही स्पष्टपणे सांगितली आहे आणि त्यांनी ती मान्य केली आहे की, भाडेकरूला संरक्षणाचा आज जो कायदा आहे, त्यामध्ये कुठलाही दुसरा कंट्रोल ॲक्ट आला तरी, त्याचा समावेश भाडेकरुंना संरक्षित करणाराच असणार, जे राज्य सरकार सांगणार ते. राज्य सरकारचीसुध्दा स्पष्ट भूमिका आहे की, आज भाडेकरुना जे संरक्षण आहे ते या शहर व राज्यामध्ये कायम राहणार याबाबतीत कुठलेही दुमत नाही.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय जोराने बोलले म्हणजे मला खात्री पटेल असे नाही. केंद्र सरकारच्या कायद्याने आपल्या महाराष्ट्रात जो जुना कायदा आहे, त्या जुन्या कायद्याचा अधिकार कमी होणार नाही, एवढा प्रोव्हीजो त्यात समाविष्ट करावा, आमची तक्रार नाही.

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने जर असा कायदा आणला तर, परंतु केंद्रीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, अजून अशाप्रकारचा कुठलाही प्रस्ताव विचाराधीन सुद्धा नाही.

श्री. जयंत पाटील : आपण सभागृहाची दिशाभूल करीत आहात. ...

श्री. प्रकाश महेता : सन्माननीय सदस्य आपण माझे पूर्ण बोलणे ऐका व नंतर बोला. मी तुमची दिशाभूल करु शकत नाही व सभागृहाचीही करीत नाही. आपल्याला जोराने बोललेले आवडत नाही तर मी हळुवारपणे सांगतो ते आपण ऐकावे. आम्हाला भाडेकरुंबाबत खूप कळकळ आहे. मी राजकारणावर बोलत नाही. उपनगरातील भाडेकरुंना संरक्षण देण्यासंबंधी अफझलपूरकर समितीचा अहवाल सन 1999 मध्ये पूर्ण झाल्यानंतरही सन 2000 ते सन 2015 पर्यंत तुम्ही लोकांनी 7 जी.आर. काढून पुढचे काहीच काम केले नाही. मला माफ करा ठीक आहे, ते राहिले त्याबाबत मला राजकारण करावयाचे नाही. परंतु, केंद्र सरकारच्या कुठल्याही कायद्यात या मुंबई व या राज्यातील भाडेकरुंना आज जे संरक्षण आहे, ते संरक्षण अबाधितच राहणार, ही राज्य

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश महेता .....
सरकारची भूमिका आहे आणि केंद्राने ती मान्य केली आहे, विषय येथेच संपला. या पलीकडे जाऊन मी तुम्हाला सांगतो की, कायद्याने, कायद्याच्या कलमाने सर्व भाडेकरुंना आजचे संरक्षण कायम राहणार आहे.

श्री राज पुरोहित : अध्यक्ष महोदय, यह प्रश्न लाखों लोगों से संबंधित है. पूरा डिस्क्शन गलत दिशा की ओर जा रहा है. आज महाराष्ट्र में भाड़ेकरु के संबंध में कानून है. महाराष्ट्र रेंट एक्ट कानून है. इसमें किसी भी प्रकार का परिवर्तन केंद्र सरकार नहीं कर सकती. (व्यवधान) यह मैंने बनाया है, मेहनत की है. इसके लिनए मैंने 8-10 साल काम किया है. मैं यह कहना चाहता हूं कि मॉडेल रेंट एक्ट पॉलिसी एक गाइडलाइन्स है. वह मानने के लिए हम बाध्य नहीं है. किसी भी प्रकार से महाराष्ट्र के भाडुतों को डरने की जरूरत नहीं है.

श्री. जयंत पाटील : असे असेल तर आनंद आहे. त्याबद्दल तक्रार नाही. भाडेकरुंच्या संरक्षणासाठी एकदा देशात मॉडेल ॲक्ट झाला की, हळुहळू लोक कोर्टात जाणार, त्यांच्यातील आणि आपल्यातील फरक दाखविणार, ते अंतर कमी करण्याचा प्रयत्न करणार, मग आपली अडचण होईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ZZ-1/...

श्री. जयंत पाटील.....

त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, आपण केंद्र सरकारमध्ये मॉडेल ॲक्ट हा राज्यांना ऑप्शनल ठेवावा, अशी एक ओळ टाकावी. तसे झाल्यावर माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेब आपलेही ऐकणार नाही आणि आमचेही ऐकणार नाही. निवेदनावर कधीही चर्चा झालेली नाही. परंतु आपण आज प्रिसीडेंट पाडलेला आहे. यापुढे कुठलेही निवेदन झाल्यास आम्हाला बोलण्याची संधी द्यावी, ही विनंती करतो.

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांची एका ओळीची सुधारणा आहे. मॉडेल रेंट कंट्रोल ॲक्ट आला तर त्यामध्ये राज्य सरकारचे आज जे मत आहे, त्या मताचा मॉडेल रेंट कंट्रोल ॲक्टमध्ये समावेश असणारच एवढ्या खात्रीने केंद्रातील माननीय मंत्र्यांनी आम्हाला सांगितलेले आहे. मी जबाबदारीने बोलत आहे. निश्चितपणाने महाराष्ट्रातील आणि मुंबईतील भाडेकरुंना केंद्राचा कोणताही कायदा आला तरी त्यामध्ये बाधा येणार नाही.

-----

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO. II OF 2016 (A BILL FURTHER TO AMEND THE CONTRACT LABOUR (REGULATION AND ABOLITION) ACT, 1970, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, त्रिपक्षीय सल्लागार समित्या बरखास्त करण्याचे सरकारचे धोरण आहे. माझे चुकीचे असेल. परंतु माननीय पंतप्रधानांच्या ार्यालयातून...(अडथळा)...

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, आपण मूळ चर्चेवरुन व मूळ बिलावरुन माननीय पंतप्रधानांपर्यंत जावून आलात. परंतु आपण सभागृहामध्ये जी चर्चा करतो आणि आज सरकारने जे बिल मांडलेले आहे, त्यामध्ये देशाच्या माननीय पंतप्रधानांनी कामगार चळवळीवर बाधा आणली, अशा प्रकारचा विषय नाही. तुम्ही इतर मांडलेल्या मुद्यांचे उत्तर माझ्याकडे आताही आहे. या बिलापुरते आपण मांडलेले मुद्दे आणि सयुक्त कृती समितीने मांडलेले मुद्दे यांच्या डाऊट्स संदर्भात शासनाची भूमिका स्वच्छ आहे. आपले भाषण संपल्यावर मी त्याबाबत उत्तर देतो.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितलेली बाब मी मान्य करतो. माझी कदाचित चुकीची माहिती असेल. राज्यस्थान येथील कामगार कायद्याच्या धर्तीवर सर्व राज्यांनी बदल करावा, अशा प्रकारची सूचना आपल्याला केंद्रातून आली, अशी माझी माहिती आहे. ती चुकीची असेल. परंतु आपण त्याचे स्पष्टीकरण करावे. या राज्यामध्ये किंवा या देशामध्ये चळवळ सुरु झाली. महात्मा ज्योतिबा फुले, भिमरावजी लोखंडे अशा प्रबोधनाच्या चळवळीतील महान नेत्यांनी या आंदोलनाच्या माध्यमातून नोकरीतील कामाची वेळ आठ तास असावी, अशा

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे.....

प्रकारची मागणी करुन त्यावेळी आंदोलने केली. गिरणी कामगारांसाठी फार मोठी चळवळ उभी राहिली. त्याप्रमाणे त्यावेळी फॅक्ट्री ॲक्ट करण्यात आला. मी एवढेच सांगणार आहे की, त्यामध्ये दिवसातून कामाचे आठ तास, साप्ताहिक सुट्टी, ओव्हर टाईम, वार्षिक रजा, सुरक्षेचे नियम अशा प्रकारचे कामगार कायदे आणण्याचा निर्णय घेतला. कामगार क्षेत्राच्या माध्यमातून काही अधिकार आणि काही हक्क आहेत. ते हक्क आमच्या अधिकाराचे आहेत. या हक्कांना डावलण्यासाठी कोणी कामगार कायदा आणत असेल, या हक्काला बाजूला करण्यासाठी आऊट सोर्सिंग, कॉन्ट्रॅक्ट पद्धत, वेठ बिगारी पद्धती आणण्याचा प्रयत्न होत असेल तर त्याला विरोधी करणे आमचे कर्तव्य आहे.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. योगेश सागर) :** सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांना विनंती करतो की, आता आपण ही चर्चा ऑन लेग ठेवू. सदरहू चर्चा सोमवार, दिनांक 11 एप्रिल 2016 रोजी घेण्यात येईल.

सर्व सन्माननीय सदस्यांना गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सोमवार, दिनांक 11 एप्रिल 2016 रोजी सकाळी 11.00 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक 6.34 वाजता सोमवार, दिनांक 11 एप्रिल 2016 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

---*---

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION